महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेल्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास व त्याचा स्त्री जीवनावरील दृश्य परिणाम

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

शिक्षणशास्त्र विद्याशाखांतर्गत

शिक्षणशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती

(पीएच.डी.) पदवीसाठी

सादर केलेला शोध प्रबंध

संशोधक

सौ. सुचिता राजू पवार

मार्गदर्शक

डॉ. अनुराधा सहस्त्रबुद्धे

सप्टेंबर २०२०

प्रतिज्ञापत्र

मी असे प्रतिज्ञापूर्वक जाहीर करते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, शिक्षणशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरिता सादर केलेला 'महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेल्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास व त्याचा स्त्री जीवनावरील दृश्य परिणाम' हा शोध प्रबंध मी स्वतः लिहिलेला असून तो पूर्णपणे स्वतंत्र आहे. हा प्रबंध मी इतर कुठल्याही विद्यापीठात कोणत्याही पदवीसाठी किंवा अन्य परिक्षेसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण : – पुणे

सौ. सुचिता राजू पवार

(संशोधक)

दिनांक : –

प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, येथे शिक्षणशास्त्र विषयाअंतर्गत विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी सादर केलेला 'महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेल्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास व त्याचा स्त्री जीवनावरील दृश्य परिणाम' हा शोध प्रबंध सौ. सुचिता राजू पवार यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली लिहिलेला आहे. माझ्या माहितीप्रमाणे तसेच देण्यात आलेल्या खात्रीने मी असे घोषित करते की, सदर शोध प्रबंध इतर कोणत्याही विद्यापीठास किंवा परीक्षण मंडळास सादर केलेला नाही.

ठिकाण : – पुणे

डॉ. अनुराधा सहस्त्रबुद्धे

(मार्गदर्शक)

दिनांक : –

ऋणनिर्देश

प्रस्तुत प्रबंध पूर्ण करताना अनेकांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. त्या सर्वांप्रती ऋण व्यक्त करणे हे संशोधिका आपले कर्तव्य समजते. या सर्वांच्या मदतीशिवाय प्रबंध पूर्ण होवू शकला नसता. म्हणून संशोधिका सर्वांचे आभार प्रदर्शित करीत आहे.

सर्वप्रथम मार्गदर्शक डॉ. अनुराधा सहस्त्रबुद्धे मॅडम यांच्याप्रती मनःपूर्वक आभार प्रकट करते. कारण संशोधन करताना मार्गदर्शकाची भूमिका महत्त्वाची असते. सदर प्रबंधाच्या विषय निश्चितीपासून ते अहवाल लेखनापर्यंत सर्व बाबींसाठी त्यांनी वेळोवेळी योग्य मार्गदर्शन केले, त्यासाठी प्रोत्साहन दिले. माहिती संकलन करण्यासाठी मदतही केली. मुलाखती दरम्यान आवश्यक ती माहिती कशी मिळवावी? यासाठी निरपेक्षपणे मार्गदर्शन केले. त्यांच्या बहुमोल मार्गदर्शनामुळेच प्रबंध पूर्ण होवू शकला. म्हणून संशोधिका त्यांची सदैव ऋणी राहील.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे प्रमुख मा. श्री. टिळक सर, पीएच.डी. विभागाच्या अधिष्ठाता, शिक्षणशास्त्र विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, कार्यालयीन कर्मचारी यांच्या सहकार्याबद्दल संशोधिका त्यांचे मनःपूर्वक आभार मानते.

तसेच महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, संस्थेचे सचिव, संस्थेतील कर्मचारी वर्ग, महिलाश्रम हायस्कूल प्रशालेच्या प्राचार्या, शाला समिती अध्यक्षा, पार्वतीबाई अध्यापिका विद्यालयाच्या प्राचार्या, सिद्धीविनायक महाविद्यालयाच्या प्राचार्या, एस.एन.डी.टी. महाविद्यालयाच्या प्राचार्या व माझे सहशिक्षक यासर्वांचे महर्षी कर्वे यांच्या कार्याची माहिती मिळवण्यासाठी सहकार्य लाभले. त्याबद्दल सर्वांचे आभार!

माहिती संकलन हा प्रबंधाचा गाभा आहे. त्याशिवाय प्रबंध पूर्ण होवू शकत नाही. त्यासाठी महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या माजी विद्यार्थिनी व एस.एन.डी.टी. महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी यांनी माहिती देण्यासाठी प्रश्नावली व मुलाखतीद्वारे सहकार्य केले. मुलाखती दरम्यान काही वयस्कर विद्यार्थिनीही भेटल्या की, ज्यांनी म. कर्वे यांना प्रत्यक्ष पाहिले असून त्यांच्या सहवासात दिवस घालवले होते. त्यामुळे त्यांना फ ारच आनंद झाला व त्यांनी सहजगत्या, गप्पांच्या ओघात महर्षी कर्वे यांच्या कार्यासंबंधी महत्त्वपूर्ण माहिती दिली. त्या सर्वांनी आपला वेळ देऊन प्रबंधासाठी आवश्यक माहिती दिली. त्याबद्दल संशोधिका त्यांची आभारी आहे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या महाविद्यालयातील ग्रंथालय कर्मचारी, आय.आय.ई मधील ग्रंथालय विभाग, सावित्रीबाई फुले विद्यापीठातील शिक्षणशास्त्र विभागाचे ग्रंथालयीन कर्मचारी, महिलाश्रम हायस्कूलच्या ग्रंथपाल या सर्वांनी प्रबंधास आवश्यक त्या संदर्भसाहित्याची उपलब्धता करुन दिली. त्याचा संशोधिकेस खूपच फायदा झाला. त्याबद्दल त्या सर्वांचीही संशोधिका आभारी आहे.

या प्रबंधासाठी मैत्रिणींकडून, सहकारी शिक्षकांकडून प्रेरणा मिळाली. त्यांनी वेळोवेळी हवे ते सहकार्य केले, प्रोत्साहन दिले. या सर्वांप्रती संशोधिका मनस्वी ऋण व्यक्त करीत आहे. अनेकांनी संशोधन कार्यास मनापासून शुभेच्छा दिल्या. तसेच माझ्या कुटुंबियांचेही मला सहकार्य लाभले व पाठिंबा मिळाला. या सर्वांमुळे संशोधन यशस्वीरित्या पूर्ण झाले असे संशोधिकेस वाटते. त्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार!

सौ. सुचिता राजू पवार

(संशोधक)

अनुक्रमणिका

अ. क्र.	शीर्षक	पान क्र.
१	शीर्षक	I
२	प्रतिज्ञापत्र	II
३	प्रमाणपत्र	III
४	ऋणनिर्देश	IV
५	कोष्टक यादी	XI
६	आलेख यादी	XII
७	फोटो यादी	XIII
८	सारांश	XVII
१	**प्रस्तावना**	१–२२
१.१	संशोधनाची प्रस्तावना	३
१.२	पार्श्वभूमी	६
१.३	संशोधनाची गरज	१०
१.४	संशोधनाचे महत्त्व	१४
१.५	शीर्षक	१५
१.६	समस्या विधान	१६
१.७	संशोधनाची उद्दिष्ट्ये	१६
१.८	संशोधन प्रश्न	१६
१.९	संकल्पनात्मक व्याख्या	१७
१.१०	कार्यात्मक व्याख्या	१७
१.११	संशोधनातील पद्धती	१७
१.१२	माहिती संकलनाची साधने	१८
१.१३	गृहीतके	१८
१.१४	व्याप्ती, मर्यादा, परिमर्यादा	१९
१.१५	जनसंख्या	२०
१.१६	नमुना निवडीच्या पद्धती	२०

१.१७	नमुना	२०
१.१८	संशोधन प्रकरणे	२१
१.१९	समारोप	२१
१.२०	संदर्भसूची	२२
२	**संबंधित साहित्याचा आणि संशोधनाचा आढावा**	२३–४८
२.१	प्रस्तावना	२५
२.२	संबंधित साहित्य व संशोधन आढाव्याचे महत्त्व	२५
२.३	संबंधित संदर्भ साहित्याचा आढावा	२६
२.४	पूर्व संशोधनाचा आढावा	२८
२.५	पूर्व संशोधनाचा आढावा व संशोधनातील वेगळेपणा	४७
२.६	संबंधित संशोधनाच्या व पूर्व संशोधनाच्या अभ्यासाचा उपयोग	४८
२.७	समारोप	४८
३	**संशोधनाची पद्धती व कार्यवाही**	४९–६२
३.१	प्रस्तावना	५१
३.२	शैक्षणिक संशोधनाचा अर्थ	५१
३.३	संशोधनाच्या पद्धती	५१
३.४	प्रस्तुत संशोधनातील पद्धती	५२
३.५	माहिती संकलनाची साधने	५६
३.६	जनसंख्या	५६
३.७	नमुना	५६
३.८	नमुना निवडीच्या पद्धती	५७
३.९	प्रस्तुत संशोधनातील नमुना	५७
३.१०	न्यादर्श निवडीचे निकष	५९
३.११	प्रश्नावलीची निर्मिती	५९
३.१२	प्रत्यक्ष कार्यवाही	६०
३.१३	पथदर्शक अभ्यास	६०
३.१४	संशोधनाची कार्यवाही	६१

३.१५	समारोप	६२
४	**माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन**	६३–१७१
४.१	प्रस्तावना	६५
४.२	माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन	६५
	भाग अ–प्राथमिक व दुय्यम स्त्रोत विश्लेषण	७१
४.३	प्राथमिक स्त्रोत– महर्षी कर्वे यांचे स्त्री शिक्षण विषयक कार्य	७१
४.४	दुय्यम स्त्रोत –महर्षी कर्वे यांचे स्त्री शिक्षण विषयक कार्य	११९
४.५	माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन	१४४
	भाग ब–गुणात्मक व संख्यात्मक विश्लेषण–प्रश्नावली व मुलाखत	
४.६	संशोधकाचे मत	१७०
४.७	समारोप	१७१
५	**सारांश, निष्कर्ष ,शिफारशी**	१७२–१९१
५.१	प्रस्तावना	१७५
५.२	शीर्षक	१७५
५.३	संशोधनाची गरज	१७६
५.४	संशोधनाचे महत्त्व	१७६
५.५	समस्या विधान	१७७
५.६	संकल्पनात्मक व्याख्या	१७७
५.७	कार्यात्मक व्याख्या	१७७
५.८	उद्दिष्ट्ये	१७८
५.९	संशोधन प्रश्न	१७८
५.१०	गृहीतके	१७९
५.११	संशोधनाची व्याप्ती,मर्यादा,परिमर्यादा	१७९
५.१२	संबंधित साहित्याचा आणि संशोधनाचा आढावा	१८०
५.१३	संशोधन पद्धती	१८२
५.१४	नमुना निवडीच्या पद्धती	१८२
५.१५	नमुना	१८२

५.१६	माहिती संकलनाची साधने	१८३
५.१७	महर्षी कर्वे यांचे स्त्री शिक्षणविषयक कार्य व परिणाम	१८४
५.१८	निष्कर्ष	१८५
५.१९	संशोधनाचे योगदान	१८७
५.२०	संशोधनाचे शैक्षणिक उपयोजन	१८८
५.२१	शिफारशी	१८८
५.२२	पुढील संशोधनासाठी विषय	१९०
५.२३	संशोधकाचा अभिप्राय	१९०
५.२४	समारोप	१९१
	संदर्भसूची	२०२–२०९
१	पुस्तके	२०४
२	मासिके	२०७
३	नियतकालिक	२०८
४	हस्तपुस्तिका	२०८
५	स्मरणिका	२०८
६	अहवाल	२०८
७	वृत्तपत्र	२०८
८	वेबसाईट	२०९
९	संशोधने	२०९
	परिशिष्ट	२११–२२३
अ	प्रश्नावली	२१३
ब	महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था शाखा विस्तार	२१८
क	महर्षी कर्वे यांचे विचार धन	२२१
ड	वर्तमानपत्रातील कात्रणे	२२३

कोष्टक यादी

प्रकरण क्रमांक	कोष्टक क्रमांक	शीर्षक	पान क्र.
१	१.१	महाराष्ट्र स्त्री – पुरुष साक्षरता प्रमाण	१२
	१.२	स्त्री शिक्षणाची आकडेवारी	१४
	१.३	माहिती संकलनाची साधने	१८
२	२.१	पूर्व संशोधनाचा आढावा	२८
३	३.१	उद्दिष्ट्यानुसार माहिती संकलनाची साधने	५६
	३.२	नमुना निवडीचे गट	५८
	३.३	न्यादर्श निवड संख्या	५९
४	४.१	विद्यार्थिनींची संख्या जातवारी	८०
	४.२	विद्यार्थिनींची संख्या स्थळवारी	८१
	४.३	विद्यार्थिनींची वाढती संख्या	११३
	४.४	महर्षी कर्वे संस्थेचे मूल्यमापन	१४५
	४.५	महर्षी कर्वे यांच्या कार्याचे महत्त्व	१४७
	४.६	महर्षी कर्वे यांच्या कार्याचे मूल्यमापन	१५०
	४.७	समाजाचा स्त्रीशिक्षणाविषयी दृष्टीकोन	१५२
	४.८	स्त्री शिक्षणाच्या सुविधा	१५४
	४.९	महर्षी कर्वे यांच्या कार्याची उपयुक्तता	१५६
	४.१०	शिक्षणाचा झालेला फायदा	१५८
	४.११	संस्थेचा उपयुक्त अभ्यासक्रम	१६०
	४.१२	महर्षी कर्वे यांच्या विचारांचा विद्यार्थिनींवरील प्रभाव	१६१

	४.१३	शिक्षणामुळे झालेले बदल	१६४
	४.१४	शिक्षणाचे महत्त्व /फायदे	१६७
५	५.१	नमुना निवडीचे गट	१८२
	५.२	माहिती संकलनाची साधने	१८३

आलेख यादी

प्रकरण क्रमांक	आलेख क्रमांक	शीर्षक	पान क्र.
१	१.१	भारताचे स्त्री–पुरुष साक्षरता प्रमाण	१३
४	४.१	विद्यार्थिनी संख्या पूर्व प्राथमिक व प्राथमिक	१००
	४.२	विद्यार्थिनी संख्या माध्यमिक	१०१
	४.३	विद्यार्थिनी संख्या महाविद्यालयीन	१०२
	४.४	विद्यार्थिनी संख्या वसतिगृह	१०२
	४.५	विद्यार्थिनी संख्या (सन १८९६ ते २००६)	१०३
	४.६	महर्षी कर्वे संस्थेच्या कार्याचे मूल्यमापन	१४६
	४.७	महर्षी कर्वे यांच्या कार्याचे महत्त्व	१४८
	४.८	महर्षी कर्वे यांच्या शैक्षणिक कार्याचे मूल्यमापन	१५१
	४.९	समाजाचा स्त्रीशिक्षणाविषयी दृष्टीकोन	१५३
	४.१०	स्त्री शिक्षणाच्या सुविधा	१५४
	४.११	महर्षी कर्वे यांच्या कार्याची सद्यस्थितीत उपयुक्तता	१५७
	४.१२	शिक्षणााचे फायदे	१५८
	४.१३	महर्षी कर्वे यांच्या विचारांचा स्त्रियांवर पडलेला प्रभाव	१६२
	४.१४	शिक्षणामुळे स्त्री जीवनात झालेला बदल	१६५
	४.१५	शिक्षणाचा स्त्री जीवनावरील दृष्य परिणाम	१६७

फोटो यादी

फोटो क्रमांक	शीर्षक	पान क्र.
१	महर्षी धोंडो केशव कर्वे	६७
२	संस्थेतील पहिल्या चार विद्यार्थिनी	७२
३	मूळ झोपडी	७४
४/५	वसतिगृह इमारत	७५
६	महिलाश्रम हायस्कूल/ एस.एन.डी.टी. महाविद्यालय	७८/८३
७	वसतिगृह (बालकल्याण विभाग)	८३
८	गृहशास्त्र वर्ग	९०
९	क्रीडा (लेझीम)	९०
१०	सर्वांगसुंदर व्यायाम	९१
११	पोहण्याचा तलाव	९१
१२	भाऊबीजनिधी सोहळा	९४
१३	आईनस्टाईन व म. कर्वे भेट	९६
१४	जपान युनिव्हर्सिटीला भेट	९७
१५	थोरांच्या भेटी	९७
१६	महर्षी कर्वे आणि सहकारी	९७
१७	महर्षी कर्वे यांना भारतरत्न पुरस्कार	१०७
१८/१९	महर्षी कर्वे यांना डी लिट पदवी	१०९
२०	महर्षी कर्वे संस्थेस मिळालेला पुरस्कार	११८
२१	पदवी प्रमाणपत्र (गृहितागमा)	१९२
२२	महिलाश्रम हायस्कूल	१९३
२३	अध्यापिका विद्यालय	१९३
२४	एरंडवणा मा. विद्यालय / विद्यापीठ हायस्कूल	१९४

२५	महिलांसाठी उच्च शिक्षणाच्या सुविधा संगणक पदवी फॅशन टेक्नॉलॉजी परिचारिका महाविद्यालय अभियांत्रिकी महाविद्यालय वास्तूशास्त्र महाविद्यालय व्यवस्थापन महाविद्यालय वसतिगृह कला व वाणिज्य महाविद्यालय	१९५
२६	वृद्धाश्रम	१९८
२७	थोरांच्या भेटी	१९९
२८	संस्थेचे प्रधान कार्यालय	२००
२९	महर्षी कर्वे व आनंदीबाई कर्वे	२०१

सारांश

अ. क्र.	शीर्षक	पान क्र.
१	प्रस्तावना	XVII
२	शीर्षक	XVII
३	संशोधनाची गरज	XVII
४	संशोधनाचे महत्त्व	XVIII
५	समस्या विधान	XX
६	संकल्पनात्मक व्याख्या	XX
७	कार्यात्मक व्याख्या	XVIV
८	उद्दिष्ट्ये	XX
९	संशोधन प्रश्न	XX
१०	गृहीतके	XX
११	संशोधनाची व्याप्ती,मर्यादा,परिमर्यादा	XXI
१२	संबंधित साहित्याचा आणि संशोधनाचा आढावा	XXI
१३	संशोधन पद्धती	XXIII
१४	नमुना निवडीच्या पद्धती	XXIII
१५	नमुना	XXIV
१६	माहिती संकलनाची साधने	XXIV
१७	महर्षी कर्वे यांचे स्त्री शिक्षणविषयक कार्य व परिणाम	XXV

१८	निष्कर्ष	XXVIII
१९	संशोधनाचे योगदान	XXX
२०	संशोधनाचे शैक्षणिक उपयोजन	XXXI
२१	शिफारशी	XXXI
२२	पुढील संशोधनासाठी विषय	XXXIII
२३	संशोधकाचा अभिप्राय	XXXIII

सारांश

१ प्रस्तावना

भारतीय शिक्षण व्यवस्थेतील स्त्री शिक्षण विषयक दृष्टीकोन पाहिल्यास असे लक्षात येते की, वैदिक काळात स्त्री शिक्षणाची स्थिती उत्तम होती. या संदर्भात मैत्रीयी, गार्गी अशा स्त्रियांची नावे आपणास माहिती आहेत, परंतु त्यानंतर स्मृती कालखंडापासून स्त्री शिक्षणाची स्थिती अत्यंत बिकट होत गेली. १८ व्या शतकात तर स्त्रियांनी शिक्षण घेऊच नये अशी स्थिती निर्माण झाली. पितृसत्ताक पद्धतीमुळे कुंटुंब व समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान दिले गेले. त्यानंतर स्त्री शिक्षण मागे पडले. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात सन १८४८ साली महात्मा फु ले यांनी स्त्रियांसाठी पहिली शाळा काढली व स्त्री शिक्षणाचा पाया घातला. त्यानंतर अनेक महापुरुषांनी स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली. विशेषतः महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी या क्षेत्रात अत्यंत भरीव कार्य केले. त्यामुळे स्त्री शिक्षणाची प्रगती झाली व स्त्री जीवनावर त्याचा इष्ट परिणाम झाला. प्रस्तुत संशोधनात यासंबंधी अभ्यास करण्यात आला आहे.

२ शीर्षक

'महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेल्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास व त्याचा स्त्री जीवनावरील दृश्य परिणाम'

३ संशोधनाची गरज

स्त्री शिक्षणाची त्यावेळची समाजातील स्थिती अत्यंत बिकट होती. तत्कालीन स्त्री जीवनाचे वर्णन ''रांधा वाढा आणि उष्टी काढा'' अशा शब्दात केले जाते. केवळ संसार, मुलबाळ, घरकाम हेच त्यांचे जगणे होते. स्त्रियांना कुटुंबात व समाजात कोणतेही हक्क, अधिकार, निर्णय स्वातंत्र्य नव्हते. समाजाच्या अनेकविध रुढी परंपरेत स्त्री जीवन अडकून पडले होते. त्यामुळे स्त्रीचे जगणे कठीण झाले. मग शिक्षण तर दूरच राहिले. अशा स्त्रियांना सुशिक्षित, कार्यक्षम व स्वावलंबी बनवण्याचे काम महर्षी कर्वे

यांनी केले. आणि त्याचा इष्ट परिणाम स्त्री जीवनावर कसा झाला हे जाणून घेणे आवश्यक वाटले.

४ प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व

काळ हा गतिशील आहे. कालानुरुप परिस्थिती बदलते. त्याचा परिणाम आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रात दिसून येतो. शिक्षण ही देखील गतिशील प्रक्रिया असून ती अखंड चालत रहाते. म्हणून जसजशी परिस्थिती, काळ बदलेल तसा शिक्षणातही बदल घडून यायला हवा.

१२० वर्षापूर्वी महर्षी कर्वे यांनी शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य केले. स्त्रियांसाठी शाळा, वसतिगृह, महाविद्यालय, विद्यापीठ उभारले. स्त्रियांची परिस्थिती, त्यांची गरज व काळानुरुप आवश्यक ते शिक्षण स्त्रियांना मिळावे असा दूरदृष्टी विचार महर्षी कर्वे यांनी केला. तत्कालीन सामाजिक परिस्थिती ध्यानात घेऊन समाजाभिमुख असा अभ्यासक्रम त्यांनी तयार केला. त्यामुळे त्यांचे कार्य प्रगतीशील राहिले (बेदरकर – २००७, स्मरणिका).

महर्षी कर्वे यांनी केलेले कार्य हे सद्य परिस्थितीतही उपयुक्त ठरते का म्हणून त्यांच्या कार्याची माहिती घेणे गरजेचे वाटते. सामाजिकतेचे भान ठेऊन शिक्षण क्षेत्रात कसे काम करावे ? हे महर्षी कर्वे यांच्या कार्यातून समजेल. शिक्षणाचा मनुष्यजीवनावर परिणाम होतो. तो परिणाम बहुतांशी सकारात्मक ठरतो. महर्षी कर्वे यांनी केलेल्या स्त्री शिक्षणाच्या कार्यामुळे स्त्रियांच्या जीवनावर निश्चितच परिणाम झालेला दिसून येतो. त्याचा शोध घेतला आहे.

संशोधनाचे महत्त्व पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेल्या शैक्षणिक कार्याची माहिती मिळेल.

२) महर्षी कर्वे यांनी अनुसरलेल्या/अंगीकारलेल्या कालसापेक्ष समाजाभिमुख शिक्षणाची माहिती होईल.

३) १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात शिक्षणामुळे स्त्री जीवनावर कोणते दृश्य परिणाम झाले हे समजेल.

४) महर्षी कर्वे यांच्या कार्याची उपयुक्तता समजेल.

५) सामाजिक परिस्थितीत होणाऱ्या बदलानुसार सद्यपरिस्थितीत शैक्षणिक पद्धती व अभ्यासक्रमात बदल होणे आवश्यक वाटते. म्हणूनही हा अभ्यास महत्त्वपूर्ण ठरेल.

५ समस्या विधान

महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेले शैक्षणिक कार्य आणि त्याचा स्त्रीजीवनावर झालेल्या दृश्य परिणामांचा अभ्यास करणे.

६ संकल्पनात्मक व्याख्या

१) शैक्षणिक कार्य – शिक्षणाचा प्रसार, प्रचार वाढीच्या कामी सक्रिय होऊन शिक्षणाच्या कामातील योगदान म्हणजे शैक्षणिक कार्य – (चंदन पवार, २०१०)

२) स्त्री शिक्षण – स्त्रीला साक्षर करणे. (गंगणे, २०१५)

३) दृश्य परिणाम – कोणत्याही गोष्टीचा प्रत्यक्षात दिसणारा बदल.

७ कार्यात्मक व्याख्या

१) शैक्षणिक कार्य– महर्षी कर्वे यांनी विधवा, कुमारिकांच्या शिक्षणासाठी केलेले प्रयत्न, स्त्रियांसाठी प्राथमिक शिक्षणापासून उच्चशिक्षणापर्यंत उपलब्ध करुन दिलेल्या सुविधा आणि शालेय शिक्षणाबरोबरच समाजशिक्षणासाठी दैनंदिन जीवनाशी निगडीत शिक्षणासाठी केलेले कार्य.

२) स्त्री शिक्षण – स्त्रियांना लिहिता वाचता येण्याबरोबरच शिक्षणामुळे त्यांच्यामध्ये होणारा इष्ट बदल, शालेय शिक्षण, संसारोपयोगी शिक्षण, दैनंदिन व्यवहार ज्ञान व स्त्रियांचा सर्वांगीण विकास.

३) दृश्य परिणाम – शिक्षणामुळे साक्षरतेसह स्वावलंबी होणे, आत्मविश्वास येणे, संस्कारक्षम गृहिणी होणे, अर्थार्जन करणे, कौटुंबिक जबाबदारी पार पाडणे अशा पद्धतीने शिक्षणामुळे प्रत्यक्ष जीवनात झालेला बदल.

८ संशोधनाची उद्दिष्टे

संशोधनातून खालील उद्दिष्टे साध्य करण्यात आली.

१) महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेल्या शैक्षणिक कार्याचा तत्कालीन सामाजिक संदर्भासह अभ्यास करणे.

२) महर्षी कर्वे यांनी निर्माण केलेल्या समाजाभिमुख शिक्षणाचा आढावा घेणे.

३) महर्षी कर्वे यांच्या शैक्षणिक कार्याचा स्त्री जीवनावर झालेले दृष्य परिणाम जाणून घेणे.

९ संशोधन प्रश्न

१) महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी तत्कालीन सामाजिक परिस्थितीत अनुकूल असे कोणते शैक्षणिक कार्य केले?

२) महर्षी कर्वे यांनी स्त्रिशिक्षणासाठी कोणता अभ्यासक्रम राबवला?

३) महर्षी कर्वे यांनी केलेल्या शैक्षणिक कार्याचा स्त्रीजीवनावर कोणता दृश्य परिणाम झाला?

१० गृहीतके

गुड अँड हॅट यांच्या मते ''गृहितकृत्य ही अशी मान्यता आहे की, जी सत्य सिद्ध करण्यासाठी तिचे प्रयोगात्मक परिक्षण केले जाऊ शकते. आणि पुढील संशोधनासाठी ते उपयुक्त असते.'' (कृतिसंशोधन हस्त पुस्तिका, २००५)

• प्रस्तुत संशोधनातील गृहीतके

१) शिक्षण तज्ञांच्या शैक्षणिक कार्यामुळे व्यक्ति व समाजात इष्ट परिवर्तन होते. (चंदन पवार २०११)

२) महर्षी कर्वे हे स्त्री शिक्षणाचे प्रणेते होते. (देशपांडे मालती, १९९७)

३) शिक्षणामुळे व्यक्तिच्या व्यक्तिमत्वात सकारात्मक बदल घडून येतात व त्यामुळे इतरांसाठी प्रेरणा मिळते. (कांबळे गीता, २०११)

४) शिक्षणामुळे स्त्रीच्या अंगी व्यवहारकुशलता, जीवनकौशल्ये निर्माण होतात. (महाराष्ट्र राज्य शालेय शिक्षण विभाग – हस्तपुस्तिका, २००५)

११ संशोधनाची व्याप्ती

संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतामधून उपलब्ध झालेले महर्षी कर्वे यांचे स्त्री शिक्षणाचे कार्य.

• संशोधनाच्या मर्यादा

१) उपरोक्त संशोधन हे उपलब्ध माहिती संकलनाच्या साधनांमधून मिळालेल्या माहितीवर आधारीत आहे.

२) (प्रतिसादकाच्या) मुलाखतदात्यांच्या भावना व मनःस्थिती यावर संशोधकाचे नियंत्रण नाही.

• संशोधनाच्या परिमर्यादा

१) प्रस्तुत संशोधन महर्षी कर्वे यांनी केलेल्या स्त्री शिक्षणाच्या कार्यापुरते मर्यादित आहे.

२) प्रस्तुत संशोधन हे प्रतिसादकाने दिलेल्या प्रतिसादापुरते मर्यादित आहे.

१२ संबंधित साहित्याचा आणि संशोधनाचा आढावा

• संदर्भ साहित्य

शासकिय प्रकाशन– पुस्तके

- जोशी न. म., महाराष्ट्राचे शिल्पकार–महर्षी धोंडो केशव कर्वे, सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, दादर, मुंबई
- बाबर सरोजिनी, स्त्रीशिक्षणाची वाटचाल, महाराष्ट्र शासन शिक्षण संचनालय, मुंबई १९६८,बाबर सरोजिनी – भारतीय स्त्री
- हाटे चंद्रकला, स्वातंत्र्योत्तर भारतीय स्त्री, सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, सचिवालय, मुंबई, प्रथमावृत्ती एप्रिल १९७३

महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था प्रकाशन– पुस्तके

- कर्वे धोंडो केशव, पटवर्धन नारायण महादेव, धोंडो केशव कर्वे आत्मवृत्त व चरित्र– भास्कर धोंडो कर्वे, चिटणीस हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, पुणे प्रथमावृत्ती १९५८
- कर्वे आनंदीबाई, माझे पुराण, केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, मुंबई १९९८
- कर्वे कावेरी, हिंगण्याच्या माळावर, हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, पुणे २
- आठवले पार्वतीबाई, माझी कहाणी, अनाथ बालिका श्रमाची मंडळी, पुणे, १९३६
- देशपांडे मालती – स्त्री शिक्षणाचे प्रणेते महर्षी कर्वे, म. कर्वे स्त्री शिक्षण संस्था कर्वेनगर, पुणे ५२
- कर्नाटकी चंद्राताई, भारतीय स्त्री शिक्षणात स्त्रीचे स्थान, के. रा. पालकर, चिटणीस, हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, कर्वेनगर, पुणे, प्रथमावृत्ती डिसेंबर १९६७
- पटवर्धन गंगूबाई, भारतीय स्त्री, 'गेल्या दीडशे वर्षातील स्त्रीशिक्षणाचे प्रयोग', के. रा. पालकर, चिटणीस हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, कर्वेनगर, पुणे, डिसेंबर १९६७
- शेंडे कुसुमताई, उतराई, श्री. अ. ल. शेंडे, राजहंस रत्नप्रभा प्रकाशन, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, पुणे २००९
- तेरणीकर सुलभा, गाथा शतकाची, सचिव महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, कर्वेनगर, पुणे ५२,२००७

इतर प्रकाशने पुस्तके

- आठलेकर मंगला, महर्षी ते गौरी (स्त्री स्वातंत्र्याची वाटचाल), राजहंस प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे पहिली आवृत्ती १९९९
- भगत रा. तु. शिक्षणातील थोर विचारवंत, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, सप्टेंबर २००१

➢ भागवत कमल, स्त्री चळवळीची वाटचाल, प्रागतिक पुस्तक प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८५

➢ भागवत विद्युत, स्त्री प्रश्नांची वाटचाल : परिवर्तनाच्या दिशेने प्रतिमा प्रकाशन, पुणे २००९

➢ खोले विलास, महर्षी धोंडो केशव कर्वे, मॅजेस्टिक पब्लिसिंग हाऊस ठाणे, द्वितीयावृत्ती ऑक्टो.

- मासिके
- नियतकालिक
- हस्तपुस्तिका
- अहवाल
- वृत्तपत्र (सकाळ, महाराष्ट्र टाइम्स, लोकमत)
- कात्रणे
- वेबसाईट

१३ संशोधन पद्धती

- ऐतिहासिक
- सर्वेक्षण पद्धती

१४ नमुना निवडीच्या पद्धती

प्रस्तुत संशोधनाकरिता 'स्नो बॉल सॅम्पलिंग' व यादृच्छिक लॉटरी पद्धतीचा उपयोग केला आहे.

- स्नो बॉल सॅम्पलिंग
- लॉटरी पद्धत

१५ नमुना

१) महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेतील माजी विद्यार्थिनी.

२) एस.एन.डी.टी. महाविद्यालयातील माजी विद्यार्थिनी.

सन १९१६ च्या आधीच्या विद्यार्थिनी सद्य परिस्थितीत भेटणे व त्यांची मुलाखत घेणे अशक्य असल्याने सन १९१६ पासून पुढील २० वर्षाच्या अंतराने सालाप्रमाणे ५ गट केले आहेत. माजी विद्यार्थिनींचे शैक्षणिक कालावधीनुसार पाच गट:

नमुना निवड गट

गट क्र.	शैक्षणिक कालावधी
१.	सन १९१६ ते ३६
२.	सन १९३७ ते ५७
३.	सन १९५८ ते ७८
४.	सन १९७९ ते ९९
५.	सन २००० ते २०१५

१६ माहिती संकलनाची साधने

उद्दिष्ट क्रमांक	संशोधन पद्धती	प्राथमिक स्त्रोत	दुय्यम स्त्रोत
१ २	ऐतिहासिक	महर्षी कर्वे यांचे आत्मवृत्त व चरित्र वृत्तपत्रे, छायाचित्रे, पत्रे (गुणात्मक विश्लेषण)	चरित्र,संदर्भ पुस्तके,मासिके,नियतकालिक हस्तपुस्तिका,अहवाल वृत्तपत्र (सकाळ, म.ट ा.) वेबसाईट , संशोधने
३	सर्वेक्षण पद्धती	(संख्यात्मक विश्लेषण)	मुलाखत, प्रश्नावली

अभ्यास विषयास अनुसरुन ऐतिहासिक व सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे (प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोत). आणि मिळालेल्या माहितीचे विश्लेषण हे गुणात्मक व संख्यात्मक पद्धतीने केलेले आहे.

- **संख्यात्मक साधने**

शेकडेवारी

माजी विद्यार्थिनींकडून मुलाखती व प्रश्नावलीद्वारे मिळालेल्या माहितीचे संख्यात्मक विश्लेषण शेकडेवारी काढून आलेखाद्वारे स्पष्ट केले आहे.

१७ महर्षी कर्वे यांचे स्त्रीशिक्षणविषयक कार्य व परिणाम

स्त्रीशिक्षणाच्या क्षेत्रात अनेक महापुरुषांनी आपले योगदान दिले आहे. त्यापैकी एक महर्षी धोंडो केशव कर्वे होय. एक दृष्टे शिक्षणतज्ज्ञ असा त्यांचा उल्लेख केला आहे. आपले १०५ वर्षाचे दिर्घायुष्य त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी, उन्नतीसाठी खर्ची घातले. त्यासाठी अथक परिश्रम घेतले. अनेक अडचणींवर मात केली. समाजाचा विरोध पत्करून आपले कार्य तडीस नेले. केवळ साक्षरतेचा विचार न करता स्त्रियांच्या अडचणी, गरजा यांचा सर्वांगीण विचार करुन त्यासाठी जे–जे काम करावे लागले ते ते केले. गरज ही शोधाची जननी आहे असे म्हणतात. त्यासाठी नवनवीन मार्ग चाणाक्षपणे शोधून त्यानुसार जशा अडचणी त्यावर तसा उपाय असे काम ते करत गेले. त्यामुळे त्यांच्या कार्याची व्याप्ती दिवसेंदिवस वाढतच गेली.

स्त्रीशिक्षणाच्या कार्याची सुरुवात करताना त्या कार्याची ठळक उद्दिष्टे त्यांच्या समोर होतीच. परंतु तत्कालीन समाजाकडून मिळणारा पाठिंबा आणि होणारा विरोध अशा परस्पर विरोधी प्रसंगाना महर्षी कर्वे यांना सामोरे जावे लागले. त्यांचे स्त्री शिक्षणाचे कार्य मुळात समाजकार्यातून सुरु झाले. त्यांनी विधवा पुनर्विवाहाचा धाडसी निर्णय घेऊन तो प्रत्यक्षात आणला. आणि विधवांच्या शिक्षणाचे कार्य सुरु केले. त्यामागे त्यांचा स्वभाव, बालवयापासून घेतलेले अनुभव, स्त्रियांबद्दल असणारी तळमळ या गोष्टी कारणीभूत होत्या. त्यांच्या कार्याचे वर्णन –

''महात्म्याने रचिला पाया । महर्षी झालासे कळस ।।''

असे केल्यास ते अतिशोयोक्ती वाटणार नाही. महात्मा फु ले यांनी सन १८४८ मध्ये स्त्रियांसाठी पहिली शाळा काढली आणि स्त्री शिक्षणाचा पाया घातला. त्यांनी स्त्रियांना प्राथमिक शिक्षण दिले. स्वतःच्या पत्नीला साक्षर केले. तर महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी प्राथमिक शिक्षणाने सुरुवात केली आणि त्यांना उच्च शिक्षण देण्यासाठी भारतातील पहिले विद्यापीठही स्थापन केले. या अर्थाने स्त्री शिक्षणाच्या कार्यावर त्यांनी कळस चढविला असे म्हणता येईल.

असे अतुलनीय कार्य करणाऱ्या महर्षी कर्वे यांनी केलेल्या स्त्रियांच्या शैक्षिणिक कार्याचा अभ्यास करताना संशोधकास महर्षी कर्वे व त्यांचे कार्य याविषयी सखोल माहिती मिळाली. त्यांचे आत्मचरित्र वाचताना एक स्त्री म्हणून त्यांच्याबद्दलचा आदर अधिकच वाढला. प्रत्येक स्त्रीच्या उन्नतीचे श्रेय महर्षी कर्वे यांच्यासारख्या अलौकिक कार्य करणाऱ्या महात्म्यास जाते.

महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंतच्या सोयी उपलब्ध केल्या. त्यांना शालेय शिक्षणाबरोबरच संसारोपयोगी व समाजाभिमुख शिक्षण दिले. त्यामुळे स्त्रिया साक्षर तर झाल्याच परंतु त्या स्वावलंबी, सक्षम, सबला झाल्या व स्वतःची प्रगती करू शकल्या. ज्यामुळे समाजहित व देशहितही साधले गेले.

- **महर्षी कर्वे यांच्या कार्यातील वेगळेपणा**

स्त्री शिक्षणासाठी अनेक समाजसेवक, समाजसुधारक व शिक्षणतज्ज्ञांनी अलौकिक कार्य केले आहे. अनेकांच्या कार्यामध्ये सारखेपणा दिसून येतो. परंतु महर्षी कर्वे यांचे कार्य हे इतरांपेक्षा वेगळे आहे. हे त्यांच्या पुढील कार्यक्षेत्रातून जाणवते.

१) महर्षी कर्वे यांनी विधवा शिक्षणाने त्यांच्या कार्याची सुरुवात केली परंतु नंतर सर्वसामान्य, अनाथ, परितक्त्या, प्रौढ अशा सर्व स्तरावरील स्त्रियांच्या शिक्षणासाठी कार्य केले.

२) स्त्रियांना साक्षर तर केलेच त्याचबरोबर त्यांना स्वावलंबी, सबल, सक्षम व आत्मविश्वासू बनवले.

३) शालेय शिक्षणाबरोबरच पारंपारिक कलांचे शिक्षण दिले. उदा. शिवणकाम, विणकाम,भरतकाम इ.

४) मुलींना क्रीडाक्षेत्रातही संधी मिळावी म्हणून सन १९३८ साली 'पूना गर्ल्स स्कूल स्पोटर्स असोसिएशन' या संस्थेची स्थापना केली. याद्वारे आज ८० वर्षे सतत क्रीडा स्पर्धा घेतल्या जातात. त्यासाठी प्रशस्त क्रीडांगण व पोहण्याचा तलाव अशा सुविधा निर्माण केल्या.

५) समाजाभिमुख अभ्यासक्रमाची निर्मिती केली.

६) मुलीच्या सुरक्षिततेचा विचार करून वसतिगृहाची सोय केली. त्यामुळे कौटुंबिक वातावरणात मुलींना शिक्षण मिळाले.

७) मुलींना संसारोपयोगी कामाच्या सवयी लावल्या.

८) संस्कारक्षम शिक्षण दिले.

९) मातृभाषेतून शिक्षणास महत्त्व दिले. परंतु जागतिक ज्ञानासाठी इंग्रजी भाषेसही प्राधान्य दिले.

१०) महिलांना उच्च शिक्षण मिळावे म्हणून भारतातील पहिल्या स्वतंत्र महिला विद्यापिठाची स्थापना केली.

११) ग्रामीण भागातही शिक्षणाचा प्रसार केला.

१२) शैक्षणिक कार्यासाठी लोकवर्गणीतून निधी संकलन केले.

१३) स्त्री शिक्षणाचा प्रचार व प्रसार यासाठी देश विदेशात दौरे केले.

१४) जातीभेद पाळला नाही. त्यामुळे देशभरातून सर्व जातीधर्माच्या मुलींना शिक्षण मिळाले.

१५) निष्काम–कर्म–मठाची स्थापना करून स्त्रियांनाच स्त्री शिक्षणाच्या कार्यास उद्युक्त केले.

१६) स्त्रियांना समाजसेवा करण्याचे संस्कार दिले.

१७) संबंध मानवतेचे कल्याण करणे असा उदात्त हेतू ठेऊन 'समता संघाची' स्थापना केली व समाजात समानता रुजवण्याचे कार्य केले.

१८) शैक्षणिक कार्याबरोबर सामाजिक कार्यही केले.

इतरांपेक्षा वेगवेगळ्या कार्यक्षेत्राचा विचार करून स्त्रियांच्या शैक्षणिक कार्याबरोबर समाजोपयोगी कार्य केले. स्त्रियांची सर्वांगीण प्रगती व्हावी म्हणून त्यांनी अत्यंत कठीण परिस्थितीस तोंड दिले व स्त्रीशिक्षणाचे कार्य तडीस नेले. स्त्रियांच्या सर्वांगीण विकासाचा सखोल विचार केला व आपले दिर्घायुष्य शैक्षणिक व सामाजिक कार्यास अर्पण केले. थोडक्यात स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी जे–जे करणे गरजेचे होते. ते–ते कार्य महर्षी कर्वे यांनी केले. हा महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेले शैक्षणिक कार्याचा दृश्य परिणाम सांगता येईल.

१८ निष्कर्ष

संशोधन अभ्यासाच्या संदर्भसाहित्यातून मिळालेली माहिती व महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेतील माजी विद्यार्थिनीकडून घेतलेल्या मुलाखती व प्रश्नावलींच्या माध्यमातून आलेली उत्तरे प्रकरण ४ वर आधारित संशोधकाने पुढील निष्कर्ष नोंदवले आहेत. यातील काही महत्त्वाच्या बाबी –

क्र.	तपशील	शेकडा
१	महर्षी कर्वे यांचे स्त्रीशिक्षणाचे कार्य महत्त्वाचे वाटते	८९%
२	सद्यस्थितीत महर्षी कर्वे यांच्या कार्याची उपयुक्तता वाटते	९३%
३	स्त्री शिक्षणाचा जीवनाला फायदा झाला	८३%
४	शिक्षणामुळे स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला	८९%

उद्दिष्टानुसार निष्कर्ष

- उद्दिष्ट क्र.१

  महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेल्या शैक्षणिक कार्याचा तत्कालीन सामाजिक संदर्भासह अभ्यास करणे.

१) अठराव्या शतकात स्त्रीशिक्षणाबाबत समाजाचा दृष्टिकोन संकुचित होता.

२) अठराव्या शतकात स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता.

३) तत्कालीन समाजास स्त्रियांनी शिक्षण घेणे हे मान्य नव्हते.

४) अठराव्या शतकात स्त्रियांना कुटुंबात व समाजात दुय्यम स्थान होते.

५) अठराव्या शतकात स्त्री शिक्षणासाठी सामाजिक स्थिती अनुकूल नव्हती.

६) स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रात महर्षी कर्वे यांनी महत्वपूर्ण कार्य केले.

७) महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी संसारोपयोगी विषयांचा अभ्यासक्रमात अंतर्भाव केला. स्त्रीशिक्षणासाठी मातृभाषेला महत्त्व दिले.

८) महर्षी कर्वे यांनी शालेय शिक्षणाबरोबरच स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्कारक्षम उपक्रम राबवले.

९) महर्षी कर्वे यांनी स्त्रियांच्या उच्च शिक्षणासाठी स्वतंत्र महिला विद्यापीठाची स्थापना केली, स्त्रीशिक्षणाचा प्रसार केला. व स्त्री शिक्षणाच्या कार्यासाठी संस्था उभारली.

- उद्दिष्ट क्र. २

  महर्षी कर्वे यांनी निर्माण केलेल्या समाजाभिमुख शिक्षणाचा आढावा घेणे.

१) महर्षी कर्वे यांनी समाजास उपयुक्त अशा विषयांचा अभ्यासक्रमात समावेश केला.

२) महर्षी कर्वे यांनी शिक्षणाचा कुटुंबाला, समाजाला उपयोग होईल असे शिक्षण स्त्रियांना दिले.

- उद्दिष्ट क्र. ३

- महर्षी कर्वे यांच्या शैक्षणिक कार्याचा स्त्री जीवनावर झालेले दृष्य परिणाम जाणून घेणे.

१) शिक्षणामुळे स्त्री स्वावलंबी झाली.

२) सुशिक्षित स्त्रियांनी इतर स्त्रियांना शिक्षण देण्याचे व्रत अंगिकारले.

३) शिक्षणामुळे स्त्रियांच्या व्यक्तिमत्वात इष्ट बदल घडून आले.

४) स्त्रियांच्या शिक्षणाचा उपयोग कुटुंबासाठी झाला.

५) शिक्षणामुळे स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला.

६) शिक्षणामुळे स्त्री सक्षम झाली.

१९ संशोधनाचे योगदान

या अभ्यासामधून महर्षी कर्वे यांनी समाजाचा प्रचंड विरोध सहन करुन आपले कार्य कसे तडीस नेले, हे समजले. त्यांची स्त्रीशिक्षणाबद्दलची तळमळ लक्षात आली. केवळ पुस्तकी ज्ञान म्हणजे शिक्षण नव्हे तर व्यवहारज्ञान, मूल्यसंस्कारही जीवनात यशस्वी होण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरतात याचा अनुभव मिळाला. स्त्रियांच्या गृहिणी म्हणून जबाबदाऱ्या पार पाडताना स्त्रियांनी घेतलेल्या शिक्षणाचा मुलांसाठी, कुटुंबासाठी व समाजासाठी किती फायदा झाला हे समजले. महर्षी कर्वे यांनी केवळ शैक्षणिक कार्य केले नाही तर त्याला समाजकार्याची जोड दिली. त्यामुळे १२५ वर्षानंतरही त्याचे कार्य उपयुक्त ठरते. कालसापेक्ष व परिस्थितीनुरुप समाजाची मानसिकता लक्षात घेऊन दिलेले शिक्षण, विचारपूर्वक तयार केलेला अभ्यासक्रम याबद्दल माहिती मिळते.

एक स्त्री म्हणून या अभ्यासादरम्यान आलेल्या अनुभवातून नवीन शिकता आले. स्त्रियांचा स्वतःच्या जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन समजला. शिक्षणामुळे स्त्री अंर्तबाह्य बदलून गेली आहे. प्रेम, माया, ममता, सहनशीलता या गुणांबरोबर ती कणखर, धाडसी, आत्मविश्वासू, स्वावलंबी व सक्षम कशी बनू शकते याचा प्रत्यय आला. कर्वे यांच्याबद्दल आदर आहेच तो अधिक वाढला. प्रतिकूल परिस्थिती अवघड कार्य त्यांनी केले. आत्ताची परिस्थिती तर स्त्री शिक्षणास अनुकूल आहे. स्त्रियांची एकंदरीत स्थिती सुधारावी यासाठी कार्य करण्याची उमेद मिळाली. स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रात अनेक गोष्टी करण्यासारख्या आहेत त्या सर्वांनी मिळून करायला हव्यात. स्त्रीचे कुटुंब व समाजातील स्थान उंचावण्याची गरज आहे. सामाजिक संस्था, समाजसुधारक व स्त्रियांविषयी तळमळ असणाऱ्या सर्वांनी एकत्र आल्यास ते करता येईल अशी आशा निर्माण होते.

'' जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगा उद्धारी

'' मुलगी शिकली प्रगती झाली. ''

स्त्री शिक्षणाबाबत वरील उद्‌गार काढले जातात. ते सार्थ ठरताना दिसत आहेत. शिक्षणामुळे स्त्री जीवनावर झालेला सर्वात महत्त्वपूर्ण दृष्य परिणाम जाणवला, तो म्हणजे स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आहे. आत्मविश्वास निर्माण झाल्यामुळे स्त्रियांना जीवनातील संकटावर मात करता येते. अशक्य ते शक्य करता येते. जीवन आनंदाने जगता येते. समाजात व कुटुंबात स्वतःचे स्थान निर्माण होते. हे महर्षी कर्वे यांनी महिलांसाठी केलेल्या कामातून स्पष्ट होते.

२० संशोधनाचे शैक्षणिक उपयोजन

प्रस्तुत संशोधनामुळे शिक्षणक्षेत्रास उपयुक्त अशा काही गोष्टी–

- स्त्री शिक्षणामुळे स्त्रियांची उन्नती होईल.
- समाजाभिमुख अभ्यासामुळे शिक्षणाचा समाजहितासाठी उपयोग होईल.
- महर्षी कर्वे यांच्या स्त्री शिक्षणाच्या अभ्यासामुळे शिक्षणाची ध्येय व शैक्षणिक आराखडा तयार करण्यास मदत मिळेल.
- पुस्तकी शिक्षणाबरोबरच जीवनोपयोगी शिक्षण मिळाल्यास स्त्री जीवन समृद्ध होईल.
- स्त्री शिक्षणामुळे स्त्रिया स्वावलंबी, आत्मविश्वासु व सक्षम बनतील.
- स्त्री शिक्षणामुळे देशातील स्त्रियांचा साक्षरता दर वाढेल, व त्याचा कुटुंब व समाजास उपयोग होईल.

२१ शिफारशी

संशोधन प्रक्रियेतून जे निष्कर्ष निघालेले आहेत त्यावर आधारित तात्विकपद्धती न वापरता व्यवहार्य अशा ज्या सूचना आणि सुधारणांचे मार्ग सुचवलेले असतात त्यांना **शिफारशी** म्हणतात. संशोधन पूर्ण झाल्यानंतर संशोधकास पुढील सूचना करावश्या वाटतात.

- स्त्रियांना कुटुंबात व समाजात समान दर्जा प्राप्त व्हायला हवा कारण अजूनही स्त्री–पुरूष समानता दिसून येत नाही.

- स्त्री शिक्षणाविषयीचा दृष्टिकोन बदलणे आवश्यक वाटते.
- ग्रामीण भागात सद्यस्थितीतही स्त्री शिक्षणाकडे तितक्या गांभीर्याने पाहिले जात नाही या विचारात बदल घडून यावा.
- ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणासाठी जाणीवपुर्वक प्रयत्न करणे गरजेचे वाटते कारण आजही ग्रामीण भागात शाळा लांब असल्याने शिक्षणात अडचणी येतात.
- मुलींसाठी वसतीगृहाच्या सोयी उपलब्ध झाल्यास सुरक्षितता निर्माण होईल.
- शिक्षणातून मूल्यसंस्कार (उदा– स्वावलंबन, सहकार्यभावना, श्रमप्रतिष्ठा, सक्षमता) निर्माण होतील यासाठी प्रयत्न व्हावेत.
- शिक्षणामुळे जीवनात इष्ट बदल घडविण्यासाठी आत्मविश्वास निर्माण व्हायला हवा तरच स्त्री जीवन सुखी व आनंदी होवू शकेल.
- आधुनिक काळात काही बाबतीत स्त्री शिक्षणाबाबत उदात्त दृष्टिकोन दिसून येतो परंतु १००% स्त्री साक्षरता निर्माण होण्यासाठी स्त्री वर्ग, पालक वर्ग व समाजाने सक्रीय प्रयत्न करणे आवश्यक वाटते.
- समाजातील बदलत्या परिस्थितीनुरुप अनुकूल असे बदल शासनाने अभ्यासक्रमात करायला हवेत. सध्याचे शिक्षण हे दैनंदिन जीवनास उपयुक्त ठरत नाही; अशी चर्चा अनेकदा ऐकायला मिळते. शिक्षणपद्धतीत आमुलाग्र बदल घडायला हवेत असे विचार अनेक शिक्षणतज्ज्ञांनी व्यक्त केले आहेत. (उदा. रमेश पानसे, हेरंब कुलकर्णी) स्त्रियांचे सामाजिक स्थान उंचावण्याकरिता स्त्री संघटनांनी सक्रिय व्हायला हवे. महर्षी कर्वे यांनी स्त्रियांना शिक्षणाची सोय करून दिली. त्यामुळे स्त्रियांचा आत्मविश्वास वाढला. परंतु समाजात सामाजिक प्रतिष्ठा, स्त्री–पुरुष समानता दिसून येत नाही. याकरता शिक्षणाशिवाय काही प्रयत्न होणे गरजेचे वाटते. त्यासाठी स्त्रियांनीच पुढे यायला हवे. उदा. स्त्रियांची मानसिकता बदलणे.

२२ पुढील संशोधनासाठी विषय

महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेल्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेताना महर्षी कर्वे यांच्याविषयी अनेक नवीन पैलूंची माहिती मिळाली. त्या विषयात संशोधन कार्य व्हायला हवे असे संशोधकास वाटते. त्यासाठी सुचवलेले काही विषय –

- महर्षी कर्वे यांचे सामाजिक कार्य – एक अभ्यास
- महर्षी कर्वे यांचे शिक्षणविषयक विचार व त्यांचे शैक्षणिक कार्य
- महर्षी कर्वे : एक शिक्षणतज्ज्ञ
- महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या कार्याचा अभ्यास व त्याची उपयुक्तता

२३ संशोधकाचा अभिप्राय

उद्दिष्ट क्र.१ : महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेल्या शैक्षणिक कार्याचा तत्कालीन सामाजिकसंदर्भासह अभ्यास करणे

उद्दिष्ट क्र. २ : महर्षी कर्वे यांनी निर्माण केलेल्या समाजाभिमुख शिक्षणाचा आढावा घेणे.

उद्दिष्ट क्र. ३ : महर्षी कर्वे यांच्या शैक्षणिक कार्यामुळे स्त्री जीवनावर झालेले दृश्य परिणाम जाणून घेणे.

संशोधनाची वरील उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेऊन प्रस्तुत संशोधन हे पुढील दोन भागात केलेले आहे. पहिल्या भागात ऐतिहासिक संशोधन पद्धतीनुसार महर्षी कर्वे यांनी केलेल्या स्त्रीशिक्षणाच्या कार्याचा मागोवा घेताना; संबंधित संदर्भसाहित्य व महर्षी कर्वे यांच्या आत्मचरित्राचा अभ्यास करून, त्यांनी तत्कालीन सामाजिक परिस्थितीस अनुरुप असे जे समाजाभिमुख शिक्षण सुरु केले त्याचा शोध घेतला आहे. तर संशोधनाच्या दुसऱ्या भागात महर्षी कर्वे यांनी केलेल्या कार्यामुळे स्त्रियांच्या दैनंदिन जीवनात कोणते दृश्य स्वरुपाचे बदल झाले, हे पाहण्यासाठी प्रश्नावली, मुलाखत या माहिती संकलन साधनांचा वापर करून महर्षी कर्वे यांच्या कार्याची उपयुक्तता तपासण्याचा अभ्यास केला आहे. एकंदरीत त्यामधून असे निदर्शनास आले की, स्त्रिया

साक्षर तर झाल्याच त्याचबरोबर त्या सक्षम, स्वावलंबी व आत्मविश्वासू बनल्या. त्यासंदर्भातली अधिक माहिती निष्कर्षात नोंदविली आहे.

परंतु याचबरोबर महर्षी कर्वे यांचे सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील कार्याचा विविध अंगांनी अभ्यास होणे शक्य आहे असे वाटते. उदा. महर्षी कर्वे यांचे सामाजिक कार्य, महर्षी कर्वे यांचे स्त्रीशिक्षणविषयक विचार व योगदान इ. विषयावर अभ्यास होणे आवश्यक वाटते.

प्रकरण पहिले

प्रस्तावना

अ. क्र.	तपशील	पान क्र.
१.१	संशोधनाची प्रस्तावना	३
१.२	पार्श्वभूमी	६
१.३	संशोधनाची गरज	१०
१.४	संशोधनाचे महत्त्व	१४
१.५	शीर्षक	१५
१.६	समस्या विधान	१६
१.७	संशोधनाची उद्दिष्ट्ये	१६
१.८	संशोधन प्रश्न	१६
१.९	संकल्पनात्मक व्याख्या	१७
१.१०	कार्यात्मक व्याख्या	१७
१.११	संशोधनातील पद्धती	१७
१.१२	माहिती संकलनाची साधने	१८

१.१३	गृहीतके	१८
१.१४	व्याप्ती, मर्यादा, परिमर्यादा	१९
१.१५	जनसंख्या	२०
१.१६	नमुना निवडीच्या पद्धती	२०
१.१७	नमुना	२०
१.१८	संशोधन प्रकरणे	२१
१.१९	समारोप	२१
१.२०	संदर्भसूची	२२

प्रकरण १ ले

प्रस्तावना

१.१ प्रस्तावना

अठराव्या शतकात बालविवाहासारख्या रुढी परंपरामुळे लहानवयातच येणारे वैधव्य, त्याचबरोबर केशवपनासारख्या वाईट प्रथा अशा अनेक रुढींना स्त्रियांना बळी पडावे लागत होते. या स्थितीमधून स्त्रियांची सुट.का करण्यासाठी अनेक समाजसुधारकांनी प्रयत्न केले. जेव्हा स्त्रीला घराचा उंबरठाही ओलांडण्याची मुभा नव्हती तेव्हा, त्या प्रतिकूल परिस्थितीत इसवी सन १८४८ मध्ये महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाचा पाया घातला. त्यावेळी समाजाकडून त्यांना कडाडून विरोध झाला. कारण तत्कालीन सामाजिक परिस्थितीत स्त्रीने शिक्षण घ्यावे ही कल्पनाच समाजाला रुचणारी नव्हती. परंतु तरीही महात्मा फुले यांनी त्यांची पत्नी सावित्रीबाई फुले यांच्या सहकार्याने आपले स्त्री शिक्षणाचे कार्य चालू ठेवले. त्याचबरोबर पं. ईश्वरचंद्र विद्यासागर, राजा राममोहन रॉय, न्यायमूर्ती रानडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडिता रमाबाई (शास्त्री), ताराबाई शिंदे या आणि अशा अनेक समाजसुधारकांनी स्त्रियांना शिक्षण मिळावे, कुटुंबात व समाजात स्थान मिळावे म्हणून प्रयत्न केले. त्यापैकी महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे स्त्री शिक्षणविषयक कार्यही मोलाचे ठरले. त्यांच्या याच कार्याचा शैक्षणिक व सामाजिक दृष्टीकोनातून प्रस्तुत संशोधनात अभ्यास केला आहे.

संशोधनाच्या संबंधित संदर्भ ग्रथांचा अभ्यास करताना अशी माहिती मिळते की, सन १८८९ मध्ये पं. रमाबाई यांनी मुंबईमध्ये विधवा स्त्रियांसाठी 'शारदासदनाची' स्थापना केली. तेव्हा महर्षी धोंडो केशव कर्वे हे मुंबईत राहून शिक्षकाचे काम करत होते. दरम्यान त्यांचा परिचय पं. रमाबाईंशी झाला. त्यांचे कार्य जवळून पाहण्याचा योग महर्षी कर्वे यांना आला. त्यातच समाजातील व कुटुंबातील विधवांची केविलवाणी अवस्था महर्षी कर्वे यांनी पाहिली. यातूनच त्यांना विधवांसाठी कार्य करण्याची प्रेरणा मिळाली. त्यांनी त्यासाठी 'विधवाविवाहोत्तेजक मंडळीची' स्थापना केली. विधवा पुनर्विवाहाची चळवळ उभी केली. एवढंच नव्हे तर स्वतःही एका विधवेशीच पुनर्विवाह केला.

त्यामुळे त्यांना समाजातून मोठा विरोध झाला. महर्षी कर्वे आणि त्यांचे कुटुंब यांना समाजाने वाळीत टाकले. या संकटांना न डगमगता महर्षी कर्वे यांनी आपले कार्य चालूच ठेवले.

स्त्रियांना त्यांच्या बिकट अवस्थेतून बाहेर काढण्यासाठी स्त्रीशिक्षणाशिवाय पर्याय नाही हे त्यांच्या लक्षात आले. केवळ चार विद्यार्थिनींना घेवून त्यांनी स्त्री शिक्षणाचे कार्य सुरु केले. हळूहळू त्यांच्या कार्याचे महत्त्व समाजाला पटू लागले (कर्वे, पटवर्धन – १९५८). विधवांबरोबर कुमारिकाही शिक्षणासाठी येवू लागल्या. स्त्री शिक्षणाचे कार्य समाजापर्यंत पोहचले. विद्यार्थिनी वाढू लागल्या. यातून १८९५ मध्ये पुणे येथे 'अनाथबालिकाश्रम' नावाने संस्था सुरु झाली.

महर्षी कर्वे यांच्या चरित्राचा अभ्यास करताना असे दिसून लक्षात आले; १४ जून १८९६ मध्ये अनाथबालिकाश्रमाचे 'हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेत' रुपांतर झाले. मुलींसाठी आवश्यक ती सुरक्षितता हा पालकांना आपल्या मुलींसाठी मोठा फायदा वाटू लागला. कारण सुरुवातीस मुलींना सांभाळण्याची जबाबदारी महर्षी कर्वे यांची पत्नी सौ. आनंदीबाई कर्वे (बाया) यांनी घेतली होती. त्यामुळे गरीब, गरजू, अनाथच नव्हे तर उत्तम आर्थिक परिस्थिती असणारे पालकही पैसे भरून मुलींना शिक्षणासाठी पाठवू लागले व विद्यार्थिनींची संख्या वाढत गेली (आत्मवृत्त व चरित्र – १९५८). पुढे स्त्रियांसाठी विद्यालय काढले. स्वतंत्र वसतिगृह बांधले आणि उच्च शिक्षणासाठी महिला विद्यापीठही स्थापन केले. देशातील स्त्रियांसाठी असणारे हे पहिले विद्यापीठ. स्त्रियांना केवळ साक्षर बनवणे नव्हे तर त्या सुकन्या, सुमाता व सुगृहिणी व्हाव्यात (कर्वे २००७) यासाठी नवीन अभ्यासक्रमही तयार केला. त्यासाठी काही विद्‌वान सहकाऱ्यांची मदत घेतली. जपान व युरोपमध्ये प्रवास करताना तेथील स्त्री शिक्षणाबाबत त्यांनी जाणीवपूर्वक निरीक्षण केले होते. त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी असा अभ्यासक्रम तयार केला त्यात आरोग्यशास्त्र, बालसंगोपनशास्त्र, गृहशास्त्र, गायन, चित्रकला इ. विषयांचा समावेश केला. पुण्याला एस.एस.सी. बोर्ड आल्यानंतर त्यांनीही 'कर्वे मॅट्रिक' या अभ्यासक्रमाचा आपल्या बोर्डात अंर्तभाव केला. (बेदरकर २००७). इ.सन १९१६ साली स्त्रियांच्या उच्च शिक्षणासाठी 'भारतवर्षीय महिला विद्यापीठाची' (SNDT) स्थापना केली.

पदवीचा अभ्यासक्रम ठरविताना सामान्य स्त्रियांचे जे कार्यक्षेत्र आहे ते म्हणजे 'गृह' की ज्यायोगे तिला 'गृहिणी' असे संबोधले जाते. यासंबंधी काही विशेष करावे असा विचार महर्षी कर्वे

यांनी केला म्हणून स्त्रियांकरिता प्रपंचशास्त्र, आरोग्यशास्त्र अशा विषयांची अभ्यासक्रमात भर घातली आणि त्यांना 'गृहितागमा' ही पदवी (Pass Degree) दिली. ही पदवी बी. ए. प्राप्त करणाऱ्या स्त्रियांपेक्षा कमी नाही अशी त्यांची खात्री होती (कर्वे, पटवर्धन १९५८).

आज महर्षी कर्वे यांनी स्थापन केलेली संस्था शतकोत्तर कार्य करत आहे. संस्थेची शिक्षणाच्या सर्व क्षेत्रातील कामगिरी लक्षात घेण्याजोगी आहे. कालानुरुप अनेक नवनवीन शाखा–विभाग सुरु झाले आहेत. भारतातील पहिले मुलींसाठीचे अभियांत्रिकी महाविद्यालयही संस्थेने सुरु केले आहे. याशिवाय वास्तूशास्त्र, नर्सिंग, आय. टी., संगणक, फॅशन डिझाइनिंग इ. अशा सर्व शाखा उत्तम स्थितीत चालू आहे. आज संस्थेला १२० वर्षाचा इतिहास आहे.

भारत सरकारने महर्षी कर्वे यांच्या स्त्री शिक्षणविषयक कार्याची दखल घेवून सन १९५८ साली महर्षी कर्वे यांना 'भारतरत्न' ही सर्वोच्च पदवी बहाल केली; त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. आज १२५ वर्षानंतरही महर्षी कर्वे यांनी केलेले कार्य कसे उपयुक्त ठरते? त्यांचे स्त्री शिक्षणाविषयीचे विचार कसे प्रेरणादायी आहेत? समाजास अनुकूल व स्त्रियांच्या भावी आयुष्यात उपयोगी पडेल असा कोणता समाजाभिमुख अभ्यासक्रम त्यांनी राबवला? त्याचा स्त्रियांच्या दैनंदिन जीवनात त्यांना कोणता फायदा झाला?हे जाणून घेण्याची संशोधकास उत्सुकता आहे. महर्षी कर्वे यांच्या विचाराने प्रेरित होऊन अनेक स्त्रियांनी शिक्षण तर घेतलेच परंतु स्वतःही समाजसेवेचे कार्य स्विकारून महर्षी कर्वे यांच्या कार्यास मदत केली. या विचारांचा प्रसार होणे आवश्यक आहे.

सद्यपरिस्थिती तत्कालीन परिस्थितीपेक्षा भिन्न आहे. स्त्री प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर आहे. परंतु स्त्रियांच्या समस्या सुटलेल्या नाहीत. समस्यांचे स्वरुप बदलले आहे. पूर्वी शिक्षण घेणे हीच एक महत्त्वपूर्ण समस्या होती. आज गरज आहे ती सामाजाच्या बदलत जाणाऱ्या स्थितीनुसार अनुरुप असा अभ्यासक्रम व शिक्षण देण्याची. महर्षी कर्वे यांनी जसे सामाजिक व शैक्षणिक बाबींचा विचार करून स्त्री शिक्षणाविषयीचे विचार सत्यात उतरवले, त्याप्रमाणे आता काय करता येईल? काय करणे आवश्यक आहे? यासाठी म. कर्वे यांच्या स्त्रीविषयी शैक्षणिक कार्याचा अभ्यास संशोधकास करावासा वाटला.

समस्या ह्या परिस्थितीनुरुप बदलत राहतात. त्याप्रमाणे शिक्षणक्षेत्रातही नवनवीन प्रयोग झाले पाहिजे तरच ते शिक्षण कालसापेक्ष होईल. महर्षी कर्वे आपल्या आत्मवृत्तात लिहितात ''जुने जसेच्या तसे सांभाळून ठेवण्यात शहाणपणा नाही. जुन्या नव्यांचा एकजीव होऊन जुन्यांतून नवे उत्क्रांत होणे, हीच जुन्याची खरी वाढ होय (कर्वे – पटवर्धन १९५८)''.

१.२ पार्श्वभूमी

- **शिक्षणाची संकल्पना :** शिक्षणाच्या संकल्पनेचा विचार करताना व्युत्पत्तीशास्त्रानुसार शिक्षण संकल्पना, शिक्षणाच्या प्राचीन संकल्पना, भारतीय विचारवंतानुसार शिक्षणविषयक संकल्पना आणि पाश्चात्य विचारवंताच्या दृष्टीने शिक्षणविषयक संकल्पना असे वर्गीकरण करता येते.

- **व्युत्पत्तीनुसार शिक्षणाची संकल्पना**

  १) शिक्षक : शिक्ष् म्हणजे उपदेश करणे व बदल घडवून आणणे.

  २) शिक्षण हा शब्द संस्कृत 'शास' या धातूपासून आला शास् म्हणजे ताब्यात ठेवणे, शिस्त लावणे, शिकवणे.

  ३) शिक्षण या शब्दाला समानार्थी शब्द आहे विद्या. विद् म्हणजे जाणणे, समजणे, ज्ञान मिळवणे.

  ४) इंग्रजीत शिक्षण म्हणजे Education. Education ला लॅटिन शब्द Educare याचा अर्थ व्यक्तीच्या सुप्त क्षमतांना जागृत करणे.

- **शिक्षणाच्या प्राचीन संकल्पना**

  १) ऋग्वेद : मानवाला स्वावलंबी व स्थाननिरपेक्ष बनवणारा घटक म्हणजे शिक्षण.

  २) उपनिषद : 'सा विद्या या विमुक्तये' म्हणजेच सर्व बंधनातून मुक्त करुन मोक्षप्राप्तीपर्यंत पोहचवते ते खरे शिक्षण.

  ३) आद्य शंकराचार्य : आत्मज्ञान व आत्मसाक्षात्कार म्हणजेच शिक्षण.

- **शिक्षणाच्या व्याख्या**
- **भारतीय विचारवंत**

  १) स्वामी विवेकानंद : शिक्षण म्हणजे मनुष्याच्या ठिकाणी जे पूर्णत्व आधीच विद्यमान आहे त्याचे प्रकटीकरण.

  २) रवींद्रनाथ टागोर : शिक्षण म्हणजे आत्माविष्कार.

  ३) महात्मा गांधी : शिक्षण म्हणजे बालकाच्या शरीर, मन व आत्मा या त्रयींमध्ये जे सुप्त उत्तमत्व आहे, त्याचा सर्वांगीण विकास घडवून आणणे.

  ४) डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन : मनाचे औदार्य म्हणजे शिक्षण.

- **पाश्चात्य विचारवंत**

  १) जॉन रुसो : व्यक्तीच्या सर्व अवयवांचा व शक्तींचा नैसर्गिक विकास म्हणजे शिक्षण होय.

  २) जॉन ड्युई : शिक्षण ही जीवन जगण्याची तयारी नसून शिक्षण म्हणजे प्रत्यक्ष जीवनच आहे.

  ३) हबर्ट स्पेन्सर : सर्वांगसुंदर जीवन जगण्याची कला म्हणजे शिक्षण.

  ४) मादाम मॉटेंसरी : मुलांचा स्वाभाविक विकास घडवून आणणे म्हणजे शिक्षण होय.(संदर्भ : भगत रा. तु. २००१)

- **प्राचीन शिक्षणपद्धती**
- **वैदिक शिक्षण**

वैदिक शिक्षणात ज्ञानप्राप्तीचे दोन प्रकार पडतात. शाश्वत स्वरुपाच्या ज्ञानास परा ज्ञान तर अशाश्वत स्वरुपाच्या ज्ञानास अपरा ज्ञान म्हणतात. ज्ञानमार्ग, कर्ममार्ग, भक्तीमार्ग आणि राजमार्ग हे परा स्वरुपाच्या ज्ञानप्राप्तीचे मार्ग आहे. यामध्ये संहितावाङ्मय, श्रृतीवाङ्मय, वेदांगे याचा अभ्यासक्रमात समावेश होता. गुरुकुल पद्धती, गुरु–शिष्य संबंध, स्त्री शिक्षण, शिस्त व स्वातंत्र्य ही वैदिक शिक्षणाची वैशिष्ट्ये होती. या माध्यमातून शिक्षण दिले जात असे.

महर्षी कर्वे यांनी स्त्रीशिक्षणाचे अविरत कार्य केले. त्यांनी शिक्षणाची स्वतंत्र अशी कोणतेही व्याख्या मांडलेली नाही परंतु वरील शिक्षणाच्या सर्व संकल्पना व व्याख्यांचा विचार करताना आणि म. कर्वे यांच्या संदर्भ साहित्याचा अभ्यास करताना असे निदर्शनास आले की यातील सर्वच गोष्टी स्त्री शिक्षण कार्यातून त्यांनी साध्य केल्या.

जसे की ऋग्वेदात सांगितल्यानुसार त्यांनी स्त्रीला स्वावलंबी बनवले. स्वामी विवेकानंदाच्या विचारानुसार स्त्रियांच्या अंतर्गुणाचा शोध घेतला. तिच्या सुप्तगुणांना वाव दिला. गांधीजींच्या तत्वज्ञानाप्रमाणे शरीर, मन व आत्मा यांचा विकास व्हावा म्हणून स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले तर पाश्चात्य विचारवंत जॉन ड्युई, हबर्ट स्पेन्सर व मॉटेंसरी यांनी उल्लेखलेल्या प्रत्यक्ष जीवन म्हणजे शिक्षण, जीवन जगण्याची कला म्हणजे शिक्षण आणि स्त्रियांच्या स्वाभाविक विकास घडवणे म्हणजे शिक्षण होय. याच गोष्टी त्यांनी अनेकविविध उपक्रमाद्वारे प्रत्यक्षात आणल्या. शालेय शिक्षणाबरोबर त्यांनी स्त्रियांना समाजशिक्षण दिले.

- **बौद्धकालीन शिक्षण**

बौद्ध धर्मात विपुल प्रमाणात वाङ्मयनिर्मिती झाली. यात पाली भाषेतील त्रिपिटके ग्रंथ म्हणजेच विनयपिटक (शिस्तीचे नियम) सुप्तपिटक (बौद्धकथा) अधिधम्मपिटक (अध्यात्मिक दृष्टीकोन) हे बौद्ध धर्माचे महत्त्वपूर्ण वाङ्मय ठरले. गौतम बुद्धांनी आपल्या धर्माची शिकवण व त्यांचे आचरण यासाठी चार आर्यसत्य, अष्टांग मार्ग, पंचशील तत्वे व चार ब्रह्मविहार सांगितले आहे. नालंदा व तक्षशिला या विद्यापीठातून या काळात शिक्षण दिले जात असे. प्राथमिक स्तर, उच्च स्तर, व्यावसायिक शिक्षण या स्तरावर शिक्षण दिले जाई. यामध्ये तर्कशास्त्र, गणित, अर्थशास्त्र, न्यायशास्त्र, खगोलशास्त्र, औषधशास्त्र, समाजजीवन, तत्त्वज्ञान, संस्कृत, पाली, व्याकरण, तंत्र व विद्या आणि जातक कथा यांचा अभ्यास होत असे.

- **जैन शिक्षण**

जैन धर्म म्हणजे जिनदेवाने प्रवर्वित केलेला धर्म. भगवान महावीर हे जैन मताचे प्रतिपादन करणारे चोविसावे तीर्थकार होते. जैन शिक्षणपद्धतीत प्रत्यक्ष ज्ञान व परोक्ष ज्ञान असे ज्ञानाचे प्रकार सांगितले आहेत. जैन शिक्षणात वाचन, प्रच्छना, अनुत्पेक्ष, आम्नाय, धर्मोपदेशन अशा अध्ययन–

अध्यापन पद्धती होत्या. तत्कालीन अभ्यासक्रमात जैन धर्माचे धर्मग्रंथ, विविध कला, तसेच पुराणे, काव्य, गणित, वैद्यक व राज्यशास्त्र यांचा समावेश असे. स्वयंशिस्तीला या शिक्षणपद्धतीत महत्त्व होते.

- **इस्लामिक शिक्षण**

भारताचा मध्ययुगीन काळ इस्लामिक काळ म्हणून ओळखला जातो. इस्लामिक काळातील प्राथमिक शिक्षण हे 'मक्तबा' मधून दिले जात असे. तर उच्च शिक्षणाच्या व्यवस्थेसाठी मदरसाची रचना केलेली होती. शैक्षणिक स्तरानुसार शिक्षण दिले जात होते. 'पवित्र कुराण' हा मुस्लिम शिक्षणाचा आद्यग्रंथ आहे. त्यामुळे इस्लामिक शिक्षण हे मूलतः धार्मिक शिक्षण आहे. शिक्षणाचा प्रमुख उद्देश 'पवित्र कुराण' आहे. इमाम आबु हनिफा यांच्या मतानुसार 'शिक्षण म्हणजे कशाने आत्मा पृष्ठ बनतो किंवा आत्म्याचे नुकसान होते हे जाणून घेणे होय.'

- **वैदिक काळ व बौद्ध काळातील स्त्रीशिक्षण**

- **वैदिक काळ**

वैदिक काळात शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांना सद्योवधू व ब्रह्मवादिनी म्हटले जात असे. सद्योवधू म्हणजे विवाहापर्यंत शिक्षण घेणाऱ्या स्त्रिया व ब्रह्मवादिनी म्हणजे जन्मभर अध्ययन करणाऱ्या स्त्रिया होय. यासाठी गार्गी, मैत्रेयी व अत्रेयी याची उदाहरणे दिली जातात. स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच शिक्षणात समानसंधी दिली जात असे. गुरुकुलात सुतकाम आणि विणकाम हेही अभ्यासक्रमात शिकवले जाई. आषाला, होमाशा, ममता, लोपामुद्रा यांनी गुरुकुलात शिक्षण घेतल्याचे पुरावे मिळतात. परंतु स्त्रीशिक्षणात सामान्यवर्गीय स्त्रियांना स्थान दिले जात नसावे असे इतिहासतज्ज्ञांचे मत आहे.

- **बौद्ध काळ**

स्त्रियांना बौद्धकाळात शिक्षण पद्धतीत पुरुषांच्या बरोबरीने समान संधी होती. परंतु स्त्रियांना विहारात राहण्यास मात्र बंदी घालण्यात आली होती. कुलीन व व्यापारी वर्गातील स्त्रियांना खाजगी शिक्षण घेण्यास परवानगी नसे. बौद्ध काळात उच्च अध्ययन करणाऱ्या प्रभादेवी, संघमित्रा यांची उदाहरणे दिली जातात.

१.३ प्रस्तुत संशोधनाची गरज

वेदपूर्वकाळात विवाहसंस्था समाजात रुढ झाल्याने समाजाच्या दृष्टीने पत्नी ही पतीची सहचारिणी मानली गेली. पतीच्या सुख–दुःखाची ती वाटेकरीण होती. याचा अर्थ स्त्री–पुरुषांना समान दर्जा असून स्त्रिया सुखात होत्या हे जाणवते. वैदिक काळात स्त्रियांनी शिक्षक, तत्वज्ञ म्हणूनही नाव मिळवले. मैत्रेयी, गार्गी अशी काही उदाहरणेही परिचित आहेत. स्त्रियांना तेव्हां शिक्षणाचा पूर्ण अधिकार होता. परंतु स्मृतिकाळात समाजाची स्त्रीजीवनाविषयीची धारणा बदलली. ज्ञानसंपादनाचे काम मागे पडून स्त्रियांवर अनेक बंधने आली. स्त्रीकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला. स्त्रीने केवळ 'चूल व मूल', पतिसेवा, संसार एवढेच करावे ही मनूची विचारसरणी मान्यता पावत गेली (बाबर – १९६८).

सुमारे ४ ते ५ हजार वर्षापूर्वी पितृसत्ताक पद्धती रुढ झाली आणि कुटुंबात स्त्रियांना दुय्यम दर्जा प्राप्त झाला. वेद–अध्ययनात स्त्रिया मागे पडल्या. अर्थातच स्त्रीचा सामाजिक दर्जा ही खालावला. परिणामी स्त्रीची हळूहळू होत असलेली अवनती यानंतर इतक्या पराकोटीला पोचली की स्त्री मनाने, बुद्धीने, शरीराने, विचारांनी पूर्णपणे पुरुषाची दासी बनली. आपण दुर्बल आहोत असे ती स्वतःच मानू लागली. पुरुषही तिला अबला समजू लागले (लिमये १९७७).

पुरुषांच्या तुलनेत स्त्री मागे पडली. युद्ध व परकियांची आक्रमणे यामुळे स्त्रिया घराबाहेर पडू शकत नव्हत्या. त्यामुळे नंतर घरगुती ललित कलांचे शिक्षण त्यांना दिले जाऊ लागले. विणकाम, भरतकाम, गृहशास्त्र यांचा त्यात समावेश होता (बाबर – १९६८).

तेराव्या शतकात पुन्हा हळूहळू स्त्रिया घरच्या घरी लिहू–वाचू लागल्या. मराठीतील आद्य कवयित्री महादाईसेचे धवळे साहित्यात प्रसिद्ध आहेत. मुक्ताई–जनाईसारख्या संतकवीही झाल्या. पंधराव्या शतकात म्हणजे शिवकाळात जिजाबाई, येसूबाई, ताराबाई व शिंदे, होळकर अशा घराण्यांतील स्त्रियांची अनेक हस्तलिखिते उपलब्ध आहेत (बाबर १९६८). यावरुन त्या स्त्रिया साक्षर होत्या याबद्दल शंका राहत नाही (देशमुख – १९७३).

सन १८१८ मध्ये पेशवाईचा अंत झाला आणि इंग्रजी राजवटीची सुरुवात झाली. तेव्हा ख्रिश्चन धर्मप्रसारांच्या हेतूने शाळा काढल्या व स्त्रिया शिकू लागल्या. तरीही स्त्रिया अबला,

परावलंबीच राहिल्या. इसवी सन १८४८ मध्ये म.फुले यांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली व सावित्रीबाईंसारखी 'स्त्री शिक्षिका 'समाजाला मिळाली (मी स्वयंसिद्धा, महाराष्ट्र राज्य शै. संशोधन व प्रशिक्षण परिषद – २००५). इंग्रज सरकारची स्त्रीशिक्षणाविषयी धोरणे व त्याला भारतीय समाजसुधारकांनी दिलेला पाठिंबा यामुळे स्त्री शिक्षणाचा विकास होऊ लागला. तरीही स्त्रियांच्या सामाजिक व कौटुंबिक दर्जात अजिबात बदल झाला नाही. त्यासाठी महर्षी कर्वे यांनी प्रयत्न केले. स्त्रियांची हलाखीची परिस्थिती बदलण्यासाठी त्यांनी स्त्रीशिक्षणाचे कार्य हाती घेतले.

सद्यपरिस्थितीत स्त्री–पुरुष समानता असे ऐकण्यात असले तरी प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी आहे असे दिसून येते. एकविसाव्या शतकात स्त्री पुरुषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रात दिसत आहे. पूर्वीपेक्षा स्त्री सबला, स्वावलंबी, समर्थ झाल्याचे दिसते. थोडक्यात हा बदल म्हणजे स्त्री जीवनातील एक क्रांती आहे. हा आमुलाग्र बदल कसा घडून आला? हे जाणून घेणे गरजेचे वाटते. आणि स्त्री शिक्षणात काही अडचणीही दिसून येतात. जसे की, खेड्यापाड्यातील–तळागाळातील मुलींपर्यंत १००% शिक्षण पोहचलेले नाही. (census2011.co.in) त्यासाठी म. कर्वे यांचे शिक्षणविषयक धोरणे व विचार याचा उपयोग होऊ शकतो.

शिक्षणशास्त्राच्या दृष्टीने भूतकाळाचे ज्ञान, वर्तमानकाळाची प्रगती व भविष्यकाळातील योग्य नियोजन महत्त्वाचे ठरते (भिंताडे – २०११) .म्हणजे प्रगती व्हायची असेल तर गतकाळात काय घडून गेले? हे पाहणे जरुरीचे ठरते. शिक्षणक्षेत्रात स्त्रियांसाठी जे कार्य आजपर्यंत झाले आहे त्याची माहिती घेणे अपरिहार्य ठरते. स्त्रियांना साक्षर, स्वावलंबी करावयाचे झाल्यास स्त्रीशिक्षणाच्या कार्याचा मागोवा घेतला पाहिजे. याचा उहापोह करताना महात्मा फुले व महर्षी कर्वे यांच्या कार्याचा उल्लेख झाल्यावाचून राहत नाही. त्यांच्या कार्यातच आजच्या स्त्रीशिक्षणाच्या प्रगतीचे बीज आहे.

आता स्त्रियांना शिक्षण उपलब्ध असले तरी स्त्रियांचा कौटुंबिक दर्जा फ ारसा उंचावलेला दिसत नाही. पूर्वी स्त्रियांना शिक्षणाच्या सुविधा, स्वातंत्र्य नव्हते. समाजाची मानसिकताही अत्यंत मागासलेपणाची व संकुचित होती अशा परिस्थितीतही महर्षी कर्वे यांच्यासारख्या समाजसुधारकांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी जे कार्य केले त्याची माहिती घेऊन पुढे शिक्षणक्षेत्रात कोणते बदल होणे आवश्यक आहेत हे पाहणे आवश्यक ठरते. यांसाठी प्रस्तुत संशोधनाची गरज वाटते. आजही स्त्री व

पुरुष साक्षरतेच्या प्रमाणात तफावत आहे. (१७ मार्च २०१५ च्या अहवालानुसार) आणि ग्रामीण भागात महिलांच्या निरक्षरतेचे प्रमाण जास्त असून मुलींनी शिकून काय करायचे? असा विचार आहे. जगात जॉर्जिया, क्यूबा व रशियात अनुक्रमे १००, ९९.५, ९९.५ टक्के साक्षरता आहे. ऑस्ट्रेलिया व जपानमध्ये ९९%, चीनमध्ये ९५.९% या तुलनेत भारतात ते प्रमाण कमी आहे. उच्च शिक्षणाचा आढावा घेतल्यास २०१५ च्या एका सर्वेक्षणानुसार ते प्रमाण २३.६% इतके आहे. यातील मुलींची टक्केवारी २२.७ असून अनुसुचित जाती व जमाती अनुक्रमे १७.६% व १२% इतकी आहे. सर्वसाधारण विचार केल्यास हे प्रमाण खुपच कमी आहे (मगदूम २०१७).


कोष्ठक क्र. १.१ साक्षरतेचे शेकडा प्रमाण (महाराष्ट्र राज्य २०११)

अ. क्र.		सन २००१	सन २०११
१.	पुरुष	८५.९७%	८८.३८%
२.	स्त्रिया	६७.०३%	७५.८७%
३.	एकूण	७६.८८%	८२.३४%

(आकडेवारी संदर्भ – साईट www.census2011.co.in)

वरील आकडेवारीवरुन असे लक्षात येते की, २००१ ते २०११ च्या जनगणनेनुसार स्त्री व पुरुषांच्या साक्षरतेत वाढ झालेली आहे. परंतु स्त्री–पुरुषांच्या तुलनेत प्रत्येक ठिकाणी पुरुषांची आकडेवारी, टक्केवारी ही स्त्रियांच्या साक्षरतेच्या प्रमाणापेक्षा जास्त आहे. म्हणजेच सद्यपरिस्थितीतही स्त्रियांच्या शिक्षणाचे प्रमाण वरील पुरुषांपेक्षा कमीच आहे, ते वाढले पाहिजे. त्यासाठी स्त्रीशिक्षणाची गरज आहे.

आलेख १.१ भारताचे साक्षरता प्रमाण



संपूर्ण भारत देशातील साक्षरेतच्या या रेषाआलेखातून स्पष्ट दिसून येते की भारत देश अजूनही १००% साक्षर नाही. पुरुषांच्या साक्षरतेची टक्केवारी ही सन १९०० पासून सतत वेगाने वाढत गेलेली दिसते व साक्षरतेचे प्रमाणही वाढलेले दिसून येते.

त्या तुलनेत १९०० सालापासून स्त्री साक्षरतेचा वेग अत्यंत कमी दिसून येतो आणि साक्षरतेची टक्केवारी हळूहळू वाढलेली दिसते. स्त्री साक्षरतेचे प्रमाण सतत वाढलेले आहेच परंतु ते पुरुषांच्या साक्षरता प्रमाणापेक्षा प्रत्येक वर्षी कमीच दिसते आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्रीसाक्षरतेचा वेग फारच कमी आहे तर स्वातंत्र्यानंतर मात्र तो मोठ्या प्रमाणात वाढत गेलेला आहे.

एकंदरीत सन १९०० सालापासून स्त्री-पुरुष साक्षरता शेकडेवारी सतत वाढली असली तरीही पुरुषांची साक्षरता वाढ ही स्त्रियांपेक्षा जास्त झाली असून स्त्रियांची साक्षरता वाढ मात्र पुरुषांपेक्षा कमी दिसते. सद्यस्थितीत साक्षरतेचा दर पाहिला तरी ही स्त्री पुरुष साक्षरता दर समान दिसत नाही, तर पुरुषांचा साक्षरता दर हा स्त्रियांच्या साक्षरता दरापेक्षा जास्त आहे आणि स्त्रियांचा

साक्षरता दर कमी दिसत आहे. याशिवाय प्राथमिक, माध्यमिक व उच्चशिक्षणाचाही आढावा घेतला तर त्याची आकडेवारी अशी दिसते.

कोष्टक क्र.१.२ १९६६ साली स्त्री शिक्षणाची आकडेवारी (बाबर, पान २६२, २६३, २६४)

शैक्षणिक स्तर	संस्था संख्या		विद्यार्थी संख्या	
	मुले	मुली	मुले	मुली
पूर्वप्राथमिक	४४८	–	१७,३१८	१४,४४०
प्राथमिक	४०,१३५	१,६७९	३५,१९,९६७	२१,५५,२४७
माध्यमिक	३,८०९	३६४	११,७२,९७१	४,५९,६६९
उच्च शिक्षण	१६३	१४	१,११,३९५	४०,९७०

वरील कोष्टकातील आकडेवारीवरून असे दिसते की, व पूर्वप्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक या प्रत्येक शैक्षणिक स्तरावर मुलींची संख्या मुलांपेक्षा कमी आहे. पूर्वप्राथमिकमध्ये मुलींसाठी शिक्षण देणारी एकही संस्था दिसत नाही. प्राथमिक स्तरावर संख्या मुलांच्या १:४ प्रमाणात दिसते तर माध्यमिक स्तरावर ती खूपच कमी आहे. याचा अर्थ थोड्या प्रमाणात प्राथमिक शिक्षण मुलींना मिळत होते असे दिसून येते. मग उच्चशिक्षणाविषयी काय?

म्हणजेच सद्यपरिस्थितीतही स्त्रियांच्या शिक्षणाचे प्रमाण पुरुषांपेक्षा कमीच आहे, ते वाढले पाहिजे. त्यासाठी स्त्रीशिक्षणाची गरज आहे.

१.४ प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व

काळ हा गतिशील आहे. कालानुरुप परिस्थिती बदलते. त्याचा परिणाम आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रात दिसून येतो. शिक्षण ही देखील गतिशील प्रक्रिया असून ती अखंड चालत रहाते. म्हणून जसजशी परिस्थिती, काळ बदलेल तसा शिक्षणातही बदल घडून यायला हवा.

१२० वर्षापूर्वी महर्षी कर्वे यांनी शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य केले. स्त्रियांसाठी शाळा, वसतिगृह, महाविद्यालय, विद्यापीठ उभारले. स्त्रियांची परिस्थिती, त्यांची गरज व काळानुरुप आवश्यक ते शिक्षण स्त्रियांना मिळावे असा दूरदृष्टी विचार महर्षी कर्वे यांनी केला. तत्कालीन सामाजिक परिस्थिती ध्यानात घेऊन समाजाभिमुख असा अभ्यासक्रम त्यांनी तयार केला. त्यामुळे त्यांचे कार्य प्रगतीशील राहिले (बेदरकर – २००७, स्मरणिका).

महर्षी कर्वे यांनी केलेले कार्य हे सद्य परिस्थितीतही उपयुक्त ठरते का म्हणून त्यांच्या कार्याची माहिती घेणे गरजेचे वाटते. सामाजिकतेचे भान ठेऊन शिक्षण क्षेत्रात कसे काम करावे ? हे महर्षी कर्वे यांच्या कार्यातून समजेल. शिक्षणाचा मनुष्यजीवनावर परिणाम होतो. तो परिणाम बहुतांशी सकारात्मक ठरतो. म. कर्वे यांनी केलेल्या स्त्री शिक्षणाच्या कार्यामुळे स्त्रियांच्या जीवनावर निश्चितच परिणाम झालेला दिसून येतो. त्याचा शोध घेतला आहे.

संशोधनाचे महत्त्व पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेल्या शैक्षणिक कार्याची माहिती मिळेल.

२) महर्षी कर्वे यांनी अनुसरलेल्या/अंगीकारलेल्या कालसापेक्ष समाजाभिमुख शिक्षणाची माहिती होईल.

३) १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात शिक्षणामुळे स्त्री जीवनावर कोणते दृश्य परिणाम झाले हे समजेल.

४) महर्षी कर्वे यांच्या कार्याची उपयुक्तता समजेल.

५) सामाजिक परिस्थितीत होणाऱ्या बदलानुसार सद्यपरिस्थितीत शैक्षणिक पद्धती व अभ्यासक्रमात बदल होणे आवश्यक वाटते. म्हणूनही हा अभ्यास महत्त्वपूर्ण ठरेल.

१.५ शीर्षक

'महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेल्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास व त्याचा स्त्री जीवनावरील दृश्य परिणाम'

१.६ समस्या विधान

महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेले शैक्षणिक कार्य आणि त्याचा स्त्रीजीवनावर झालेल्या दृश्य परिणामांचा अभ्यास करणे.

१.७ संशोधनाची उद्दिष्टे

१) महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेल्या शैक्षणिक कार्याचा तत्कालीन सामाजिक संदर्भासह अभ्यास करणे;त्यासाठी तत्कालीन समाजामधील स्त्रियांचे स्थान, स्त्रियांसाठी असलेल्या शैक्षणिक सुविधांचा अभ्यास, समाजाचे स्त्री शिक्षणविषयक असलेले विचार / मते यांचा अभ्यास करणे.

२) महर्षी कर्वे यांच्या समाजाभिमुख शिक्षणाचा आढावा घेणे.

- महर्षी कर्वे यांनी कोणता अभ्यासक्रम तयार केला ते पाहणे.
- तत्कालीन सामाजिक परिस्थितीत त्या अभ्यासक्रमाची उपयुक्तता तपासणे.

३) महर्षी कर्वे यांच्या शैक्षणिक कार्यामुळे स्त्री जीवनावर झालेले दृश्य परिणाम जाणून घेणे.

- शिक्षणामुळे स्त्रियांच्या दैनंदिन जीवनात कोणता फायदा झाला ते पाहणे.
- स्त्रियांच्या दैनंदिन जीवनातील बदल जाणून घेणे.

१.८ संशोधन प्रश्न

१) महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी तत्कालीन सामाजिक परिस्थितीत अनुकूल असे कोणते शैक्षणिक कार्य केले?

२) महर्षी कर्वे यांनी स्त्रिशिक्षणासाठी कोणता अभ्यासक्रम राबवला?

३) महर्षी कर्वे यांनी केलेल्या कार्याचा स्त्रीजीवनावर कोणता दृश्य परिणाम झाला?

१.९ संकल्पनात्मक व्याख्या

१) शैक्षणिक कार्य – शिक्षणाचा प्रसार, प्रचार वाढीच्या कामी सक्रिय होऊन शिक्षणाच्या कामातील योगदान म्हणजे शैक्षणिक कार्य – (चंदन पवार, २०१०)

२) स्त्री शिक्षण – स्त्रीला साक्षर करणे. (गंगणे, २०१५)

३) दृश्य परिणाम – कोणत्याही गोष्टीचा प्रत्यक्षात दिसणारा बदल.

१.१० कार्यात्मक व्याख्या

१) शैक्षणिक कार्य – महर्षी कर्वे यांनी विधवा, कुमारिकांच्या शिक्षणासाठी केलेले प्रयत्न, स्त्रियांसाठी प्राथमिक शिक्षणापासून उच्चशिक्षणापर्यंत उपलब्ध करुन दिलेल्या सुविधा आणि शालेय शिक्षणाबरोबरच समाजशिक्षणासाठी दैनंदिन जीवनाशी निगडीत शिक्षणासाठी केलेले कार्य.

२) स्त्री शिक्षण – स्त्रियांना लिहिता वाचता येण्याबरोबरच शिक्षणामुळे त्यांच्यामध्ये होणारा इष्ट बदल, शालेय शिक्षण, संसारोपयोगी शिक्षण, दैनंदिन व्यवहार ज्ञान व स्त्रियांचा सर्वांगीण विकास.

३) दृश्य परिणाम – शिक्षणामुळे साक्षरतेसह स्वावलंबी होणे,आत्मविश्वास येणे,संस्कारक्षम गृहिणी होणे, अर्थार्जन करणे, कौटुंबिक जबाबदारी पार पाडणे अशा पद्धतीने शिक्षणामुळे प्रत्यक्ष जीवनात झालेला बदल.

१.११ प्रस्तुत संशोधनातील पद्धती

उपरोक्त संशोधनात पुढील पद्धतीचा वापर केला आहे.

- ऐतिहासिक
- सर्वेक्षण

१.१२ माहिती संकलनाची साधने

कोष्टक क्र.१.३ माहिती संकलनाची साधने

उद्दिष्ट क्रमांक	संशोधन पद्धती	प्राथमिक स्त्रोत	दुय्यम स्त्रोत
१ आणि २	ऐतिहासिक	महर्षी कर्वे यांचे आत्मवृत्त व चरित्र वृत्तपत्रे छायाचित्रे पत्रे (गुणात्मक विश्लेषण)	चरित्र,संदर्भ पुस्तके,मासिके,नियतकालिक हस्तपुस्तिका,अहवाल वृत्तपत्र (सकाळ, म.ट ा.) वेबसाईट संशोधने
३	सर्वेक्षण पद्धती	(संख्यात्मक विश्लेषण)	मुलाखत, प्रश्नावली

अभ्यास विषयास अनुसरुन ऐतिहासिक व सर्वेक्षण पद्धतीने (प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोत) मिळालेल्या माहितीचे विश्लेषण हे गुणात्मक व संख्यात्मक पद्धतीने केलेले आहे.

- **संख्यात्मक साधने**

शेकडेवारी

माजी विद्यार्थिनींकडून मुलाखती व प्रश्नावलीद्वारे मिळालेल्या माहितीचे संख्यात्मक विश्लेषण शेकडेवारी काढून आलेखाद्वारे स्पष्ट केले आहे.

१.१३ गृहीतके

गुड अँड हॅट यांच्या मते ''गृहितकृत्य ही अशी मान्यता आहे की, जी सत्य सिद्ध करण्यासाठी तिचे प्रयोगात्मक परिक्षण केले जाऊ शकते. आणि पुढील संशोधनासाठी ते उपयुक्त असते.''(कृतिसंशोधन हस्त पुस्तिका, २००५)

प्रस्तुत संशोधनातील गृहीतके

१) शिक्षण तज्ञांच्या शैक्षणिक कार्यामुळे व्यक्ति व समाजात इष्ट परिवर्तन होते. (चंदन पवार २०११)

२) महर्षी कर्वे हे स्त्री शिक्षणाचे प्रणेते होते. (देशपांडे मालती, १९९७)

३) शिक्षणामुळे व्यक्तिच्या व्यक्तिमत्वात सकारात्मक बदल घडून येतात व त्यामुळे इतरांसाठी प्रेरणा मिळते. (कांबळे गीता, २०११)

४) शिक्षणामुळे स्त्रीच्या अंगी व्यवहारकुशलता, जीवनकौशल्ये निर्माण होतात. (महाराष्ट्र राज्य शालेय शिक्षण विभाग – हस्तपुस्तिका, २००५)

१.१४ संशोधनाची व्याप्ती

संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतामधून उपलब्ध झालेले महर्षी कर्वे यांचे स्त्री शिक्षणाचे कार्य.

- **संशोधनाच्या मर्यादा**

  १) उपरोक्त संशोधन हे उपलब्ध माहिती संकलनाच्या साधनांमधून मिळालेल्या माहितीवर आधारीत आहे.

  २) (प्रतिसादकाच्या) मुलाखतदात्यांच्या भावना व मनःस्थिती यावर संशोधकाचे नियंत्रण नाही.

- **संशोधनाच्या परिमर्यादा**

  १) प्रस्तुत संशोधन महर्षी कर्वे यांनी केलेल्या स्त्री शिक्षणाच्या कार्यापुरते मर्यादित आहे.

  २) प्रस्तुत संशोधन हे प्रतिसादकाने दिलेल्या प्रतिसादापुरते मर्यादित आहे.

१.१५ जनसंख्या – एकूण ५००

महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेत शिक्षण घेतलेल्या महाराष्ट्रातील ५०० विद्यार्थिनी. एका विद्यार्थिनींची माहिती (फोन नंबर, पत्ता) हाती आल्यानंतर तिच्या संपर्कातील मैत्रिणींचे पत्ते व फोन नंबर मिळाले अशा रितीने जनसंख्या तयार झाली.

१.१६ नमुना निवडीच्या पद्धती

प्रस्तुत संशोधनाकरिता 'स्नो बॉल सॅम्पलिंग' व यादृच्छिक लॉटरी पद्धतीचा उपयोग केला आहे.

- **स्नो बॉल सॅम्पलिंग**
- **लॉटरी पद्धत**

१.१७ नमुना

१) महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेतील माजी विद्यार्थिनी.

२) एस.एन.डी.टी. महाविद्यालयातील माजी विद्यार्थिनी.

सन १९१६ च्या आधीच्या विद्यार्थिनी सद्य परिस्थितीत भेटणे व त्यांची मुलाखत घेणे अशक्य असल्याने सन १९१६ पासून पुढील २० वर्षाच्या अंतराने सालाप्रमाणे ५ गट केले आहेत. माजी विद्यार्थिनींचे शैक्षणिक कालावधीनुसार पाच गट पुढीलप्रमाणे–

कोष्टक क्र. १.४ नमुना निवड गट

गट क्र.	शैक्षणिक कालावधी
१.	सन १९१६ ते ३६
२.	सन १९३७ ते ५७
३.	सन १९५८ ते ७८

४.	सन १९७९ ते ९९
५.	सन २००० ते २०१५

१.१८ संशोधन प्रकरणे

१) प्रस्तावना

२) संबंधित साहित्याचा आणि संशोधनाचा आढावा

३) संशोधनाची पद्धती व कार्यवाही

४) माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन

५) सारांश, निष्कर्ष व शिफारशी

१.१९ समारोप

प्रकरण एक मध्ये संशोधनाचा आराखडा मांडला असून त्यामध्ये संशोधनाची प्रस्तावना, संशोधनाची गरज, संशोधनाचे महत्त्व व उद्दिष्टे स्पष्ट केली आहेत. प्रकरण दोन मध्ये संशोधनाशी उपयुक्त अशा संदर्भ साहित्याचा व संशोधनाचा मागोवा घेतला आहे.

१.२० संदर्भसूची

१) महर्षी कर्वे– पटवर्धन, आत्मवृत्त व चरित्र, भास्कर धोंडो कर्वे चिटणीस हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, हिंगणे, १९५८, पुणे ४. पृष्ठ क्र. १६६

२) उपरोक्त पृ. २३१

३) उपरोक्त पृ. २३१

४) उपरोक्त पृ. ४३२

५) उपरोक्त पृ. ३१५

६) लिमये अनसूया, स्त्रीचे समाजातील स्थान आणि भूमिका, चिटणीस समाजवादी महिला सभा शनिवार पेठ, पुणे – ३०, १९७७, पृष्ठ क्र. १५

७) बाबर सरोजिनी, स्त्रीशिक्षणाची वाटचाल, महाराष्ट्र शासन शिक्षण संचलनालय, मुंबई, १ मे १९६८, पृष्ठ क्र. १४, उपरोक्त पृ. ७०

८) डॉ. देशमुख शारदा, शिवकालीन व पेशवाईतील स्त्री–जीवन, रं. श्री. सरदेशपांडे कार्यवाह,टिळक महाराष्ट्र विद्यापीठ गुलटेकडी, पुणे ,१९७३, पृष्ठ क्र. ४६

९) भागवत कमल, स्त्री चळवळीची वाटचाल, प्रागतिक पुस्तक प्रकाशन, बुधवार पेठ, पुणे प्रथमावृत्ती ५ नोव्हेंबर १९८५

१०) बेदरकर कुसुम, अण्णांचे मनोगत, स्मरणिका, शताब्दी वर्ष २००६–०७.

११) कर्वे संजीवनी, महिलाश्रम प्रशाला, शतकाची वाटचाल, स्मरणिका, शताब्दी वर्ष २००६–०७.

१२) आमची परंपरा १, 'होईन मी स्वयंसिद्धा', द्वितीयावृत्ती, २००५, पृष्ठ क्र.३ उपरोक्त

१३) भिंताडे वि.रा. शैक्षणिक संशोधन पद्धती, नित्यनूतन प्रकाशन, पुणे ३०,पृष्ठ क्र.७६

१४) वेबसाईट – www.cencus2011.co.in

प्रकरण २ रे

संबंधित साहित्याचा आणि संशोधनाचा आढावा

अ. क्र.	तपशील	पान क्र.
२.१	प्रस्तावना	२५
२.२	संबंधित साहित्य व संशोधन आढाव्याचे महत्त्व	२५
२.३	संबंधित संदर्भ साहित्याचा आढावा	२६
२.४	पूर्व संशोधनाचा आढावा	२८
२.५	पूर्व संशोधनाचा आढावा व संशोधनातील वेगळेपणा	४७
२.६	संबंधित संशोधनाच्या व पूर्व संशोधनाच्या अभ्यासाचा उपयोग	४८
२.७	समारोप	४८

प्रकरण २ रे

संबंधित साहित्याचा आणि संशोधनाचा आढावा

२.१ प्रस्तावना

महर्षी कर्वे यांनी केलेल्या स्त्री शिक्षणाच्या कार्याचा अभ्यास करताना १९ व्या शतकात स्त्री शिक्षणाची असणारी स्थिती, तत्कालीन समाजाचे त्यासंबंधी असलेले विचार, स्त्रियांचे समाजातील स्थान, स्त्रीची भूमिका, स्त्री–पुरुष विषमता, स्त्री शिक्षणाची गरज, स्त्री शिक्षणासाठी इंग्रज, भारतीय समाजसुधारक, समाजसेवी संस्था यांनी केलेले प्रयत्न व शिक्षणामुळे झालेला सकारात्मक बदल या मुद्यांचा प्रस्तुत प्रकरणात संशोधिकेने आढावा घेतला आहे. त्यासाठी प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोताचा वापर केला आहे.

प्राथमिक स्त्रोतामध्ये महर्षी कर्वे यांचे आत्मवृत्त व चरित्र, त्यातील पत्रे, वर्तमानपत्रातील लेख आणि छायाचित्रे याद्वारे महर्षी कर्वे व त्यांचे स्त्रीशिक्षण विषयक कार्य याची माहिती घेतली तसेच दुय्यम स्त्रोत म्हणून महर्षी कर्वे व त्यांचे स्त्री शिक्षणविषयक कार्य याबद्दल इतर साहित्यिकांनी लिहिलेल्या संदर्भ पुस्तकांचा उपयोग केला असून त्याचबरोबर वर्तमानपत्रात त्यांच्याविषयी आलेले लेख व बातम्या यांची कात्रणे याचाही आधार घेतला आहे. आणि प्रश्नावली व मुलाखत या तंत्राचा वापर केला आहे. तसेच संबंधित संशोधने व पूर्व संशोधनाचा आढावा घेतला आहे.

२.२ संबंधित साहित्य व संशोधन आढाव्याचे महत्त्व

संशोधन कार्य सुरु केल्यापासून संशोधकास संशोधनासाठी अधिक माहिती मिळवावी लागते. कारण त्यातून नवनवीन माहितीचा शोध घेता येतो. ज्यामुळे संशोधन कार्यात भर घालता येते. संशोधनास मदत होते. संशोधन विषयासंबंधी सखोल माहिती उपलब्ध होते. इतर संशोधकांनी संशोधनासाठी वापरलेल्या संशोधनाच्या पद्धती व माहिती संकलनाच्या विविध साधनांची माहिती होते. संशोधन कार्य पूर्ण झाल्यानंतर संशोधन अहवाल कसा लिहावा? याचे मार्गदर्शन मिळते.

संशोधन विषयाची पुनरावृत्ती होत नाही आणि मुख्य म्हणजे स्वतःच्या संशोधनास योग्य ती दिशा मिळते. या सर्व गोष्टीवरुन संशोधन आढाव्याचे महत्त्व लक्षात येते.

२.३ संबंधित संदर्भ साहित्याचा आढावा

संशोधकाने विषय निश्चिती केल्यानंतर विविध शैक्षणिक संस्थाना भेटी देऊन संबंधित संदर्भ साहित्याचा आणि संशोधनाच्या पूर्व संशोधनाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला त्यासाठी खालील ठिकाणी भेटी दिल्या.

१) सावित्रीबाई फुले विद्यापीठ – जयकर ग्रंथालय

२) सावित्रीबाई फुले विद्यापीठ – शिक्षणशास्त्र विभाग (ग्रंथालय)

३) सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यासकेंद्र

४) इंडियन इन्स्टिट्यूट फॉर एज्युकेशन (IIE)

५) आलोचना संस्था (AGO) पंचाद्री सोसा.

६) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथालय, पुणे

७) कर्वे समाज सेवा संस्था, कर्वेनगर, पुणे

८) एस. एन. डी. टी. महाविद्यालय, पुणे

९) महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, कर्वेनगर, पुणे महिलाश्रम हायस्कूल, कर्वेनगर, पुणे ५२

१०) आदर्श बहुव्यापी शिक्षण व संशोधन महाविद्यालय, एरंडवणा, कर्वेरोड पुणे.

वरील ठिकाणी संदर्भ साहित्याचा व पूर्व संशोधनाचा आढावा घेतला.

- **संदर्भ साहित्य**

शासकिय प्रकाशन– पुस्तके

- जोशी न. म., महाराष्ट्राचे शिल्पकार–महर्षी धोंडो केशव कर्वे, सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, दादर, मुंबई

- बाबर सरोजिनी, स्त्रीशिक्षणाची वाटचाल, महाराष्ट्र शासन शिक्षण संचनालय, मुंबई १९६८, बाबर सरोजिनी – भारतीय स्त्री
- हाटे चंद्रकला, स्वातंत्र्योत्तर भारतीय स्त्री, सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, सचिवालय, मुंबई, प्रथमावृत्ती एप्रिल १९७३.

महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था प्रकाशन– पुस्तके

- कर्वे धोंडो केशव, पटवर्धन नारायण महादेव, धोंडो केशव कर्वे आत्मवृत्त व चरित्र– भास्कर धोंडो कर्वे, चिटणीस हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, पुणे प्रथमावृत्ती १९५८
- कर्वे आनंदीबाई, माझे पुराण, केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, मुंबई १९९८
- कर्वे कावेरी, हिंगण्याच्या माळावर, हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, पुणे २
- आठवले पार्वतीबाई, माझी कहाणी, अनाथ बालिका श्रमाची मंडळी, पुणे, १९३६
- देशपांडे मालती – स्त्री शिक्षणाचे प्रणेते महर्षी कर्वे, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था कर्वेनगर, पुणे ५२
- कर्नाटकी चंद्राताई, भारतीय स्त्री शिक्षणात स्त्रीचे स्थान, के. रा. पालकर, चिटणीस, हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, कर्वेनगर, पुणे, प्रथमावृत्ती डिसेंबर १९६७
- पटवर्धन गंगूबाई, भारतीय स्त्री, 'गेल्या दीडशे वर्षातील स्त्रीशिक्षणाचे प्रयोग', के. रा. पालकर, चिटणीस हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, कर्वेनगर, पुणे, डिसेंबर १९६७.
- शेंडे कुसुमताई, उतराई, श्री. अ. ल. शेंडे, राजहंस रत्नप्रभा प्रकाशन, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, पुणे २००९
- तेरणीकर सुलभा, गाथा शतकाची, सचिव महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, कर्वेनगर, पुणे ५२, २००७

इतर प्रकाशने पुस्तके

- आठलेकर मंगला, महर्षी ते गौरी (स्त्री स्वातंत्र्याची वाटचाल), राजहंस प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे पहिली आवृत्ती १९९९
- भगत रा. तु. शिक्षणातील थोर विचारवंत, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, स्पटेंबर २००१
- भागवत कमल, स्त्री चळवळीची वाटचाल, प्रागतिक पुस्तक प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८५
- भागवत विद्युत, स्त्री प्रश्नांची वाटचाल : परिवर्तनाच्या दिशेने प्रतिमा प्रकाशन, पुणे २००९
- खोले विलास, महर्षी धोंडो केशव कर्वे, मॅजेस्टिक पब्लिसिंग हाऊस ठाणे, द्वितीयावृत्ती ऑक्टो.

२.४ पूर्व संशोधनाचा आढावा

संशोधन विषयाशी संबंधित अशा खालील पूर्व संशोधनाचा आढावा संशोधिकेने घेतला आहे.

कोष्टक क्र. २.१ पूर्व संशोधनाचा आढावा

अ.क्र.	संशोधक	संशोधन विषय
एम. एड.स्तरावरील संशोधने		
१	गुंजाळ अनुपमा यशवंत(२००७–२००८)	डॉ. आंबेडकरांचे स्त्री शिक्षण विषयक योगदान एक अभ्यास
एम.फील.स्तरावरील संशोधने		
१	बागले बा. म. (२००६)	प्रवरानगर परिसरातील पद्मश्री डॉ. विखे पाटील यांचे शैक्षणिक कार्य व त्याची परिणामकारकता यांचा अभ्यास.
२	गुप्ता आर. पी (१९८५)	स्वामी विवेकानंदाच्या शैक्षणिक विचारांचा अभ्यास करणे.

३	तौर संतोष २००९	शिक्षणमहर्षी ज्ञानदेव मोहेकर यांच्या शैक्षणिक कार्याचा चिकित्सक अभ्यास.
४	चव्हाण बी. पी. एस (१९८१)	स्वामी दयानंद यांचे तात्विक विचारामागील शैक्षणिक विचार.
पीएच. डी. स्तरावरील संशोधने		
१	बाबासाहेब केरबा कांबळे (२०१६)	डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांच्या शैक्षणिक विचारांचा सदयकालीन शैक्षणिक दृष्टिकोनातून अभ्यास
२	गागरे शं. बा. (२०००)	पांडुरंग शास्त्री आठवले यांच्या शैक्षणिक विचारांचा समाजावर झालेल्या प्रभावाचा अभ्यास.
३	कांबळे गीता (२०११)	शांताबाई दाणी यांच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास.
४	पारघे शर्मिला, (२००७)	मा. अण्णा हजारे यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा राळेगण सिद्धीच्या संदर्भात समाजावर पडलेल्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास.
५	चौधरी प्रभाकर श्रावण (१९८८)	लोकमान्य टिळक यांचे शैक्षणिक कार्य.
६	पवार चंदन (२०१०)	महात्मा फुले व सावित्रीबाई फु ले यांचे शैक्षणिक विचार व योगदान आणि आजच्या शिक्षणासाठी त्याची उपयुक्तता यांचा अभ्यास.
७	मांडगे सुदाम (२०११)	रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पत्रांमधून व्यक्त होणाऱ्या शैक्षणिक प्रेरणा व त्यांचा शैक्षणिक कार्यावरील प्रभावांचा अभ्यास.
८	कदम गोविंद (२०१०)	एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील समाजसुधारकांचे शैक्षणिक विचार : एक चिकित्सक अभ्यास
९	जाधव दिलीप (२०११)	महात्मा फुले व महर्षी कर्वे यांचे स्त्रीसुधारणाविषयक योगदान (सन १८४८ ते १९४८)
१०	राईरीकर अपर्णा देवदास, पुणे विद्यापीठ (२००३)	कै. गुरुवर्य विष्णू गोविंद उर्फ अण्णासाहेब विजापूरकर यांचे शैक्षणिक कार्य व शैक्षणिक विचार याचा चिकित्सक अभ्यास

• पूर्व संशोधनाचा आढावा

एम. एड. स्तरावरील संशोधने

संशोधक – गुंजाळ अनुपमा यशवंत २००७–२००८, पुणे विद्यापीठ

विषय – डॉ. आंबेडकरांचे स्त्री शिक्षण विषयक योगदान एक अभ्यास

उद्दिष्टे –

१) डॉ. आंबेडकरांच्या स्त्री शिक्षणावर आधारित साहित्याचा अभ्यास करणे.

२) डॉ. आंबेडकरांच्या स्त्री शिक्षणावर आधारित साहित्याचा अभ्यास करणे.

३) डॉ. आंबेडकरांनी स्त्री शिक्षणाचे महत्त्व कशाप्रकारे स्पष्ट केले हे अभ्यासणे.

४) डॉ. आंबेडकरांचे स्त्री शिक्षणविषयक विचार सद्यस्थितीत किती उपयोग आहे हे अभ्यासणे.

संशोधन पद्धती – ऐतिहासिक

१) प्राथमिक – डॉ. आंबेडकरांनी लिहिलेले पुस्तकग्रंथ

२) दुय्यम – इतरांनी त्याच्याविषयी लिहिलेले ग्रंथ

३) मुलाखत

निष्कर्ष –

१) डॉ. आंबेडकरांच्या साहित्यामधून त्यांची शिक्षणाविषयी तळमळ दिसून येते.

२) स्त्री शिक्षणासंदर्भात त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे.

३) स्त्री शिक्षणाचे महत्त्व तत्कालीन मागासलेल्या समाजास पटवून दिले.

४) डॉ. आंबेडकरांचे स्त्रीशिक्षणविषयक विचार आजच्या परिस्थितीतह बहुतांशी उपयुक्त ठरतात.

एम. फिल स्तरावरील संशोधने

संशोधक – बागले बा. म. २००६, पुणे विद्यापीठ

विषय – प्रवरानगर परिसरातील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांचे शैक्षणिक कार्य व त्याची परिणामकारता यांचा अभ्यास.

उद्दिष्टे –

१) पद्मश्री डॉ. विखे पाटील यांच्या जीवनविषयक आणि शिक्षणविषयक जीवनाचा अभ्यास करणे.

२) डॉ. विखे पाटील यांच्या शैक्षणिक संस्थेच्या तत्त्वज्ञानासंबंधी अभ्यास करणे.

३) आधुनिक शिक्षण व्यवस्थेवर डॉ. विखे पाटील यांच्या विचारांचा झालेल्या प्रभावांचा अभ्यास करणे.

४) डॉ. विखे पाटील यांचे शैक्षणिक कार्य व शैक्षणिक विचारांचे आधुनिक शिक्षणातील स्थान समजावून घेणे.

संशोधन पद्धती – सर्वेक्षण

माहिती संकलनाची साधने – प्रश्नावली मतावली

निष्कर्ष –

१) प्रवरानगर परिसराचा सामाजिक स्तर उंचावला.

२) शेतकरी कुटुंबाच्या राहणीमानात लक्षात येण्याजोगा बदल घडून आला.

३) विखे पाटलांचा साधेपणा हा गुण दिसून येतो.

४) ग्रामीण भागातील विद्यार्थी पदवीधर झाल्याने त्यांना नोकरीची संधी मिळाली.

५) शिक्षणामुळे लोकांच्या विचारसरणीत पगल्भता झाली.

६) प्रवरानगर परिसरात व्यावसायिक प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध झाली. त्यामुळे अत्यंत कमी कालावधीत ग्रामीण भागातील विद्यार्थी उदरनिर्वाहाला लागले.

७) शिक्षणामुळे सकारात्मकता वाढली.

संशोधक – तौर संतोष २००९ य. च. मु. विद्यापीठ

विषय – शिक्षणमहर्षी ज्ञानदेव मोहेकर यांच्या शैक्षणिक कार्याचा चिकित्सक अभ्यास

उद्दिष्टे –

१) शिक्षणमहर्षी ज्ञानदेव मोहेकर यांचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्य अभ्यासणे.

२) शिक्षणमहर्षी ज्ञानदेव मोहेकर यांचे सामाजिक व राजकीय क्षेत्रातील योगदान अभ्यासणे.

३) शिक्षणमहर्षी ज्ञानदेव मोहेकर यांच्या इतर कार्याचा आढावा घेणे.

संशोधन पद्धती – ऐतिहासिक व वर्णनात्मक

माहिती संकलनाची साधने – प्रश्नावली, मतावली

निष्कर्ष –

१) कळंब भागातील तळागाळातील बहुजन समाजासाठी परिसरात सक्तीच्या शिक्षणाच्या सोयी वाढवण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले.

२) शिक्षणातून सहकार चळवळ रुजवली.

३) विविध मार्गांनी आधी स्वतः शिक्षण घेतले व नंतर आपल्या परिसरातील मुला मुलींच्या शिक्षणासाठी कवाडे खुली केली.

४) परिसरात विविध ठिकाणी शाळा/विद्यालये सुरु केली.

५) शिक्षणातून जातीपातीचा भेद मिटवला.

६) निराधार महिला, दलित आर्थिक मागासांना शिक्षित केले.

संशोधक - चव्हाण बी. पी. एस (१९८१)

विषय – शिक्षणशास्त्र पुणे विद्यापीठ

संशोधन विषय – स्वामी दयानंद यांचे तात्विक विचारामागील शैक्षणिक विचार

उद्दिष्टे –

१) स्वामी दयानंदाच्या तात्विक विचारामागील शैक्षणिक त्या विचारांचा अभ्यास करणे

२) स्वामी दयानंदाच्या ग्रंथामधून शिक्षण व्यवस्थेच्या स्वरुपाविषयीचा अभ्यास करणे.

३) स्वामी दयानंदाच्या ग्रंथामधून त्यांच्या अध्यात्मिक, नैतिक, धार्मिक शिक्षणाविषयी विचारांचा अभ्यास करणे.

संशोधन पद्धती – ऐतिहासिक

माहिती संकलनाची साधने – ग्रंथ, पुस्तके, लेख, पत्रे, अहवाल

निष्कर्ष –

१) राष्ट्रीय शिक्षणाची योजना प्रथम दयानंदानी मांडली.

२) जातीव्यवस्था मोडून काढण्याच्या, अस्पृश्यता दूर करण्याचा पुरस्कार त्यांनी शिक्षणव्यवस्थेत केला.

३) शिक्षण ही सतत चालणारी अध्यात्मिक, सामाजिक प्रक्रिया आहे.

४) अभ्यासक्रम जीवनस्पर्शी असावा.

५) शिक्षण व विद्यार्थी यांच्यामध्ये परस्परांविषयी प्रेम आदर असावा.

संशोधक – गुप्ता आर. पी (१९८५)

विषय – शिक्षणशास्त्र, पुणे विद्यापीठ

संशोधन विषय – स्वामी विवेकानंदाच्या शैक्षणिक विचारांचा अभ्यास करणे.

उद्दिष्टे –

१) स्वामी विवेकानंदाच्या शैक्षणिक विचारांचा अभ्यास करणे

संशोधन पद्धती – सर्वेक्षण

माहिती संकलनाची साधने – स्वामी विवेकानंदाच्या वाङ्मयाचे प्राथमिक व दुय्यम स्त्रोत

निष्कर्ष –

१) स्वामी विवेकानंद बालकांच्या शिक्षणामध्ये शाररिक व मानसिक शिक्षणावर भर देतात.

२) शिक्षण म्हणजे जीवनाची तयारी होय.

३) शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावी.

४) स्वालंबन हे शिक्षणाने घडावे.

५) शिक्षणाची समान संधी सर्वांना मिळावी.

पीएच.डी. स्तरावरील संशोधने

संशोधक – बाबासाहेब केरबा कांबळे (२०१६) पीएच.डी.

विषय – शिक्षणशास्त्र

संशोधन विषय – डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांच्या शैक्षणिक विचारांचा सदयकालीन शैक्षणिक दृष्टिकोनातून अभ्यास

उद्दिष्टे –

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षणविषयक विचारांची माहिती मिळविणे.

२) डॉ. आंबेडकर यांच्या शैक्षणिक विचारांमुळे व शैक्षणिक कार्यामुळे महाराष्ट्रात झालेल्या शैक्षणिकविकासाचा व सामाजिक परिवर्तनाचा शोध घेणे.

३) डॉ. आंबेडकर यांच्या शैक्षणिक विचारांचा महाराष्ट्रातील सदयकाळातील शैक्षणिक समस्या सोडविण्यास झालेली मदत व शैक्षणिक दृष्टिकोन यांचा अभ्यास करणे.

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक विचारांची आजच्या शिक्षण पद्धतीसाठी उपयुक्तता व व्यवहारिकता यांचे विश्लेषण करणे.

संशोधन पद्धती – ऐतिहासिक व सर्वेक्षण

माहिती संकलनाची साधने – १) प्राथमिक स्त्रोत, २) दुय्यम स्त्रोत, ३) प्रश्नावली, ४) मुलाखत

निष्कर्ष –

१) शिक्षणाशिवाय पर्याय नाही. सर्वांना शिकण्याची संधी मिळावी, स्त्रियांना शिक्षण मिळावे.

२) पूर्ण मानव हा शैक्षणिक संस्कारातून घडतो. त्यासाठी स्त्री शिक्षणाला महत्त्व द्यावे. स्त्री शिवाय समाजाला अस्तित्व नाही. स्त्रियांच्या शिक्षणासाठी डॉ. आंबेडकरांनी हिंदू–कोडबिल व पीपल्स एज्युकेशन सोसायटीमार्फत स्त्री शिक्षणाला प्राधान्य दिले.

३) शिक्षणामुळे परिवर्तन झाले आहे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारातून साकार झाले आहे.

४) समाजाच्या चळवळी व शैक्षणिक कार्य यांचा संबंध असावा हे अंशतः मान्य आहे.

५) शिक्षण ही जीवनातील महत्त्वाची बाब आहे. सर्व दुखण्यावर शिक्षण हेच औषध आहे हे मान्य झाले आहे.

६) जीवनाभिमुख शिक्षणासाठी योग्य अभ्यासक्रमाची कार्यवाही काटेकोरपणे राबवावी.

७) सध्याच्या शिक्षणामध्ये प्राथमिक शाळामध्ये स्त्री शिक्षकांच्या जास्तीत जास्त नियुक्त्या करण्यात येतात.

संशोधक – शं. बा. गागरे २००० पुणे विद्यापीठ ऑक्टोबर

विषय – पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या शैक्षणिक विचारांच्या समाजावर झालेल्या प्रभावांचा अभ्यास

उद्दिष्टे –

१) स्वाध्याय परिवाराचे प्रणेते व संस्थापक पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या जीवनविषयक शिक्षणविषयक विचारांचा अभ्यास करणे.

२) स्वाध्यातील केंद्रे, युवा केंद्रे इत्यादीमधील कार्यक्रम व आचारसंहिता अभ्यास करणे.

३) स्वाध्यायामुळे , स्वाधीयांच्या व्यक्तीगत, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, नैतिक, अध्यात्मिक व सांस्कृतिक जीवनात झालेल्या परिवर्तनाचा अभ्यास करणे.

४) स्वाध्यायातील शिक्षणविषयक प्रयोगांचा अभ्यास करणे.

संशोधन पद्धती – सर्वेक्षण व ऐतिहासिक (मिश्र)

संशोधन साधने – प्रश्नावली, मतावली, मुलाखती, नोंदी

संख्याशास्त्रीय परिणामे – शेकडेवारी, मध्यमान, मध्यमा, परिक्षिका

निष्कर्ष –

१) स्वाध्यायात सर्व स्तरावरील लोकांचा सहभाग आहे.

२) स्वाध्यायी स्वखर्चाना स्वतःहून सहभागी आहे.

३) स्वाध्यायाचे विचार प्रत्यक्ष जीवनात उतरविलेले दिसून येतात. उदा. भक्तीफेरी

४) स्वाध्यायी विचारांचे ग्रंथ खरेदी करतात. त्याचे वाचन करतात.

संशोधक – गीता कांबळे – २०११ पुणे विद्यापीठ

विषय – शांताबाई दाणी यांच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास

उद्दिष्ट्ये –

१) शांताबाई दाणी यांच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करणे.

२) शांताबाई दाणी यांच्या व्यक्तीमत्वाचा अभ्यास करणे.

३) शांताबाई दाणी यांनी लोकशिक्षणासंदर्भात केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.

४) शांताबाई दाणी यांनी शैक्षणिक योगदान घेण्यासाठी प्रभावी ठरलेल्या घटकांचा अभ्यास करणे.

५) शांताबाई दाणी यांच्या शैक्षणिक कार्याचे सद्यस्थितीतील महत्त्व अभ्यासणे.

संशोधन पद्धती – वर्णनापर पद्धती (व्यक्ति अभ्यास)

न्यादर्श – नमुना निवड – स्नो बॉल सॅम्पलिंग

साधने – मुलाखत, प्रश्नावली

संख्याशास्त्रीय साधने – शेकडेवारी, गुणात्मक पद्धती काही ठिकाणी संख्यात्मक

निष्कर्ष –

१) शांताबाई दाणी याचे शैक्षणिक कार्य इतरांसाठी प्रेरणादायी आहे.

२) शांताबाई दाणी यांच्या कार्यामुळे इतरांच्या व्यक्तिमत्वात सकारात्मक बदल घडून आला.

३) शांताबाई दाणी यांनी लोकशिक्षणासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले.

४) शांताबाई दाणी यांच्या शैक्षणिक कार्य सद्यस्थितीतही उपयोगी पडते.

संशोधक – शर्मिला भाऊसाहेब पारधे (पुणे विद्यापीठ)

विषय – मा. अण्णा हजारे यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा राळेगळ सिद्धीच्या संदर्भात

समाजावर पडलेल्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास.

उद्दिष्ट्ये –

१) मा. अण्णा हजारे यांनी परिसरात केलेल्या सामाजिक कार्याचा अभ्यास करणे.

२) मा. अण्णा हजारे यांनी परिसरात केलेल्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करणे.

संशोधन पद्धती – सर्वेक्षण, व्यक्तिअभ्यास

माहितीची साधने – प्रश्नावली, मुलाखत

संख्याशास्त्रीय साधने – शेकडेवारी

निष्कर्ष –

उद्दिष्ट क्र. १

१) १९७५ पूर्वी गावात दारु सहज उपलब्ध होती.

२) दारु पिणाऱ्यांची संख्या खूप होती.

३) आता दारू दुकान नाही, गावात दारु मिळत नाही. कोणी पितही नाही तसेच पान, तंबाखू, गुटखाही मिळत नाही.

उद्दिष्ट क्र. २

१) नापासांची शाळा हा विशेष उपक्रम सुरु आहे.

२) अण्णा स्वतः शाळेस भेट देऊन मार्गदर्शन करतात.

३) ग्रामसभेत चर्चा, अडचणी, उपाय यावर विचार होतो.

४) नापास मुलांसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात.

संशोधक – चौधरी प्रभाकर श्रावण (पुणे विद्यापीठ)

विषय – लोकमान्य टिळक यांचे शैक्षणिक कार्य

उद्दिष्ट्ये –

१) लो. टिळकांच्या शैक्षणिक विचारांचा शोध घेणे व त्याचे विशदीकरण करणे.

२) टिळकांचे अध्यात्मिक तत्वज्ञान आणि शिक्षणविचार याचा संबंध पाहणे.

३) टिळकांनी शिक्षक म्हणून औपचारिक व लोकशिक्षक म्हणून केलेल्या अनौपचारिक शैक्षणिक कामगिरीचे मूल्यमापन करणे.

४) टिळकांच्या शैक्षणिक कामगिरीचे मूल्यमापन करणे.

पद्धती – ऐतिहासिक

माहिती संकलनाची साधने– लो. टिळकांवरील वाङ्मय

निष्कर्ष –

१) लो. टिळकांनी भारतीय शिक्षणाला ज्वलंत राष्ट्रवादाची देणगी दिली.

२) टिळकांनी शिक्षणक्षेत्राला विद्यार्थी केंद्री अशी मोलाची नवी दृष्टी दिली.

३) अभ्यासक्रमात वास्तववादी आशय आणण्याचे कार्य लोकमान्य टिळकांनी केले.

४) सर्व सामान्य माणसाचा व बहुजन समाजाच्या जीवनाचा, गरजांचा व महत्त्वकांक्षाचा विचार भारतीय शिक्षणात होण्यास टिळकानंतर चालना मिळाली.

संशोधक – चंदन पवार – २०१० पुणे विद्यापीठ

विषय– महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक विचार व कार्याचा अभ्यास करणे.

उद्दिष्ट्ये –

१) महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक विचार व कार्याचा अभ्यास करणे.

२) महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी केलेल्या शैक्षणिक कार्यामुळे झालेल्या शैक्षणिक व सामाजिक परिवर्तनाचा शोध घेणे.

३) महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक विचार व कार्याची सध्याच्या शैक्षणिकपद्धतीसाठी उपयुक्तता अभ्यासणे.

संशोधन पद्धती – सर्वेक्षण

माहिती संकलनाची साधने – मुलाखत

निष्कर्ष –

१) महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या कार्यामुळे महाराष्ट्रात शैक्षणिक विकास घडून आला.

२) महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या कार्यामुळे सामाजिक परिवर्तन होण्यास मदत झाली.

३) महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी केलेल्या शैक्षणिक कार्याची सद्य परिस्थितीतही उपयुक्तता जाणवते.

संशोधक – सुदाम तुकाराम मांडगे (२०११) पुणे विद्यापीठ

विषय – रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, पद्मभुषण कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या पत्रांमधून व्यक्त होणाऱ्या शैक्षणिक प्रेरणा व त्यांचा शैक्षणिक कार्यावरील प्रभावांचा अभ्यास

उद्दिष्टे –

१) कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पत्रांमधून व्यक्त होणारे शैक्षणिक विचार अभ्यासणे.

२) कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक प्रेरणा अभ्यासणे.

३) कर्मवीर भाऊराव पाटील त्यांच्या संस्थेवरील कार्याचा प्रभाव अभ्यासणे.

संशोधन पद्धती –

ऐतिहासिक सर्वेक्षण – दस्तऐवज पृथक्करण मिश्र पद्धती

माहिती संकलनांची साधने – मुलाखत, प्राथमिक व दुय्यम स्त्रोत

संख्यात्मक परिणामे – गुणात्मक पद्धत – शेकडेवारी

निष्कर्ष –

उद्दिष्ट क्र. १

१) सर्व स्तरांवरील शिक्षण मोफत असावे.

२) सर्व विद्यार्थ्यांनी मा. व उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कष्ट करून स्वालंबनाचे शिक्षण घ्यावे.

उद्दिष्ट क्र. २

१) कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्यामुळे समाजातील तळागाळातील मुलांना शिक्षणाची प्रेरणा दिली.

२) कष्ट करुन शिकणाऱ्यांची संख्या वाढली.

उद्दिष्ट क्र. ३

१) सर्वांसाठी शिक्षण मिळावे म्हणून संस्था उभारले.

२) प्राथमिक, माध्यमिक शिक्षणाची सोय केली.

३) स्त्रीविषयक व अस्पृश्यांसाठी कार्य केले.

संशोधक – कदम गोविंद दगडू (टि. म. वि.)

संशोधन विषय – एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील समाजसुधारकांचे शैक्षणिक विचार, एक चिकित्सक अभ्यास

उद्दिष्टे –

१) १९ व्या शतकातील सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

२) १९ व्या शतकातील शैक्षणिक चळवळीचा अभ्यास करणे.

३) १९ व्या शतकातील शैक्षणिक चळवळीत प्रेरणादायी ठरलेल्या घटकांचा अभ्यास करणे.

४) १९ व्या शतकातील विविध समाजसुधारकांचे शैक्षणिक विचार व योगदान यांचा अभ्यास करणे.

५) शेतकरी, कामगार, दलित, बहुजन समाज व स्त्रियांच्या शिक्षणासंबंधी समाज सुधारकांनी मांडलेल्या शिक्षण विचारांचा अभ्यास करणे.

६) १९ व्या शतकातील शैक्षणिक विचारांची विसाव्या शतकातील उपयोग तपासून पहाणे.

संशोधन पद्धती – विश्लेषणात्मक व वर्णनात्मक

निष्कर्ष –

१) १९ व्या शतकातील सामाजिक परिस्थिती अत्यंत मागासलेली होती.

२) १९ व्या शतकात अनेक समाज सुधारकांनी शिक्षणविषयक नवे विचार मांडण्यासाठी चळवळी केल्या.

३) १९ व्या शतकात आगरकर, टिळक, आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज अशा अनेक विचारवंताचे कार्य प्रेरणादायी असे होते.

४) शाहू–फुले–आंबेडकर यांबरोबर इतरही समाजसुधारकांनी आपले शिक्षणविषयक कार्य केले.

५) समाजातील सर्वच स्तरावरील घटक शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले होते.

६) १९ व्या शतकातील शैक्षणिक विचार हे विसाव्या शतकातही विविध प्रकारे उपयुक्त ठरतात.

संशोधक – दिलीप साहेबराव जाधव – २०११ सप्टेंबर टि. म. वि.

विषय – महात्मा फुले व महर्षी कर्वे यांचे स्त्री सुधारणा विषयक योगदान (१९४८ – १९४८)

उद्दिष्टे –

१) महर्षी कर्वे यांनी स्त्रीशिक्षणासाठी शैक्षणिक संस्था काढून स्त्रियांसाठी शिक्षणाचा मार्ग मोकळा केला याचा अभ्यास करणे.

२) स्त्रीविषयक सामाजिक परिवर्तनात महात्मा फुले व महर्षी कर्वे यांच्या योगदानाचा अभ्यास करणे.

संशोधन पद्धती – सर्वेक्षण

निष्कर्ष –

१) १९४८ ते १९४८ या शतकात स्त्रियांसाठी शैक्षणिक संस्था निर्माण झाल्यामुळे स्त्रीशिक्षणास चालना

२) मिळाली.

३) स्त्रीयांच्या शैक्षणिक व सामाजिक परिवर्तनात महात्मा फुले व महर्षी कर्वे यांचे योगदान मोठे आहे.

संशोधक – राईरीकर अपर्णा देवदास, पुणे विद्यापीठ (२००३)

विषय – कै. गुरुवर्य विष्णू गोविंद उर्फ अण्णासाहेब विजापूरकर यांचे शैक्षणिक कार्य व शैक्षणिक विचार याचा चिकित्सक अभ्यास

उद्दिष्टे –

१) विजापूरकर यांच्या शैक्षणिक कार्याचा सर्वांगीण अभ्यास करणे.

२) विजापूरकर यांच्या शैक्षणिक विचारांचा चिकित्सक अभ्यास करणे.

३) विजापूरकर यांचे शैक्षणिक कार्य व शैक्षणिक विचार यांचे आधुनिक शिक्षणातील स्थान समजावून घेणे.

संशोधन पद्धती – ऐतिहासिक

निष्कर्ष –

१) उनाड व मठ्ठ विद्यार्थी चांगल्या मार्गाला लावण्यासाठी १९८६ मध्ये हायस्कूलात उनाड मुलांचा वर्ग सुरु केला.

२) शिक्षकाचे स्थान महत्त्वाचे यावर भर दिला.

३) स्त्री शिक्षण कसे असावे, साक्षरता वाढवी व व्यावसायिक शिक्षण द्यावे असे विचार समोर आणले.

४) शैक्षणिक समाजशास्त्रीय व शैक्षणिक मानसशास्त्रीय विचार प्रगट केले आहेत.

५) राष्ट्रीय शिक्षण देण्यासाठी समर्थ विद्यालय स्थापन केले; यात शाळा काढताना सर्वांगीण विचार करून कार्यपद्धती, वसतिगृह, शाळा व अभ्यासक्रम, परीक्षा पद्धती यांचे स्वरुप मांडले.

संशोधकाने संशोधन विषयाशी संबंधित संदर्भ साहित्याचा (प्राथमिक स्त्रोत) आढावा घेतला असून संशोधनाच्या विषयाशी संबंधित संशोधनाचा आढावा घेतला आहे. प्रस्तुत संशोधन हे स्त्रीशिक्षण व शिक्षणाचा जीवनावर होणारा परिणाम यासंबंधी असून त्यासाठी ऐतिहासिक व सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग केला असल्याने याच्याशी संबंधीत असणाऱ्या संशोधनाचा अभ्यास केला आहे. संशोधनाच्या ऐतिहासिक व सर्वेक्षण पद्धतीचा वापर करून डॉ. आंबेडकर, स्वामी विवेकानंद, महात्मा फुले, शीतलताई दाणी, लोकमान्य टिळक, कर्मवीर भाऊराव पाटील इ. समाजसुधारकांनी केलेल्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास ज्या संशोधनात केला आहे, तसेच शिक्षणामुळे व्यक्ती व समाजावर कोणता दृश्य परिणाम झाला आहे अशा काही संशोधनांचा आढावा इथे मांडण्यात आला आहे.

गुंजाळ अनुपमा यांनी २००७–०८ साली डॉ. आंबेडकरांचे 'स्त्रीशिक्षणविषयक योगदान' या विषयाचा अभ्यास केला असून त्यासाठी ऐतिहासिक पद्धती वापरण्यात आली आहे. त्या संशोधनातील निष्कर्षातून असे दिसून आले की, डॉ. आंबेडकरांनी स्त्री शिक्षणाच्या कार्यासाठी अनेक पुस्तके लिहिली आपल्या साहित्यामधून स्त्री शिक्षणाचे महत्त्व तत्कालीन समाजास पटवून दिले. त्यावेळी समाज स्त्री शिक्षणाबाबत अत्यंत उदासीन होता. ग्रामीण भागातील व खालच्या समाजातील मुलींसाठी त्यांनी शाळा काढल्या आणि आपले स्त्री शिक्षण विषयक कार्य करून दलित समाजातील स्त्रियांना शिक्षण मिळावे म्हणून प्रयत्न केले.

श्री. चौधरी प्रभाकर यांनी १९८८ मध्ये लोकमान्य टिळकांच्या शैक्षणिक विचाराचा शोध घेऊन त्यांच्या विचारांचे स्पष्टीकरण केले असताना असे लक्षात आले की त्यांनी ऐतिहासिक पद्धतीद्वारे लोकमान्य टिळकांच्या साहित्याचा अभ्यास केला आहे. त्यामधून असे दिसते आहे की, लो. टिळकांच्या कार्यामुळे भारतीय शिक्षणाला नवी दृष्टी मिळाली. त्यांच्या अभ्यासक्रमामध्ये त्यांनी

वास्तववादी आशयाला महत्त्व दिले होते. तसेच सर्वसामान्य माणसाच्या व बहुजनसमाजाच्या जीवनाचा, गरजांचा व महत्त्वकाक्षांचा विचार भारतीय शिक्षण व्यवस्थेस होण्यासाठी टिळकांच्या या कार्यामुळे चालना मिळाली. (जसे की महर्षी कर्वे यांचेही आपल्या स्त्रीशिक्षणाच्या कार्यात असेच दूरदृष्टी विचार दिसून येतात. विशेषतः त्यांनी समाजाभिमूख शिक्षणाचा जाणीवपूर्वक अंर्तभाव केला.)

चंदन पवार (२०१०) यांच्या महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक विचार व योगदान या विषयाच्या अंतर्गत माहिती संकलनासाठी मुलाखतीचा उपयोग केला आहे. त्यांच्या अभ्यासातील निष्कर्षातून असे जाणवते की, १८ व्या शतकात समाजाची शैक्षणिक अवस्था अत्यंत बिकट होती. विशेषतः स्त्री शिक्षणाबद्दल समाजाची मानसिकता सकारात्मक नव्हती. परंतु अशा प्रतिकूल परिस्थितीत महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी सन १८४८ मध्ये मुलींसाठी पहिली शाळा काढली आणि स्त्री शिक्षणास सुरुवात झाली.

महाराष्ट्र व देशभर त्याचे पडसाद उमटले. कर्मठ व सनातनी समाजाने त्यांना प्रचंड विरोध केला. परंतु सावित्रीबाई फुल्यांनी आपले कार्य चालू ठेवले. त्यामुळे महाराष्ट्रात स्त्रियांसाठी शैक्षणिक वातावरण निर्माण झाले व समाज परिवर्तनास सुरुवात झाली. अशाच प्रतिकूल परिस्थितीत १८९६ साली महर्षी कर्वे यांनी समाजातील कर्मठाचा विरोध पत्करून स्त्री शिक्षणाच्या कार्यास सुरुवात केली व आपले कार्य तडीस नेले.

गीता कांबळे (२०११) यांनी शांताबाई दाणी यांच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करताना वर्णनात्मक पद्धती (व्यक्ती–अभ्यास) व स्नो बॉल सॅम्पलिंग पद्धतीने नमुना निवड केल्याचे दिसून आले. त्यानुसार प्रस्तुत संशोधनातही या नमुना निवड पद्धतीचा उपयोग करता आला आहे. आपल्या या संशोधनाच्या निष्कर्षातून संशोधिकेने असे निदर्शनास आणले आहे की शिक्षणामुळे मानवाच्या व्यक्तीमत्वात सकारात्मक बदल घडून येतो आणि त्यामुळेही इतरांनाही चांगले काम करण्याची प्रेरणा मिळते.

सन २००३ राइरीकर अपर्णा देविदास यांनी अभ्यासलेल्या अण्णासाहेब विजापूरकर यांचे शैक्षणिक कार्य व शैक्षणिक विचार यातील निष्कर्षातून स्त्रीशिक्षण कसे असावे ? स्त्री साक्षरतेचे

प्रमाण वाढवणे गरजेचे आहे. तसेच एखादी शाळा सुरु करताना अभ्यासक्रम, परीक्षापद्धती, वसतिगृहाची सोय व शिक्षणाचे समाजशास्त्र व मानसशास्त्र याचाही विचार केला पाहिजे असे मत मांडले आहे.

सुदाम तुकाराम मांडगे (२०११) यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक विचार व त्यांचा प्रभाव अभ्यासविषयाच्या माहिती संकलनासाठी मुलाखत व प्राथमिक, दुय्यम स्त्रोताचा उपयोग केला आहे. त्यांनी काढलेल्या निष्कर्षातून असे लक्षात येते की, सर्वांना शिक्षण मोफ त मिळावे. स्वालंबनासारखे सदगुण विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावेत. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्त्रिया व अस्पृश्यांसाठी शैक्षणिक कार्य केले.

शर्मिला भाऊसाहेब पारघे (२००७) यांनी मा. अण्णा हजारे यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा समाजावर पडलेल्या परिणामांचा अभ्यास करताना सर्वेक्षण व व्यक्तिअभ्यास पद्धतीचा वापर केला असून निष्कर्षातून असे दिसून आले की शिक्षणामुळे समाजावर चांगला प्रभाव पडतो. समाजात ईष्ट परिवर्तन घडून येते. समाजातील युवकांची शक्ती समाजविधायक कामास उपयुक्त ठरते.

Putthi youth J. D. (१९७८), नायर व्ही. एस. (१९८०), गुप्ता आर. पी. (१९८५) या संशोधकांनी स्वामी विवेकानंद यांचे शैक्षणिक विचार व त्यांचे शैक्षणिक तत्वज्ञान या विषयांवर संशोधन करताना वर्णनात्मक व सर्वेक्षण पद्धतीतून अभ्यास केला आहे. त्यातील निष्कर्षातून असे लक्षात आले की, स्त्रियांना दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा पाया धार्मिक विचारांवर अधारित असावा. विशेषतः स्त्रियांना धार्मिक स्वरुपाचा अभ्यास शिकवला जावा. पुरुषांबरोबर स्त्रियांनाही शिक्षण मिळावे ते विशिष्ट वर्गवारीच्या शिक्षणाच्या विरोधात होते. त्यांनी कार्यात्मक साक्षरतेचा पुरस्कार केला. शिक्षणाने सामान्यांची अस्मिता जागविता येते. हे त्यांनी सिद्ध केले. तसेच शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे, शिक्षणाने स्वालंबन घडावे आणि शिक्षणाची समान संधी सर्वांना मिळावी असे विवेकानंदाचे विचार व शिक्षणाविषयीचे तत्वज्ञान सांगितले आहे.

चव्हाण बी. पी. (१९८१) यांनी ऐतिहासिक पद्धतीचा उपयोग करून स्वामी दयानंदाच्या शैक्षणिक विचारांचा अभ्यास केला व त्यातून स्पष्ट केले आहे की शिक्षणातील अभ्यासक्रम हा जीवनस्पर्शी असावा. याचा अर्थ जीवनातील दैनंदिन गोष्टीशी अभ्यासक्रम जोडलेला असावा.

बागले बा. म. (२००६) यांनी सर्वेक्षण संशोधन पद्धतीतून पद्मश्री डॉ. विखे पाटील यांचे शैक्षणिक कार्य व त्यांची परिणामकारकता याचा अभ्यास केला. त्यातील निष्कर्षातून पुढील गोष्टी लक्षात आल्या. शिक्षणामुळे व्यक्तीचा सामाजिक स्तर उंचावतो, व्यक्तीच्या राहणीमानात बदल घडून येतो. लोकांच्या विचारसरणीत प्रगल्भता येते. तसेच शिक्षणामुळे जीवनात सकारात्मकता वाढते.

तौर संतोष (२००९) यांनी मिश्र पद्धतीचा उपयोग करून शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर यांच्या शैक्षणिक कार्याचा चिकित्सक अभ्यास केला त्यातून असे दिसून आले की शिक्षणामुळे निराधार महिला, दलित व आर्थिक मागासांना आत्मविश्वास मिळाला. आणि समाजात खिचपत पडलेल्या लोकांमध्ये चेतना निर्माण झाली.

उपरोक्त संबंधित संशोधनाच्या अभ्यासातून असे निदर्शनास आले की आजही स्त्रीशिक्षणाच्या कार्याची समाजास गरज आहे. त्यासाठी स्त्री शिक्षणाच्या कार्याचा प्रचार व प्रसार अधिक होणे आवश्यक वाटते.शिक्षण क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा आढावा घेतल्यास त्यांच्या निष्कर्षातून पुढील महत्त्वपूर्ण गोष्टी लक्षात येतात.

१) शिक्षणातील अभ्यासक्रम हा दैनंदिन जीवनाशी निगडीत असावा.

२) शिक्षणात मातृभाषेला महत्त्व द्यावे.

३) शिक्षणाने व्यक्तीचे व्यक्तीमत्व सुधारते.

४) शिक्षणामुळे सामाजिक दर्जा सुधारतो.

५) समाजाच्या विचारांमध्ये इष्ट बदल घडून येण्यास शिक्षणाने मदत होते.

६) शिक्षणाने व्यक्तीच्या जीवनात सकारात्मकता निर्माण होते.

७) शिक्षणाने निराधार महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो.

८) शिक्षणाने व्यक्तीमध्ये स्वालंबन व परोपकारी वृत्ती निर्माण होते.

उपरोक्त संबंधित संशोधनाच्या अभ्यासातून असे दिसून आले की, एकंदरीत शिक्षणाने मनुष्याच्या आयुष्यात आमुलाग्र बदल घडून येतो.

२.५ पूर्व संशोधनाचा आढावा व संशोधनातील वेगळेपणा

विषयाची निवड केल्यानंतर त्यासंबंधित झालेल्या पूर्वसंशोधनाचा शोध घेतला. कदम गोविंद दगडू (२०१०) यांच्या ''एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील समाजसुधारकांचे शैक्षणिक विचार : एक चिकित्सक अभ्यास'' या समाजशास्त्र विषयांतर्गत केलेल्या अभ्यासात म. कर्वे यांनी केलेल्या शैक्षणिक कार्याचाही समावेश केला असून त्याचबरोबर महाराष्ट्रातील इतर समाजसुधारकांनी केलेल्या शैक्षणिक कार्याचाही अंर्तभाव केलेला दिसून आला. महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, विठ्ठल रामजी शिंदे यासारख्या समाजसुधारकांनी केलेल्या कार्यात शेतकरी, कामगार, दलित, बहुजन समाज व स्त्रिया यांच्या शिक्षणासंबंधी मांडलेल्या विचारांचा अभ्यास केला असून त्यांची विसाव्या शतकातील उपयुक्तता तपासून पाहिली आहे.

तसेच जाधव दिलीप साहेबराव (२०११) यांच्या ''महात्मा फुले, व महर्षी कर्वे यांचे स्त्रीसुधारणा विषयक योगदान'' (सन १८४८ ते १९४८) या विषयांतर्गत महर्षी कर्वे यांनी स्त्रीशिक्षणासाठी कोणत्या शैक्षणिक संस्था निर्माण केल्या. याचा अभ्यास करुन महात्मा फुले व महर्षी कर्वे यांनी स्त्रीविषयक केलेल्या कार्यामुळे सामाजिक परिवर्तन कसे झाले यांचा शोध घेतला आहे.

उपरोक्त दोन्ही संशोधन विषयात महर्षी कर्वे यांच्या कार्याबरोबरच इतर समाजसुधारकांच्या कार्याचाही आढावा घेतलेला दिसून येतो. त्यातून समाजसुधारकांच्या कार्याचे योगदान व त्याची उपयुक्तता लक्षात येते.

परंतु प्रस्तुत संशोधनात संशोधकाने केवळ महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेल्या शैक्षणिक कार्याचाच अभ्यास केलेला आहे. वरील संशोधनात तुलनात्मक अभ्यास केल्याचे दिसून येते. तर प्रस्तुत संशोधनात केवळ महर्षी कर्वे या समाजसुधारकांच्या कार्याचा आढावा घेण्यात आला आहे

तसेच शिक्षणाचा स्त्रियांच्या दैनंदिन जीवनावर कोणता परिणाम झाला याचाही शोध घेतला आहे. हेच या संशोधनाचे वेगळेपण सांगता येईल.

२.६ संबंधित संशोधनाच्या व पूर्व संशोधनाच्या अभ्यासाचा उपयोग

वरील संबंधित संशोधनाच्या अभ्यासामुळे संशोधकास संशोधनाची दिशा मिळाली. संशोधन करताना कोणती पद्धती वापरावी? त्यासाठी नमुना निवड कशी करावी ? संदर्भ साहित्यातील माहितीचे लेखन कसे करावे ? माहिती संकलनासाठी कोणती साधने वापरावीत ? मिळालेल्या माहितीची मांडणी कशी करावी ? प्रश्नावली व मुलाखतीसाठी प्रयोज्याची संख्या किती असावी ? प्रश्नावली कशी तयार करावी ? प्रकरणांची मांडणी कशी करावी ? निष्कर्ष कसे मांडावेत ? तसेच संपूर्ण संशोधनाच्या अहवाल लेखनासाठीही या अभ्यासाचा उपयोग झाला.

विशेषतः 'स्नो बॉल सॅम्पलिंग' या नमुना निवडीविषयी माहिती मिळाली. ज्याचा उपयोग संशोधकास प्रस्तुत संशोधनात करता आला. तसेच पूर्व संशोधनातील संशोधनाच्या अभ्यासामुळे संशोधकास स्वतःच्या संशोधनात कोणता विषय सविस्तर मांडावा, कोणत्या विशिष्ट भागावर संशोधन झाले आहे याची माहिती उपलब्ध झाली आहे. ज्यायोगे संशोधन विषयाची पुनर्रावृत्ती टाळता आली.

२.७ समारोप

प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाशी संदर्भ साहित्याचा व संबंधित संशोधनांचा सविस्तर आढावा घेतला असून पुढील प्रकरण तीन मध्ये संशोधनात वापरलेल्या संशोधन पद्धतीची व प्रत्यक्ष कार्यवाहीची माहिती दिली आहे.

प्रकरण ३ रे

संशोधनाची पद्धती व कार्यवाही

अ. क्र.	तपशील	पान क्र.
३.१	प्रस्तावना	५१
३.२	शैक्षणिक संशोधनाचा अर्थ	५१
३.३	संशोधनाच्या पद्धती	५१
३.४	प्रस्तुत संशोधनातील पद्धती	५२
३.५	माहिती संकलनाची साधने	५६
३.६	जनसंख्या	५६
३.७	नमुना	५६
३.८	नमुना निवडीच्या पद्धती	५७
३.९	प्रस्तुत संशोधनातील नमुना	५७
३.१०	न्यादर्श निवडीचे निकष	५९
३.११	प्रश्नावलीची निर्मिती	५९
३.१२	प्रत्यक्ष कार्यवाही	६०
३.१३	पथदर्शक अभ्यास	६०
३.१४	संशोधनाची कार्यवाही	६१
३.१५	समारोप	६२

प्रकरण ३ रे

संशोधनाची पद्धती व कार्यवाही

३.१ प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात संशोधनासाठी वापरलेली संशोधन पद्धती, माहिती संकलनाची साधने, जनसंख्या, नमुना निवड, स्नो बॉल सॅम्पलिंग, नमुना निवडीचे निकष, प्रश्नावलीची निर्मिती व पथदर्शक अभ्यास यासंबंधी माहिती दिली आहे. तसेच समस्या निवडीपासून अहवाल लेखनाच्या कार्यवाहीचा प्रवाही तक्ता याचाही समावेश आहे.

३.२ शैक्षणिक संशोधनाचा अर्थ

शैक्षणिक संशोधन म्हणजे शिक्षण क्षेत्रातील उद्दिष्टे, अभ्यासक्रम, अध्ययन–अध्यापन पद्धती, मूल्यमापन, विद्यार्थी, शिक्षक, वातावरण, विविध संकल्पना, शैक्षणिक साहित्य, तंत्र, पाठ्यपुस्तके इत्यादींपैकी एक वा अनेक शैक्षणिक घटकांच्या संदर्भात निर्माण झालेल्या व होणाऱ्या समस्यांचे शास्त्रशुद्ध उत्तर शोधण्याचा केलेला अथवा करण्यात येणारा प्रयत्न (भिंताडे २०११).

३.३ संशोधनाच्या पद्धती

- **ऐतिहासिक संशोधन पद्धती**

  भूतकाळाशी संबंधित असणाऱ्या समस्या ज्या पद्धतीने सोडविल्या जातात. त्यास ''ऐतिहासिक संशोधन पद्धती'' असे म्हणतात. (भिंताडे २०११)

- **वर्णनात्मक संशोधन पद्धती**

  वर्णनात्मक पद्धतीत सद्यःस्थिती काय आहे? याचे वर्णन व अर्थनिर्वचन करतात. या संशोधनाचा मूलतः वर्तमानकाळाशी संबंध आहे.

- **प्रायोगिक संशोधन पद्धती**

प्रायोगिक पद्धती ही मुख्यतः भविष्यकाळाशी संबंधित आहे. या पद्धतीत प्रयोग करून निष्कर्ष नोंदवले जातात. व ते अचूक असतात.

३.४ प्रस्तुत संशोधनातील पद्धती

- **उद्दिष्टे**

१) महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेल्या शैक्षणिक कार्याचा तत्कालीन सामाजिक संदर्भासह अभ्यास करणे.

२) महर्षी कर्वे यांनी निर्माण केलेल्या समाजाभिमुख शिक्षणाचा आढावा घेणे.

यासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे.

- **ऐतिहासिक संशोधन पद्धती**

ऐतिहासिक संशोधनाचा हेतू हा की सद्यस्थितीतील घटनांचा अर्थ लावण्याच्या दृष्टीने संदर्भ म्हणून भूतकाळातील घटनांचा मागोवा घेणे असतो. ज्या पद्धतीचा अवलंब केल्याने इतिहासाची यथार्थ ओळख होते त्या पद्धतीस ऐतिहासिक संशोधन असे म्हणतात (मुळे, उमाठे १९९८).

ऐतिहासिक संशोधनातून आपल्या सामाजिक रुढी, परंपरा, मोठ्या व्यक्तीचे कार्य यांची माहिती होते. शिक्षणाचा इतिहास अभ्यासल्याने आपल्याला प्राचीन काळी असलेल्या काही रुढी–परंपरांची माहिती होते.''शिक्षणाच्या दृष्टीने भूतकाळाचे ज्ञान, वर्तमानकाळाची प्रगती व भविष्यकाळातील योग्य नियोजन महत्त्वाचे ठरते हे ऐतिहासिक संशोधनातून साधता येते'' (भिंताडे २०११).

- **प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक पद्धती वापरण्याची कारणे**

१) संशोधकाने संशोधनासाठी ''महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेले शैक्षणिक कार्य व त्याचा स्त्री जीवनावरील दृष्य परिणाम.'' या विषयाची निवड केली आहे. संबंधित व्यक्तिचे कार्य हे भूतकाळाशी निगडीत आहे.

२) संबंधित विषयाचा अभ्यास करताना प्राचीन काळातील स्त्री शिक्षणाविषयीचे सामाजिक विचार, रुढी–परंपरा यांची माहिती घेणे जरुरीचे आहे.

३) प्रस्तुत संशोधनात महर्षी कर्वे या थोर व्यक्तिच्या कार्याची माहिती घेणे गरजेचे होते.

४) शैक्षणिक कार्याबरोबरच स्त्री जीवनावरील दृष्य परिणामांचा शोध घेताना भूतकाळातील ज्ञान, वर्तमानातील प्रगती व भविष्यकाळातील योग्य नियोजन महत्त्वाचे वाटते.

उपरोक्त कारणास्तव संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधन विषयांतर्गत महर्षी कर्वे यांनी केलेल्या स्त्री शिक्षणाच्या कार्याचा अभ्यास व तत्कालीन समाजस्थितीचा मागोवा घेणे गरजेचे होते. त्यासाठी महर्षी कर्वे यांचे स्वतःचे आत्मचरित्र, त्यामध्ये त्यांनी स्वतः लिहिलेली काही पत्रे, त्यांची दैनंदिनी व त्यांच्या कार्यासंबंधी वृत्तपत्रात छापून आलेला मजकूर यांचा समावेश आहे. स्त्री शिक्षणाचे कार्य करताना महर्षी कर्वे यांनी कोणते प्रयत्न केले? त्याला समाजमान्यता का मिळाली? याची माहिती मिळावी म्हणून संशोधनामधे खालील प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर केला आहे.

- **प्राथमिक स्त्रोत–** महर्षी कर्वे यांचे आत्मवृत्त व चरित्र, वृत्तपत्रे, छायाचित्रे, पत्रे
- **दुय्यम स्त्रोत**– महर्षी कर्वे यांच्या विषयी इतरांनी व्यक्त केलेले विचार (न. म.जोशी, देशपांडे मालती, खोले विलास, कर्वे आनंदीबाई, तेरणीकर सुलभा, आठलेकर मंगला, भगत रा. तु., भागवत कमल, बाबर सरोजिनी इ.) तसेच वर्तमानपत्रातील व मासिकामधील लेख , कात्रणे.
- **गुणात्मक विश्लेषण**
- उद्दिष्टे –

१) महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेल्या शैक्षणिक कार्याचा तत्कालीन सामाजिक संदर्भासह अभ्यास करणे.

२) महर्षी कर्वे यांनी निर्माण केलेल्या समाजाभिमुख शिक्षणाचा आढावा घेणे.

साठी अभ्यास विषयास अनुसरुन ऐतिहासिक संशोधनातील प्राथमिक व दुय्यम स्त्रोतामधुन मिळालेल्या संदर्भा साहित्यातील माहितीचे विश्लेषण हे गुणात्मक पद्धतीने केलेले आहे.

- **उद्दिष्टे ३**

  महर्षी कर्वे यांच्या शैक्षणिक कार्याचा स्त्री जीवनावर झालेल्या दृष्य परिणामांची उपयुक्तता जाणून घेणे साठी सर्वेक्षण पद्धती पद्धतीचा वापर केला आहे.

- **सर्वेक्षण पद्धती**

  जॉन बेस्ट : प्रश्न विचारण्याच्या काळजीपूर्वक आयोजिलेल्या पद्धती आणि नमुना निवडीच्या शास्त्रीय पद्धती वापरून केलेले शैक्षणिक समस्येचे संशोधन म्हणजे सर्वेक्षण होय' (भिंताडे २०११).

या पद्धतीत सद्यस्थितीची माहिती घेतली जाते. या पद्धतीतून गुणात्मक आणि सांख्यिकीय माहितीही मिळू शकते. हे या पद्धतीचे वैशिष्ट्ये आहेत. तसेच या पद्धतीचे महत्त्व असे की, वर्तमानकाळाला उपयुक्त असा भूतकाळाचा अभ्यास केला जातो व यामधून भविष्यकालीन प्रगतीचा वेध घेतला जातो. संशोधनासाठी पूरक अशी माहितीही मिळवता येते. सर्वेक्षण पद्धती तील संशोधनामधे खालील दुय्यम स्त्रोतांचा वापर केला आहे.

- **दुय्यम स्त्रोत** : मुलाखत व प्रश्नावली

संशोधनाकरिता आवश्यक माहिती मिळवण्यासाठी संशोधनात सर्वेक्षण पद्धतीचाही उपयोग केला आहे. तसेच संशोधन विषयासंदर्भात स्त्रियांच्या जीवनावर झालेल्या दृष्य परिणामांचा शोध घेण्यासाठी संशोधकास महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था व एस.एन.डी.टी. महाविद्यालयातील माजी विद्यार्थिनींच्या मुलाखती घेवून माहिती मिळवणे आवश्यक होते. तसेच काही विद्यार्थिनींकडून प्रश्नावली ही भरून घेतली आहे. यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. विद्यार्थिनींच्या अनुभवाद्वारेच हे शक्य आहे म्हणून सर्वेक्षण पद्धती उपयोगात आणली आहे.

संशोधन कार्यात स्त्री शिक्षणाच्या कार्याचा स्त्री जीवनावर कोणता दृश्य परिणाम झाला? याचा शोध घेण्यात आला आहे. त्यासाठी महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या माजी विद्यार्थिनींच्या मुलाखती व प्रश्नावलीद्वारा सांगितलेले स्वानुभव यांचा संशोधनासाठी उपयोग झाला आहे.

विशेषतः 'मुलाखत' या तंत्राद्वारे संस्थेच्या माजी विद्यार्थिनींशी प्रत्यक्ष बोलता आले. महर्षी कर्वे यांचे शैक्षणिक कार्य व विद्यार्थिनींचे प्रत्यक्ष जीवन यांचा संबंध लावता आला. शिक्षणामुळे कोणते संस्कार झाले? कोणते गुण त्यांच्या अंगी बाणले गेले? हे जाणून घेता आले. स्त्रियांच्या जीवनावर शिक्षणाचा कोणता व कसा दृश्य परिणाम झाला? याचा शोध घेता आला.

महर्षी कर्वे यांच्या सहवासात राहून शिक्षण घेतलेल्या काही मोजक्या माजी विद्यार्थिनी मिळाल्या. त्यामुळे महर्षी कर्वे यांचे कार्य व त्यामुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास, स्वावलंबन, सहकार्यभावना, समाजसेवा अशा गुणांची जोपासना होण्यास कशी मदत झाली ? हे जाणून घेता आले. अनेकजणींच्या जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. त्यामुळे मुलींनी उत्तम माहिती दिली व सहकार्य केले. काही विद्यार्थिनींना प्रश्नावली देऊन ती भरून घेण्यात आली.

- **संख्यात्मक विश्लेषण**
- **उद्दिष्टे ३**

  महर्षी कर्वे यांच्या शैक्षणिक कार्याचा स्त्री जीवनावर झालेल्या दृष्य परिणामांची उपयुक्तता जाणून घेणे.

यासाठी सर्वेक्षण पद्धतीतून दुय्यम स्त्रोतातील माजी विद्यार्थिनींकडून मुलाखती व प्रश्नावलीद्वारे मिळालेल्या माहितीचे संख्यात्मक विश्लेषण शेकडेवारी काढून आलेखाद्वारे स्पष्ट केले आहे.

- **संख्यात्मक साधने**
- **शेकडेवारी**

माजी विद्यार्थिनींकडून मुलाखती व प्रश्नावलीद्वारे मिळालेल्या माहितीचे संख्यात्मक विश्लेषण शेकडेवारी काढून आलेखाद्वारे स्पष्ट केले आहे.

३.५ उद्दिष्टनुसार माहिती संकलन साधने

कोष्ठक क्र. ३.१

उद्दिष्ट क्र.	संशोधन पद्धती	प्राथमिक स्त्रोत	दुय्यम स्त्रोत
१ आणि २	ऐतिहासिक	महर्षी कर्वे यांचे आत्मवृत्त व चरित्र वृत्तपत्रे छायाचित्रे पत्रे गुणात्मक विश्लेषण	पुस्तके मासिके नियतकालिक हस्तपुस्तिका अहवाल वृत्तपत्र कात्रणे वेबसाईट संशोधने
३	सर्वेक्षण पद्धती	संख्यात्मक विश्लेषण	मुलाखत, प्रश्नावली

३.६ जनसंख्या – एकूण ५००

महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेत शिक्षण घेतलेल्या महाराष्ट्रातील ५०० विद्यार्थिनी . एका विद्यार्थिनींची माहिती (फोन नंबर, पत्ता) हाती आल्यानंतर तिच्या संपर्कातील मैत्रिणींचे पत्ते, फोन नंबर मिळाले अशा रितीने जनसंख्या तयार झाली.

३.७ नमुना व्याख्या

१) बोगार्डस् – नमुना निवड म्हणजे पूर्वनियोजित योजनेनुसार मोठ्या गटातून ठराविक टक्केवारी निवडणे. (भिंताडे – २०११)

२) George & Haft मोठ्या गटातून प्रतिनिधीक स्वरुपाचा लहान गट निवडणे म्हणजे 'नमुना' होय. (भिंताडे – २०११)

३.८ नमुना निवडीच्या पद्धती

प्रस्तुत संशोधनाकरिता 'स्नो बॉल सॅम्पलिंग' व यादृच्छिक लॉटरी पद्धतीचा उपयोग केला आहे.

- **स्नो बॉल सॅम्पलिंग**

एका व्यक्तीकडून अनेक व्यक्तींची नावे कळतात. पुन्हा त्या अनेकांकडून इतरांची नावे समोर येतात. अशा पद्धतीच्या न्यादर्श निवडीला 'स्नो–बॉल–सॅम्पलिंग' असे म्हणतात. (पवार २०१०–प्रबंध)

पहिल्या तीन गटांसाठी 'स्नो–बॉल–सॅम्पलिंग' या पद्धतीचा वापर केला आहे. कारण इतक्या जुन्या विद्यार्थिनींची सविस्तर माहिती सहजासहजी उपलब्ध होऊ शकली नाही.म्हणून जेव्हा एका विद्यार्थिनीशी प्रत्यक्ष संपर्क झाला तेव्हा त्यांनी दिलेल्या त्यांच्या मैत्रिणींच्या संपर्कातील विद्यार्थिनींचे फोन नंबर, पत्ते घेऊन पुढील विद्यार्थिनी मिळत गेल्या व संख्या वाढत गेली. त्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात आल्या.

- **लॉटरी पद्धत**

गट क्र. ४ व ५ या गटांसाठी यादृच्छिक पद्धतीनुसार लॉटरी पद्धतीचा वापर केला आहे. सदर विद्यार्थिनींना क्रमांक देऊन त्यातून लॉटरी पद्धतीने नमुना निवड केली. व त्यांच्याकडून प्रश्नावल्या भरून घेतल्या. सदर स्त्रियांनी म. कर्वे स्त्री शिक्षण संस्थेत शालेय किंवा विद्यापीठीय शिक्षण घेतले आहे.

३.९ प्रस्तुत संशोधनातील नमुना

१) महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेतील माजी विद्यार्थिनी.

२) एस.एन.डी.टी. महाविद्यालयातील माजी विद्यार्थिनी.

सन १९१६ च्या आधीच्या विद्यार्थिनी सद्य परिस्थितीत भेटणे व त्यांची मुलाखत घेणे अशक्य असल्याने सन १९१६ पासून पुढील २० वर्षाच्या अंतराने सालाप्रमाणे ५ गट केले आहेत. माजी विद्यार्थिनींचे शैक्षणिक कालावधीनुसार पाच गट–

कोष्टक क्र. ३.२ नमुना निवड गट

गट क्र.	शैक्षणिक कालावधी
१.	सन १९१६ ते ३६
२.	सन १९३७ ते ५७
३.	सन १९५८ ते ७८
४.	सन १९७९ ते ९९
५.	सन २००० ते २०१५

कोष्टक क्र. ३.३ न्यादर्श निवड

एकूण जनसंख्येतील गट क्र.व शैक्षणिक कालावधी	जनसंख्या	टक्केवारी	न्यादर्श निवडला
गट १ सन १९१६ ते ३६	०१	१००%	०१
गट २ सन १९३७ ते ५७	१०	१००%	१०
गट ३ सन १९५८ ते ७८	५०	१००%	५०
गट ४ सन १९७९ ते ९९	२३०	३०%	७०
गट ५ सन २००० ते २०१५	२७५	३०%	८०
–	५६६	–	२११

३.१० न्यादर्श निवडीचे निकष

१) महर्षी कर्वे यांनी स्थापन केलेल्या शिक्षणसंस्थेत शिक्षण घेतलेल्या महाराष्ट्रातील विद्यार्थिनी घेतल्या कारण यांचे कार्य महाराष्ट्रात जास्त झाले आहे.

२) प्राथमिक शिक्षणापासून, महाविद्यालयीन शिक्षण व कोणतेही प्रमाणपत्र प्राप्त कोर्स पूर्ण केलेल्या विद्यार्थिनी. कारण त्यांनी घेतलेल्या ज्ञानाचा वापर करता आला की नाही हे पडताळून पाहण्यासाठी.

३) संशोधनाचा हेतू स्त्रियांच्या ज्ञानाचा त्यांच्या दैनंदिन जीवनात वैयक्तिक, सामाजिक व शैक्षणिक जीवनात झालेला सकारात्मक परिणामांचा शोध घेणे असा असल्याने सध्या शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिनींना विचारात घेतलेले नाही.

४) स्तरीय यादृच्छिक पद्धतीचा उपयोग केलेला नाही. कारण कोणत्या शिक्षणाचा कोणता फायदा झाला हा संशोधनाचा हेतू नाही.

संशोधकाने जनसंख्या निवडताना महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेतील शाखांमधून शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थिनींची यादी मिळवण्यासाठी प्रयत्न केले. परंतु ती यादी पुरेशी नव्हती. कारण त्यामध्ये विद्यार्थिनींचे पत्ते, फोन नंबर मिळू शकले नाहीत. शिवाय विद्यार्थिनींची लग्नानंतर नावे, पत्ते बदलले गेल्याने त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. म्हणून त्या–त्या शाखांमध्ये घेतलेल्या माजी विद्यार्थिनींच्या मेळाव्यात हजर असलेल्या मुलींची यादी व त्यांच्या संपर्कात असलेल्या इतर मैत्रिणींचे नावे यांची यादी या दोन्ही याद्या प्रमाणभूत मानून ती जनसंख्या समजून त्यातून न्यादर्श निवडला.

३.११ प्रश्नावलीची निर्मिती

संशोधनाची उद्दिष्टे लक्षात घेऊन प्रश्न तयार केले. उद्दिष्टानुरुप जास्तीत जास्त माहिती संकलन करता येईल अशी प्रश्नांची रचना केली. तज्ञ व्यक्तींकडून प्रश्नावली तपासून घेतली व प्रमाणित केली. प्रश्नावलीमधील प्रश्नांची अ, ब, क, ड या चार गटात रचना केली.

- विभाग अ – मुलाखतदात्याची माहिती
- विभाग ब – महर्षी कर्वे संस्थेबद्दल माहिती व अभिप्राय
- विभाग क – महर्षी कर्वे व्यक्ती व कार्य याबद्दल माहिती व अभिप्राय
- विभाग ड – महर्षी कर्वे संस्थेतील शिक्षणाचा दृष्य परिणाम

यामध्ये काही मुक्त प्रश्न व काही पर्यायी प्रश्नांचा समावेश केला आहे.

३.१२ प्रत्यक्ष कार्यवाही


मुलाखतींसाठी प्रतिसादकास प्रत्यक्ष भेटणे गरजेचे होते. प्रतिसादकांची माहिती मिळवुन प्रथम फोनवरून संपर्क साधला. प्रतिसादकांकडुन मुलाखतीसाठी दिवस व वेळ निश्चित केली. दिलेल्या वेळेनुसार प्रतिसादकांची भेट घेवुन मुलाखती घेतल्या. अनेकदा प्रतिसादकांच्या सोयीनुसार वेळेचे नियोजन करावे लागले. सुट्टीचा दिवस तसेच सकाळ व संध्याकाळची वेळ अनेकदा सोयीची ठरली. प्रश्नावली भरून घेण्यासाठी प्रथम संस्थेच्या काही शाखांमध्ये जावून माजी विद्यार्थीनींची नावे मिळवली.तेंव्हा संस्थेच्या महिलाश्रम हायस्कू ल मधून यादी उपलब्ध झाली. तसेच पार्वतीबाई अध्यापिका विद्यालयाचे २०१६ हे वर्ष शताब्दी वर्ष होते, S.N.D.T. महाविद्यालयाचे २०१७ हे शताब्दी वर्ष होते, सिदिध–विनायक महाविद्यालयाचे २०१५ हे रौप्यमहोत्सवी वर्ष होते. त्यानिमित्त त्या त्या ठिकाणी माजी विद्यार्थीनींचे मेळावे आयोजित केल्याचे समजले आणि त्या त्या दिवशी त्या ठिकाणी जाऊन विद्यार्थीनींना प्रत्यक्ष भेटता आले व प्रश्नावली भरून घेतल्या.

३.१३ पथदर्शक अभ्यास

सुरुवातीस वीस विद्यार्थिनींची प्रश्नावलीनुसार प्रश्न विचारुन मुलाखत घेतली आणि वीस विद्यार्थिनींना प्रश्नावली भरावयास दिली. मुलाखत घेताना, प्रश्नावली भरताना काही प्रश्न संदिग्ध असल्याचे लक्षात आले. मुलाखतदात्यास त्यांच्या जीवनावरील दृश्य परिणाम कथन करताना अडचणी येत होत्या. त्यानुसार काही प्रश्नांची रचना बदलण्यात आली. प्रत्येक पर्यायी प्रश्नासाठी

यापेक्षा वेगळे उत्तर असा एक पर्याय दिला. त्यामुळे प्रश्नांची उत्तर देताना व प्रश्नावलीत उत्तरे लिहिताना प्रतिसादकास मनातील विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य मिळाले व अधिक माहिती मिळू शकली. मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनानुसार पथदर्शक अभ्यास पूर्ण केला.

३.१४ संशोधनाची कार्यवाही



३.१५ समारोप

उपरोक्त प्रकरणात संशोधन पद्धती, माहिती संकलन साधने, नमुना, नमुनानिवड, संशोधनाची कार्यवाही याविषयी सविस्तर माहिती दिली असून पुढील प्रकरणात प्रस्तुत संशोधनातून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन यासंबंधी लेखन केले आहे.

प्रकरण चौथे

माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन

अ. क्र.	तपशील	पान क्र.
४.१	प्रस्तावना	६५
४.२	माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन	६५
	भाग अ – प्राथमिक व दुय्यम स्त्रोत विश्लेषण	७१
४.३	प्राथमिक स्त्रोत– महर्षी कर्वे यांचे स्त्री शिक्षण विषयक कार्य	७१
४.४	दुय्यम स्त्रोत –महर्षी कर्वे यांचे स्त्री शिक्षण विषयक कार्य	११९
४.५	माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन	१४४
	भाग ब – गुणात्मक व संख्यात्मक विश्लेषण–प्रश्नावली व मुलाखत	१७२
४.६	संशोधकाचे मत	१७०
४.७	समारोप	१७१

प्रकरण चौथे

माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन

४.१ प्रस्तावना

समस्येचे उत्तर शोधणे हे संशोधन प्रक्रियेचे प्रमुख उद्दिष्ट असते. त्याच्या पुर्ततेसाठी संशोधनासंदर्भात मिळवलेल्या माहितीचे विवेचन करणे गरजेचे आहे. संशोधनाचा दर्जा हा माहितीच्या दर्जावर अवलंबून असतो. ही माहिती संबंधित साहित्याद्वारे मिळाली तर ती वस्तुनिष्ठ, विश्वसनीय, वैध ठरते. माहितीचा दर्जा हा संपूर्ण संशोधन प्रक्रियेचा गाभा आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेल्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास व त्याचा स्त्री जीवनावरील दृष्य परिणाम या अभ्यासासाठी ज्या संदर्भ साहित्याचा उपयोग केला, मुलाखती घेतल्या, प्रश्नावली भरुन घेतल्या त्याआधारे माहितीचे संकलन करुन त्या संकलित केलेल्या माहितीचे गुणात्मक व संख्यात्मक विश्लेषण करण्यात आले आहे. त्यासाठी आवश्यक तिथे कोष्टकांचा व आलेखाचा वापर करण्यात आला आहे. प्रस्तुत प्रकरणातील अ भागात प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांद्वारे महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेल्या शैक्षणिक कार्याची जी माहिती संकलित झाली त्या संकलित माहितीची संशोधनाचा विषय व संशोधनाची उद्दिष्टे यानुसार मांडणी करुन विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले आहे. व ब भागात प्रश्नावली व मुलाखत या दुय्यम स्त्रोतांद्वारे महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेल्या शैक्षणिक कार्यामुळे स्त्रियांच्या जीवनावर कोणते दृष्य परिणाम झाले आहेत याचे त्यातील उत्तरांच्या आधारे कोष्टकीकरण करुन आलेखासह विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले आहे.

४.२ भाग अ – प्राथमिक व दुय्यम स्त्रोत विश्लेषण

- **प्राथमिक स्त्रोतांद्वारे मिळालेली माहिती**

प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांद्वारे उपलब्ध माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन या प्रकरणात केले आहे. महर्षी धोंडो केशव कर्वे व नारायण महादेव पटवर्धन यांनी लिहिलेले धोंडो


केशव कर्वे आत्मवृत्त व चरित्र (१८५८ ते १९२८,१९२८ ते १९५८) , वृत्तपत्रे, छायाचित्रे, पत्रे या प्राथमिक स्त्रोतांचा वापर केलेला आहे. यामधून महर्षी कर्वे यांचे स्त्रीशिक्षणविषयक विचार आणि त्यांचे स्त्रीशिक्षणाचे कार्य याविषयी मिळालेल्या माहितीचे संकलन व विश्लेषण केले आहे.

तसेच चरित्र, संदर्भ पुस्तके, मासिके, नियतकालिक, हस्तपुस्तिका, अहवाल, वृत्तपत्र (सकाळ, महाराष्ट्र टाइम्स, लोकमत) वेबसाईट, संशोधने, कात्रणे या दुय्यम स्त्रोतांद्वारे महर्षी कर्वे यांचे स्त्रीशिक्षणविषयक विचार आणि त्यांचे स्त्रीशिक्षणाचे कार्य याविषयी मिळालेल्या माहितीचे संकलन व विश्लेषण केले आहे.

फोटो क्र. १

भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे

(संस्थापक – महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था)



(गाथा शतकाची, तेरणीकर, २००७)

- **महर्षी कर्वे यांचा अल्पपरिचय**

महर्षी कर्वे म्हणजेच धोंडो केशव कर्वे. सर्वजण त्यांना प्रेमाने 'अण्णा' म्हणत. यांचा जन्म मुरुडजवळ शेरवली गावी झाला. घरची परिस्थिती बेताची परंतु आई लक्ष्मीबाई आणि वडील केशव कर्वे यांनी नेटाने संसार करुन महर्षी कर्वे यांना शिकवले. ते मुळातच हुशार होते. गणित विषयाची त्यांना आवड होती. स्त्रोत पाठांतर, मित्रांबरोबर विविध खेळ, घरातील छोटी मोठी कामे यातच त्याचं बालपण गेलं.

त्यांचे प्राथमिक शिक्षण मुरुडलाच झाले. सहावीची परीक्षा देण्यासाठी ते सातारा या ठिकाणी पावसात पायी चालत गेले. मुरुड ते सातारा असा जवळ जवळ १०८ मैलाचा प्रवास त्यांनी चार दिवसात केला. असा खडतर प्रवास करुनही त्यांना वयाची सतरा वर्षे पूर्ण नाहीत म्हणून परीक्षेस बसता आले नाही. पुढे रत्नागिरीला जावून त्यांनी परीक्षा दिली.

शिक्षणासाठी त्यांनी खूप कष्ट घेतले. सोमण गुरुजी हे त्यांचे मार्गदर्शक आणि आदर्श होते. त्यांच्यामुळेच महर्षी कर्वे यांना समाजसेवेचे बाळकडू मिळाले. लहान वयातच त्यांना आजुबाजूच्या समाजस्थितीची जाणीव झाली. त्यांची बहिण विधवा होती. त्यामुळे तेव्हापासून त्यांना विधवांविषयी सहानुभूती वाटू लागली. पहिल्या पत्नीच्या निधनानंतर त्यांनी विधवेशीच पुर्नविवाह करण्याचा निग्रह केला व आनंदीबाई जोशी या विधवेशी दुसरा विवाह केला. खरं तर इथूनच त्यांच्या सामाजिक कार्याची सुरुवात झाली.

मुंबईत शिकवण्या घेऊन त्यांनी उच्च शिक्षण पूर्ण केले. गणिताचे शिक्षक म्हणून नोकरी केली. त्याचवेळी पंडिता रमाबाईंच्या कार्याचा प्रभाव त्यांच्यावर पडला त्यांची स्त्री शिक्षणाविषयीची तळमळ अधिक जागृत झाली. समाजातील स्त्रीची दयनीय स्थिती बदलायची झाल्यास स्त्रियांना शिकवले पाहिजे हे त्यांनी जाणले. पुण्यात फर्ग्युसन महाविद्यालयामध्ये गणिताचे प्राध्यापक म्हणून काम करतानाच आगरकर, टिळक, नामदार गोखले यासारख्या समाजसुधारकांशी त्यांचा परिचय झाला. आणि त्यांच्या मनातील स्त्री शिक्षणाच्या इच्छेने उचल घेतली.

- **महर्षी कर्वे यांची स्वभाववैशिष्ट्ये**

महर्षी कर्वे हे अबोल व मितभाषी होते. मुलींची शाळा, त्यांच्या अडीअडचणी, स्त्रीशिक्षण याविषयी ते बोलत असत, अन्यथा आपल्या कामात गुंतलेले असत. घरातील मंडळींशी बोलायलासुद्धा त्यांना शनिवार– रविवार मोकळा वेळ मिळत नसे. इतकी कामे त्यांनी स्वतःला लावून घेतली होती असे त्यांची पत्नी (बाया कर्वे) त्यांच्या आत्मवृत्तात लिहितात. महर्षी कर्वे यांचे वैयक्तिकरित्या कोणाशीही भांडण नव्हते. कारण ते आपल्या माणसाची खरी बाजू घेऊनही कोणाशी भांडत नसत. त्यांचा स्वभाव एकमार्गी म्हणजे आपण भले आणि आपले काम भले असा होता. ते अतिशय भिडस्त होते. पोटाला दोन घास कमी मिळाले तरीही ते बोलत नसत. मुळात खाण्यापिण्याच्या बाबतीत त्यांच्या कोणत्याही आवडीनिवडी नव्हत्या. वेळेला जे मिळेल ते आवडीने खात असत.

ते जितके शांत तितकेच रागीटही होते. अत्यंत राग आणि अत्यंत शांतपणा असे अजब मिश्रण त्यांच्या स्वभावात होते. स्वतःच्या तब्येतीची मात्र ते काळजी घेत. व्यायाम हवाच म्हणून ते चालायला जात असत आणि कधीही चुकवत नसत. बोटीतून प्रवास करतानाही ते फेऱ्या मारत. व्यवहाराला ते अत्यंत चोख होते. एक पै सुद्धा इकडची तिकडे होत नसे. संस्थेच्या हिशोबाप्रमाणेच घरातला हिशोबही चोख ठेवत. स्वखर्चासाठी त्यांनी आपल्या मुलांकडूनही कधी पैसे घेतले नाहीत. आणि बी.ए. नंतरच्या शिक्षणासाठी मुलांनाही पैसे दिले नाहीत. त्यांच्या आत्मवृत्तात महर्षी कर्वे यांनी स्त्री शिक्षणासाठी मिळालेल्या देणगीचा हिशोब जमा खर्चासह, सनावळीनुसार अत्यंत बारकाईने लिहून ठेवला आहे. त्यामुळे संस्थेच्या शैक्षणिक व आर्थिक प्रगतीचा आलेख कसा उंचावत गेला, याची सविस्तर माहिती मिळते. हिशेब लेखनामुळे त्यांच्या स्वतःच्या कामातील नेटकेपणा दिसून येतो.

त्यांची पत्नी बाया कर्वे म्हणतात, **''कर्वे यांनी माझा कारभार मला करू दिला त्यात कोणताही हस्तक्षेप केला नाही मला पूर्ण स्वातंत्र्य दिले आणि त्याचेच मला कौतुक वाटते.''** म्हणजे स्त्री शिक्षण आणि स्त्री स्वातंत्र्यासाठी जे कार्य त्यांनी केले त्याचा प्रत्यय प्रत्यक्ष त्यांच्या पत्नीलाच

आला हे दिसून येते. 'आधी केले मग सांगितले' या उक्तीला साजेशीच त्यांची कृती आणि विचारही होते.

- **महर्षी कर्वे यांचे स्त्री शिक्षणासंबंधी विचार** (संदर्भ कर्वे, पटवर्धन – १९५८)

श्री. न. चिं. केळकर यांनी सन १९१५ महर्षी कर्वे यांच्याकडे केसरी वृत्तपत्रासाठी एक लेख लिहावा अशी इच्छा प्रकट केली असता स्त्री शिक्षणासंबंधी आपले विचार समाजापर्यंत पोहचविण्याची ही उत्तम संधी आहे असे समजून महर्षी कर्वे यांनी आपले स्त्री शिक्षणाविषयीची मते या लेखाद्वारे मांडली.

१) समाजात स्त्रियांविषयी कळकळ वाटणारे फारच थोडे लोक आहेत.

२) सन १९२८ मध्ये पारशी व हिंदू समाजात स्त्रीशिक्षणास एकदम सुरुवात झाली. परंतु पारशी समाजात साक्षर स्त्रियांचे प्रमाण १००% झाले तर हिंदू समाजात केवळ ३% इतकेच राहीले.

३) स्त्री शिक्षणासाठी सरकारकडून जास्त प्रयत्न झाले पाहिजेत परंतु अनेक गोष्टींमुळे तिकडे दुर्लक्ष होवू शकते. म्हणून लोकांनी मुलींच्या शाळा काढून त्या सरकारच्या स्वाधीन केल्या पाहिजेत.

४) वृत्तपत्रांनी स्त्री शिक्षणासंबंधी लोकमत तयार करण्याचे काम हाती घेतले पाहिजे.

५) वेळप्रसंगी मुलांच्या शाळेतही मुलींना पाठवून शिक्षण दिल्यास स्त्रीशिक्षणात प्रगती होईल.

६) मिशनरी लोकांनी धर्मप्रसाराच्या हेतूने का होईना स्त्रीशिक्षणास मदत केली आहेच . परंतु त्याच बरोबरीने आपणही शाळा उभारायला हव्यात आणि त्याचा जास्तीत जास्त लाभ घ्यायला हवा.

७) धनिक व सामान्य लोकांकडून वर्गणी गोळा करुन स्वार्थ त्यागी पुरुषांनी खाजगी शाळा चालवाव्यात.

८) महत्त्वाचे म्हणजे स्त्री शिक्षणाच्या कार्याची तळमळ असणाऱ्यांनी स्त्री शिक्षणाच्या प्रसाराचे कार्य, पवित्र देशकार्य धर्मकार्य म्हणून केले पाहिजे.

९) स्त्री शिक्षणाच्या कार्याची लांबी, रुंदी व खोली वाढविण्याच्या महत्कार्यासाठी मी आपले जीवित अर्पण करीन, आणि पडतील ते कष्ट सोशीन अशी मनाची तयारी पाहिजे.

१०) स्त्रियांच्या शिक्षणासाठी निरपेक्ष वृत्तीने कार्य करणाऱ्या स्त्रियांचे संघ तयार झाले पाहिजेत. तरच स्त्रीशिक्षणाचा प्रश्न सुटण्याची आशा आहे (कर्वे–पटवर्धन १९५८).


हे महर्षी कर्वे यांचे केवळ विचार होते. परंतु प्रत्यक्ष स्त्री शिक्षणाचे कार्य करताना त्यांनी अनेक उदात्त ध्येय, उद्दिष्टे व तत्वे स्विकारली व अमलात आणली. आपल्या विचारांमधून इतरानांही कार्य करण्याची प्रेरणा दिली. संस्थेत शिक्षण पूर्ण करुन गेलेल्या स्त्रियांनी महर्षी कर्वे यांना त्यांच्या कार्यात मदत केली. स्त्रीने शिकून इतरानांही सहकार्य करावे. शिक्षणाचे लोण जास्तीत जास्त लोकांपर्यत पाहेचवावे म्हणून त्यांनी ''निष्काम –कर्म–मठाची '' स्थापना केली. त्याद्वारे अनेक स्त्रिया शिक्षणाच्या कार्याशी जोडल्या गेल्या. स्त्रियांना केवळ स्त्री म्हणून विचारात न घेता ती कुटुंबाचा, समाजाचा राष्ट्राचा एक घटक म्हणून महर्षी कर्वे यांनी विचार केला. त्यादृष्टीने आपले कार्य केले.

४.३ महर्षी कर्वे यांचे स्त्री शिक्षण विषयक कार्य

- **विधवा शिक्षणास सुरुवात**

विधवा शिक्षणाच्या इमारतीचा पाया घालण्याचे अत्यंत श्रेष्ठ कार्य पंडिता रमाबाई यांनी केले. त्या स्वतः विधवा होत्या. आपल्या विधवा शिक्षणाच्या कार्यासाठी त्यांनी 'शारदासदन' नावाची संस्था स्थापना केली. त्यांच्या या कार्याला मदत करण्यास कोणीही पुढे आले नाही. तेव्हा त्यांनी इंग्लंडला जाऊन ख्रिस्ती मिशनरी मंडळीकडून मदत घेतली. साधारणपणे ७० विद्यार्थिनी शिक्षण घेऊ लागल्या. परंतु १८९३ मध्ये शारदासदनातील १०/१२ विद्यार्थिनींनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला अशी बातमी महाराष्ट्रात पसरली आणि रमाबाईंची मुंबईतील शारदासदन ही विधवा शिक्षण देणाऱ्या संस्थेचे कार्य हळूहळू बंद पडू लागले.

फोटो क्र. २



(गाथा शतकाची, तेरणीकर, २००७)

महर्षी कर्वे यांना पंडिता रमाबाई यांच्याबद्दल विशेष आदर होता. 'परोपकाराय सतां विभूतयः' असे मत रमाबाईबद्दल महर्षी कर्वे यांनी व्यक्त केले आहे. (कर्वे–पटवर्धन – १९५८) विधवा पुनर्विवाह या सामाजिक कार्याकडून विधवा शिक्षण या कार्याकडे ते वळले. महर्षी कर्वे यांची दुसरी पत्नी आनंदीबाई ह्या शारदासदनातील पहिली विद्यार्थिनी होत्या. त्यामुळे शारदासदनाच्या विधवाशिक्षणकार्याबद्दल त्यांच्या मनात सहानुभूती निर्माण झाली. **शिक्षणाचा प्रश्न हाती घेतल्यास कितीतरी विधवांना कष्टमय स्थितीतून वर काढता येईल असे महर्षी कर्वे यांचे विचार होते**.

विधवा शिक्षणासाठी स्वतःजवळील सर्व शिल्लक रु. १००/– खर्च करुन त्यांनी नवीन योजना आखली व १८९६ च्या मे महिन्याच्या सुधारक पत्रकात एक पत्र प्रसिद्ध केले. समाजातून त्याला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. परंतु त्यांनी आपल्या विधवा शिक्षणाच्या कार्याला सुरुवात केली.

- **अनाथबालिकाश्रमाची मंडळी स्थापना**

विधवाशिक्षणाच्या कार्याची सुरुवात करण्यासाठी महर्षी कर्वे यांनी **१४ जून १८९६** रोजी पुण्यातील भिडे वाड्यात भिडे यांच्या अध्यक्षतेखाली एक प्राथमिक सभा घेतली. यासभेला केवळ १६ गृहस्थ होते. काही ठोकळ नियम ठरवून त्या ठिकाणी **'अनाथबालिकाश्रमाची मंडळी'** स्थापन केली. ही योजना चालवण्यासाठी त्यांनी वर्गणी गोळा केली आणि स्वतःची ५०००/– रु. रुपयांची पॉलिसी आश्रमासाठी खर्च केली. १८९८ साली रा. ब. गोखले या दानशूर व्यक्तीने हिंगण्याच्या माळावरील जागा महर्षी कर्वे यांना आश्रमासाठी दिली. पुण्यातील आश्रमात सुरुवातीस केवळ एकच विधवा होती. त्यानंतर हिंगण्याला आल्यावर सात–आठ विद्यार्थिनी आल्या. हा आश्रम केवळ विधवा शिक्षणासाठीच होता. आश्रमाची वाढ अत्यंत सावकाश होत होती. पाच वर्षानंतर एकूण २१ विधवा शिक्षण घेऊ लागल्या. १९०० साली ५०० रु. खर्च करून एक छोटेसे झोपडे बांधून आश्रम हिंगण्यास सुरु झाला. त्यांना शिकवण्याचे काम स्वतः महर्षी कर्वे करीत हाते. पुणे ते हिंगणे असा दाट झाडीतला प्रवास त्यांना रोज करावा लागे. अत्यंत कष्टाने हे काम त्यांनी चालू ठेवले. कालांतराने हिंगण्यालाच आश्रमाची इमारत बांधायचे ठरवले.

फोटो क्र. ३ मूळ झोपडी



(स्मरणिका महिलाश्रम हायस्कूल २००६–२००७)

- **कुमारिकांचा शिक्षणात समावेश**

आश्रम बाल्यवस्थेत असतानाच रत्नागिरीतील एका गृहस्थाचे महर्षी कर्वे यांना पत्र आले. त्यांनी लिहिले होते की, 'माझ्या १४, १२ व १० वर्षाच्या तीन मुली आहेत. सर्वात मोठी मुलगी विधवा आहे. आणि दुसऱ्या दोन कुमारिका. त्या सर्वांनाच आश्रमात शिक्षणासाठी पाठवावे अशी माझी इच्छा आहे. विधवा मुलीला एकटीलाच पाठवू शकत नाही. तसे केल्यास बाकीच्या मुलींना स्थळ मिळणे शक्य नाही.


पत्र वाचून महर्षी कर्वे स्वतः रत्नागिरीस गेले. कुटुंबाची व मुलींची प्रत्यक्ष भेट घेतली. मुलींची हुशारी पाहून त्या तिघींनाही आश्रमात आणण्याचे ठरवले आणि इथूनच कुमारिकांचेही शिक्षण सुरु झाले. तिघी बिहिणी अत्यंत हुशार होत्या. पुढे त्यातील मोठी मुलगी सेवासदनात शिक्षिका म्हणून काम करू लागली व तिने आपल्या दोघी बहिणींचे पुढील शिक्षण केले. दुसरी मुलगी बी. ए. पर्यंत शिकली आणि तिसरी मुलगीही शिक्षिका झाली. अशा रितीने हळूहळू विधवा व

त्यांच्या कुमारिका बहिणी आश्रमात येऊ लागल्या. कुमारिका व सुवासिनी मुलींनाही लोक संस्थेत ठेवू लागले.

- **शिक्षणासाठी वसतिगृहाची सोय**

आश्रमातील अविधवा विद्यार्थिनींची संख्या वाढतच गेली. त्यामुळे आश्रमात जागा अपुरी पडू लागली. विधवांना प्रथम प्राधान्य दिल्याने अविधवा विद्यार्थिनींना बऱ्याचदा प्रवेश देता येत नसे. ही गोष्ट महर्षी कर्वे यांना आवडली नाही त्यातूनच स्वतंत्र वसतिगृहाची योजना आकारास आली. त्यांनी हा विचार कमिटी सभासदांसमोर मांडला. अशी सोय झाल्यास विद्यार्थिनी संख्या दुप्पट वाढेल असे त्यांना वाटले. अन्यथा शिकण्याची इच्छा असूनही मुली अशिक्षित राहतील. म्हणून स्वतंत्र वसतिगृहाची सोय करण्यात आली.

फोटो क्र. ४/५ वसतिगृह



(गाथा शतकाची, तेरणीकर, २००७)

- **स्वतंत्र महिला विद्यालयाची स्थापना**

आतापर्यंत विधवा व अविधवा यांची सोय वेगवेगळी होती. परंतु संख्या जसजशी वाढू लागली तसा महर्षी कर्वे यांनी सर्वांचे शिक्षण एकत्र घेण्याचा विचार केला. स्वतःच्या जबाबदारीवर त्यांनी ४ मार्च १९०७ रोजी रंगपंचमीच्या दिवशी लकडी पुलाजवळील जुन्या वाड्यात सहा विद्यार्थिनींसह स्वतंत्र महिला विद्यालयास सुरुवात केली. कारण बरेच लोक आपल्या अविवाहित व विवाहित मुलींना शाळेत पाठविण्यास तयार होते. मनात असूनही शाळेचा / शिक्षणाचा फ ायदा मिळू शकत नाही ही अडचण त्यामुळे दूर झाली. तेव्हा महर्षी कर्वे यांचे शिक्षक श्री सोमण गुरुजी शिक्षकाचे काम करीत होते.

पुण्याबाहेर विद्यालय गेल्यास मुलींची संख्या अधिक वाढेल असा विचार त्यांच्या मनात आला. महिलाविद्यालय वाढू लागले अगदी सर्व जागा भरून मुली घेण्याची सोय राहिली नाही. आश्रम हिंगण्यात व महिलाविद्यालय पुण्यात परंतु दोन्हींची जबाबदारी महर्षी कर्वे यांच्यावरच होती म्हणून आश्रमाजवळच विद्यालयाची स्थापना करावी असा विचार करून विद्यालयही आश्रमाजवळच आणले.

- **प्रौढ मुलींना शिक्षण देण्याचा प्रयोग**

काही कुमारिकांना चांगले शिक्षण मिळून प्रौढ वयात त्यांचे विवाह झाल्याची उदाहरणे समाजात आणावी या हेतुने आश्रमात व विद्यालयात ब्रह्मचर्यफंडाची योजना आणल्या कारणाने पालक मुलींचे लग्न लवकर लावत नसत. २० वर्ष वयापर्यंतच्या काही मुली आश्रमात होत्या. पुण्यातील मुलींच्या शाळा भरून गेल्या होत्या. म्हणून महर्षी कर्वे यांनी हा एक नवीन प्रयोग केला. मुलींना बोर्डिंगमध्ये ठेवून शिक्षणासाठी दुसऱ्या शाळेत पाठवणे असा क्रम चालू ठेवला. हा अनुभव उत्साहवर्धक ठरला. न्यू इंग्लिशमध्ये कर्वे स्वतः शिकवत होते. तिथे मुलींना पाठवल्याने अभ्यासावर त्यांचे लक्ष असे. १९०८ साली हा प्रयोग सुरु झाला प्रथम वर्षी ५/६ मुली होत्या. संख्या हळूहळू वाढत गेली. शाळेत मुलींना बसण्यासाठी वेगळी छोटी खोली दिली. आणि हा नवीन प्रयोग यशस्वी झाला. परंतु समाजातून / पालकांकडून प्रतिसाद कमी मिळाला. शिक्षणासाठी सोय नव्हती, म्हणून शिकण्याची इच्छा असणाऱ्यांसाठी महर्षी कर्वे यांनी ही सोय करुन दिली.

- **निष्काम – कर्म मठाची स्थापना**

आश्रमातील विद्यार्थिनींनी विद्या संपादन करुन आपला चरितार्थ चालवावा इतकाच आश्रमाचा हेतू नव्हता. तर **मुलींनी स्वतः शिकून आपल्या देशभगिनींच्या उपयोगी पडावे,** शिक्षण घेऊन पैसा कमावणे नव्हे तर **मिळवलेल्या ज्ञानाचा उपयोग परोपकारासाठी करावा.** आश्रमासारख्या संस्था स्त्रियांनी चालवाव्यात त्यासाठी तशा स्त्रिया तयार व्हाव्यात म्हणून महर्षी कर्वे यांनी 'निष्काम कर्म मठाची' स्थापना केली. याकरिता पैसा तर हवाच परंतु या कार्यासाठी काम करणाऱ्या स्त्रियांचा संघ तयार व्हावा, आश्रम व विद्यालय चालवण्यासाठी स्त्रियांचा गट तयार करणे असे त्यांचा उद्देश होता. मठाचे काही नियम होते. ते पाळणाऱ्या स्त्रीला सेविका होता येई. यातुनच शिक्षणाचे कार्य पुढे नेण्याऱ्या काही **समाजसेविका** निर्माण झाल्या. त्यामुळे शिक्षणासाठी लागणारा निधी गोळा करणे व स्त्री शिक्षणाचे कार्य जोमाने पुढे नेण्यास मदत झाली. स्त्री शिक्षणाचे कार्य स्त्रीयांनीच पुढे न्यावे हा उदात्त हेतू साध्य होवू लागला. कालांतराने हा मठ आश्रमात विलीन करण्यात आला. यातूनच हरणाबाई कौलगेकर, श्री. रमाबाई सोमण, श्री. कमलाबाई गरुड व पार्वतीबाई आठवले अशा सेविका आश्रमास मिळाल्या.

फोटो क्र. ६ महर्षी कर्वे यांनी सुरु केलेली पहिली शाळा



(स्मरणिका महिलाश्रम हायस्कूल २००६-२००७)

- **नवीन अभ्यासक्रम व मातृभाषेला महत्त्व**


स्त्रियांच्या विशेष गरजा व समाजाच्या स्त्रीकडून असणाऱ्या अपेक्षा लक्षात घेऊन शिक्षणक्रमाशी समांतर असा स्त्रियांसाठी नवीन अभ्यासक्रम महर्षी कर्वे यांनी राबवला. यात प्रपंचशास्त्र आणि आरोग्यशास्त्र हा विषय सर्व परीक्षांमध्ये आवश्यक ठेवला. याखेरीज वनस्पती शास्त्र, प्राणीशास्त्र, शरीररचनाशास्त्र, इंद्रियविज्ञानशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र, गायन, वादन आणि चित्रकला या विषयांचा समावेश होता. इथे शिक्षण पूर्ण केलेल्या स्त्रियांना बी.ए. ऐवजी 'गृहितागमा' ही पदवी दिली जात होती.

इंग्रजी भाषेला फाजील महत्त्व न देता कमी श्रमात मातृभाषेतून स्त्रियांना शिक्षण देण्याची व्यवस्था म. कर्वे यांनी केली. **उच्च शिक्षणात देखील मातृभाषेला बोधभाषा करणे म्हणजे मातृभाषेतून सर्व विषय शिकवणे हे महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी काढलेल्या स्वतंत्र विद्यापीठाचे वैशिष्ट्ये होते.** मातृभाषेच्या वाङ्मयाच्या अभ्यासालाही विद्यापीठात प्रमुख स्थान दिले. स्वभाषेतून शिक्षण मिळावे अशी योजना राबवली. इंग्रजी सोडून बाकी सर्व विषय मातृभाषेतून शिकवले जात. स्वभाषेत शिक्षण देणाऱ्या स्त्रियांच्या युनिव्हर्सिट्या स्थापन झाल्याशिवाय शिक्षणाचा पाया भक्कम होऊ शकत नाही असे त्यांचे मत होते. म्हणून **मातृभाषेतून शिक्षणाला त्यांनी महत्त्व दिले**. आणि त्याप्रमाणे आपल्या विद्यापीठात सुविधा उपलब्ध करून दिल्या. शिक्षणाने केवळ अंधानुकरण होऊ नये याकडे त्यांचा कटाक्ष होता. मराठीला महत्त्व दिले म्हणजे त्यांनी इंग्रजी भाषेला कधीही कमी लेखले नाही.

- **सर्वांसाठी शिक्षण–भेदभाव नाही**

स्त्रीशिक्षणाचे कार्य करतानाच सामाजिक समानतेविषयी महर्षी कर्वे यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. ''आपणाला मिळालेले स्वातंत्र्य जर टिकवायचे असेल तर आपल्या हाडीमाशी खिळलेला जातीयवाद आपण प्रथम नष्ट केला पाहिजे.'' असे ते म्हणत. त्याप्रमाणे त्यांनी स्त्री शिक्षणाचे कार्य करताना भाषा, जात, धर्म, प्रदेश असा कोणताही भेदभाव केला नाही. शिकण्याची इच्छा असणाऱ्या सर्वांना शिक्षण मिळावे असा महर्षी कर्वे यांचा मानस होता. याची कल्पना पुढील कोष्टकातून येते.

कोष्टक क्र. ४.१ जातवारी तक्ता



विद्यार्थिनींची जातवारी


कोंकणस्थ ब्राह्मण	... ...	६०	नायडू	... ...	२
देशस्थ ब्राह्मण	... ...	५७	गोवर्धन ब्राह्मण	... ...	२
कऱ्हाडे ब्राह्मण	... ...	२३	तेलगू	... ...	२
सारस्वत ब्राह्मण	... ...	१४	द्रविड ब्राह्मण	... ...	२
कायस्थ प्रभु	... ...	१०	देवरुखे ब्राह्मण	... ...	२
मराठे	... ...	१०	विदुर ब्राह्मण	... ...	२
दैवज्ञ ब्राह्मण	... ...	६	उच्चकुळांतील मराठे	... ...	१
वाणी	... ...	४	धनगर	... ...	१
तेली	... ...	३			
				एकूण	२०१

(कोष्टक संदर्भ: आत्मवृत्त व चरित्र सन १९५८ पान क्र. २०४, जातवारी तक्ता)

१९३३ सालापासून आश्रमात मागासवर्गीय मुलींनाही प्रवेश दिला जाऊ लागला. वसतिगृहातील इतर विद्यार्थिनींबरोबर या मुलींचाही समावेश करण्यात आला. या मुलींची संख्या ही हळूहळू वाढतच गेली. शैक्षणिक प्रगतीबरोबरच संस्थेची सामाजिक प्रगतीही झाली याचे हे उदाहरण म्हणता येईल.

आश्रमातील शिक्षणाचा फायदा घेण्यासाठी विद्यार्थिनी फार दूरदूरच्या ठिकाणाहून येत. महाराष्ट्राच्या सर्व भागातून तसेच वऱ्हाड, मध्यप्रांत, गुजरात, मध्यहिंदुस्थान, ज्यांची स्वभाषा मराठी नव्हती अशाही मुली मद्रास, म्हैसुर, मंगळूर इ. ठिकाणाहून येत होत्या. यावरुन लक्षात येते की, आश्रमाच्या कार्याची माहिती सर्व हिंदुस्थानात पसरली होती. आश्रमाच्या स्थापनेपासुन १९ वर्षानंतर देशातील विविध ठिकाणाहून आश्रमात मुली शिक्षणासाठी आल्या. हे पुढील कोष्टकातून दिसून येते.

कोष्टक क्र. ४.२ स्थळवारी तक्ता



आश्रमाचा विस्तार

विद्यार्थिनींची स्थळवारी

पुणें जिल्हा	... ...	२७	बडोदें ४
मुंबई	... ...	२६	गुजरात ४
सातारा जिल्हा	... ...	२०	मध्य हिंदुस्थान ३
रत्नागिरी जिल्हा	... ...	१९	निजामाचें राज्य ३
कोल्हापूर व दक्षिणेतील संस्थानें		१६	कारवार ३
मध्यप्रांत	... ...	१५	नाशिक जिल्हा २
सोलापूर जिल्हा	... ...	१०	सावंतवाडी २
वऱ्हाड	... ...	८	म्हैसूर २
इंदूर	... ...	५	मंगळूर २
ठाणें जिल्हा	... ...	५	विजापूर जिल्हा २
बेळगांव जिल्हा	... ...	५	खानदेश १
कुलाबा जिल्हा	... ...	५	राजमहेंद्री १
ग्वाल्हेर	... ...	५	गोवा प्रांत १
अहमदनगर जिल्हा	... ...	५	एकूण २०१

विद्यार्थिनींच्या पालकांची सामाजिक स्थिति

६४	विद्यार्थिनींचे पालक सरकारी नोकर आहेत.
२३	संस्थानांतील अगर खासगी नोकर आहेत
२१	विद्यार्थिनींचे पालक सुखवस्तु आहेत
१९	शेतकीच्या उत्पन्नावर निर्वाह करणारे
१७	खाजगी व्यापारधंदा वगैरे करणारे
१४	वकील ... ...
१३	डॉक्टर ... ...
१२	पेन्शनर ... ...
७	गरीब विधवा ....
५	कॉलेजांतील विद्यार्थी ... ...
१	संस्थानिक ... ...
५	विद्यार्थिनींचे जवळचे आप्त कोणी नाहींत.
२०१	एकूण

(कोष्टक संदर्भ – आत्मवृत्त व चरित्र सन १९५८ पान क्र. २०५,स्थळवारी तक्ता)

याखेरीज संपूर्ण भारत देशातील महिलांना उच्च शिक्षण मिळावे म्हणून महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापनेचे कार्यही महर्षी कर्वे यांनी हाती घेतले.

- **महिला विद्यापिठाची स्थापना : (SNDT – नाथीबाई दामोदर ठाकरसी)**

जपानमधील एक शिक्षणविषयक पुस्तक महर्षी कर्वे यांच्या हाती पडले. त्यातील महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठाची माहिती वाचतानाच महर्षी कर्वे यांना भारतात असे स्वतंत्र महिला विद्यापीठ स्थापन करण्याची कल्पना सुचली. स्त्रियांना केवळ प्राथमिक व माध्यमिक शिक्षणच पुरेसे नाही तर स्वावलंबी व सक्षम होण्यासाठी महिलानांही उच्च शिक्षण मिळायला हवे असे महर्षी कर्वे यांना वाटले. आणि **१९१६ साली त्यांनी भारतातील पहिले स्त्रियांसाठीचे स्वतंत्र विद्यापीठ (भारतवर्षीय महिला विद्यापीठ) उभारले.** त्यावेळी त्यांनी काही महत्त्वाची तत्त्वे डोळ्यासमोर ठेवली होती ती अशी,

१) **आपण जबाबदार मानवी व्यक्ती आहोत ही भावना व आपल्या सामर्थ्याविषयी आत्मविश्वास ज्यामुळे उत्पन्न होईल असे पुरुषसामान्य शिक्षण स्त्रियांना देणे.**

२) **'गृहिणी गृहमुच्यते' यामध्ये जो अर्थ आहे तसे सामर्थ्य ज्या शिक्षणाने स्त्रियांमध्ये उत्पन्न होईल असे शिक्षण स्त्रियांना देणे.**

३) **आपण राष्ट्राचा घटक आहोत ही भावना ज्या शिक्षणाने उत्पन्न होईल असे शिक्षण स्त्रियांना देणे.**

या तत्त्वाचा विचार केल्यास स्त्रीला कुटुंब, समाज व राष्ट्रास अनुकुल असे शिक्षण देण्याचा विचार महर्षी कर्वे यांच्यामध्ये दिसून येतात. कॉलेजात न जाता घरी अभ्यास करुनही ह्या विद्यापीठाच्या परीक्षा देता येत असत. अनेक आर्थिक व सामाजिक अडचणींवर मात करुन महर्षी कर्वे यांनी स्त्रियांच्या उच्च शिक्षणासाठी विद्यापीठ स्थापन केले. गेली शंभर वर्षे हे विद्यापीठ शिक्षणाचे हे अमूल्य कार्य करीत आहे. सध्या नार्थीबाई दामोदर ठाकरसी (SNDT) या नावाने मुंबईत हे विद्यापीठ प्रसिद्ध आहे तर त्याची दुसरी शाखा पुण्यात आहे. याखेरीज गुजरात, वर्धा याठिकाणी ही यांच्या शाखा आहेत.

फोटो क्र. ६ देशातील स्त्रियांसाठीचे पहिले विद्यापीठ



फोटो क्र. ७ बालकल्याण विभाग



(गाथा शतकाची, तेरणीकर, २००७)

- **कोर्ट कमिटेड मुलींचे शिक्षण**

शिक्षणाच्या माध्यमातून समाजसेवा ह्या धोरणानुसार १९३९ सालापासून संस्थेत कोर्ट – कमिटेड मुलींनाही प्रवेश दिला जाऊ लागला. समाजातील अनाथ मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी सरकारी कायद्यानुसार संस्थेने घेतली. कौटुंबिक कलहामुळे ज्या मुली शिक्षण घेऊ शकत नाहीत प्रामुख्याने विधवांच्या मुली, सावत्र आई, सावत्र वडील, व्यसनी वडील, तुरुंगवासाची शिक्षा भोगत असलेले, असाध्य रोगाने पछाडलेले अशांच्या मुलींना कोर्टामार्फत अर्ज केल्यास कोर्ट – कमिटेड करुन संस्थेत प्रवेश दिला जातो. विशेष म्हणजे त्यातील ज्या मुलींना शिक्षणाची आवड आहे त्यांच्या वयाची २१ वर्षे पूर्ण होईपर्यंत त्या संस्थेत राहतात. शिक्षण घेतात. सर्वसाधारण मुलींप्रमाणेच त्यांना वागवले जाते. कोणताही भेदभाव केला जात नाही. शालेय शिक्षणाबरोबर ह्या मुलींच्या कलागुणांनाही वाव दिला जातो. सुट्टीतही या मुली संस्थेतच राहतात. त्यांच्यासाठी विविध प्रकारची शिबीरे भरवली जात. सन २०२० मधे १५० मुली संस्थेत राहून शिकत आहेत. समाजातील तळागाळापर्यंत शिक्षण पोहचावे हीच संस्थेची यामागील तळमळ दिसून येते. ज्यूवेनाईल कोर्ट कमिटेड विभाग हा बालकल्याण समिती म्हणून आजपर्यंत सुरु आहे. जवळजवळ ४०–५० वर्ष महर्षी कर्वे यांची नात सौ. कुंदाताई नेने या स्वतः या विभागाचे काम पहात होत्या. कुंदाताई अशा अनेक निराधार मुलींच्या आईची भूमिका निभावत होत्या.

- **समाजाभिमुख शिक्षण**

महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी शिक्षणाचे अभूतपूर्व कार्य केले, परंतु केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे असे त्यांचे मत होते. शिक्षणासाठी अभ्यासक्रम तयार करताना महर्षी कर्वे यांनी समाजाच्या गरजा व तत्कालीन सामाजिक स्थितीचा विचार करुन उपयुक्त अशा विषयांचा त्यात अंर्तभाव केला कारण शिक्षण हे समाजाच्या उपयोगी पडले पाहिजे असा त्यामागे त्यांचा विचार होता. त्यासाठी शिक्षण व समाज आणि समाजीकीकरण यांचा सहसंबंध लक्षात घ्यायला हवा.

- **शिक्षण व समाज**

शिक्षण व समाज यांचा अत्यंत घनिष्ठ संबंध आहे. त्यातूनच शैक्षणिक समाजशास्त्राची निर्मिती झाली. Education and Society या पुस्तकात ओटावे यांनी शैक्षणिक समाजशास्त्राची व्याख्या अशी केली आहे. "The Sociology of Education is a Study of the relations between Education and Society." (महाजनी, गोगटे–१९७२). म्हणजे शैक्षणिक समाजशास्त्र म्हणजे शिक्षण आणि समाज यांमधील संबधाचा अभ्यास होय.

भारतातील प्राचीन व मध्ययुगीन शिक्षण पद्धतीत शिक्षणाच्या सामाजिक अंगावर जास्त लक्ष देण्यात आले होते. इंग्रज राजवटीत त्याकडे दुर्लक्ष झाले त्यावेळी रविंद्रनाथ टागोर, जे. पी. नाईक, के. जी. सैयद्विन या नामवंत शिक्षणतज्ज्ञांनी समाजशास्त्रीय सिद्धांतावर शैक्षणिक पुनर्रचना झाली पाहिजे, असे मत आपल्या ग्रंथात ठासून मांडले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मुदलियार व राधाकृष्णन आयोगानेही हीच गोष्ट नमूद केली. १९६४ साली नेमलेल्या कोठारी आयोगाने शिक्षण समाजाभिमुख झाले पाहिजे, ते राष्ट्रविकासाचे साधन झाले पाहिजे यासंबंधी सविस्तर मार्गदर्शन केले आहे.

व्यक्तिविकासाच्या साहाय्याने समाजाची उन्नती कशी साधता येईल? हा शिक्षणापुढील सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यासाठी शाळेतच समाज घडविणारे समाजशिक्षण मिळावे असे प्रयत्न झाले शिक्षणाने मुलांच्या ठिकाणी नागरिकत्वाला पोषक अशा गुणांची जोपासना केली पाहिजे. पुस्तकी शिक्षणाबरोबरच अनुभुतीतून मिळणारे शिक्षण महत्त्वाचे असते. शिक्षणातून संस्कृतीची जोपासना होते. के. जी. सैय्यदिन यांनी Problems of Educational Reconstruction या पुस्तकात शाळा व समाज यातील संबंधाचे स्पष्टीकरण पुढील शब्दात केले आहे.

"Education is essentially a social affair and the school is charged by society with the duty of training and bringing up the youth so that they may be able to participate effectively in the life of the group to which they belong."

याचा अर्थ शिक्षणाच्या सामाजिक स्वरुपावर त्यांनी विशेष भर दिला आहे. ज्या समाजाचा मूल घटक आहे त्या समाजात त्याला मोठेपणी यशस्वी रीतीने भाग घेता यावा असे शिक्षण देण्याची जबाबदारी समाजाने त्या समाजातील शाळेवर टाकली आहे. यासाठी शाळा व समाज यांचा जवळून

संबंध यायला हवा. **समाजविकासासाठीच्या योजना शाळेमार्फ त राबविल्या जाव्यात.** शाळा ही समाजजीवनाचे केंद्र बनली पाहिजे. शिक्षण हे सामाजिक नियंत्रणाचे सर्वात प्रभावी साधन आहे. शिक्षणाने मन सुसंस्कृत होते. मुलाला आपल्या कर्तव्याची जाणीव होते. तो समाजाभिमुख बनून समाजकार्य करण्यास सिद्ध होतो. शिक्षणाने विचारसरणी बदलते. योग्य शिक्षणाने व्यक्ती कार्यक्षम बनते व त्याच्या जोरावर ती समाजातील वरच्या दर्जावर पोहचू शकते. याबाबतीत डॉ. राधाकृष्णन असे विचार व्यक्त करतात की, लोकांची विचारसरणी विशाल बनवण्यासाठी योग्य शिक्षणाची गरज आहे. शिक्षणाने लोकांच्या मनावर सुसंस्कार घडविण्याचे कार्य चालू राहिले पाहिजे. राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यासाठी शिक्षणाच्या योजनाबद्ध व दीर्घकालीन कार्यक्रमाची जरुरी आहे.

थोडक्यात शिक्षण हे समाजसुधारणांचे साधन आहे. शिक्षणातून जो नैतिक विकास होतो त्यातूनच चांगला नीतीमान समाज निर्माण होतो. शाळा म्हणजे समाजाची छोटी प्रतीकृतीच होय.

- **शिक्षण म्हणजे सामाजिकीकरणाची प्रक्रिया**

जॉन ड्यूई यांनी म्हटले आहे की,''व्यक्ती जीवनाप्रमाणेच समाजजीवनही संक्रमण प्रक्रियेनेच अस्तित्वात राहते. हे संक्रमण कार्य म्हणजेच शिक्षण होय.'' हे संक्रमणाचे कार्य म्हणजेच आपला ज्ञानविज्ञानाचा वारसा पुढील पिढीच्या स्वाधीन करण्याचे कार्य सोपे नाही. हे काम हेतुपुरस्कर प्रयत्नाने करावे लागते. संस्कृतिसंक्रमणाचे पहिले साधन असते भाषा. ती बालकांना शिकवावी लागते. भाषा, मने व हृदये जोडते. कुटुंबातील रीती–भाती, कुलाचार, सामाजिक प्रथा–पद्धती या शिकवाव्या लागतात. बालकांमध्ये अनेक शक्ती असतात. त्याद्वारे ते नवीन गोष्टी आत्मसात करते. सहजीवनातून संस्कार घडत असतात. समाजातील जाणत्या व्यक्तींनी निर्माण केलेले जीवनाचे आदर्श, इष्ट गोष्टी यांच्याबद्दलच्या कल्पना मुलं ग्रहण करतात. अशाप्रकारे एकेवेळी असंमजस, असहाय, अज्ञानी असलेल्या पिढीची मने सबल, समंजस, ज्ञानसंपन्न बनतात. दोन पिढ्यांमध्ये समान ध्येये व मूल्ये निर्माण होतात. छोट्या बालकांना समाजाचे घटक बनविण्याचा या प्रक्रियेलाच 'सामाजिकीकरण' म्हणतात.

शिक्षणाचे कार्य वळण लावण्याचे, संस्कार करण्याचे, वर्तन–परिवर्तनाचे म्हटले जाते. या अर्थाने शिक्षण म्हणजे लहान व असहाय्य मानवी व्यक्तीला सुखी, नीतिमान व कार्यक्षम

बनवण्यासाठी केलेले सहाय्य होय असे जॉन ड्यूई म्हणतात. समाजजीवनातील या कार्यालाच शिक्षण किंवा संस्कार म्हणतात. अनुभव संक्रमणाचे अवघड कामही या सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेतून घडते. शिक्षणाचा व्यक्तीच्या व समाजाच्या भावी जीवनाशी संबंध असतो. या अर्थाने 'शाळा' ही एक सामाजिक संस्थाच आहे. याच पार्श्वभूमीवर महर्षी कर्वे यांची समाजाभिमुख शिक्षणाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

- **महर्षी कर्वे यांचे समाजाभिमुख शिक्षण कार्य**
    - **संसारोपयोगी कामे व व्यवहार ज्ञान**

आश्रमात शिस्त व स्वालंबनाला मोठं महत्त्व होतं. नीटनेटकेपणा, साधेपणा याबरोबर जीवनमूल्य जपण्याची धडपड होती. आश्रमातील दिनक्रम ठरलेला असे. मुली त्यासंबंधी आठवणी सांगतात. आश्रमात आम्ही पहाटे ५ लाच उठायचो नंतर सर्वजणी वसतिगृहाच्या चौकात एकत्रित प्रार्थनेला जमत. त्यानंतर गटागटाने विभागून दिलेली काम केली जात. साफसफाई करणं, झाडांना पाणी घालणं, स्वयंपाकघरात भाजी चिरणं, धान्य निवडणं, पिण्याचे पाणी भरणं, भाकरी – पोळ्या करणं, जेवण वाढणं याशिवाय स्वतःची ताट–वाटी स्वच्छ करणं, कपडे धुणं अशा स्वालंबंनाच्या सवयी लावल्या जात.

सगळी काम शिस्तीत आणि वेळेतच, त्यानंतर भोजन, सामुदायिक प्रार्थना, अभ्यास, क्रीडांगणावर खेळ, मैत्रिणींशी गप्पा, गृहपाठ आणि झोप सगळा दिनक्रम वेळेनुसार. झाडावरील फुले तोडताना कळ्या तोडायच्या नाहीत, जांभूळ, कैऱ्यासाठी झाडांना दगड मारायचा नाही. जेवणात पानांत खरकट टाकायचं नाही. प्रार्थना म्हटल्याशिवाय जेवण नाही, अभ्यास केल्यावरच झोपणं असे अनेक अलिखित नियम. पण मनापासून ते नियम पाळले जात. केवळ अभ्यासच नव्हे तर या सर्वांची शिकवण आश्रमात राहणाऱ्या मुलींना मिळत असे.

१९०७ साली महिला महाविद्यालय स्थापनेचा उद्देशच असा होता की, ''गृहिणीपदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या ज्याच्या योगाने मनावर ठसतील व ज्याच्या योगाने समाजविषयक कर्तव्याविषयी चांगली ओळख होऊ शकेल असे शिक्षण देऊन आपल्या समाजात

सुशिक्षित स्त्रिया तयार करण्याचा प्रयत्न करणे''. या उद्देशाला पूरक असे ज्ञान आश्रमात मिळत असे.

- **संस्कारक्षम उपक्रम**

संस्थेत शालेय अभ्यासक्रम व दैनंदिन कामाशिवाय मुलींवर संस्कार घडतील असे उपक्रम नियमित असत. गोकुळाष्टमी, राखीपौर्णिमा, हरितालिका, गणेशचतुर्थी, दसरा, दिवाळी असे धार्मिक सण साजरे होत. त्यामागील भूमिका समजावली जात असे. गणेशोत्सवानिमित्त विद्वानांची व्याख्याने, गायन, वादन, नाट्यछटा अशा कार्यक्रमाची रेलचेल असे. स्तोत्र पाठांतर, आरत्या, श्लोक, प्रार्थना, समूहगीते, गीतापठण, केकावली यांचे पाठांतर असे. आठवड्यांच्या प्रार्थना ठरलेल्या असत. रोज नवीन प्रार्थना असे.

गणेशोत्सवासाठी देखावे बनवणे, रांगोळी काढणे, लेझीम–टिपऱ्यांची प्रॅक्टीस करणे. पारंपारिक पोशाख, वेशभूषा करणे, रंगीबेरंगी पताका बनवणे, आंब्याच्या पानांची तोरणं बनवणे आणि सजावट करणे. अशी छोटी पण महत्त्वाची काम मुली करत. यातूनच आपली संस्कृती, आपला धर्म, चालीरिती, परंपरा, सण–उत्सव यांचे महत्त्व समजत असे आणि नकळत हे संस्कार मुलींमध्ये संक्रमित होत गेले.

- **शेती व्यवसाय**

इ. स. १९४९ साली सरकारी योजनेनुसार इ. ५ वी ते ७ वी साठी वेगळा अभ्यास तयार केला. त्यात हस्तव्यवसाय हा वेगळा विषय होता. संस्थेच्या आवारात खूप मोकळी शेतजमीन असल्याने 'शेती' हा हस्तव्यवसाय सुरु केला गेला. शाळेतील विद्यार्थिनी या जमिनीत पालेभाज्या, फळभाज्या लावीत. त्यांची निगा राखत व पिकवलेल्या भाजीपाल्याची विक्री करुन हिशेब ठेवत असत.


- **गृहशास्त्र विभाग**

शाळेतील प्रत्येक विद्यार्थिनीला पाच जणांचा स्वयंपाक करता आला पाहिजे तिला आहारशास्त्र समजले पाहिजे, तिने गृहकृत्यदक्ष बनावे या हेतूने १९५६–१९५७ साली अद्ययावत साधनांनी युक्त असा गृहशास्त्र विभाग संस्थेने सुरु केला. त्यासाठी स्वतंत्र इमारत बांधली. यामध्ये

आहारशास्त्र, विविध पोषक पदार्थ बनवणे, अन्नातील घटक, चौरस आहार, टेबल सजावट हे विषय शिकवले जात. मुलींनी गृहिणी म्हणून घर कसे चालवावे याचे गटागटाला प्रत्यक्ष शिक्षण दिले जाई. रोजच्या स्वयंपाकाचा–नाश्त्याचा मेनू ठरवणे, खर्चाचे नियोजन करणे, गृहसजावट करणे, पाहुण्यांचे आदरातिथ्य करणे या सर्व गोष्टी शिकवल्या जात असत. याशिवाय कपड्यांची योग्य पद्धतीने धुलाई व इस्त्री करणे याचेही शिक्षण दिले जाई. पुढे इ. स. १९७५ नंतर नवीन अभ्यासक्रमानुसार कार्यानुभव विषयांतर्गत 'टिकाऊ व पोषक पदार्थ' याचे प्रात्यक्षिक या गृहशास्त्र वर्गात घेतले जाई.

- **पोहण्यासाठी तलाव**

इ. स. १९३८ साली माजी विद्यार्थीनींच्या देणगीतून शाळेच्या आवारात मैदानाजवळ 'कृष्णतलाव' बांधला गेला. संस्थेतील प्रत्येक मुलीला पोहता आलेच पाहिजे. या उद्देशाने संस्थेतील महिला शिक्षकाने मुलींना पोहायला शिकवले. कावेरी कर्वे (महर्षी कर्वे यांच्या स्नुषा) या स्वतः मुलींना पोहायला शिकवत असत. मुली उत्साहाने पोहायला शिकत व पोहण्याचा आनंद लुटत असत.



(स्मरणिका महिलाश्रम हायस्कूल २००६–२००७)

फोटो क्र. ८/९ गृहशास्त्र वर्ग–शिवणकाम





(स्मरणिका महिलाश्रम हायस्कूल २००६–२००७)

फोटो क्र. १०/११ कवायत प्रकार





(स्मरणिका महिलाश्रम हायस्कूल २००६–२००७)

- **विविध कला व क्रीडाशिक्षण**

वक्तृत्व, शिवणकाम, भरतकाम, गायन, विणकाम, नाट्यछटा, नाटक, वादन, पाककला या सर्व कलांचे शिक्षण अभ्यासक्रमात समाविष्ट होते. ट्रेनिंग कॉलेजच्या मुलींना शिलाई मशीन चालवता यावी म्हणून स्वतंत्र वर्गाची सोय होती.

विणकाम, भरतकामाचे विविध टाके शिकवले जाते. या सर्वांची परीक्षा घेतली जात असे. स्वेटर विणणे, वायरपासून पिशव्या विणणे, उद्यममंडळात पुस्तक बांधणी करणे, पुष्ठे तयार करणे, ही कामे करावी लागत. यामुळे मुलींच्या कला गुणांना वाव मिळाला. आणि या सर्वांचा उपयोग पुढे मुलींना संसारात झाला. आदर्श गृहिणीच्या समाजाच्या स्त्रीकडून असणाऱ्या अपेक्षा पूर्ण करण्यास मदत झाली. मुलींना खेळण्याची संधी मिळावी म्हणून प्रशस्त मैदान होते. शाळा सुटल्यावर रोज संध्याकाळी एक तास मैदानावर खेळण्यासाठी वेळ दिला जात असे. वर्षभरात एकदा आठवडाभर क्रीडा सप्ताह घेतला जाई. कवायत, लेझीम, काठी यांचे शास्त्रोक्त शिक्षण दिले जाई. त्यामुळे मुलींना सुदृढ व निरोगी आरोग्य मिळाले. महर्षी कर्वे यांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त सन १९३८ साली माजी विद्यार्थिनींच्या पुढाकाराने पुण्यातील मुलींच्या आंतरशालेय क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. त्यानिमित्त 'पुना गर्ल्स स्कूल स्पोर्टस असोसिएशन' (PGSSA) नावाची संस्था स्थापन करण्यात आली. दरवर्षी या संस्थेमार्फत जलतरण, मैदानी व सांघिक स्पर्धा आणि आसने, सूर्यनमस्कार, मानसंचलन, घोषपथक, लेझीम, कॅलेस्थेनिक्स, लोकनृत्य अशा ड्रील स्पर्धा घेतल्या जातात. पुण्यातील नामवंत शाळांचा यात सहभाग असतो. सन २०१८ हे या स्पर्धांचे ८० वे वर्ष आहे. सतत ८० वर्षे या स्पर्धा चालू आहे. संस्थेत आजही शारीरिक शिक्षणाला महत्त्व दिले जाते.

अशा तऱ्हेने महर्षी कर्वे यांनी स्त्री शिक्षणाच्या कार्यातून शालेय शिक्षण, सामाजिक गरजा, स्त्रीसक्षमीकरण, संसारोपयोगी शिक्षण, कला, क्रीडा व स्त्रियांच्या उच्च शिक्षणासाठी प्रयत्न केले. ज्यामुळे स्त्रियांचा मानसिक, भावनिक, सांस्कृतिक, शारीरिक, बौद्धिक असा **सर्वांगीण विकास** झाला असे म्हणता येईल.

- **संस्था उभारणीसाठी महर्षी कर्वे यांनी केलेले कार्य**

महर्षी कर्वे यांनी स्त्रीशिक्षणासाठी १४ जून १८९६ ला **'अनाथबालिकाश्रमाची मंडळी'** स्थापन केली. पुढे १८/४/१९४६ ला तिचे **'हिगणे स्त्री संस्था'** असे नामकरण झाले. आता **'महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था'** या नावाने ही संस्था १२५ वर्ष स्त्री शिक्षणाचे कार्य अविरत करीत आहे.

- **स्त्री शिक्षणाच्या वर्गणीसाठी पायपीट**

शिक्षणकार्याच्या खर्चासाठी महर्षी कर्वे यांना प्रथम पदरमोड करावी लागली. समाजापर्यंत जाऊन पै–पै गोळा केली. त्यासाठी अखंड पायपीट करावी लागली. अनेकदा लोक दरवाजे लावून घेत असत. परंतु त्यांनी चिकाटी सोडली नाही. हळूहळू पैसे जमू लागले. देणगीदार वाढत गेले. वर्गणी गोळा करणारे स्वयंसेवक तयार झाले. त्यामुळे मदत मिळत गेली.

स्त्रियांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापनेबद्दल वर्तमानपत्रातून वाचल्याबरोबर बाबू शिवप्रसाद गुप्त यांनी ५०० रुपयाचा चेक संस्थेकडे पाठवला. आणि हळूहळू वेगवेगळ्या देणग्या संस्थेकडे येऊ लागल्या. परंतु विद्यापीठाचे काम वाढत असताना हा निधी कमी पडू लागला म्हणून महर्षी कर्वे यांनी देशभर भ्रमण केले. १९२० साली डेक्कन, कोकण, कर्नाटक, वऱ्हाड, मध्यप्रांत, बडोदा, गुजरात, काठेवाड, मध्यहिंदुस्थान, इंदौर, राजपुताना, म्हैसूर, मद्रास, बंगाल, संयुक्त प्रांत, पंजाब, सिंध, इचलकरंजी, मुरुड, कुडाळ, भोर अशा ठिकाणी त्यांनी प्रवास केला व शिक्षणाच्या कार्यासाठी वर्गणी जमा केली. याचा सविस्तर तपशील महर्षी कर्वे यांच्या आत्मवृत्तात सापडतो. सर विठ्ठलदास ठाकरसी या उदार दात्याने अनपेक्षितरित्या महर्षी कर्वे यांना बोलावून महिला विद्यापीठासाठी भरघोस देणगी दिली. आणि त्यामुळे महिला विद्यापीठाची भव्य व आकर्षक इमारत उभी राहिली. शताब्दी महोत्सव साजरा करून हे विद्यापीठ सध्या यशस्वी वाटचाल करीत आहे.

- **भाऊबीजनिधी संकल्पना**

गरीब गरजू मुलींची संख्या संस्थेत वाढत होती. त्यामानाने निधी कमी पडत होता. निधी संकलन करण्यासाठी संस्थेचे आजन्म सेवक कै. गो. म. चिपळूणकर यांनी १९१९ मध्ये

भाऊबीजनिधी संकल्पना मांडली. स्वयंसेवकांनी संस्थेची माहिती समाजापर्यंत पोहचवावी व निधी जमा करावा असा या मागील हेतू होता. यामुळे स्वयंस्फूर्तीने काम करणारे अनेक स्वयंसेवक तयार झाले. त्यांनी निधी संकलनास मदत केली. तसेच वसतिगृहातील विद्यार्थिनीही सुट्टीत घरी जाताना निधी संकलनासाठी पावतीपुस्तक नेतात व भाऊबीज गोळा करतात. हा सर्व निधी संस्थेत जमा केला जातो. आज १०० वर्षे हा उपक्रम अखंड चालू आहे. हजारो स्वयंसेवक आणि हजारो विद्यार्थिनींचा यात समावेश आहे. अतिशय निःस्वार्थ व उदात्त हेतूने चालविलेल्या या योजनेचे यंदाचे **शताब्दीवर्ष** आहे. ग्रामीण भागातील निराधार, होतकरू मुलींचा खर्च यातून भागवला जातो आणि त्यांच्या शैक्षणिक अडचणी दूर केल्या जातात. तसेच प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणासाठी गरजू मुलींना आर्थिक मदतही केली जाते. दरवर्षी २० डिसेंबर कै. गो. म. चिपळूणकर यांच्या पुण्यतिथिच्या दिवशी 'भाऊबीजनिधी अर्पण सोहळा' साजरा केला जातो. जमवलेला सर्व निधी संस्थेकडे सुपूर्त करण्यात येतो.

फोटो क्र. १२ भाऊबीजनिधी अर्पण सोहळा



- **शिक्षणाचा प्रसार व त्रिखंडाचा प्रवास**

महिलाविद्यापीठाची स्थापना केल्यानंतर १२ वर्षे महर्षी कर्वे यांनी संपूर्ण भारतभर प्रवास करून लोकमत जागृत केले व हजारो रुपयांची मदतही मिळवली. आता भारताबाहेरील देशांमध्ये जाऊन प्रचारकार्य करावे, अर्थप्राप्ती करावी व जिनीव्हा येथे भरणारे शैक्षणिक मेळावे पाहावे अशी कल्पना त्यांना सुचली. खरे तर वयाची साठी उलटलेली असताना हा प्रवास अवघड होता. १६ मार्च १९२९ रोजी युरोपखंडाच्या प्रवासास त्यांनी सुरुवात केली. साडेतीन महिने ते लंडनमध्ये राहिले. संस्थेच्या कार्याच्या प्रचारार्थ काही संस्थांमध्ये जावून तिथे ते सभा घेत व नंतर निधीसाठी प्रयत्न करुन जी मिळेल ती मदत ते स्वीकारत. याचबरोबर तेथील शैक्षणिक संस्थांची बारकाईने पाहणी करत. लीडर्स्, पॅरिस, बेल्जियम, हॉलंड, जिनिव्हा, डेन्मार्क, कोपनहेगन, नार्वे, जर्मनी या ठिकाणी ते गेले. व्याख्याने दिली. संस्थेच्या माहितीचा प्रसार केला. आणि एकूण ३७२० रुपये व ५५६ पौंड वर्गणी मिळवली (आत्मवृत्त व चरित्र १९५८).

नंतर ते अमेरिकेत गेले. न्यूयॉर्क , वॉशिंग्टन, फिलाडेल्फिया, पिटस्बर्ग, शिकागो, लॉस एंजल्स, सॅनफ्रान्सिको या शहरात फिरले. येथे शैक्षणिक गोष्टीबरोबर सामाजिक बाबींचेही निरीक्षण त्यांनी केले. १९३० साली ते आशिया खंडातील योकोहामा बंदरात पोहचले. टोकिओ, कोबे, शांघाय, चीनमधील फिलिपाईन बेटे, सिंगापूर, मलाया असे प्रवास करुन स्वदेशी परतले. असा त्रिखंडाचा प्रवास करुन १४३०० रु. इतकी रक्कम स्त्री शिक्षणासाठी जमवली.

या प्रवासातून देणग्या तर मिळाल्याच परंतु शिक्षणकार्याचा मोठा प्रसार झाला. तसेच भारताबद्दलचे परकीय लोकांचे गैरसमज दूर झाले. आपल्या व्याख्यानानंतर ते प्रश्नोत्तरे घेत. त्यामुळे लोकांशी चांगला सुसंवाद घडून येई. असे अनेक हेतू महर्षी कर्वे यांनी आपल्या युरोप, आशिया व अमेरिका दरम्यानच्या प्रवासातून साध्य केले.

फोटो क्र. १३/१४ बर्लिनमधील भेट – १९२९




डॉ. आइन्स्टाइन डॉ. महर्षी कर्वे



(संदर्भ – आत्मवृत्त व चरित्र सन १९५८ पान क्र. ४८८)

फोटो क्र. १५/१६

थोरांच्या भेटी





(संदर्भ – आत्मवृत्त व चरित्र सन १९५८ पान क्र. ५६१)

- **महर्षी कर्वे यांच्या कार्याला मिळालेला पाठिंबा**

तत्कालीन परिस्थितीत कित्येक मुलींचे पालक मुलींना स्थळे पाहता पाहता अगदी कंटाळून जात. लग्न जमत नाही म्हटल्यावर एवढी मोठी झालेली मुलगी घरी नेली तर शेजारी–पाजारी नावे ठेवतील. मुलगी ही निरूद्योगी राहणार. अशा अडचणीत अनेक पालक पडत असत. अशा वेळी विद्यालय–आश्रम हे एक निर्वेध ठिकाण वाटे. त्यामुळे प्रौढ मुलींची संख्याही वाढू लागली. अशा तऱ्हेने स्त्रीजीवनाचा व सामाजिक परिस्थितीचा योग्य मेळ घालून महर्षी कर्वे यांनी समाजाभिमुख शिक्षण दिले. शिक्षण आणि समाज यातील सहसंबंध, सामाजिकीकरणाची प्रक्रिया या सर्वच बाबींचा विचार त्यांनी या शिक्षणप्रक्रियेत केला. आणि त्यामुळे त्यांच्या शिक्षणकार्यास समाजाचा पाठिंबा मिळाला तो असा की, प्रथमतः वृत्तपत्रांनी त्यांच्या कार्याची दखल घेतली आणि १) इंदुप्रकाश पुणे व मुंबई २) सुधारक पुणे ३) सुबोधपत्रिका मुंबई ४) वैदर्भ अकोला ५) ज्ञानचक्षु पुणे ६) वेंगुर्लेवृत्त वेंगुर्ले ७) प्रमोदसिंधु अमरावती ८) केसरी पुणे ९) मराठा पुणे १०)नेटिव्ह ओपिनियन मुंबई ११) विद्याविलास कोल्हापूर १२) तुकाराम व जगदादर्श अहमदनगर १३) कल्पतरु सोलापूर, नाशिकवृत्त नाशिक व १४) खानदेशवैभव धुळे या सर्व वृत्तपत्रांनी त्यांच्या या कार्याचे समर्थन केले व त्याविषयी **अनुकूल अभिप्राय वृत्तपत्रात** छापले.

अनाथ बालिकाश्रमाच्या कामाचा व्याप वाढल्यानंतर पार्वतीबाई आठवले, वेणुबाई नामजोशी व काशीबाई देवधर या आश्रमातील स्त्रिया पुढे आल्या. त्यांनी धीटपणा व समयसूचकता दाखवून महर्षी कर्वे यांना स्त्रीशिक्षणाच्या कार्यात मदत केली. सन १८८९ साली मिस् मॅनिंग यांनी आश्रमाला भेट दिली. ३० रु. इतकी वर्गणी दिली. आपल्या मृत्यूपत्रात आश्रमाला ५० पौंड देवू केले. राजपुतान्यातील टोक संस्थानाचे ट्रेझरर दामोदरपंत फाटक व त्यांची पत्नी यशोदाबाई यांनी ५०० रुपये आश्रमास पाठवले. कारण त्यांना आश्रमाबद्दल प्रेम वाटत होते. तसेच **अक्कलकोटच्या राणीसाहेब** व श्रीमती रमाबाई रानडे यांनी आश्रमात येवून मुलींच्या अडचणी समजावून घेतल्या. **राजकोटचे गृहस्थ सीताराम नारायण पंडित** यांनी संस्था पाहून त्यांच्या कार्याला मदत म्हणून तीनशे रुपयांचा चेक पाठवला आणि मुलींची संख्या वाढलेली पाहून दरमहा ५० रु. पाठवण्यास सुरुवात केली. 'तुमचे व संस्थेचे मजवर उपकार आहेत तुम्ही माझ्या पैशाला योग्य मार्ग दाखवला'

अशा आशयाचे पत्रही पाठवले. असे सहृदयी महर्षी कर्वे यांना भेटले. सन १९०४ साली **बडोद्याचे श्रीमंत सयाजीराव महाराज** आश्रम पाहण्यास आले. दोन तास त्यांनी आश्रमात घालवले. मुलींच्या अभ्यासाची चाचणी घेतली, विधवांना त्यांच्या समस्या विचारल्या, त्यासंबंधी मार्गदर्शन केले. आश्रमातील व्यवस्था पाहून त्यांना आनंद झाला. महर्षी कर्वे यांच्या कार्याला त्यांनी पाठिंबा दिला. सन १९१५ साली **महात्मा गांधी आपल्या पत्नीसह आश्रमाच्या भेटीस आले.** तीन–चार तास त्यांनी बारकाईने संस्था पाहिली. आणि महर्षी कर्वे यांचे त्यांच्या कार्यासाठी कौतुक केले. प्रसिद्ध सुधारक **वीरेश लिंगम् पंतलू व त्यांच्या पत्नी, लाला लजपतराय, सरोजिनी नायडू** यांनी आश्रमाच्या उत्कर्षासाठी भेटी देऊन आशीर्वाद दिले.

अनेक वर्ष त्यांच्यापासून दूर असलेले महर्षी कर्वे यांच्या मातोश्री व वडील बंधू यांनीही १९०२ मध्ये आश्रमात मुक्काम केला. आश्रम पाहून दोघांच्याही डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले. तसेच **रँग्लर परांजपे** यांचे वडील व मातोश्री या उभयतांनी आश्रमास भेट दिली. त्यांना झालेला आनंद पाहून महर्षी कर्वे यांना गहिवरून आले. **डॉ. सर रामकृष्णपंत भांडारकर, न्या. गोविंद रानडे, नामदार गोपाळकृष्ण गोखले** अशा थोर पुरुषांनीही आश्रमाचे कौतुक केले व आश्रम व्यवस्थापनासाठी सहकार्य केले.


अशा प्रकारे कुटुंबीय व हितचिंतक यांनी कौतुक केले, आशीर्वाद दिले आणि काही उदार दात्यांनी सढळ हस्ते आर्थिक मदत केली व त्यांच्या कार्यास पाठिंबा दर्शविला. **परदेशातून सर वुल्यम वेडरबर्ग, मिसेस हेन्री यांनीही महर्षी कर्वे यांच्या कार्याची पत्राद्वारे प्रशंसा केली.**

आश्रमाच्या व स्त्रियांच्या शिक्षणाचा खर्च भागविण्यासाठी अनेक देणगीदार पुढे आले. पैकी सर विठ्ठलदास ठाकरसी यांनी महिलांच्या स्वतंत्र विद्यापीठासाठी भरघोस आर्थिक मदत केली. आणि विद्यापीठाची सुंदर इमारत साकारली. आश्रम, विद्यालय व महाविद्यालय यांचा वाढता व्याप, विस्तार व खर्च यासाठी अनेक दात्यांनी देणग्या दिल्या. त्यामुळे महर्षी कर्वे यांना **आर्थिक पाठबळ** मिळाले.

महर्षी कर्वे यांनी आपल्या कार्याचा प्रसार करण्यासाठी आशिया, आफ्रिका, युरोप व अमेरिका खंडाचा दौरा केला. आपल्या भाषणातून आपले विचार मांडले. ते इतरांनाही पटले. त्यामुळे त्यांना परदेशातूनही भरपूर आर्थिक मदत मिळाली.


अशा तऱ्हेने आप्त स्वकियांचा मानसिक, भावनिक व आर्थिक आधार महर्षी कर्वे यांना मिळाला. तो त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्यामुळेच. संस्थेचे कार्य, तिथला अभ्यासक्रम व शिक्षण हे लिहिता वाचता येण्यापलीकडे होते. कुटुंब व समाजास उपयुक्त होते. त्यांच्या समाजाभिमुख कार्यपद्धतीमुळे पालक वर्गाचाही त्यांना पाठिंबा मिळाला. आणि दिवसेंदिवस मुलींची संख्या वाढतच गेली. हे पुढील आलेखातून लक्षात येते.

आलेख ४.१ विद्यार्थिनी संख्या पूर्व प्राथमिक व प्राथमिक




(म. कर्वे स्त्री शिक्षण संस्था अहवाल, २०१६–२०१७, पान नं. १४)

आलेख ४.२ विद्यार्थिनी संख्या माध्यमिक




(म. कर्वे स्त्री शिक्षण संस्था अहवाल, २०१६–२०१७, पान नं. १४)

आलेख ४.३ विद्यार्थिनी संख्या महाविद्यालय




(म. कर्वे स्त्री शिक्षण संस्था अहवाल, २०१६–२०१७, पान नं. २०)

आलेख ४.४ विद्यार्थिनी संख्या वसतिगृह



(म. कर्वे स्त्री शिक्षण संस्था अहवाल, २०१६–२०१७, पान नं. २४)

आलेख ४.५ विद्यार्थिनी संख्या (सन १८९६ ते २०१९)



(म. कर्वे स्त्री शिक्षण संस्था अहवाल, २०१६–२०१७)

- **विद्यापिठाच्या (S. N. D. T.) धोरणाने चालणाऱ्या शाळा**

महिलांसाठी उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून महर्षी कर्वे यांनी 'भारतवर्षीय महिला विद्यापीठ' पुण्यात स्थापन केले. त्याचबरोबर इतर ठिकाणीही स्त्री शिक्षणाची गरज ओळखून महर्षी कर्वे व त्यांचे सहकारी यांनी अशा तऱ्हेने महाराष्ट्रात सांगली, बेळगाव, सातारा, मुंबई , पुणे , सुरत, बडोदा, अकोला, सोलापूर, वाई, रत्नागिरी इ. ठिकाणी मुलींच्या शाळा काढल्या. यामध्ये

महर्षी कर्वे यांच्या सहकार्यांचा विशेषतः स्त्रियांचा मोठा वाटा होता. महर्षी कर्वे यांनी निष्काम कर्म मठाची स्थापना ज्या उद्देशाने केली तो सफल झाला असेच म्हणता येईल.

- **महर्षी कर्वे यांच्या कार्यातील वेगळेपणा**

  स्त्री शिक्षणासाठी अनेक समाजसेवक, समाजसुधारक व शिक्षणतज्ज्ञांनी अलौकिक कार्य केले आहे. अनेकांच्या कार्यामध्ये सारखेपणा दिसून येतो. परंतु महर्षी कर्वे यांचे कार्य हे इतरांपेक्षा वेगळे आहे. हे त्यांच्या पुढील कार्यक्षेत्रातून जाणवते.

१) महर्षी कर्वे यांनी विधवा शिक्षणाने त्यांच्या कार्याची सुरुवात केली परंतु नंतर सर्वसामान्य, अनाथ, परितक्त्या, प्रौढ अशा सर्व स्तरावरील स्त्रियांच्या शिक्षणासाठी कार्य केले.

२) स्त्रियांना साक्षर तर केलेच त्याचबरोबर त्यांना स्वावलंबी, सबल, सक्षम व आत्मविश्वासू बनवले.

३) शालेय शिक्षणाबरोबरच पारंपारिक कलांचे शिक्षण दिले. उदा. शिवणकाम, विणकाम, भरतकाम इ.

४) मुलींना क्रीडाक्षेत्रातही संधी मिळावी म्हणून सन १९३८ साली 'पूना गर्ल्स स्कूल स्पोटर्स असोसिएशन' या संस्थेची स्थापना केली. याद्वारे आज ८० वर्षे सतत क्रीडा स्पर्धा घेतल्या जातात. त्यासाठी प्रशस्त क्रीडांगण व पोहण्याचा तलाव अशा सुविधा निर्माण केल्या.

५) समाजाभिमुख अभ्यासक्रमाची निर्मिती केली.

६) मुलीच्या सुरक्षिततेचा विचार करून वसतिगृहाची सोय केली. त्यामुळे कौटुंबिक वातावरणात मुलींना शिक्षण मिळाले.

७) मुलींना संसारोपयोगी कामाच्या सवयी लावल्या.

८) संस्कारक्षम शिक्षण दिले.

९) मातृभाषेतून शिक्षणास महत्त्व दिले. परंतु जागतिक ज्ञानासाठी इंग्रजी भाषेसही प्राधान्य दिले.

१०) महिलांना उच्च शिक्षण मिळावे म्हणून भारतातील पहिल्या स्वतंत्र महिला विद्यापिठाची स्थापना केली.

११) ग्रामीण भागातही शिक्षणाचा प्रसार केला.

१२) शैक्षणिक कार्यासाठी लोकवर्गणीतून निधी संकलन केले.

१३) स्त्री शिक्षणाचा प्रचार व प्रसार यासाठी देश विदेशात दौरे केले.

१४) जातीभेद पाळला नाही. त्यामुळे देशभरातून सर्व जातीधर्माच्या मुलींना शिक्षण मिळाले.

१५) निष्काम–कर्म–मठाची स्थापना करून स्त्रियांनाच स्त्री शिक्षणाच्या कार्यास उद्युक्त केले.

१६) स्त्रियांना समाजसेवा करण्याचे संस्कार दिले.

१७) संबंध मानवतेचे कल्याण करणे असा उदात्त हेतू ठेऊन 'समता संघाची' स्थापना केली व समाजात समानता रुजवण्याचे कार्य केले.

१८) शैक्षणिक कार्याबरोबर सामाजिक कार्यही केले.

इतरांपेक्षा वेगवेगळ्या कार्यक्षेत्राचा विचार करून स्त्रियांच्या शैक्षणिक कार्याबरोबर समाजोपयोगी कार्य केले. स्त्रियांची सर्वांगीण प्रगती व्हावी म्हणून त्यांनी अत्यंत कठीण परिस्थितीस तोंड दिले व स्त्रीशिक्षणाचे कार्य तडीस नेले. स्त्रियांच्या सर्वांगीण विकासाचा सखोल विचार केला व आपले दिर्घायुष्य शैक्षणिक व सामाजिक कार्यास अर्पण केले. थोडक्यात स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी जे–जे करणे गरजेचे होते. ते–ते कार्य महर्षी कर्वे यांनी केले.

- **महर्षी कर्वे यांच्या कार्याचा गौरव**

१८ एप्रिल १९५८ महर्षी कर्वे यांचा शंभरावा वाढदिवस. त्यानिमित्त अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम सरकारने आखले. त्यांचे जन्मस्थान मुरुड येथे त्यांचा पुतळा बसवून कायमचे स्मारक केले. महर्षी कर्वे यांची प्रतिमा असलेले **पोस्टाचे तिकिट** काढले. त्यांच्या जीवनावर बोलपट तयार केला. मुंबई विद्यापीठाने त्यांना 'डॉक्टर ऑफ लॉज' ही पदवी


देवून भूषविले. रॉबर्ट मनी स्कूल, विल्सन कॉलेज व एल्फिस्टन कॉलेजमध्ये त्यांचा सत्कार झाला. मुंबई महापालिकेने त्यांना **मानपत्र** अर्पण केले. बनारस विद्यापीठाकडून **डी. लिट**. पदवी, सन १९५५ मध्ये **'पद्मविभूषण'** ही पदवी आणि यावर कळस चढवला तो **'भारतरत्न'** या पदवीने. २६ जानेवारी १९५८ या दिवशी भारत सरकारने त्यांना सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान करून त्यांनी केलेल्या स्त्रीशिक्षणाच्या कार्याचा गौरव केला.



फोटो क्र.१७ महर्षी कर्वे यांना पद्मविभूषण व भारतरत्न हा सर्वोच्य सन्मान




(महर्षी कर्वे संग्रहालय, कर्वेनगर, पुणे)



(महर्षी कर्वे संग्रहालय, कर्वेनगर, पुणे)

फोटो क्र. १८ महर्षी कर्वे यांची डी. लिट पदवी



Benares Hindu University

Doctor of Letters


The Senate of the Benares Hindu University hereby confers the Honorary Degree of Doctor of Letters on Prof. D. K. Karve, M.A., in recognition of his eminent position and attainments.

January 21, 1942.

S. Radhakrishnan
Vice-Chancellor.

(महर्षी कर्वे संग्रहालय, कर्वेनगर, पुणे)

फोटो क्र. १९



We, the Chancellor, Vice-Chancellor and Members of the Court of the University of Poona certify that the Honorary Degree of

Doctor of Letters

has been conferred on

Shri Dhondo Keshav Karve


at Poona, on the eighth day of the month of September in the year one thousand nine hundred and fifty one.

In Testimony whereof are set the Seal of the said University and the Signature of the said Chancellor.

Chancellor.

(महर्षी कर्वे संग्रहालय, कर्वेनगर,पुणे)

महर्षी कर्वे यांना पद्मविभूषण



(महर्षी कर्वे संग्रहालय, कर्वेनगर,पुणे)

- **महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेची यशस्वी वाटचाल**

भावी पिढीसमोर इतिहास ठेवताना काळाचा संदर्भ फार महत्त्वाचा ठरतो. आधुनिक युगात वावरणाऱ्या, विपुल संधी, सुखसुविधा यांनी समृद्ध जीवनाचा अनुभव घेणाऱ्या युवती समोर संस्थेचा प्रतिकूल काळ, संस्थेची आरंभीची खडतर वाटचाल व सध्याचा उत्कर्ष मांडायला हवा.

संस्थेची मुहूर्तमेढ : १४ जून १८९६ रोजी पुण्यात रावबहादूर वि. मो. भिडे यांच्या वाड्यात त्यांच्याच अध्यक्षतेखाली 'अनाथ बालिकाश्रमाची मंडळी' या छोट्याश्या विधवागृहाची स्थापना करण्यात आली. अध्यक्ष होते सर डॉ. रामकृष्ण भांडारकर आणि चिटणीस स्वतः धोंडो केशव कर्वे. १८९७ साली संस्थेत विद्यार्थिनी संख्या सात होती. खर्चासाठी कर्वे यांनी पायपीट सुरु केली. निधी जमवू लागले. सर्वप्रथम स्वतःच्या विम्याची पॉलीसी गहाण ठेवून खर्च चालवला. १९९८ साली रा. ब. गोखले यांनी हिंगण्याची जागा संस्थेस दिली. १ जानेवारी १८९९ रोजी अनाथबालिकाश्रमानंतर सदाशिव पेठेत पेरूगेटजवळ गोरे वाड्यात आश्रमास सुरुवात झाली. पहिल्या वर्षाअखेर ४ विद्यार्थिनी, दुसऱ्या वर्षाअखेर ७ विद्यार्थिनी, तिसऱ्या वर्षाअखेर ११ विद्यार्थिनी, चौथ्या वर्षाअखेर १४ विद्यार्थिनी, पाचव्या वर्षाअखेर २१ विद्यार्थिनी अशी संख्या वाढत गेली.

१८९९ साली पुण्यात प्लेगची साथ आली. तेव्हा संस्था पुण्याबाहेर हिंगणे येथे स्थलांतरीत झाली. १९०० साली आश्रम हिंगण्यात आला. पत्नी आनंदीबाई, मेहुणी नर्मदाबाई फडके मदतीला आल्या. १९०२ साली नवी छोटी इमारत बांधली. यासाठी महाराष्ट्रभर प्रवास करून वर्गणी जमा केली व सभा घेतल्या. स्वार्थत्यागी सुशिक्षित स्त्रिया (पार्वतीबाई, वेणूबाई, काशीबाई) यांच्या कामात मदतनीस मिळाल्या. सुरुवातीस समाजाचा विरोध झाला, अनेक अडचणी आल्या परंतु १८९९ पासून मिस मॅनिंग, ट्रेझरर दामोदरपंत फाटक, हर एक्सलन्सी लेडी नॉर्थकोट, नामदार सी. एच. हिल., राणीसाहेब (अक्कलकोटच्या), रमाबाई रानडे, श्रीमंत इचलकरंजीकर, १९०४ बडोद्याचे श्रीमंत सयाजीराव, १९०५ हिज एक्सलन्सी लॉर्ड लॅमिंग्टन, सर जॉर्ज क्लॉर्क, लेडी विलिंग्डन,

देशभक्त महात्मा गांधी, कस्तुरबा गांधी, सुधारक वीरेश लिंगम पंतलू, रॅग्लर परांजपे इत्यादी थोर स्त्री पुरुषांनी आश्रमास भेटी देवून महर्षी कर्वे यांच्या कार्यास पाठिंबा दिला. त्यांना सढळ हाताने मदत केली व त्यांच्या कामाचे कौतुक केले.

आश्रमास अनेक हितचिंतक मिळाले. आश्रमाचा विस्तार वाढला. आता ९० मुली आश्रमात शिकत होत्या. महाराष्ट्रातील अनेक भागातून व देशातूनही मुली येऊ लागल्या. स्त्रिया सुशिक्षित व स्वावलंबी होवू लागल्या. विधवाबरोबर कुमारिकाही दाखल होवू लागल्या. **लोकांना आश्रम व अभ्यासक्रम आवडू लागला.** शैक्षणिक कार्य सुरु झाल्यानंतरचे पहिल्या दहा वर्षात कशी हळूहळू संख्या वाढत गेली. हे खालील तक्त्यातील मुलींच्या वाढत जाणाऱ्या संख्येवरुन लक्षात येते.

कोष्ठक क्र.४.३ विद्यार्थिनींची वाढती संख्या

वर्ष	विधवा विद्यार्थिनींची संख्या	अविधवा विद्यार्थिनींची संख्या
१८९९	४	०
१९९९	८	२
१९०१	११	३
१९०२	१४	४
१९०३	२१	९
१९०४	२७	११
१९०५	४७	१३
१९०६	५६	१९

(संदर्भ – आत्मवृत्त व चरित्र सन १९५८)

पालकांच्या आग्रहाखातर वसतिगृह बांधले गेले. सुवासिनी व कुमारिका यांच्यासाठी नवीन शाळा ४ मार्च १९०७ रोजी रंगपंचमीच्या दिवशी लकडी पुलाजवळील पडक्या

वाड्यात ६ विद्यार्थिनींना घेऊन सुरु झाली. वर्षाअखेर १४ मुली आल्या. दिवसेंदिवस संख्या वाढतच गेली. वर्तमानपत्रात लेखाद्वारे माहिती प्रसिद्ध झाली. समाजाचा पाठिंबा मिळू लागला. १९०९ साली आश्रम, विद्यालय व मठ यांचे एकत्रिकरण करुन **'महिलाश्रम'** नावाने शाळा सुरु झाली.

अनेक हितचिंतक, सहकारी, अध्यापक महर्षी कर्वे यांच्या कार्यात सक्रिय सहभागी झाले. (हरि रामचंद्र दिवेकर, नारायण आठवले, गो. म. चिपळूणकर, वा. म. जोशी, वा. गो. मायदेव, विश्वनाथ मोडक इ.) १९१६ स्वतंत्र महिला विद्यापीठ व १९१७ मध्ये पार्वतीबाई अध्यापिका विद्यालयाची स्थापना झाली. काहींचा विरोध व अनेकांचे सहकार्य मिळाले. दानशूरांकडून देणग्या मिळाल्या व विद्यापीठास स्थैर्य प्राप्त झाले. देशातील पहिले स्त्रियांसाठीचे विद्यापीठ असल्याने देशभरातून मुली येऊ लागल्या.

- **महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचा विस्तार**

सन १८९६ ते सन २०१८ या १२३ वर्षाच्या प्रदिर्घ कालावधीत संस्थेचे रुपांतर एका भव्य वटवृक्षात झाले आहे. पुणे, सातारा, वाई, रत्नागिरी, नागपूर, कामशेत व वसई या ठिकाणी संस्थेच्या ६७ शाखा कार्यरत आहेत. (यादी परिशिष्ट ब मध्ये)

संस्थेत उपलब्ध असलेल्या उच्च शिक्षणाच्या सोयी

१) श्री सिद्धीविनायक कला आणि वाणिज्य महिला महाविद्यालय

२) कमिन्स अभियांत्रिकी महिला महाविद्यालय

३) डॉ. भानुबेन नानावटी वास्तुशास्त्र महिला महाविद्यालय

४) श्रीमती हिराबेन नानावटी व्यवस्थापन शास्त्र महिला महाविद्यालय व संशोधन संस्था

५) स्कूल ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी

६) सुमती देशमुख इन्स्टिट्यूट ऑफ फॉरेन लॅगवेजेस

७) मणिलाल नानावटी व्होकेशनल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट

८) श्रीमती बकुळ तांबट इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन

९) के. बी. जोशी इन्स्टिट्यूट ऑफ इनफॉरमेशन टेक्नॉलॉजी

१०) महिलाश्रम हायस्कूल कला, वाणिज्य, शास्त्र व व्यवसाय शिक्षण विभाग

११) पार्वतीबाई अध्यापिका विद्यालय

अशा तऱ्हेने नव्या सहस्त्रकात स्त्री शिक्षणाचा वृक्ष बहरला, विस्तारला आहे. उजाड माळरानावर नंदनवन फुलले आहे. महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासात या संस्थेचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. सामाजिक व शैक्षणिक असे परस्परपूरक दुहेरी कार्य संस्था करीत आहे. विसाव्या शतकाच्या घडामोडींच्या संदर्भात आणि महर्षी कर्वे यांच्या निष्कलंक, सेवाव्रती प्रदीर्घ जीवनाच्या आलेखात ते अधिकच उजळलेले आहे.




सन १८९६ पासून शालेय शिक्षणाचे कार्य
माफक दरात शालेय शिक्षण व वसतिगृहाची सोय
गरजू व होतकरु विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती
सन १९३४ पासून कनिष्ठ व वरिष्ठ बालगृह
अंध विद्यार्थनींसाठी विशेष वर्ग
सुमारे ३०% विद्यार्थिनींना मोफत शिक्षण
देणगी योजनांद्वारे आर्थिक सहाय्य


सन १९१० पासून उच्च शिक्षणाचे कार्य
कला, वाणिज्य महाविद्यालय
अभियांत्रिकी महाविद्यालय (पुणे, नागपूर)
वास्तुशास्त्र महाविद्यालय
व्होकेशनल ट्रेनिंग इन्स्टिटचूट
मॅनेजमेंट इन्स्टिटचूट
फॅशन टेक्नॉलॉजी
नर्सिंग महाविद्यालय (पुणे, नागपूर)
इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी (वीसीए) (पुणे,बाई, सातारा, रत्नागिरी)
फॉरेन लॅन्गवेज इन्स्टिटचूट
मेकॅट्रॉनिक्स इन्स्टिटचूट
लेझर टेक्नॉलॉजी इन्स्टिटचूट

- **सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या योगदानाबद्दल संस्थेला मिळालेले पुरस्कार**

१) संस्थेच्या सामाजिक कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाने **दलित मित्र** पुरस्काराने सन १९७९ साली सन्मानित केले.

२) संस्थेच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्याबद्दल १९९८ सालामध्ये **विमलाबाई तिडके** पुरस्कराने सन्मानित करण्यात आले.

३) संस्थेने शैक्षणिक क्षेत्रामध्ये केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाच्या वतीने १९९९–२००० सालाकरिता संस्थेला पुण्यश्लोक **अहिल्यादेवी होळकर** पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

४) रोटरी इंटरनॅशनल, नवी दिल्ली यांनी डिसेंबर २००१ मध्ये महिला सबलीकरण वर्षाच्या निमित्ताने संस्थेला **रोटरी इंटरनॅशनल ॲवॉर्ड फॉर ह्युमॅनिटी** टू पुरस्कार देऊन गौरविले. १ लाख रुपये व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

५) महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा समाज कल्याण विभागाच्या वतीने शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रामध्ये केलेल्या उल्लेखनिय कार्याबद्दल संस्थेला सन २०१६–२०१७ या वर्षाकरिता **'शाहू–फुले–आंबेडकर पुरस्कार'** मिळाला. रु. १५ लाख व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप होते.

फोटो क्र. २० महर्षी कर्वे संस्थेस पुरस्कार



महसूल मंत्री श्री. चंद्रकांत पाटील, सामाजिक न्यायमंत्री श्री. राजकुमार बडोले व राज्यमंत्री श्री. दिलीप कांबळे यांच्या उपस्थितीमध्ये कोल्हापूर येथे संपन्न झालेल्या समारंभामध्ये 'शाहू-फुले-आंबेडकर पुरस्कार' स्वीकारताना संस्थेचे पदाधिकारी दि. २४ मे २०१७

(म. कर्वे स्त्री शिक्षण संस्था अहवाल २०१६-२०१७)

४.४ दुय्यम स्त्रोतांद्वारे मिळालेली माहिती

चरित्र, संदर्भ पुस्तके, मासिके, नियतकालिक, हस्तपुस्तिका, अहवाल, वृत्तपत्र (सकाळ, महाराष्ट्र टाईम्स) वेबसाईट, संशोधने, कात्रणे या दुय्यम स्त्रोतांद्वारे महर्षी कर्वे यांचे स्त्रीशिक्षणविषयक विचार आणि त्यांचे स्त्रीशिक्षणाचे कार्य याविषयी मिळालेल्या माहितीचे संकलन व विश्लेषण केले आहे.

- **न. म.जोशी–**'महाराष्ट्राचे शिल्पकार महर्षी धोंडो केशव कर्वे'

न. म. जोशी यांनी लिहिलेल्या 'महाराष्ट्राचे शिल्पकार महर्षी धोंडो केशव कर्वे' या पुस्तकांच्या अध्यक्षीय निवेदनात प्रसिद्ध साहित्यिक बाबा भांड लिहितात की, स्त्री घरातील संस्काराची धनीण, पण समाजानं तिला **दुय्यमस्थान** दिलं. **शिक्षणापासून वंचित** ठेवलं. दुर्देवानं नशिबी आलेल्या वैधव्याचा कलंक माथी मिरवत समाजानं तिचा छळ सुरु केला. ही दूषणे दूर व्हावीत यासाठी आयुष्यभर स्त्री शिक्षणासाठी गेल्या शतकात प्रत्यक्ष काम करणारे **महर्षी धोंडो केशव कर्वे** हे एक असेच महत्त्वाचे **शिल्पकार आहेत**. निराधार स्त्रियांना आश्रयाचा आधार देण्याचा मार्ग म्हणजे त्यांना शिकवून स्वतःच्या पायावर उभं केलं तर त्या **स्वावलंबी होतील.** हें महर्षींनी ओळखले.

अनाथबालिकाश्रमाच्या संचालनात त्यांनी श्रमांना महत्त्व दिले होते. स्वयंपाकपाणी, स्वच्छता, अन्य कारभार यांबाबत शक्यतो सर्वांनी **स्वावलंबनाने सहकार्याने प्रयत्न करावेत** आणि श्रमाचे मूल्य देऊन आपला खर्च कमी करावा अशीच योजना त्यांनी आखली हेाती. **''धोंडो म्हणजेच 'स्त्रीशिक्षणाचं महाद्वार' महाराष्ट्रातील स्त्रियांसाठी खुलं करुन देणारा कृतिशील कर्मवीर'' असे लेखक म्हणतात.**

लेखक पुढे म्हणतात की, उच्चशिक्षणाबाबत समाजाचा महिलांसंबंधी दृष्टीकोन हा एक प्रश्न तर होताच, पण शिक्षणाच्या माध्यमाबाबतचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा होता. **मातृभाषेतून** उच्च शिक्षणाची सोय होणे महिलांच्या दृष्टीने हितकर होते. याबाबतही ठोस पावले उचलणे आवश्यक आहे. असे कर्वे यांना वाटले. यासाठी **महिला विद्यापीठ** स्थापन करणे हे कर्वे यांचे स्वप्न होते. ते स्वप्न त्यांनी साकार केले. महिला विद्यापीठाची स्थापना झाली आणि अनाथबालिकाश्रम ते महिला विद्यापीठ असा कर्वे यांचा स्वप्नांचा विस्तार झाला. या **विद्यापीठाचे**

वैशिष्ट्य म्हणजे तेथील **माध्यम मातृभाषा** असून मुलींच्या गरजा व परिस्थिती लक्षात घेऊन तेथील **अभ्यासक्रम** आखण्यात आला आहे. तसेच भारतीय जीवनातील साधेपणा कायम राखून अभ्यासक्रमाची आखणी करण्यात आली आहे. महिला विद्यापीठाच्या उत्तम कार्याची दखल मुंबई प्रांताचे शिक्षणखातेही घेत होते. १९२५–२६ या वर्षी शिक्षणखात्याने या विद्यापीठाच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करुन लिहिले आहे. ''या प्रांतातील अनेक शाळा या विद्यापीठाशी संलग्न आहेत. या शाळांचे वैशिष्ट्ये म्हणजे इंग्रजी विषय वगळता अन्य सर्व विषय या शाळांतून मातृभाषेतून शिकविले जातात.''शंभर वर्षात त्यांनी गरीब स्त्रिया, विधवा, अनाथ मुली आणि दीनदुबळे यांच्यासाठी अविरत कार्य केले. महर्षी अण्णासाहेब कर्वे यांनी ज्या स्त्रियांसाठी कार्य केले, त्यातील काही स्त्रियांचे उत्तम पुनर्वसन होऊन त्या **स्त्रिया समाजात सुस्थिर** झाल्या होत्या. अशा स्त्रियांना तर कर्वे यांच्या कार्याची महती सप्रमाण पटली होती. त्यांचे ते आधार बनले. हे काम करताना महिलांचं शिक्षण हेच समाज परिवर्तनाची सुरुवात आहे हे त्यांनी ओळखून आयुष्यभर स्त्री शिक्षणाचे कार्य ते करत राहिले. **महर्षी कर्वे हा आधुनिक काळातला महाराष्ट्रामधला एक चमत्कार आहे.** चांगुलपणा, भलेपणा, सौजन्य आणि साधुत्व यांचा असा मूर्तिमंत पुतळा या काळामध्ये सहजासहजी पाहावयास मिळणार नाही. (आचार्यअत्रे)

- **सौ. मालतीबाई देशपांडे–** 'स्त्री शिक्षणाचे प्रणेते महर्षी कर्वे'

''शिक्षणामुळे स्त्री स्वतंत्र व कर्तव्यदक्ष बनेल आशा–आकांक्षांचे अमर्याद क्षेत्र स्त्रियांना शिक्षणामुळे मोकळे होईल. शिक्षणामुळे ती अधिक **समर्थ** बनेल.'' हा केवळ आशावाद नव्हता की आशीर्वाद नव्हता. हा ध्यास होता या भूमीच्या एका महर्षींचा. सौ. मालतीबाई देशपांडे यांनी अगदी मोजक्या शब्दांत 'स्त्री शिक्षणाचे प्रणेते महर्षी कर्वे' या पुस्तकात आपले विचार मांडले आहेत.

प्रत्येक सुशिक्षित माणसाने समाज–ऋण फेडलेच पाहिजे असे विचार त्या काळात मांडले जात होते. आपल्या स्वभावाला आवडेल असे देश कार्याचे क्षेत्र सुदैवाने अण्णांना सापडले ते म्हणजे 'स्त्री शिक्षण.' **समाजाकडून स्त्रियांच्या वाट्याला यायचा फक्त तिरस्कार, उपेक्षा आणि हेटाळणी !** अशा दुर्दैवी बालविधवा, निराधार अबला, स्त्रियांची दुःखे पाहून अण्णांचे मन व्यथित व्हायचे. त्यांना

वाटे नुसता विधवा विवाह स्त्रियांच्या उन्नतीसाठी पुरेसा नाही. स्त्री सुशिक्षित झाल्याखेरीज आपल्या भवितव्याचा निर्णय करण्यास समर्थ झाल्याखेरीज हा प्रश्न सुटणार नाही. ज्या काळात स्त्रियांच्या शिक्षणाबद्दल बोलणे, लिहिणे हे देखील निषिद्ध, धर्माविरुद्ध मानले जाई त्या काळात बालविधवांना शिक्षण देऊन स्वावलंबी बनविणे म्हणजे समाजद्रोहच मानला जाई. पण अण्णांनी हे धाडस करण्याचे ठरविले.

शिक्षणाने मने सुसंस्कृत झाली. आपल्याला स्वावलंबी होता येईल असा विश्वास निर्माण झाला. आश्रमातील राहणी, अभ्यासक्रम लोकांना आवडू लागला. लोकांना स्त्री–शिक्षणाच्या कार्याची उपयुक्तता पटू लागली. समाजाच्या विरोधाची धार बोथट होऊ लागली.

महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठाचे अण्णांचे स्वप्न साकार झाले**. विद्यापीठाचा आगळावेगळा अभ्यासक्रम तयार करण्यात आला**. प्रपंचशास्त्र, आरोग्यशास्त्र, इंद्रियविज्ञान, शिशुमानसशास्त्र, वनस्पतिशास्त्र, गायन, वादन, चित्रकला, या विषयांचा अभ्यासक्रमात अंतर्भाव करण्यात आला. **मातृभाषेतून शिक्षण** हे या विद्यापीठाचे वैशिष्ट्ये होते. '' अर्धशतकापूर्वीचे अण्णांचे हे विचार त्यांचे द्रष्टेपण तर दाखवतातच पण आजच्या काळातही ते मार्गदर्शक ठरतात. ''स्त्रियांमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे हे अत्यंत पवित्र देशकार्य, धर्मकार्य आहे. यासाठी केलेले विचार, आचार हीच परमेश्वराची प्रार्थना आहे. हेच जन्माचे सार्थक अशी आपली वृत्ती बनली पाहीजे.'' असे अण्णांचे मत होते. महर्षी कर्वे म्हणायचे, शिक्षणामुळे स्त्री स्वतंत्र व कर्तव्यदक्ष बनेल. आशा–आकांक्षाचे अमर्याद क्षेत्र स्त्रियांना शिक्षणामुळे मोकळे होईल. शिक्षणामुळे ती अधिक समर्थ बनेल.''ती आता प्रशासक, पोलिस महासंचालक, पायलट, मंत्री, पंतप्रधानही बनू शकते. बुध्दिमान, समर्थ स्त्रीला कर्तबगारीच्या शेकडो वाटा आता खुल्या झाल्या आहेत. ज्ञान, विचार, तंत्रज्ञान, कला, क्रीडा, अभिनय अशा विविध क्षेत्रांत ती आपली गुणवत्ता सिध्द करीत आहे. हे परिवर्तन घडवून आणण्यात महर्षी कर्वे यांचा सिंहाचा वाटा होता.

- **विलास खोले –** 'महर्षी धोंडो केशव कर्वे'

स्त्रियांची उन्नती व्यापक प्रमाणावर साधायची असेल तर पुनर्विवाहापुरते मर्यादित प्रयत्न करण्याऐवजी त्यांना शिक्षण देऊन **स्वावलंबी** करण्याकडे लक्ष पुरवले तर स्त्रियांचा उद्धार

होईल. असा कर्वे यांचा विचार होता. १९०७ च्या दैनिक ज्ञानप्रकाशात संस्थेच्या स्थापनेमागील हेतू कर्वे यांनी स्पष्ट केले. त्यापैकी एक हेतू असा होता की गृहिणीपदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या ज्याच्या योगाने मनावर पूर्णपणे ठसतील व ज्याच्या योगाने समाजविषयक कर्तव्यांविषयी चांगली ओळख होऊ शकेल, असे शिक्षण देऊन आपल्या समाजात काही **सुशिक्षित स्त्रिया तयार करण्याचा प्रयत्न करणे.**

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (एस.एन.डी.टी.) **महिला विद्यापीठ हे** कर्वे यांच्या स्त्रीविषयक कार्याचे चिरस्थायी स्वरुपाचे स्मारक आहे. स्त्रियांकरिता स्वतंत्र विद्यापीठाची स्थापना करताना केवळ मुंबई विद्यापीठाचा अभ्यासक्रम स्वीकारण्यापेक्षा त्यांनी **स्वतंत्र अभ्यासक्रमाची आखणी** केली. (२३७) स्त्रीवर्गाच्या शारीरिक व मानसिक स्थितीला अनुरुप होईल असा अभ्यासक्रम तयार करणे म्हणून त्यांनी काही हेतू स्पष्ट केले .उच्चशिक्षणात **मातृभाषेला बोधभाषा करणे, ग**णित विषय ऐच्छिक ठेवणे. प्रपंचशास्त्र व आरोग्यशास्त्र हा विषय अनिवार्य ठेवून स्त्रियांना सुयोग्य असा अभ्यासक्रम ठरविणे हा उपक्रम गांधीजींनाही मान्य होता. गांधीजींनी ही कर्वे यांना मदत करण्याची इच्छा व्यक्त केली. लेखक पुढे म्हणतात; आश्रमात काही **संस्कारक्षम गोष्टी** पाहायला मिळतात; पाहुण्यांची सरबराई करणं, त्यांना चहा देताना पावलं टाकणे, मान झुकवून आदर व्यक्त करणं, नम्रपणे चहा देऊन आनंदाने त्यांच्या समोरुन जावे हे त्यांच्या रीतिभातीचं दर्शन झाले, त्याबद्दल लोक कौतुकगार काढतात. बाबूताई खरे या आजन्म सेविका सांगतात की आपल्याला जे वाटतं, जे पटतं तेच निश्चयपूर्वक करायचे असा **आत्मविश्वास** मला आला होता. प्रौढ स्त्रियांना शिवण, गायन शिकवले जाई. आजच्या युवतीनं **निर्भय** व्हावं, **आत्मविश्वासानं** तिचा ऊर भरुन यावा, मुक्त पाखरासारखं तिन विहार करावा, हसावं, तिच **जीवन सुंदर** व्हावं, **समृद्ध** व्हावं याचसाठी महर्षी कर्वे यांनी एवढा अट्टाहास केला होता. त्यांच्या या कार्याबद्दल १९५८ साली डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्याकडून महर्षी कर्वे यांना **भारतरत्न** हा पुरस्कार मिळाला. सदयस्थिती समाजात स्त्रियांसंबंधीचे वेगवेगळे प्रश्न उपस्थित होत आहे. त्या प्रश्नांची सोडवणूक करण्याचे मार्ग शोधताना कर्व्यांच्या जीवनपद्धतीचे व कार्यपद्धतीचे स्मरण निःसंशय उपयुक्त ठरु शकेल;

खरोखरच, **अण्णा (महर्षी कर्वे) म्हणजे महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाचे महान शिल्पकार होते.** (२२४)

- **तेरणीकर सुलभा** – 'महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, गाथा शतकाची'

एकोणिसाव्या शतकाचा शेवटचा चरण **स्त्री शिक्षणाच्या विरोधपर्वाचा काळ** होता.पण वैधव्याची दु:ख सहन करीत असलेल्या बालिकांना, त्यांच्या पालकांना आण्णासाहेब कर्वे यांनी वाट दाखविली. महाराष्ट्रातच नव्हे तर सर्व भारतात अण्णांच्या आश्रमाचा लौकिक पसरला होता. आश्रमातली राहणी, अभ्यासक्रम, शिस्त याचा लौकिक दूरवर पसरल्याने विधवा मुलींबरोबर कुमारिका व विवाहितांमध्येही आश्रमात येण्याची ओढ निर्माण झालेली होती. **स्त्री शिक्षणासाठी समाजमन थोडं अनुकूल होत चाललं होत**

''आश्रमातल्या मुली पहाटे पाचलाच उठत आणि वसतिगृहाच्या चौकात प्रार्थनेला जमत. नंतर गटागटानं बादल्या, खराटे घेऊन साफसफाई होई. झाडांना पाणी घालणं, स्वयंपाकघरात भाजी चिरणं इ. सुरु होई. आपापल्या अंघोळी तर मुली अशा झपाट्यानं उरकत की कुणाला पत्तादेखील लागत नसे. रेंगाळणे नाही की वेळ काढणे नाही. सारं **शिस्तीन** बसवलेले होतं. पाणी भरणं, कपडे धुणं ही अशाच चटपटीत पद्धतीने उकरल जाईल. मराठीचे चांगले ज्ञान, इंग्रजी व संस्कृतची तोंडओळख, व्यवहारापुते गणित, जमाखर्च, बाल संगोपन, आरोग्यशास्त्र, आहारशास्त्र, आजाऱ्याची शुश्रूषा, गृहव्यवस्था, पाकशास्त्र एवढ्याचा **अभ्यासक्रमात समावेश** करण्यात आला. शरीरशास्त्र, इंद्रियविज्ञानशास्त्र, वनस्पती शास्त्र, प्राणिशास्त्र हे वैद्यकीय विषय डॉ. कृष्णाबाई पेठे, डॉ. वा. ग. आगाशे हे शिकवण्यास पुढे आले.

स्वयंपाक करायला बायका असल्या तरी भाजी निवडणं, चिरणं, ताक करणं, पीठ मळणं, चटणी वाटणं, रात्रीचे दिवे पुसून तेलवात करुन ठेवणं, आळीपाळीने करावे लागे. ह्या वारुबाई शेवडे यांच्या काही आठवणी. **स्वावलंबनानं** साफसफाई, पाणी भरणं, खरकटी भांडी घासणं, कपडे धुंण ही कामे मुली मोठ्या हौसेने करीत. उलट उत्तर देणं, कामचुकारपणा करणं, मोठ्यांदा ओरडणं, चिडणं, भांडणं हे मुळीच चालवून घेतले जात नसे. महाराष्ट्रातच नव्हे तर सर्व भारतात अण्णांच्या आश्रमाचा लौकिक पसरला होता.

प्रौढ स्त्रियांना शिवण, गायन, इंग्रजी शिकण्याची व्यवस्था महिला सदनमध्ये केलेली होती. गृहपरीक्षा, शिवण, पाकशास्त्र हे विषय शिकविण्यास सुरुवात झाली. आपल्याला जे वाटतं, जे पटतं तेच निश्चयपूर्वक करायचे असा **आत्मविश्वास आलेला** होता. मनातून भय हद्दपार झालेलं होतं. तीस वर्षे वयाच्या विद्यार्थिनींना कवायत, लेझीम, काठी कवायत यांचे **शास्त्रोक्त शिक्षण** देण्यात आले. खेळांच्या स्पर्धा, मैदानी खेळ, गायन, वादन याचा समावेश होता. शिक्षणप्रसारासाठी अण्णांनी युरोप, अमेरिका, आशिया व आफ्रिकेचा दौरा केला. **लोकमान्यता, राजमान्यता** मिळालेली आपली संस्था ह्या भावनेनं सर्वत्र आनंदी आनंद झाला. ज्ञानप्रकाश, केसरी ह्या वृत्तपत्रातून अण्णांचे अग्रलेख, लेख आले. बनारसच्या एका प्राध्यापकानं लिहिलं – ॲरिस्टॉटलनं एके ठिकाणी म्हटलेले आहे की शाब्दिक विवाद, बौद्धिक उपपत्तीच्या आधारावर समाज–घटना तयार होत नाही. समाज चालविण्यास **अशा संस्थाच** उत्पन्न केल्या पाहिजेत.

- **आठलेकर मंगला** – 'महर्षी ते गौरी (स्त्री स्वातंत्र्याची वाटचाल)'

एकोणिसाव्या शतकातील स्त्री ही चार भिंतींच्या आत असे. चूल आणि मूल हेच तिचे विश्व होते. या काळात **स्त्रियांना शिक्षणाची दारे बंदच** होती. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांवर अनेक बंधने, रुढी, परंपरा लादल्या गेल्या होत्या. **पुरुष प्रधान व स्त्री दुय्यम हे सूत्र समाज मनात पक्के रुजले होते** (आठलेकर १९९९).

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. ते जो प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. (डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधन) म्हणजे शिक्षणाने मानवाच्या विचारात व वर्तनात इष्ट परिवर्तन होते हे लक्षात येते. 'स्त्रिला शिक्षण मिळाले की ती बोलू लागेल. ती आर्थिक स्वावलंबी होईल, समाजात एकटी उभी राहू शकेल. याच हेतूने स्त्रियांकरिता शाळांची उभारणी झाली' (आठलेकर १९९९). शिक्षणामुळे स्त्रीमध्ये किती बदल घडून येवू शकतो याबद्दलची खात्रीच लेखिका या वाक्यातून देतात. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करुन सुदाम तुकाराम मांडगे आपल्या निष्कर्षात लिहितात की, स्वालंबनातून खरे शिक्षण घडते व त्यामुळे इतरांना प्रेरणा मिळते. त्याचप्रमाणे म. कर्वे यांच्या

शैक्षणिक कार्यामुळे स्त्रिया स्वावलंबी बनल्या व त्यांनी इतर स्त्रियांसाठी शैक्षणिक कार्यात मदत केली.

अठराव्या शतकात तत्कालीन सामाजिक परिस्थितीमुळे आपण शालेय शिक्षण घ्यावं असं स्त्रियांना स्वतःहून कधी वाटलच नाही. समाजाच्या मनःस्थितीचा, धर्मातील रुढी परंपरांचा तिच्या विचारांवर जबरदस्त पगडा होता. आहे त्या परिस्थितीतच त्या आनंद मानीत असत**. घर–संसार, पतिसेवा, मुले बाळं यातच त्या गुरफटून गेल्या होत्या.** स्त्रीचं दुःख कमी झालं पाहिजे ही जाणीव त्यावेळी काही समाजसुधारकांना झाली. आपल्या मुलींना, बहिणींना दुःख मुक्त करण्यासाठी स्त्रियांचे प्रश्न अखेर पुरुषांनी हाताळले. सतीची चाल बंद, विधवा विवाहास मान्यता, बालविवाहास विरोध, स्त्रियांना वारसा हक्क असे कायदे झाले. परंतु हे **हक्क स्त्रियांना प्रत्यक्षात मिळवायचे असतील तर स्त्रीला शिक्षणावाचून गत्यंतर नाही हे म. कर्वे यांच्या सारख्यांनी जाणले**. **शिक्षण मिळाले की ती बोलू लागेल, तिच्यात आर्थिक स्वालंबन येईल, समाजात ती एकटी उभी राहू शकेल म्हणून स्त्री शिक्षणाची गरज वाटू लागली.**

- **स्त्री शिक्षणाविषयी इतराचे विचार**

वैदिक काळात स्त्रिया शिक्षण घेऊ शकत होत्या. त्यासंदर्भात गार्गी, मैत्रेयी, अरुंधती, सुलभा अशी उदाहरणे देता येतील. त्या काळात समाजात स्त्रियांना आदराचे स्थान होते **(बाबर १९६८**). परंतु आर्य संस्कृती ही पुरुषप्रधान संस्कृती असल्याने या काळात स्त्रियांना कुटुंबात आणि समाजात कमी महत्त्व दिले गेले. पुरुष हाच कुटुंबप्रमुख, त्यालाच सर्व अधिकार, आर्थिक स्वातंत्र्य, निर्णयस्वातंत्र्य हे केवळ पुरुषालाच होते. **स्त्रीला केवळ दासी मानले जात असे.** समाजात आणि कुटुंबात **स्त्रीचे स्थान दुय्यम** दर्जाचे होते. याची अनेक कारणे सांगता येतील. परंतु अज्ञान हे त्यातील एक मुख्य कारण होते. ती अशिक्षित होती. अर्थार्जन करु शकत नव्हती, तिला कोणतेही स्वातंत्र्य व अधिकार नव्हते. इंग्रजसरकारने शिक्षणाबाबत अलिप्ततावादी धोरण सोडून शिक्षण कार्यात सहभाग घेतला. लॉर्ड डलहौसी यांनी सांगितले **स्त्री शिक्षण** हा शिक्षण मंडळाचा विषय आहे, सरकारने त्याला पाठिंबा द्यावा. म्हणून १८५४ मध्ये वुडचा खलिता आला आणि स्त्री शिक्षणाची जबाबदारी इंग्रज सरकारने उघडपणे घेतली. त्यामुळे १८६५ मध्ये मुलींच्या

शाळा २३ तर त्यातील मुलींची संख्या ६३९ एवढी वाढली. १८७१ मध्ये शाळा २१८ इतक्या तर त्यातील मुलींची संख्या ९१९० इतकी वाढली (बाबर १९६८).

स्वातंत्र्यप्राप्तीच्या चळवळीने या कामी चांगलाच हातभार लावला. पुरुषांच्या बरोबरीने राष्ट्रकार्यास वाहून घेणाऱ्या स्त्रिया पुढे आल्या. आणि त्यांनी स्त्रीशिक्षणाचे कार्य हाती घेतले. स्वतःचे शिक्षण पुरे केलेल्या स्त्रियांनी आता इतर स्त्रियांनाही शिक्षण देण्याचे व्रत अंगिकारले आणि स्त्रिशिक्षणाच्या कार्यास एक प्रकारची वेगळी नजर येत गेली (बाबर १९६८).

रमाबाई रानडे, आनंदीबाई कर्वे अशा शिक्षिका नसलेल्या स्त्रियांनी स्त्रिशिक्षणाच्या संस्थामार्फत हजारो स्त्रियांना प्रेरणा व प्रोत्साहन देवून जी अजोड जागृती केली तिचे मोल शब्दांनी सांगता येणार नाही. (कर्नाटकी, १९६८), अशा स्त्रिया समाजासमोर आल्या, हा केवळ शिक्षणामुळे घडून आलेला बदल आहे. एवढेच नव्हे तर वरील उदाहरणातील प्रत्येक स्त्रीने समाजातील इतर **स्त्रियांना साक्षर** करण्याचा प्रयत्न केला आहे.

शिक्षणामुळे व्यक्तिच्या व्यक्तिमत्वात सकारात्मक बदल घडून येतात व त्यामुळे इतरानांही प्रेरणा मिळते. (शं. बा. गागरे २०००, गीता कांबळे २०११)

अण्णा हजारे यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्यामुळे राळेगणसिद्धीसारख्या एका छोट्याश्या खेड्याचा कायापालट होवून **समाज सुदृढ** झाला. (शर्मिला पारधे २००७)

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रमुख साधन असून महान शिक्षण तज्ज्ञांचे विचारही शैक्षणिक व सामाजिक परिवर्तनासाठी उपयुक्त ठरतात. म. फुले व सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी केलेल्या कार्यामुळेच आजची स्त्री साक्षर आहे, विचारी आहे. (चंदन पवार २०१०) **आंबेडकरांनी केलेल्या शैक्षणिक कार्यामुळे व त्यांच्या साहित्यामुळे स्त्री जीवनावर कसा परिणाम झाला यावर प्रकाश टाकला आहे. आंबेडकरांच्या विचारांचाही मानवी मनावर सखोल परिणाम झाला हे त्या दाखवून देतात.** (गीता कांबळे २००७-२००८)

स्वालंबन हे शिक्षणाने येते. शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे. हेच विचार म. कर्वे यांच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करताना संशोधकास लक्षात आले. म. कर्वे यांच्या आत्मवृत्तात

म. कर्वे यांनी आपले हे विचार स्पष्ट केले आहेत. (Gupta R. P. १९८५) **शिक्षणामुळे सकारात्मकता वाढली.** (बागले बा. म. २००६)

'स्त्रीचे समाजातील स्थान व भूमिका' मांडताना लेखिका लिहितात की, **पुरुषांप्रमाणे स्त्रीला शिक्षण मिळाले, संधी मिळाली, वातावरण मिळाले तर तिच्या आकांक्षा फुलू शकतात. ती उत्तम प्राध्यापक, उत्तम डॉक्टर, उत्तम वकील, उत्तम शास्त्रज्ञ व उत्तम कलावंत होऊ शकते आणि राजकारणपटू ही बनू शकते. (**अनसूया लिमये १९७७)

पूर्ण मानव हा शैक्षणिक संस्कारातून घडतो. त्यासाठी **स्त्री शिक्षणाला महत्त्व** द्यावे. स्त्री शिवाय समाजाला अस्तित्व नाही. स्त्रियांच्या शिक्षणासाठी डॉ. आंबेडकरांनी हिंदू-कोडबिल व पीपल्स एज्युकेशन सोसायटीमार्फत **स्त्री शिक्षणाला प्राधान्य** दिले. जीवनाभिमुख शिक्षणासाठी **योग्य अभ्यासक्रमाची** कार्यवाही काटेकोरपणे राबवावी. (बाबासाहेब केरबा कांबळे २०१६**)**

१९ व्या शतकाच्या पूर्वार्धात समाजात स्त्रीशिक्षणाविषयी चुकीच्या कल्पना व अंधश्रद्धा दिसून येतात. **स्त्री शिकल्यास अधर्म घडेल**, ती अल्पवयात विधवा होईल, कुमार्गास लागेल अशी भीती लोकांच्या मनात होती. **समाजजीवनातील स्त्रीची भूमिका म्हणजे आदर्श पत्नी, आदर्शमाता व आदर्श गृहिणी हीच होती.** (बेदरकर स्मरणिका २००७) याशिवाय तिला काही करावसे वाटते, याला फारसे महत्त्व दिले जात नव्हते. असे स्वानुभव महर्षी कर्वे संस्थेच्या माजी विद्यार्थिनींनी शाळेच्या शताब्दी महोत्सवानिमित्त प्रकाशित स्मरणिकेत आपल्या मनोगतात नोंदवले आहेत.'स्त्रियांना उच्च प्रतीच्या शिक्षणाची गरज आहे काय?' (२०१०) या लेखात इंदिरा पंडित लिहितात आपण सदाचार संपन्न व परोपकारी व्हावे व इतरांस सदाचार संपन्न व परोपकारी बनवावे हाच स्त्रिशिक्षणाचा हेतू आहे**. स्त्रियांना धार्मिक, व्यावहारिक, घरातील व्यवस्थेपुरते आणि मुलांच्या संगोपनापुरते शिक्षण अवश्य असले पाहिजे** आणि मातृभाषेतील ग्रंथाद्वारे ज्ञानसंपादन करुन त्या ज्ञानाचा उपयोग इतर भगिनींना करुन देण्याचा प्रयत्न त्यांनी करावा. (इंदिरा पंडित २०१०)

वृषाली मगदूम 'आपल्या एका शिक्षणाच्या अभावापायी' (२०१७) लेखात म्हणतात, शिक्षण हा स्त्रियांचा मूलभूत अधिकार आहे. पण तो कौटुंबिक पातळीवर जेव्हा नाकारला जातो, तेव्हा स्त्रियांची दुरावस्था होते. **१९ व्या शतकात स्त्रियांनी शिकू नये असाच विचार केला**

जात होता. (वृषाली मगदूम २०१७). स्त्रियांस उत्तम शिक्षणक्रम कोणता? हे स्पष्ट करताना सांगतात, आपल्या शिक्षणाचा मुख्य हेतू आपल्याला उत्तम गृहिणी व चांगली माता कोणत्याप्रकारे होता येईल हा होय. १९०१ पर्यंत स्त्रियांच्या शिक्षणाकडे कोणत्या दृष्टीने पाहिले जात होते हेच यातून स्पष्ट होते. (आनंदीबाई प्रभुदेसाई १९०१). एकंदरीत स्त्री शिक्षणाबद्दल १८ व्या शतकात व १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात अत्यंत **अनास्था** दिसून येते. स्त्रियांनी शिकूच नये आणि शिकल्यास केवळ कौटुंबिक जबाबदारी सांभाळण्यापुरते हवे हाच **समाजाचा दृष्टीकोन** होता. भारतात स्त्रीवादाचा उदय १८८२ मधील **ताराबाई शिंदे** यांच्या 'स्त्री–पुरुष तुलना' या निबंधात दिसतो. यात त्यांनी पुरुष प्रधानतेमुळे स्त्रियांचे स्थान कोणते? हे स्पष्ट केले आहे. निसर्गतःच स्त्री–पुरुष लिंगभेद असला तरी स्त्रीत्व/पुरुषत्व ह्या संकल्पना समाजाने निर्माण केल्या आहेत. पूर्वी **अत्यंत दुय्यम स्थान** व बिकट परिस्थितीत स्त्रिया जीवन कंठित होत्या. ताराबाई शिंदे म्हणतात घराची गृहस्वामिनी असूनही घरातल्या दाण्यावरही तिची सत्ता नव्हती. ही स्थिती शिक्षणामुळे बदलू शकली आणि त्याचे सर्व श्रेय महर्षी कर्वे यासारख्या समाजसुधारकांकडे जाते.

'संसार व मुले – बाळे यातच स्त्री जन्माची सार्थकता ही कल्पना तिच्यासाठी अफू ची गोळी बनली' (महाजन २०१७). महर्षी कर्वे यांनी स्थापन केलेल्या महिला विद्यापीठाच्या शतकपूर्तिनिमित्त केलेल्या भाषणात पुण्याच्या पोलीस आयुक्त रश्मी शुक्ला म्हणतात, 'मुलींच्या संगोपनात भेद नको'. याचाच अर्थ सद्य स्थितीतही स्त्री–पुरुषांमध्ये भेदभाव केला जातो (२०१६). 'स्त्रियांच्या निर्णय क्षमतेत वाढ करुन तिला माणूस म्हणून जगण्याचे अधिकार बहाल करणे म्हणजे **स्त्रीसक्षमीकरण** होय' (गंगणे २०१५). **एक उत्कृष्ट समाज निर्माण करण्यासाठी त्या समाजातील स्त्रीचे शिक्षित होणे अत्यंत महत्त्वाचे आहे**. कारण जोपर्यंत अत्याचार सहन करणाऱ्याच्या मनात अत्याचारापासून मुक्त होण्याची जाणीव नसेल तोपर्यत बाहेरून आलेले कुठलेही परिवर्तन स्थायी होवू शकणार नाही. याकरिता स्त्रीशिक्षण अत्यंत आवश्यक आहे. (महाजन २०१७). कारण कुटुंबात, समाजात स्त्री अत्याचारच सहन करीत होती. अन्याय–अत्याचारास प्रतिकार करण्यासाठी स्त्रियांना शिक्षणाची गरज आहे. **चांगल्या शिक्षित माताच चांगली व शिक्षित मुले निपजवू शकतात** (भोग २०१०). म्हणजे नवीन पिढी जर चांगली निर्माण करावयाची असेल तर अगोदर ती पिढी

निर्माण करणारी स्त्री उत्तम असली पाहिजे. स्त्री शिक्षणामुळे काय घडू शकते? यासंदर्भात महाराष्ट्र राज्य शालेय शिक्षण विभागाने **'मी होइन स्वयंसिद्धा'** या हस्तपुस्तिकेत पुढील महत्त्वाच्या गोष्टी नमूद केल्या आहेत.

१) शिकलेल्या स्त्रिया विचार करून निर्णय घेऊ शकतात. त्यांच्यातील समंजसपणा वाढतो.

२) आईने मुलावर चांगले संस्कार केल्याने देशाला चांगले नागरिक मिळू शकतात.

३) स्वतःच्या कुटुंबाचा आर्थिक विकास स्त्री करु शकते.

४) शिक्षणामुळे अंधश्रद्धांचा नायनाट करता येतो. स्त्रिया शिकल्या तर अंधश्रद्धा कमी होतील.

५) स्त्रियांनी शिक्षण घेतल्याने देशाच्या प्रगतीचा वेग वाढतो.

६) पाणी, वीज, पर्यावरण, आरोग्य इ. विषयी माहिती व ज्ञान स्त्रियांना शिक्षणामुळेच मिळते.

७) शिक्षणामुळे स्त्रीच्या अंगी व्यवहार कुशलता, जीवनकौशल्ये निर्माण होतात.

वरील चर्चेतून स्पष्ट होते की, स्त्री शिक्षणामुळे मनुष्याच्या जीवनात निश्चितच सकारात्मक बदल घडून येतात.

स्त्रीशिक्षणासंबंधी थोर विचारवंताचे विचार

- **स्वामी विवेकानंद**

स्त्री–पुरुषांमध्ये एकच शक्ती आहे. स्त्रियांनाही शिक्षण मिळायला हवे. स्त्रिया स्वतःचे प्रश्न सोडवू शकेल असे शिक्षण त्यांना द्यायला हवे. यामध्ये **पुराण, गृहव्यवस्था, कला, कौटुंबिक कर्तव्य, स्वयंपाक, शिशुसंगोपन, घरगुती कामाची पद्धत यासारख्या गोष्टीचे शिक्षण देणे योग्य ठरेल असे विवेकानंदांनी म्हटले आहे**. स्त्री शिक्षणास धार्मिक अधिष्ठान असावे म्हणून पाप–पुण्य, पूजा–अर्चा, ध्यान–धारणा या गोष्टीही शिक्षणात समाविष्ट असाव्यात, तरच पवित्र व

सुशिक्षित मातांच्या कुशीत थोर विभूती जन्म घेतील. शिक्षणामुळे स्त्रिया स्वावलंबी तर होतीलच शिवाय शीलसंपन्न बनतील.

- **महात्मा फुले**

ज्योतीरावांनी समाज क्रांतीचे पहिले शस्त्र म्हणून स्त्री–शिक्षण हाती घेतले. कारण स्त्री–शिक्षण म्हणजे पर्यायाने तिच्या मुलांचे शिक्षण होय असे त्यांना वाटत होते. जर एखाद्या पुरुषाला शिक्षण दिले तर ते एका व्यक्तीचे शिक्षण होते. परंतु **एखाद्या स्त्रीला शिक्षण दिले तर ते सर्व कुटुंबाला मिळते.** हे ओळखून ज्योतीरावांनी स्त्री–स्वातंत्र्यासाठी आणि स्त्री शिक्षणासाठी कार्य केले. स्त्री ही पुरुषांपेक्षा श्रेष्ठ आहे हा विचार त्यांनी शिरोधार्य मानला. आपल्या देशाचे हित साधावयाचे असेल तर ते स्त्रीशिक्षणावाचून साधणार नाही हा विचार ज्योतीरावांच्या मनात बिंबला होता. त्यांच्या या विचाराला मिस फॅरार बाईंमुळे गती मिळाली. स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी परमेश्वराने मला प्रेरणा दिली असे मानून त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणात लक्ष घातले. आणि पुण्यात सन १८४८ साली मुलींची पहिली शाळा काढली.

- **रवींद्रनाथ टागोर**

ज्ञानाच्या क्षेत्रात स्त्री व पुरुष यांना समान संधी असावी असे टागोरांचे विचार होते. म्हणून शिक्षणाच्या क्षेत्रात स्त्री–पुरुष हा भेद नकोच असे ते म्हणतात. स्त्रियांनी शिक्षण घ्यावे ते एक परिपक्व मानव व एक आदर्श स्त्री म्हणून जगण्यासाठी. **पत्नी व माता म्हणून आदर्श जीवन जगण्यासाठी त्यांना शिक्षणाची आवश्यकता आहे**. पत्नी म्हणून पतीविषयीचे कर्तव्य व माता म्हणून मुलांविषयीचे कर्तव्य कसे पार पाडावे यासाठी स्त्रियांना शिक्षणाची गरज आहे असे रवींद्रनाथ टागोरांचे मत होते. स्त्रियांचे वर्तन सभ्य असावे. स्त्री व पुरुष हे एकमेकांशिवाय अपूर्ण आहेत. स्त्री पुरुषाची शक्ती बनली पाहिजे अशी प्रेरकशक्ती बनणाऱ्या स्त्रियांना सम्यक शिक्षणाची नितांत गरज आहे, अशी रवींद्रनाथ टागोरांची विचारसरणी होती.

- **महात्मा गांधी**

स्त्री ही पुरुष जीवनाची जडण–घडण करणारी त्याची माता व नेत्राही आहे. यासाठी **सर्व कुटुंब साक्षर करुन कुटुंबाचा दर्जा वाढविण्यासाठी स्त्रीला ज्ञानाची आवश्यकता आहे.** ही गोष्ट म. गांधींना पटली होती. म्हणून त्यांना वाटत होते की, स्त्रियांची पारतंत्र्यातून मुक्तता व्हायला हवी. स्त्रियांच्या पुनरुज्जीवनाचे शिक्षण हेच सर्वात प्रभावी साधन आहे. शिक्षणातून आदर्श स्त्री निर्माण व्हायला हवी असा त्यांचा हेतू होता. स्त्रीशिक्षणात गांधीजींनी विद्वत्तेपेक्षा संस्कृतीला महत्त्वाचे स्थान दिले. ज्ञानाचा शेवट चारित्र्य संपादनात झाला पाहिजे असे त्यांचे मत होते.

स्त्रियांचा शिक्षणक्रम वेगळा असावा, शाळांमधून सहशिक्षण असावे व कौटुंबिक जीवनात सहकार्य व सहजीवन असावे असे स्त्रीशिक्षणविषयक विचार महात्मा गांधीनीं मांडले. गांधीजींनी समग्र स्त्रीजीवनात क्रांती व स्त्रियांच्या शिक्षणात परिवर्तन घडवून आणले. स्त्री आणि पुरुष यांचा दर्जा समान आहे. ते एकमेकांचे पुरक आहेत. म्हणून पुरुषाला जशी शिक्षणाची गरज आहे त्याहून अधिक गरज स्त्रीला आहे असे ते म्हणतात.

- **राजर्षी शाहू महाराज**

ज्या काळात समाज स्त्रियांना नाकारत होता त्या काळात शाहू महाराजांनी स्त्रिशिक्षणाबद्दलचे विचार मांडले व प्रत्यक्ष स्त्रीशिक्षणाचे कार्यही केले. स्त्री शिक्षणास उत्तेजन देण्यासाठी त्यांनी कु. एच. लिटल या अधिकाऱ्याची नेमणूक केली. **स्त्रियांच्या मानसिक विकासासाठी स्त्रीशिक्षणाची गरज आहे असे महाराजांना वाटत होते.** स्त्रीला स्वतःचे संरक्षण करण्याचे ज्ञान प्राप्त झाले पाहिजे आणि हे साध्य होण्यासाठी शिक्षण हाच एकमेव रामबाण उपाय आहे असे त्यांचे मत होते. समाजातील रुढी – परंपरांमुळे त्यांच्या या कार्यात अनेक अडचणी आल्या. परंतु **शिक्षणाचे संस्कार घडल्याशिवाय स्त्रीच्या व्यक्तिमत्वाला झळाळी मिळणार नाही अशा दृढ निश्चयाने त्यांनी आपले कार्य केले** व शिक्षणातून स्त्रीजीवन सुखी–समृद्ध करण्याचे काम शाहू महाराजांनी केले. जोपर्यंत भारतातील प्रत्येक स्त्री–पुरुषास शिक्षण मिळत नाही तोपर्यंत भारत स्वतंत्र, समृद्ध व बलवान होऊ शकणार नाही असे त्यांचे विचार होते.

- **डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन्**

स्त्री शिक्षणाबाबत राधा कृष्णन् म्हणतात जिच्या हाती पाळण्याची दोरी आहे व जिच्यामुळे घराला व पर्यायाने समाजाला स्थैर्य लाभते त्या स्त्रीच्या शिक्षणाविषयी नियोजन केलेच पाहिजे. कोणत्याही समाजाची सांस्कृतिक व आध्यात्मिक पातळी त्या समाजातील स्त्रियांचे स्थान काय आहे यावरुन समजते. यासाठी बौद्धिक आणि आत्मिक विकासाची संधी जितकी पुरुषवर्गाला आहे तितकीच स्त्री वर्गालाही मिळाली पाहिजे. शिक्षणाची संधी लिंगभेदातीत असली पाहिजे. तेव्हा स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाची व्यवस्था असणे डॉ. राधाकृष्णन् यांना आवश्यक वाटते. **स्त्री सुलभ अशा सर्व गुणांची जोपासना करण्यासाठी स्त्री शिक्षणाची परम आवश्यकता आहे असे ते सांगतात.**

- **डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

मुलांच्या शिक्षणाबरोबरच मुलींच्या शिक्षणाचा डॉ. आंबेडकरांनी आग्रह धरला. भारतीय समाज व्यवस्थेत स्त्रीचे महत्त्वपूर्ण स्थान त्यांनी ओळखले होते. म्हणून त्यांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. आपल्या भाषणात ते स्त्रियांना उद्देशून म्हणतात, **'' मुलींना शिक्षण द्या. ज्ञान, विद्या या गोष्टी स्त्रियांनाही आवश्यक आहेत. मुली शिकल्या तरच भारताची भावी पिढी चांगली निर्माण होईल.''** त्यासाठी त्यांनी ठिकठिकाणी महिला परिषदा घेतल्या स्त्रियांना मोफत व सक्तीचे शिक्षण मिळण्याबरोबरच त्यांच्यासाठी स्वतंत्र वसतिगृह असावीत असा विचार मांडला. दलित स्त्रियांनाही शिक्षणाची आवश्यकता आहे. हे त्यांनी समाजाला पटवून दिले. शिक्षणातून शीलसंवर्धन व्हावे यावर त्यांचा कटाक्ष होता. 'शिक्षण हा राष्ट्रीय उन्नतीचा महामार्ग आहे' हा मूलमंत्र त्यांनी जपला. व्यक्तीला जाणीव देते ते खरे शिक्षण असे त्यांचे विचार होते.

- **कात्रणे व लेख**

संशोधन करताना संशोधकाने सकाळ, महाराष्ट्र टाईम्स, लोकमत, सामना या वृत्तपत्रातील बातम्या व मासिकामधून आलेले लेख या कात्रणांचाही उपयोग केला आहे.



महर्षी धोंडो केशव कर्वे

(१८ एप्रिल १८५८ ते ०९ नोव्हेंबर १९६२)

रत्नागिरी जिल्ह्याच्या खेड तालुक्यातील शेरावली या गावी दि. १८ एप्रिल १८५८ रोजी धोंडो केशव कर्वे उर्फ अण्णासाहेब उर्फ महर्षी कर्वे यांचा जन्म झाला. १८८१ साली मॅट्रिकची परीक्षा पास होऊन पुढील शिक्षणासाठी ते मुंबईस आले. गणित या विषयात त्यांनी पदवी प्राप्त केली. मुंबईच्या एलफिन्स्टन कॉलेजात त्यांचे हे पदवीपर्यंतचे शिक्षण झाले.

१८९१ साली अण्णासाहेबांनी फर्ग्युसन कॉलेजात गणित या विषयाच्या अध्यापनास सुरुवात केली आणि पुढे १९१४ पर्यंत ते गणित या विषयाचे अध्यापन करीत होते. १८९१ मध्ये अण्णासाहेबांच्या पत्नीचे, राधाबाईचे निधन झाले. त्यावेळच्या सामाजिक रीतीप्रमाणे न वागता अण्णांनी पंडिता रमाबाईंच्या शारदा सदन संस्थेत शिकणाऱ्या गोदूबाई या विधवा मुलीशी पुनर्विवाह केला. तत्कालीन समाजाला ही गोष्ट मानवणारी नव्हती. पुढे मुरुढता गेल्यावर अण्णांवर सामाजिक बहिष्कार टाकण्याचा ठराव संमत झाला.

अण्णांचा पुनर्विवाह ही घटना घातक अशा सामाजिक प्रथांना केलेला विरोध, अशी ठरली. यानंतर अण्णांनी विधवा विवाह प्रतिबंध निवारक मंडळाची स्थापना केली. प्रतिगामी प्रवृत्तींना आवर घालणे हे या मंडळाचे काम होते. १८९९ मध्ये अण्णांनी अनाथ बालिकाश्रम काढला. विधवा विवाहोत्तेजक मंडळाची स्थापना केली. रावबहादूर गणेश गोविंद रोखले यांनी अण्णांचे हे उदात्त कार्य पाहून हिंगणे येथील आपली सहा एकराची जागा आणि रोख रक्कम संस्थेच्या उभारणीसाठी अण्णासाहेब यांचेकडे सुपूर्द केली. या उजाड माळरानावर अण्णांनी एक झोपडी बांधली. हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेची ही झोपडी होती ठरली.

१९०० साली अनाथ बालिकाश्रमाचे स्थलांतर हिंगणे येथे करण्यात आले. याच परिसरात विधवांचे वसतिगृह निर्माण करण्यात आले. पंडिता रमाबाई , ईश्वरचंद्र विद्यासागर

ओळख भारतरत्नांची!

अरुण वि. देशपांडे, पुणे, ९८५०१७७३४२

यांचे जीवनकार्य आणि थोर विचारवंत हर्बर्ट स्पेन्सर यांचा प्रभाव अण्णासाहेबांच्या मनावर होता. १९०७ साली त्यांनी महिला विश्वविद्यालयाची स्थापना केली. आश्रम आणि शाळा या दोन्हीसाठी कार्यकर्ते तयार व्हावेत या उद्देशाने निष्काम कर्म महाविद्यालयाची स्थापना १९१० साली केली गेली.

अण्णासाहेबांनी सुरु केलेले हे कार्य आणि संस्था यांचे कार्य व्यापक होत गेले. या सर्वांचे एकत्रीकरण करून हिंगणे स्त्री शिक्षण संस्था आणि त्यानंतर महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था या नावाने या संस्था कार्यरत आहेत. अनेकदा परदेश दौरे केलेल्या अण्णांनी जपानच्या महिला विद्यापीठास भेट दिली. या भेटीने ते प्रभावित झाले. या प्रेरणेतून पुण्यात भारतातील पहिल्या महिला विद्यापीठाची स्थापना झाली . पुढे विठ्ठलदास ठाकरसी यांनी १५ लाखांचे अनुदान दिल्यामुळे या विद्यापीठाचे श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, एसएन डी टी असे नामकरण करण्यात आले.

विधवा महिलांचे प्रश्न यांच्याशिवाय अण्णासाहेबांनी जातीव्यवस्था आणि अस्पृश्यता यांच्या विरोधातही कार्य केले. अण्णासाहेबांनी मराठी आत्मवृत्त - (१९२८), आणि Looking Back - इंडजी (१९३६) असा दोन भागात आत्मचरित्र लेखन केले.

अनेक विद्यापीठांनी अण्णांना डी. लिट. ही पदवी देऊन त्यांचा बहुमान केला. १९५५ साली अण्णासाहेबांना पद्मविभूषण हा किताब मिळाला आणि त्यांच्या कार्याची नोंद घेऊनपुढे भारत सरकारने १९५८ साली तत्कालीन राष्ट्रपतींच्या हस्ते अण्णासाहेब कर्वे यांना भारतरत्न हा सर्वोच्च मानाचा सन्मान प्रदान करण्यात आला.

एकशे चार वर्षे वय असलेल्या अण्णासाहेब उर्फ धोंडो केशव कर्वे या शतायुषी भारतरत्नाचे ९ नोव्हेंबर १९६२ रोजी, पुणे येथे निधन झाले.



- अंजली कुलकर्णी

महर्षी धोंडो केशव कर्वे आणि बाया कर्वे



या महिन्यात (नोव्हेंबर) महर्षी धोंडो केशव कर्वे यांची बावन्नावी पुण्यतिथी आहे. सामाजिक क्रांतीचे शिलेदार असणाऱ्या महर्षी कर्वे यांनी स्त्री शिक्षणासाठी आयुष्य वेचले. विधवा विवाहाचा पुरस्कार करताना, स्वत: विधवेशी लग्न करण्याचे धाडस दाखवून, आचार आणि विचारातील अद्वैताचे उदाहरण समाजापुढे घालून दिले. स्त्री उद्धाराच्या त्यांच्या प्रदीर्घ कामगिरीसाठी भारत सरकारने त्यांना १९५८ मध्ये, त्यांच्या वयाच्या १०० व्या वर्षी 'भारतरत्न' या सर्वोच्च किताबाने गौरविले. मुंबईच्या क्रीन्स रोडचे नामकरण करून त्याला 'महर्षी कर्वे रस्ता' नाव देऊन मुंबई प्रांताने त्यांच्या प्रती आदराची भावना व्यक्त केली.

कर्वे यांचा जन्म १८ एप्रिल १८५८ मध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील शिरवली येथे झाला. त्यांचे वडील बापूसाहेब कर्वे रत्नागिरीतील कोरेगाव येथे वर्गे यांच्याकडे इस्टेट मॅनेजर म्हणून अल्पंत कमी पगारावर काम करत होते. त्यामुळे कर्वे कुटुंबाची आर्थिक स्थिती बेताचीच असे. त्यांचं प्राथमिक शिक्षण मुरूड इथे शेणवी शाळेत आणि सरकारी शाळेत झालं. मुंबईला एलफिन्स्टन कॉलेजमधून त्यानी गणित विषयात पदवी संपादन केली.

वयाच्या १४ व्या वर्षी त्यांचा विवाह, त्यांच्या माता-पित्यांनी राधाबाई नावाच्या एका आठ वर्षांच्या बालिकेशी करून दिला. त्यावेळच्या प्रथेप्रमाणे हा विवाह कालसुसंगतच होता, परंतु वयाच्या अवघ्या २७ व्या वर्षी, राधाबाईचा बाळंतपणातच मृत्यू झाला. त्याच वर्षी कर्वे फर्गसन कॉलेजमध्ये गणिताचे प्रोफेसर म्हणून रूजू झाले.

दरम्यान, महात्मा फुले आणि सावित्रीबाई यांच्या प्रभावानं कर्वे यांनी स्त्री शिक्षणाचे काम हाती घेतलं. पं. रमाबाईंच्या स्त्री शिक्षणविषयक कार्याने विष्णुशास्त्री चिपळूणकर, ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या स्त्री उद्धाराच्या कामाने त्यांना स्त्री शिक्षण, स्त्रियांना समाजात चांगल्या दर्जाचे स्थान मिळावे यासाठी काम करण्याचे बळ मिळाले. हर्बर्ट स्पेन्सरसारख्या विचारवंतांच्या लेखनाने प्रभावित केले.

कर्वे यांनी स्त्रियांसाठी विशेषत: विधवा स्त्रियांसाठी आश्रम काढायचे ठरविले; परंतु पुण्यातील सनातनी ब्राह्मणांनी त्यांना इतका त्रास दिला की अखेर त्यांनी पुण्यापासून लांब अंतरावर हिंगणे इथे, खेडेगावात आपले काम सुरू केले. त्यावेळी त्यांच्याकडे अत्यंत तुटपुंजे पैसे असत आणि कित्येक वर्ष त्यांना हिंगण्यापासून पुणे शहरात, फर्गसन कॉलेजपर्यंत अनेक मैल चालत जाऊन शिकवावे लागत असे. कॉलेजच्या नंतरच्या वेळात ते आपल्या हिंगणे इथल्या कामासाठी सुधारकी विचाराच्या देणगीदारांकडे देणग्या मिळवण्यासाठी फिरत असत. बालपणीच विधवा होऊन अत्यंत हलाखीचे, कष्टप्रद आणि अपमानित जिणे जगणाऱ्या स्त्रियांविषयी कर्वे यांना अपार सहानुभूती होती. त्यासाठी त्यांनी विधवा विवाहाचा पुरस्कार केला. समाजातील तरुणांना विधवांशी लग्न करण्यासाठी तयार केले. परंतु कर्वे हे केवळ बोलूनच थांबले नाहीत, त्यांच्या प्रथम पत्नीच्या मृत्यूनंतर, एखाद्या



बालिकेशी दुसरा विवाह करणे त्यावेळच्या प्रथेनुसार त्यांना शक्य असूनही त्यांनी जाणूनबुजून २३ वर्षीय आनंदीबाई या विधवेशी विवाह केला. त्यांना 'बाया कर्वे' म्हणून ओळखलं जातं. त्या प्रथम लग्नानंतर तीन महिन्यांच्या आत वयाच्या आठव्या वर्षी, जेव्हा लग्न या शब्दाचा अर्थही कळला नव्हता, अशा वयात विधवा झाल्या होत्या.

परंतु त्या पंडिता रमाबाई यांच्या शारदा सदनामध्ये शिकत होत्या. तिथल्या त्या पहिल्या विधवा विद्यार्थिनी होत्या. त्या अत्यंत बुद्धिमान, समंजस आणि धाडसी होत्या. कर्वे यांच्याशी विवाह करतानाही त्यांनी मोठे धाडस दाखविले होते. या विवाहाला झालेल्या सनातन्यांच्या विरोधात सामोरे गेल्या. हा विवाह त्यांच्या वडिलांनी ठरविला होता, ही देखील महत्त्वाची घटना होती. कर्वे यांच्याशी विवाह झाल्यानंतर त्यांनी कर्वे यांचे स्त्री शिक्षण, विधवा पुनर्विवाह, विधवा केशवपनाला विरोध या संदर्भातले विचार आत्मसात केले. त्यांच्याबरोबरीने विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. कर्वे यांना बाया कर्वे यांची मोलाची साथ मिळाली. कर्वे यांनी महिलांसाठी शाळा सुरू केली तेव्हा त्यांची वीस वर्षांची विधवा बहीण पार्वतीबाई आठवले ही त्यांची शाळेत प्रवेश घेणारी पहिली विद्यार्थिनी होती. शिक्षण पूर्ण झाल्यावर पार्वतीबाई हिंदू महिलाश्रमाच्या सुपरिटेंडेंट म्हणून कर्व्यांना मदत करू लागल्या.

जपानमधील टोकियो इथल्या जपान महिला विद्यापीठाच्या धर्तीवर १९१६ साली, त्यांनी भारतातील पहिले महिला विद्यापीठ पुण्यात स्थापन केले. पुढच्याच वर्षी प्राथमिक शिक्षकांसाठी ट्रेनिंग स्कूल तसेच मुलींसाठी कन्याशाळा ही दुसरी शाळा सुरू केली. प्रसिद्ध उद्योगपती विठ्ठलदास ठाकरसी यांनी १९२० मध्ये कर्वे यांच्या महिला विद्यापीठाला दीड अब्ज रुपयांची देणगी दिली. तेव्हापासून विद्यापीठाचे नाव श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (एसएनडीटी) भारतीय महिला विद्यापीठ असे पडले. मार्च १९२९ मध्ये कर्वे इंग्लंडला गेले. प्राथमिक शिक्षकांच्या कॉन्फरन्समध्ये उपस्थित राहून त्यांनी 'भारतातील स्त्री शिक्षण' याविषयावर भाषण केले. त्याचबरोबर ते लंडनमधील ईस्ट इंडिया असोसिएशनच्या बैठकीत, जिनिव्हा येथील शैक्षणिक परिषदेत, तसेच शिक्षण तज्ज्ञांच्या आंतरराष्ट्रीय मिटिंगमध्येही उपस्थित राहिले आणि त्यांनी भारतातील स्त्री शिक्षणाविषयीची, भारतात स्त्रियांच्या उच्चशिक्षणाच्या सुरू असलेल्या प्रयोगांविषयीची दिली. त्याचबरोबर अमेरिकेत जाऊन वेगवेगळ्या व्यासपीठांवरून स्त्री शिक्षण आणि भारतातील सुधारकी कार्य यावर भाषणे दिली. त्यांनी टोकियोमधील महिला विद्यापीठालाही भेट दिली आणि एप्रिल १९३० मध्ये ते भारतात परतले.

डिसेंबर १९३० मध्ये त्यांनी आफ्रिकेला भेट देऊन मोंबासा, केनिया, युगांडा, टांझानिका, झांजीबार इ. ठिकाणी भारतातील स्त्री शिक्षणाची माहिती दिली.

कर्वे यांनी १९३६ मध्ये एसएनडीटी युनिव्हर्सिटी मुख्यालय मुंबईत हालविले. त्याआधी १९३१ मध्ये तिथे महिलांचे पहिले महाविद्यालय सुरू केले. त्याचवर्षी (१९३६) त्यांनी महाराष्ट्र ग्रामीण प्राथमिक शिक्षण रोसायटी स्थापन केली. याद्वारे त्यांना ग्रामीण भागातील मुलांपर्यंत शिक्षण पोहोचवायचे होते. ग्रामीण भागातील तरुणांमध्ये त्यांनी वाचनाची आवड आणि सवय रूजवण्यासाठी विशेष प्रयत्न केले. त्यांनी १९४४ मध्ये समता संघाची स्थापना केली. एसएनडीटी विद्यापीठाला भारत सरकारने १९४९ मध्ये मान्यता बहाल केली. भारतीय समाजाला कलंक असलेली जातीव्यवस्था आणि अस्पृश्यता यांचा नाश करण्यासाठीही त्यांनी जिवाचे रान केले.

कर्वे यांना चार मुले होती. रघुनाथ, शंकर, दिनकर आणि भास्कर. या त्यांच्या चारही पुत्रांनी आपापल्या क्षेत्रात आपल्या कामाचा ठसा उमटवला. त्यापैकी रघुनाथराव ऊर्फ र. धों. कर्वे हे फर्गसनमध्ये गणिताचे प्रोफेसर होते. त्यांनी लैंगिक शिक्षण, लैंगिक स्वातंत्र्याचा हक्क आणि कुटुंब नियोजन यांसारख्या त्याकाळात अत्यंत स्फोटक विषयांमध्ये मूलभूत स्वरूपाचे काम केले. या कामात त्यांना सनातनी समाजाचा अतोनात त्रास तर सहन करावा लागलाच, परंतु या कामात सुधारकी विचाराच्या लोकांनीही त्यांना मदत न केल्याने ते एकाकी पडले. त्यांनी समाज स्वास्थ्य नावाचे नियतकालिकही सुरू केले होते. दुसरे दिनकरराव कर्वे हे फर्गसन कॉलेजचे केमिस्ट्रीचे प्रोफेसर आणि मोठे शिक्षण तज्ज्ञ होते. त्यांची पत्नी इरावती कर्वे मानववंश शास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ आणि लेखिका म्हणून भारतात मान्यता पावल्या होत्या. भास्करराव कर्वे आणि त्यांची पत्नी कावेरी यांनी हिंगण्याच्या स्त्री शिक्षण संस्थेमध्ये विविध पदांवर कामे केली. शंकरराव कर्वे हे आफ्रिकेत मोंबासा इथे मोठे डॉक्टर होते. केनियन सरकारने त्यांच्या नावाचे पोस्टाचे तिकीट प्रकाशित करून त्यांना गौरविले होते. सुधारणावादी महाराष्ट्राच्या समृद्ध जडणघडणीमध्ये कर्वे कुटुंबाने आपले मोलाचे योगदान दिले. धोंडो केशव कर्वे हे या कार्याचा पाया होते.

महर्षी कर्वे यांच्या सन्मानार्थ भारत सरकारने १९५८ साली पोस्टाचे तिकीट प्रकाशित केले. इतिहासात प्रथमच एका व्यक्तीच्या नावाचे त्यांच्या हयातीत तिकीट प्रकाशित झाले होते.

कर्व्यांनी १९२८ मध्ये मराठीत 'आत्मवृत्त' नावाने इंग्रजीत आत्मकहाणी लिहिली. ती इतरांना स्फूर्तिदायी ठरावी अशी त्यांची त्यामागची प्रेरणा होती. कर्वे यांना पुष्कळ मानसन्मान प्राप्त झाले. बनारस हिंदू विद्यापीठ (१९४२), पुणे विद्यापीठ (१९५१), एसएनडीटी विद्यापीठ (१९५४) यांनी कर्वे यांना डी. लिट् बहाल केली. मुंबई विद्यापीठाने एलएलडी ही बहुमानाची पदवी बहाल केली. भारत सरकारने १९५५ साली 'पद्मविभूषण' किताब दिला.

वृद्धापस्थेमुळे ९ नोव्हें. १९६२ रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. परंतु विधवा विवाहाचा विचार समाजात रूजवणारे, स्वत:च्या आचरणाने समाजासमोर उदाहरण घालून देणारे महर्षी कर्वे यांचे भारतीय, विशेषत: महाराष्ट्रीय स्त्रियांवरचे ऋण न फिटणारे आहे. स्त्रियांनी शिकावे, आपल्या पायावर उभे राहावे, बालवयात विधवा होणाऱ्या स्त्रियांनी आपले सारे आयुष्य दैवगतीच्या आणि पूर्वजन्मीच्या घोर पातक कल्पनेच्या अंधारात बाया घालवू नये यासाठी ते आयुष्यभर झटले.

त्यांना बाया कर्वे यांची फार मोलाची साथ मिळाली हेदेखील महत्त्वाचे आहे. मुंबईला भावाच्या घरी राहायला आल्यानंतर बाया कर्वे यांच्या भावाने त्यांना शारदा सदनात शिकायला पाठविले. तेव्हा त्या धाडसाने आणि आनंदाने शाळेत जात होत्या. त्याकाळात, वैधव्य म्हणजे पूर्वजन्मी केलेल्या घोर पातकाचं फळ असं मानून, बालवयामध्ये विधवा झालेल्या छोट्या छोट्या मुली समाजापासून तोंड लपवून जगत. अशा काळात एका विधवेने भरदिवसा रस्त्यातून बूट घालून, हातात छत्री घेऊन शाळेत जाणं, ही सोपी गोष्ट नव्हती. तसं करणाऱ्या स्त्रीला समाजात मोठी मानहानी आणि उपेक्षा सहन करावी लागे. परंतु धिराने गोदुताई समाजाच्या धिक्काराविरुद्ध उभ्या राहिल्या. हे मानसिक बळ त्यांनी कुठून मिळवलं असेल?

त्याचप्रमाणे त्यांच्या विवाहाच्या वेळीदेखील समाजाच्या खूप उलटसुलट प्रतिक्रिया उमटल्या. वर्तमानपत्रांतून या विवाहावर सनातन विचाराच्या लोकांनी टीकेचा पाऊस पाडला. परंतु 'सुधारक'सारख्या वर्तमानपत्रांनी, समाजातल्या काही मोजक्या व्यक्तींनी या विवाहाची पाठराखण केली, उभयतांच्या निर्णयाची प्रशंसा केली, त्या बळावर बाया आणि महर्षी कर्वे ताठपणे उभे राहू शकले आणि पुढील आयुष्य स्त्रियांच्या उद्धारासाठी वेचू शकले. समाजातील अनिष्ट रूढी परंपरांची चौकट मोडून समाजाला नवा मार्ग दाखवणारं हे कर्वे दांपत्य आजच्या स्त्री-पुरुष समाजाला आदर्णीय न वाटतं तरच नवल!

लोकमत

शिक्षणाअभावी महिलांना कायम कष्टातच दिवस काढावे लागतात, हे ओळखून महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी हिंगणे येथे महिलांसाठी म्हणून एक शिक्षण संस्था सुरू केली. त्या रोपट्याचा आज महावृक्ष झाला आहे. त्याची ही ओळख.



हिंगणे महिलाश्रम

कर्वे रोडने वारज्याकडे जाताना टेकडीवर उजव्या हाताला वनदेवीचे मंदिर लागते. तसेच, पुढे गेल्यावर कर्वेनगरचा मोठा चौक लागतो. या चौकातच डाव्या हाताला थोडे आत गेल्यावर हिंगणे स्त्रीशिक्षण संस्था आहे. शतायुषी, भारतरत्न, महर्षी धोंडो केशव तथा अण्णासाहेब कर्वे यांनी १२५ वर्षांपूर्वी स्त्री शिक्षणासाठी स्थापन केलेली ही संस्था आज हजारो मुलींना स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे शिक्षण देत मोठ्या दिमाखात कार्यरत आहे.

धोंडो केशव ऊर्फ अण्णासाहेब कर्वे यांचा जन्म १८ एप्रिल १८५८ रोजी कोकणातील मुरुडजवळील शेरवली या त्यांच्या आजोळच्या गावी झाला. मुरुड येथील शाळेतून मराठी सहावी झाल्यावर ते मुंबईला गेले व एल्फिन्स्टन कॉलेजमधून १८८४ मध्ये बी. ए. झाले. त्याचे बिऱ्हाड मुंबईत असतानाच त्यांची प्रथम पत्नी राधाबाई हिचा १८९७ मध्ये अंत झाला. त्याच वेळी फर्ग्युसन कॉलेजमध्ये गणिताच्या प्राध्यापकाची नोकरी मिळाल्याने ते पुण्यास आले व डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे लाईफ मेंबर झाले. त्यामुळे पुढील आयुष्यात पुणे हीच त्यांची कर्मभूमी ठरली. १९१४ मध्ये सोसायटीच्या लाईफ मेंबरच्या सेवेतून ते मुक्त झाले.

पहिली पत्नी वारल्यानंतर अण्णांनी पंडिता रमाबाई यांच्या शारदा सदनमध्ये शिकत असलेल्या आनंदीबाई नावाच्या विधवेशी ११ मार्च १८९३ रोजी पुनर्विवाह केला. याच त्या बायाबाई कर्वे. हिंदू स्त्रियांवर वैधव्यात येणारा केशवपनाचा दुःखद प्रसंग व समाजात होणारी त्यांची अवहेलना पाहून अण्णांनी विधवांच्या शिक्षणासाठी १ जानेवारी १८९९ रोजी अनाथ बालिकाश्रम सुरू केला. प्रथम हा आश्रम पेरुगेटजवळील गोरे वाड्यात सुरू करण्यात येऊन नंतर तो हिंगणे येथे नेण्यात आला.

विधवांच्या शिक्षणासाठी महिलाश्रम सुरू केल्यावर अण्णांनी कुमारिकांच्या शिक्षणासाठी ६ मार्च १९०७ रोजी महिला विद्यालय सुरू केले. प्रथम हे विद्यालय लकडी पुलाजवळील लक्ष्मी रस्ता व केळकर रस्ता यांना छेदणाऱ्या गल्लीच्या तोंडाशी सुरू करण्यात आले व नंतर हिंगणे येथे १६५० रुपयांत ५ एकर जागा खरेदी करून तेथे ते नेण्यात आले. या महिला विद्यालयातून महिला विद्यापीठ निर्माण करण्याची कल्पना १९०७ पासूनच अण्णांच्या मनात घोळत होती. सुदैवाने १९१५ च्या सुमारास सर विठ्ठलदास दामोदरदास ठाकरसी या उद्योजकाच्या मनात स्त्री शिक्षणाची तीव्र अस्था निर्माण होऊन त्यांनी अण्णांच्या संस्थेला १५ लाख रुपयांची देणगी दिली. या देणगीतून ३ जून १९१६ रोजी हिंगणे येथे महिला विद्यापीठ सुरू करण्यात आले. लवकरच, कर्वे रोडवरील सध्याची २४ एकर जागा १४०० रुपये प्रतिएकर या भावाने खरेदी करण्यात आली. इमारतींचे प्लॅन व बांधकाम सर विठ्ठलदास यांच्या देखरेखीखाली करण्यात आले. या महिला विद्यापीठास 'श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ' असे नाव देण्यात आले. हेच ते कर्वे रोडवरील SNDT. देणगीच्या अटीनुसार, महिला विद्यापीठाने पुण्यात SNDT कन्या शाळाही सुरू केली.

१ जानेवारी १८९९ रोजी सुरू झालेला अनाथ बालिकाश्रम, १९०७ मध्ये सुरू झालेले महिला विद्यालय व १९२० मध्ये स्थापन झालेले SNDT महिला विद्यापीठ या संस्थांचे रूपांतर आज प्रचंड वटवृक्षात झाले आहे. या संस्थांचे संगोपन करण्यात काशीबाई देवधर, वेणूताई नामजोशी, पार्वतीबाई गाडगीळ, सीताबाई जोशी, सीताबाई अण्णीगेरी, यमुनाबाई साने, बाळूताई खरे आदी सुविद्य, कर्तव्यदक्ष व निस्वार्थी स्त्रियांचे योगदान फार मोठे आहे.

१९२९ मध्ये अण्णांनी युरोप, अमेरिका, आशिया व आफ्रिका खंडांचा प्रवास केला. बर्लिन येथे त्यांची प्रसिद्ध अणुसंशोधक अल्बर्ट आइनस्टाईन यांच्याशीही भेट झाली. महिलाश्रमाला रुपया, दोन रुपयांची देणगी मिळविण्यासाठी चार-सहा मैलांची पायपीट करणारे अण्णा, १८९३ मध्ये स्वतः विधवेशी विवाह करून विधवांच्या उन्नतीसाठी आपला १०४ वर्षांचा देह झिजविणारे अण्णा, जगप्रवासात आइनस्टाईनशी बातचीत करणारे अण्णा, महिला विद्यापीठाची स्थापना करणारे अण्णा - अशी अण्णांची अनेक रूपे पाहिली म्हणजे मन थक्क होते. केवढी ही अपार जीवननिष्ठा! केवढी ही अंगीकृत कार्याशी बांधिलकी! अण्णांच्या या कष्टांची दखल साऱ्या देशाने घेतली. बनारस, मुंबई, पुणे, SNDT या विद्यापीठांनी डी. लिट. पदव्या देऊन अण्णांचा गौरव केला. भारत सरकारने 'भारतरत्न' पुरस्काराने त्यांना गौरविले. स्वकर्तृत्वाच्या बळावर आपोआप घर चालत आलेले हे सारे सन्मान हिंगणे येथे ठेवून ९ नोव्हेंबर १९६२ रोजी अण्णा अतिदूरच्या प्रवासास निघून गेले. हिंगण्याकडे जाणाऱ्या कर्वे रस्त्यावर अण्णांचा पुतळा उभारून पुणे मनपाने तरुण पिढीला अण्णांची आठवण करून देण्याचे काम केले, ही आपल्या सगळ्यांची बाब!!

(लेखक ज्येष्ठ इतिहास संशोधक आहेत.)

कालचे-आजचे



डॉ. एच. वाय. कुलकर्णी

लोकसत्ता
विचार



शिक्षणातून समन्वयाकडे...

महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी 'भारतीय समाजशास्त्र परिषदे'च्या- 'इंडियन सोशल सायन्स काँग्रेस'च्या अध्यक्षीय भाषणातून ३० डिसेंबर १९१५ रोजी मांडलेला विचार स्त्रीशिक्षणाला गती आणि दिशाही देणारा ठरला होता... त्या भाषणाचा हा संपादित अंश! 'भारतरत्न' होण्याच्या ४३ वर्षे आधी महर्षींनी स्त्री-विद्यापीठाची कल्पना मांडली... पुढल्याच वर्षी (१९१६) 'भारतवर्षीय महिला विद्यापीठ' सुरू झाले आणि १९३१ साली त्याचे रूपांतर आजच्या 'श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठा'त झाले, ही संस्था उभारणाऱ्या कर्वे यांच्या स्पष्ट, व्यवहार्य विचारांचा हा पट...

काही सामाजिक प्रश्न सतत आपली दारं ठोठावत उत्तरं मागत आहेत. हिंदुस्थानातील समाजाची आजघटकेची गरज आहे शिक्षण. तुम्ही या बाबतीत माझ्याशी सहमत आहात की नाही कोणास ठाऊक! पण माझ्या मते, शिक्षण हा सर्व प्रश्नांत अग्रभागी असावा असा प्रश्न आहे. या प्रश्नाला राजकीय बाजू आहेच! पण सामाजिक दृष्टिकोनातून पाहिलं तरीही शिक्षणाची उणीव ही सगळ्यांकडे पसरलेली एक कीड आहे आणि ती हिंदुस्थानातील सत्य गिळून टाकते आहे. समाजात अन्याय आहे, चुकांच्या गोष्टी रूढ आहेत, कारण ज्ञान अज्ञानात खोल बुडाला आहे. अंधारात कुकर्म जन्म घेतं आणि अज्ञानापेक्षा गहन अंधार दुसरा कोणताही नाही. त्यामुळे बाहेरच्या माणसाला हिंदुस्थानच्या सामाजिक जगतात विसगती आणि फाटाफूट दिसले. यात काही आश्चर्य नाही. ही अनवस्था कशी दूर करायची? ज्ञानाच्या कारंज्यातून उडणारे तुषार पिण्याची संधीच नव्वद टक्के लोकांना मिळत नाही. त्यांचं जगणं, किरण त्याविनाच चालू असतं. त्यांचं आतलं जळू कधीही उघडतच नाही. इथं 'बळी तो कान पिळी' या न्यायाने दुर्बलांना चिरडून टाकलं जातं. म्हणून आपल्याला कोणत्या गोष्टीकडे लक्ष द्यायचं असेल तर सर्वत्र शिक्षण!

समाजरचनेत सुधारणा घडवून आणण्यासाठी या भूमीतल्या प्रत्येक स्त्री-पुरुष-मुलाला लिहिता-वाचता आलं पाहिजे. निर्गसंक्षमताही आली पाहिजे. राजकीय व्यासपीठावरून प्राथमिक शिक्षणाचा जोरदार पुरस्कार प्रथम माझे मित्र कै. गोपाळकृष्ण गोखले यांनी केला. मला आशा आहे, त्या कैलासवासी देशभक्ताच्या प्रयत्नांना सगळ्या देशाने जर एका आवाजात साथ दिली तर शेवटी चांगलं फळ मिळेल. पण त्यासाठी या भूमीचं सरकार हा प्रश्न हातात घेण्याची कृपा करेपर्यंत आपण थांबू शकत नाही. आपण स्वतः जागरूक असलं पाहिजे, जिथं शक्य असेल तिथं सरकारच्या प्रयत्नांना आपण जोड दिली पाहिजे.

तथापि आपला स्त्री-शिक्षणाशी अधिक जवळून संबंध आहे आणि या बाबतीत मला शंका आहे की त्याबाबतीत लक्षणीय असं काही फारसं आढळत नाही. मागे पाहिलं तर १८५४ मध्ये शिक्षणाच्या या शाखेचं महत्त्व सरकारनं ओळखलेलं दिसतं.

माझ्या मनात खात्री आहे की, नजीकच्या भविष्यकाळात प्रत्येक मुलीच्या दारापाशी शिक्षण पोहोचेल इतकी मुलींच्या शाळांची आणि स्त्रियांच्या कॉलेजांची संख्या काही वाढणं शक्य नाही. आता मुलांच्या बाबतीत्तच पाहा ना! प्रत्येक ठिकाणी शाळा असलेल्या एका खेड्याभोवती चार खेडी विनशाळांची असतात. त्यामुळे प्रत्येक खेड्यात मुलींची एक शाळा ही फारच दूरची गोष्ट आहे, म्हणून जे व्यवहार्य वाटते, ते मी सुचवतो. खालच्या इयत्तांमध्ये, प्राथमिक शाळेत आपण सरळ मुला-मुलींचं सहशिक्षण चालू करावं. हिंदुस्थानात सर्वत्र साधारणपणे दहा वर्षांच्या आतल्या मुलींला मुलांच्या शाळेत घालण्याबाबत विरोध होणार नाही. काही अपवाद नियतीस, पण वृत्तपत्रांनी या बाबतीत जर जोरदारपणे बाजू उचलून धरली, तर ही कल्पना सर्वसामान्य जनतेपर्यंत झिरपत जाऊ शकेल आणि अनुकूल परिणाम दिसून येतील. यासाठी काही फार वेळ घालवावा लागेल असं नाही.

सध्या स्त्री-पुरुषांनी, आता मला स्त्रियांसाठी माध्यमिक आणि उच्च शिक्षणासंबंधी माझी कल्पना स्थूलमानाने मांडण्याची अनुमती द्यावी. ही मूलतः दोन तत्त्वांच्या पायावर आधारलेली आहे. एक म्हणजे, मातृभाषेच्या माध्यमातून शिकणं हे नैसर्गिक आणि म्हणूनच अधिक कार्यक्षम आहे, दुसरं म्हणजे वर्ग म्हणून आजच्या सामाजिक अर्थव्यवस्थेत पुरुषांपेक्षा स्त्रियांची भूमिका निराळी आहे. निष्पक्षपाती विचारवंतांमुळे ही दोन तत्त्वं स्वतःच पाश्य करतील.

शिक्षणतज्ज्ञांनी त्यांचा स्वीकार केला आहे. मुलांसाठी सर्वत्र शिक्षणाचं माध्यम म्हणून प्रादेशिक भाषांचा स्वीकार झाला की स्त्रियांसाठी तो स्वीकारण्यास आपण थांबायचं काही कारणच नाही. आज यामागे कोणतीही राजकीय किंवा आर्थिक कारण नाहीत आणि आपण लवकरात लवकर मुलींचं प्राथमिक, माध्यमिक, उच्च शिक्षण प्रादेशिक भाषांत सुरू केलं तर पूर्ण देशाला ते फार चांगलं होईल. दुसरं तत्त्वही आत्यंतिक महत्त्वाचं आहे. जी स्त्रियांची महत्त्वाकांक्षा पुरुषांच्या बरोबरीने त्यांच्याच मैदानात बाबरण्याची आहे, अशाच्या युनिव्हर्सिटीत त्यांना परीक्षेच्चे आणि सन्मानासाठी स्पर्धा करायची आहे, त्यांच्यावर अगदी कडकपणे बंदी घालावी, असं मी म्हणत नाही. ज्यांच्याकडे त्यासाठी बुद्धिमत्ता, शारीरिक आणि आर्थिक कुवत आहे, त्या आजच्या परिस्थितीत स्त्री-जातीला आणि पूर्ण समाजालाही निश्चित भूषण आहेत, पण आपण हे ओळखलं पाहिजे की, राष्ट्रीय आणि सामाजिक अर्थव्यवस्थेत स्त्रियांचं स्वतःचं पुरुषांपेक्षा वेगळं असं एक असावं अशी सरळ आहे. पूर्ण समाजाला पूर्णत्वाला नेण्यासाठी रक्षण-जतन-विकास-क्रांती यातून स्त्री-पुरुषांना घडवायचं आहे, याचा अर्थ शिक्षणाच्या दोन वाटा एकमेकांपासून एकदम वेगळ्या आणि एकमेकांपासून तेडलेल्या असतील असा अजिबात नाही. कारण स्त्री-पुरुष कोणीही असो, दोघेही मुळातील माणूस म्हणून एकच आहेत ना! समाजात कार्य करताना, अधल्यातील जबाबदाऱ्यांच्या बाबतीत आणि कार्यांच्या हातुलतेत ते वेगवेगळे असतील तरी आंतरिक चैतन्य, माणुसकी यात दोघेही सारखेच आहेत. हे लक्षात घेऊन त्यांच्या शिक्षणाची रूपा समान पातळीवरही साकारली गेली पाहिजे.

माध्यमिक आणि उच्च अभ्यासक्रम तयार करण्यासाठी जपान युनेस्को युनिव्हर्सिटीकडून आपल्याला मार्गदर्शन मिळू शकतं. घोरणी आणि व्यवहारी जपानी विचारवंत आणि कार्यकर्ते त्यांनी या युनिव्हर्सिटीची कल्पना योजली आणि अत्यंत चिकाटीने, अथक परिश्रमाने ती जपान राष्ट्राच्या उभारणीसाठी यशस्वी केली. आपल्या स्त्रियांचा विचार करता आपल्या परिस्थितीचे जपानशी साम्य आहे. पाश्चात्त्यांनी स्त्रियांसाठी चालवलेल्या शाळा-कॉलेजांपेक्षा या लोकांनी चालवलेल्या संस्थांकडे आपण वळलो तर आपला फायदा होईल. नरसे यांनी जपानच्या स्त्रिया कोणत्या अवस्थेत आहेत ते पाहिलं आणि त्यांनी त्यानुसार स्वतःच्या आशा रुजवील, अशी शिक्षणाची जमीन तयार केली. ते लिहितात, ''स्त्रियांची युनिव्हर्सिटी स्थापन करताना आम्ही अमेरिका किंवा युरोपमधील स्त्री-संस्थांचा कित्ता गिरवू इच्छित नाही. या देशातील पुरुषांच्या युनिव्हर्सिटीशीही आम्ही स्पर्धा करू इच्छित नाही. आज स्त्रियांची जी शारीरिक-मानसिक स्थिती आहे ती लक्षात घेऊन अभ्यासक्रम आखणे आमचे उद्दिष्ट आहे. जसजशी प्रगती होत जाईल, त्यानुसार हळूहळू दर्जा वाढवत न्यावा लागेल.''

हिंदुस्थानची परिस्थिती लक्षात घेता कदाचित आपल्याला सुरुवातीला जपानपेक्षाही खालच्या पातळीवर जावं लागेल, आपल्याला माध्यमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम असा आखला पाहिजे की, मुलगी पंधरा ते सोळा वर्षांपर्यंत ती पूर्ण करू शकली पाहिजे. शिक्षण व्यवस्थित होत असेल तर आई-वडील लग्नासाठी एक-दोन वर्षं थांबतील. हिंदुस्थानच्या पुढारलेल्या समाजात नजीकच्या भविष्यकाळात हेच लग्नाचं किमान वय असणार आहे. सध्या मुलींच्या शाळेतील अभ्यासक्रम आखताना जे चालू अभ्यासक्रम आहेत, त्यांच्या आधारानेच हे आखायचे आहेत. ते त्यांच्या परीने स्वयंपूर्ण असले पाहिजेत म्हणजे माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यावर बाहेरच्या जगातले व्यवहार पाहण्यास त्या समर्थ झाल्या असल्या पाहिजेत. हुशार आणि महत्त्वाकांक्षी मुलींना वर्षा-दोन वर्षांनी वाटण्यास चालू असलेल्या युनिव्हर्सिटीचं मॅट्रिक्युलेशनही जमलं पाहिजे, हा निश्चितच शिक्षण क्षेत्रातला नवीन प्रयोग असेल आणि सरकारने शेतीच्या क्षेत्रात जसा पुढाकार घेतला तसा येथेही घ्यावा, अशी रास्त अपेक्षा आहे. युरोपमधील युद्धामुळे बदललेल्या आर्थिक वातावरणीच्या परिस्थितीची मला पूर्ण जाणीव आहे. परंतु सरकारनं चांगल्या प्रकारे साहाय्य केलं, तरी त्याची चाकं मेहमीच फार मावकाश चालतात. आधी उशीर झालेलाच आहे. अजून थांबून वाट पाहायची म्हणजे आत्महत्या करणं आहे. म्हणून मी देशातील हिंदुस्थानी राज्यांना, सार्वजनिक संस्थांना, खासगी संस्थांना, समाज-सुधारणांचे हितचिंतक असलेल्यांना आवाहन करतो की, उशीर न करता हा प्रश्न हातात घ्या आणि प्रयोगांना आरंभ करा. हे निर्धारानं आणि सातत्यानं केलं तर यश निश्चित आहे. नुसत्याच चर्चा करण्यात वेळ घालवला नाही, तर परिस्थिती वाचनता येईल. त्यांना प्रत्यक्ष कामाला सुरुवात करू दे! मला खात्री वाटते, जेव्हा ते काही तरी काम करून दाखवतील, तेव्हा सरकार मदत करण्यास विलंब करणार नाही. प्रश्न गंभीर आहे. निकडीचा आहे. शिवाय दुरगामी परिणाम घडवून आणणारा आहे. म्हणून मी या परिषदेला आग्रह करतो की, हा प्रश्न हातात घ्यावा. त्यासाठी समिती नेमावी. समितीने तपशीलवार योजना आखावी. येत्याच्या चर्चेच्या सुरुवात घरून जोडीक भाषांतील शाळा आणि कॉलेजं सुरू करण्याची साधनं आणि मार्ग सुचवावेत. स्त्री-शिक्षण आता पुढचा पुढे मेलं आहे, तेव्हा वरची पायरी चढण्याचा हरकत नाही.

या संदर्भात एक गोष्ट सांगावला आनंद होतो, 'हिंदू विधवा होम असोसिएशन'ने मला या परिषदेत जाहीरपणे ही बातं सांगण्याचा अधिकार दिला आहे. महिलाश्रम व मुलींची शाळा यांचाच विस्तार करून कॉलेजचे वर्ग सुरू करण्यास ते राजी आहेत.

॥ महर्षी कर्वे यांनी मूळ इंग्रजीत केलेले हे भाषण आणि विजया खाडपेकर यांनी केलेला त्याचा अनुवाद, पुस्तकरूपाने आज प्रकाशित होतो आहे... त्यापैकी मराठीतला हा संपादित अंश

सकाळपेपर - ६ जुलै २०१६

पुरूषांइतकाच महिलांनाही दर्जा

'एसएनडीटी'च्या शतकपूर्ती कार्यक्रमात पोलिस आयुक्त रश्मी शुक्ला यांचे प्रतिपादन

पुणे, ता. ५ : ''महिलांना 'सौभाग्यवती' म्हणणारा समाज पुरुषांना 'सौभाग्यवान' का बरं नाही म्हणू शकत ?... महिलांचाही दर्जा पुरुषांच्या बरोबरीनेच आहे. आताचा काळ महिलांना त्यांच्या क्षमतांची जाणीव होण्याचा आहे. ध्यान रहे, लडकी है तो सौभाग्य है... लडकी है तो विद्या है... लडकी है तो लक्ष्मी है...'' अशा शब्दांत शहराच्या पोलिस आयुक्त रश्मी शुक्ला यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या (एसएनडीटी) कला आणि वाणिज्य महिला महाविद्यालयाच्या शतकमहोत्सवी स्थापना दिन समारंभात शुक्ला मंगळवारी बोलत होत्या. या वेळी लेखिका डॉ. अश्विनी धोंगडे, आमदार मेधा कुलकर्णी, माजी महापौर कमल व्यवहारे, प्राचार्य जी. वाय. शितोळे, डॉ. रेवा कुलकर्णी, नगरसेविका माधुरी सहस्रबुद्धे आदी उपस्थित होते.

शुक्ला म्हणाल्या, ''मुलगी नको, असे म्हणणाऱ्यांनी खरंतर 'मला मुलगीच हवी' असे बोलायला हवे. समाजात स्त्रीभ्रूण हत्येसाठी जेवढे पुरुष जबाबदार आहेत, तेवढ्याच महिलाही जबाबदार आहेत. मुलींना जन्माला येऊ द्या. कित्येक गोष्टी मुलांपेक्षा मुलीच चांगल्या करतात. लक्षात ठेवा, एक सून दोन घरं जोडत असते. घरात आनंद आणत असते.''

'एसएनडीटी'ने लावलेल्या ज्योतीतून एक महान सामाजिक चळवळ आज उभी राहिलेली आहे. महर्षी कर्वे नसते, तर हे शक्यच होऊ शकले नसते, असेही त्यांनी नमूद केले.

मेधा कुलकर्णी म्हणाल्या, ''महिला या जन्मतःच सौभाग्यवती असतात. सौभाग्यवती ही व्याख्या एखाद्या महिलेस नवरा आहे किंवा नाही, यावर अवलंबून नसावी. पुरुषांचा खांदा हा निकष महिलांच्या बाबतीत आताच्या काळात आवश्यक नाही.''

धोंगडे यांनी महाविद्यालयाच्या शंभर वर्षांतील स्थित्यंतराचा आढावा घेतला. महर्षी कर्वे यांनी स्थापलेल्या अनाथ बालिकाश्रम ते देदीप्यमान आलेख असणारे एसएनडीटी असा एक प्रदीर्घ प्रवास या वेळी उपस्थितांना जाणून घेता आला.



एसएनडीटी : महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या प्रतिमेपुढे पणत्यांची सजावट करताना विद्यार्थिनी.

५ जुलै १९१६... ते ५ जुलै २०१६ !

'एसएनडीटी'च्या प्रांगणात मंगळवारच्या सकाळी उत्साहाचे भरते आल्याचे दिसत होते. ५ जुलै १९१६ ते ५ जुलै २०१६ हा प्रदीर्घ टप्पा पूर्ण झाल्याच्या उत्साहात विद्यार्थिनी व शिक्षकांच्या सोबतीने अनेक क्षेत्रांतील मान्यवर विद्यापीठाच्या प्रांगणात उपस्थित असल्याचे पाहायला मिळाले.

पुरुषसत्ताक व्यवस्थेने स्त्रीला दुय्यम लेखले

पुणे, ता. २६ : वांशिक दंगली घडतात तेव्हा स्त्रीला समाजाची मालमत्ता समजणारेही आहेत. सोशल मीडियावरूनही ते दाखविले जाते. पुरुषसत्ताक व्यवस्थेने स्त्रीला दुय्यम लेखले आहे. म्हणूनच स्त्रियांवर अन्याय होत आहेत, असे मत सामाजिक कार्यकर्त्या मुक्ता मनोहर यांनी व्यक्त केले.

लोकशाही उत्सव समितीतर्फे आयोजित कार्यक्रमात, 'बलात्कार, व्यक्ती, समाज, राजकारण' या विषयांवर त्या बोलत होत्या. मानसोपचार तज्ज्ञ डॉ. साधना नातू, प्रा. श्रुती तांबे, प्रा. नितीश नवसागरे उपस्थित होते.

मनोहर म्हणाल्या, ''समाजात वंशवाद, विषमता अजूनही आहे. मूलतत्त्ववाद हेदेखील एक समस्या आहे. त्यातच खाकी वर्दीतील व्यक्तीकडूनही मुली, महिलांवर चौकीतच बलात्कार केल्याच्या घटना घडल्या आहेत.

पोलिस चौक्या या काही लैंगिक गरजा भागविणाऱ्या जागा नाहीत. जाती व्यवस्थेमुळे दलित समाजातील महिलांवर बलात्काराच्या घटना घडतात, हे दुर्दैव आहे. एकीकडे राष्ट्रीयत्वाचा डंका वाजविला जातो. भगवे राजकारण केले जात आहे, तर दुसरीकडे महिला, मुलींवरील अत्याचाराच्या घटना घडत आहेत. या परिस्थितीचे अवलोकन करून स्त्रियांनी स्त्रियांच्या पाठीशी उभे राहावे.''



नवी पेठ : लोकशाही उत्सव समितीतर्फे आयोजित कार्यक्रमात विचार व्यक्त करताना मुक्ता मनोहर. यावेळी प्रा. श्रुती तांबे, डॉ. साधना नातू, प्रा. नितीश नवसागरे आदी.

शुक्रवार दि. २७ एप्रिल २०१८ सकाळ

बोधकथा

कृतीतून बोध



महिलांसाठी पहिले स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याचा मान महर्षी धोंडो केशव कर्वे यांना जातो. महिलांनी शिकणं, नोकरी करणं यास विरोध असण्याच्या काळात अण्णांनी आपलं कार्य सुरू केलं. तेव्हा मुलींची लहानवयातच वयाने प्रौढ पुरुषांशी लग्न लावण्याची पद्धत होती. त्यामुळे अनेक जणी बालवयातच विधवा होत. त्यांच्या पुनर्रुथ्थानासाठी अण्णांनी अपार कष्ट घेतले. अनाथ बालिकाश्रम ते हिंगण्यातील स्त्री शिक्षण संस्था हा प्रवास सोपा नव्हता. संस्थेसाठी अहोरात्र झटत त्यांनी अनेक महिलांचे भाग्य घडवले. त्यांचे दु:ख दूर करण्याचे व्रत शेवटपर्यंत पाळले. एवढं करूनसुद्धा त्यांना कीर्तीचा लोभ वा पैशाचा हव्यास अजिबात नव्हता. पै-पै जमविताना प्रसंगी समाजाची अवहेलनाही सोसत त्यांनी आपले कार्य जोमाने सुरू ठेवले. त्यामुळेच छोट्या गोष्टींमध्येही त्यांचा काटकसरीचा आग्रह असे. कोणतीही गोष्ट वाया गेलेली त्यांना खपत नसे. आश्रमातील मुलींनी जेवताना पानात टाकू नये असा दंडक होता. ते म्हणत, ''पोटभर खा, पण टाकू नका.'' ते स्वत:ही पानात जास्त घेत नसत. आश्रमातील मुली स्वयंपाक व वाढण्याचे काम आळीपाळीने करत. एकदा एकीने अण्णांना पानात चटणी वाढली. ती जास्त वाढली आहे हे अण्णांच्या लक्षात येताच त्यांनी तिला एक कागद आणायला सांगितला. तिला समजेना. पण काही न बोलता तिनं तो आणून दिला. जास्त झालेली चटणी पुडीत बांधून अण्णांनी ती पानापुढे ठेवली. या कृतीचं आश्चर्य वाटल्याने तिने विचारले, ''अण्णा, चटणी का ठेवली पुडीत?'' ''अगं, वाया कशाला घालवू? संध्याकाळी जेवताना घेईन.'' अण्णा उत्तरले.

हजार शब्दांनी जे काम झालं नसतं ते अण्णांच्या एका छोट्या कृतीनं झालं. असा छोट्या छोट्या गोष्टींचा विचार करणाऱ्या व्यक्तींमुळेच संस्था मोठ्या होतात.

– सवंगडी

सकाळ

सकाळ प्रतिबिंब

गुरुवार २८ सप्टें १८.


'मातृभाषा ही बोलायला, समजून घ्यायलाही सोपी'

वारजे माळवाडी : ''जगातील शास्त्रज्ञांनी संशोधनातून हे सिद्ध केले आहे, की जगातील ज्ञान हे मातृभाषेतून जेवढे समजते तेवढे इतर कोणत्याही भाषेतून समजत नाही. मातृभाषा बोलायला जेवढी सहजसोपी वाटते तेवढीच समजून घ्यायलाही सोपी आहे. मराठी भाषेतील वृत्तपत्रे, मासिके, पुरवण्या, मान्यवर लेखकांची पुस्तके विद्यार्थ्यांनी वाचलीच पाहिजेत. त्याचबरोबर इतरही भाषेतील साहित्य वाचावे,'' अशी माहिती महाराष्ट्र राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. आनंद काटीकर यांनी दिली.

कर्वेनगर येथील महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या श्री सिद्धिविनायक महिला महाविद्यालयात २७व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कर्वे संस्थेचे कार्याध्यक्ष एन. डी. पाटील होते. प्राचार्या डॉ. पुष्पा रानडे उपस्थित होत्या. या वेळी इंग्रजी, मराठी विभागाच्या भित्तिपत्रकांचे प्रकाशन करण्यात आले.

डॉ. काटीकर म्हणाले, ''भाषा व जीवन यांचा अतिशय घनिष्ट संबंध आहे. मुळात भाषा हा विषय दुर्लक्षित करण्यासारखा नाही. प्रत्येक ठिकाणी वापरली जाणारी भाषा, त्यातील शब्द, शब्दोचार हे तेथील ठिकाणानुसार (भौगोलिक परिस्थितीवर) अवलंबून असते.''

प्राचार्य म्हणाले, ''महाविद्यालयाची स्थापना झाली तेव्हा ४० विद्यार्थिनी होत्या. आज तीन हजार विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. कला, वाणिज्य, विज्ञान, बीबीए, एमए, एमकॉम. आणि कनिष्ठ महाविद्यालय आदी शाखा आहेत. महाविद्यालयाला आतापर्यंत तीन वेळा 'नॅक'ने मूल्यमापनात 'अ' दर्जा दिला आहे.'' मराठी विभागप्रमुख डॉ. शैलेश त्रिभुवन यांनी आभार मानले.



कर्वेनगर : श्री सिद्धिविनायक महिला महाविद्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात भित्तिपत्रकाचे उद्घाटन करताना डॉ. आनंद काटीकर आणि इतर मान्यवर.

म. टाईम्स

महर्षि धोंडो केशव कर्वे यांनी महिलांसाठी उच्च शिक्षणाची दारे खुली केली, त्याला ९९ वर्षं पूर्ण होऊन आज ही शैक्षणिक चळवळ शतकमहोत्सवी वर्षांत पदार्पण करत आहे. त्यानिमित्ताने सांगितलेली विद्यापीठाची यशोगाथा...





एसएनडीटी
महिलासक्षमतेचं विद्यापीठ

» वसुधा कामत
(कुलगुरू, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ)
samwad.mt@gmail.com

५ जुलै १९१६ ... उच्च शिक्षणाची दारे महिलांसाठी खुली करण्यांचा महर्षी कर्वे यांचा मानस या दिवशी खऱ्या अर्थाने प्रत्यक्षात आला. दि. ३ जून १९१६ रोजी विद्यापीठाचा जन्म होऊन त्याचे 'भारतवर्षीय महिला विद्यापीठ' (इंडियन विमेन्स युनिवर्सिटी) असे बारसेही झाले.

पाच विद्यार्थिनींना घेऊन सुरू झालेले हे विद्यापीठ आज शंभराव्या वर्षात पदार्पण करीत असताना खऱ्या अर्थाने 'भारतवर्षीय' ठरण्याचा प्रयत्न करीत आहे. सात राज्यांत पसरलेल्या ५०००० पेक्षा अधिक स्त्रिया महर्षिंच्या छत्रछायेत आपले उच्च शिक्षण प्राप्त करण्याचे स्वप्न पूर्ण करीत आहेत.

विद्यापीठातर्फे सुरुवातीला जी.ए. (गृहीतागमा) आणि पी.ए. (प्रदेयागमा) अशा दोन पदव्या दिल्या जात असत. १९५१ मध्ये महाराष्ट्र राज्याने विधीमंडळात कायदा करून विद्यापीठाला मान्यता दिली. विद्यापीठाचे राष्ट्रीयत्वही अबाधित ठेवले. महर्षिंनी या राष्ट्रीयत्त्वाबद्दल म्हटले आहे की, 'विद्यापीठाला राष्ट्रीय हे विशेषण अनेक दृष्टींनी शोभणारे आहे. विद्यापीठाच्या अधिकाराची सर्व सूत्रे प्रातिनिधिक तत्त्वावर बनलेल्या सिनेटच्या हातात आहेत. मराठी, गुजराती, हिंदी, उर्दू या बोध भाषांतून अभ्यास करणाऱ्या विद्यार्थींनी या विद्यापीठाचा फायदा घेत आहेत...' विद्यापीठाने आजही आपले हे 'राष्ट्रीयत्व' जपले आहे.

१९५१ साली महाराष्ट्र राज्याची मान्यता मिळाल्यानंतर लेडी प्रेमलीला ठाकरसी यांनी कुलगुरू म्हणून काम पाहावे असा ठराव झाला. १९५२ ते १९५७ या कालावधीत दिवाणबहादुर झवेरी यांनी कुलगुरूपद सांभाळले. यानंतर मात्र एक तप (१९५७ ते १९६९) लेडी ठाकरसींनी विद्यापीठाचे संगोपन केले. विद्यापीठाला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. या बारा वर्षांत १३ नवीन विभागांची/महाविद्यालयांची स्थापना झाली. यात मराठी, चित्रकला हे विभाग मुंबई व पुणे येथे, तसेच नर्सिंग महाविद्यालय, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गृहविज्ञान महाविद्यालय ही महत्त्वाची महाविद्यालये होती. अर्थशास्त्र, शिक्षणशास्त्र, ग्रंथपालनशास्त्र, फूड सायन्स अँड न्यूट्रीशन अशा पदव्युत्तर विभागांचा समावेशही होता. या सर्वांनीच आपापल्या क्षेत्रात कार्याचा ठसा उमटविला आहे. याचे महत्त्वाचे कारण लेडी ठाकरसींनी केलेले योग्य नियोजन, दाखवलेली दूरदृष्टी, मनुष्यबळाचे केलेली गुंतवणूक होय.

पुढील पाच वर्षांत (१९७१ ते १९७५) आणखी ११ विभाग आणि पुण्याचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय विद्यापीठात स्थापन झाले. Research Centre for Women's Studies हे संपूर्ण भारतात प्रथम महिला विद्यापीठात स्थापन झाले (१९७४). डॉ. नीराबेन देसाईंच्या मार्गदर्शनाखाली या केंद्राने केलेल्या कार्याला लवकरच आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली. यू.जी.सी.ने नंतर या केंद्राच्या कार्यावर आधारित अशी केंद्रे अनेक विद्यापीठात उभारली. प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार विभागाची स्थापना झाल्यापासूनच (१९७२) केंद्रिय मानवसंसाधन मंत्रालयाने त्यांच्यावर अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपवल्या. त्यांचे संशोधन, विकास, विस्तार कार्य यामध्ये या विभागाने महत्त्वाचे योगदान दिले आहे. भारतातील विद्यापीठात अन्यत्र न दिसणारे महिला विद्यापीठाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे येथील शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील अनेक विभाग. दोन शिक्षणशास्त्र विभाग, स्पेशल एज्युकेशन, शैक्षणिक तंत्रविज्ञान, मार्गदर्शन आणि समुपदेशन, शैक्षणिक व्यवस्थापन, भाषा अध्यापन, तसेच विद्यापीठ संचालित दोन शिक्षणशास्त्र महाविद्यालये. शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील प्रत्येक विभागाने राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. शैक्षणिक तंत्रविज्ञान विभागाने online learning (ऑनलाइन लर्निंग) e-content development (ई-कंटेट डेव्हलपमेंट), Instructional Design (इंस्ट्रक्शनल डिझाइन) या एकविसाव्या शतकातील नवीन गोष्टींचा विकास एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीपासूनच (इ.स. २०००) सुरू केला. आज संपूर्ण देशामध्ये शैक्षणिक तंत्रविज्ञान या क्षेत्रात मास्टर्स आणि पी.एच.डी. पदवी प्रदान करणारे SNDT महिला विद्यापीठ हे एकमेव विद्यापीठ आहे.

१९७५ ते १९८५ या दशकात विद्यापीठाने आणखी नवी क्षितीजे धुंडाळली. तेरा नवीन पदव्युत्तर विभाग (त्यामध्ये Communication Media for Children सारखे innovative काम करणारे विभाग आहेत), पॉलिटेक्निक, फार्मसी महाविद्यालय आणि दूरस्थ शिक्षण केंद्र (१९७९) स्थापन झाले. भुळात महर्षिंनी दूरस्थ शिक्षणाचा हा विचार विद्यापीठाच्या स्थापनेपासूनच केला होता. सुप्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या मातोश्री दिवंगत कमलाताई काकोडकर 'कर्वे' युनिवर्सिटीतून मॅट्रिकची परीक्षा पास झाल्या आणि बालशिक्षणाची दारे त्यांच्यासाठी खुली झाली. बालशिक्षण क्षेत्रात त्यांनी फार मोठे कार्य केले (त्यांचे आत्मवृत्त 'एक धागा सुताचा' प्रसिद्ध आहे). अशा अनेक भगिनींना तेव्हा आणि आजही हे महिला विद्यापीठ स्वत:चे घर, संसार, नोकरी, उद्योग सांभाळून दूरस्थ शिक्षण पद्धतीने उच्च शिक्षण घेण्यास साहाय्य करीत आहे. दूरस्थ शिक्षण केंद्र आज ३० अभ्यासक्रम राबविते, M.Com. हा ८० क्रेडिटचा अभ्यासक्रम पूर्णत: ऑनलाइन प्रणालीने शिकवला जातो. आता ऑगस्ट २०१५ पासून M.A. in Education हा अभ्यासक्रमही पूर्णत: ऑनलाइन केला जाणार आहे.

महिला विद्यापीठाचा महिलांच्या आंतरिक इच्छाशक्तीवर, त्यांच्या कार्यकर्तृत्वावर, त्यांच्या मानसिक पात्रतेवर पूर्ण विश्वास आहे. याच विश्वासामुळे महिलांच्या गरजा ध्यानात घेऊन सतत नवनवीन क्षेत्रे त्यांना उपलब्ध करून देण्यासाठी, उंच आकाशी भरारी घेण्यासाठी त्यांच्या पंखांना बळ देण्यासाठी हे महिला विद्यापीठ कायम सजग आहे. यामुळेच १९८५ नंतरच्या तीन दशकात बारा नावीन्यपूर्ण विभाग आणि संस्थांची स्थापना झाली. यात व्यवस्थापन संस्था, (मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट), तंत्रशास्त्र संस्था (इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी) रसायनशास्त्र, भूगोलशास्त्र, समाजकार्य संगणकशास्त्र (कंप्युटर सायन्स) न्यायशास्त्र, ज्वेलरी डिझाइन अशा अनेक संस्था आहेत. सर्वांत नवीन सभासद म्हणजे महर्षि कर्वे मॉडेल कॉलेज फॉर विमेन हे रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन येथे २०११ साली स्थापन केलेले महाविद्यालय. अल्पावधीतच या महाविद्यालयाने B.C.A. आणि B.Com या अभ्यासक्रमांच्या माध्यमातून आपली मोहोर उमटवली आहे.

स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते

थोर शिक्षणतज्ज्ञ व समाजसुधारणेचे पुरस्कर्ते भारतरत्न महर्षी धोंडो केशव ऊर्फ अण्णासाहेब कर्वे यांची आज पुण्यतिथी. त्यानिमित्ताने त्यांच्या अतुलनीय कार्याचा आढावा देणारा लेख.

'यं त्र नार्यस्त पूज्यंते, रमंते तत्र देवता' हे संस्कृत मधील बोधवाक्य सर्वांनाच परिचित आहे. आज जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने आपले कर्तृत्व दाखवीत आहेत. पण शंभर वर्षापूर्वी स्त्रियांनी शिकणे धर्मबाह्य मानले जाई! गोपाळ गणेश आगरकर, महात्मा जोतिराव फुले, ईश्वरचंद्र विद्यासागर यांसारख्या समाजसुधारकांनी अतोनात हालअपेष्टा सोसून स्त्री शिक्षणाला चालना दिली. पुण्याजवळील हिंगणे येथील माळरानावर स्त्री शिक्षणाचे तपोवन उभे करणारे थोर समाजसुधारक म्हणजे महर्षी धोंडो केशव कर्वे! त्यांचा जन्म १८ एप्रिल १८५८ रोजी त्यांच्या आजोळी कोकणातील शेरवली येथे झाला. बालपणापासून मेहनत, प्रामाणिकपणा व पुरोगामी विचार हे गुण त्यांच्या अंगी बाणले होते. १८८५ साली बी.ए. उत्तीर्ण झाल्यानंतर फर्ग्युसन महाविद्यालयात ते गणित शिकवू लागले. १८९१ ते १९१४ पर्यंत ते गणिताचे ख्यातनाम प्राध्यापक झाले. मात्र त्यांचा पिंड हा सुधारकाचा होता. त्यांच्या प्रथम पत्नी राधाबाई यांचे निधन झाल्यामुळे त्यांनी देवरूखच्या पावसकर जोशी कुटुंबातील गोदूताई बाळकृष्ण जोशी या विधवेशी दि. १३ मार्च १८९३ रोजी विवाह केला. या त्यांच्या द्वितीय पत्नी आनंदीबाई ऊर्फ बाया कर्वे! या विवाहाचा त्याकाळी सर्वत्र कडाडून निषेध झाला. परंतु न डगमगता त्यांनी अनाथ स्त्रियांसाठी महिलाश्रम, महिला विद्यापीठ, कार्यकर्ते तयार करण्यासाठी निष्काम कर्म-मठ आणि भारतीय महिला विद्यापीठ (श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ - एःञऊ.) अशा अनेक संस्था उभारून स्त्री शिक्षण हेच आपले जीवितकार्य मानले. दि. २१ मे १८९४ रोजी त्यांनी पुनर्विवाहितांचा कुटुंबमेळा घेतला. अनाथ बालिकाश्रम काढले. त्यांची मिशनरी वृत्तीची स्त्री सेवा पाहून रावबहादूर गोखले यांनी हिंगणे येथील स्वतःची ६ एकर जागा व रु. ७५०/- देणगी देऊन त्यांच्या कार्यास हातभार लावला. १९०४ साली हिंगणे येथील आश्रमाची स्थापना केली. त्यांनी विधवांचे वसतिगृह काढले. या वसतिगृहाचे पहिले अध्यक्ष डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर होते. समाजसुधारणेचे बंड उभारल्यामुळे कर्वे पती-पत्नींचा अतोनात छळ झाला. रस्त्याने जाताना त्यांच्यावर आणि त्यांच्या आश्रमशाळेतील विद्यार्थिनींवर दगडफेक, शेणाचा माराही होई. मुरूड येथील त्यांच्या जन्मगावच्या पंचायतीने त्यांना वाळीत टाकले. तरीही त्यांनी समाजसुधारणांची कास सोडली नाही. 'मी समाजमनाविरुद्ध वागलो आहे, त्यामुळे समाज देईल ती शिक्षा मी निमूटपणे भोगणार आहे. पण काही काळात समाज समंजस होईल व माझेच गुणगान गाईल हे निश्चित आहे' असे ते म्हणत असत.



१९५० साली त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांचे वृद्धापकाळाने वयाच्या ८५ वर्षी निधन झाले. एक धर्मपत्नी म्हणून त्यांचे मोलाचे सहकार्य अण्णासाहेबांना लाभले. कर्वे बरोबरील ५७ वर्षाच्या सहजीवनाचा आढावा व समाजसुधारणेचे कार्य यावर आधारित त्यांनी 'माझे पुराण' हे पुस्तक लिहिले.

दि. ९ नोव्हेंबर १९६२ रोजी वयाच्या १०४ व्या वर्षी अण्णासाहेबांचे निधन झाले. एक कार्यमग्न व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले. आपले सुधारणेचे कार्य करताना ध्येयनिष्ठ राहून दुःखाचे अनेक डोंगर चढले, पण दुःख सहजपणे पचवले. अण्णासाहेब १०४ वर्षे जगले, पण इतर वृध्दांप्रमाणे त्यांना जीवनाचा कधी कंटाळा आला नाही. किंवा वयाचे शतक ओलांडल्यावरही आता आपले डोळे मिटावे असे त्यांना कधीही वाटले नाही. त्यांच्यापेक्षा वयाने लहान लोक सक्रिय जीवनातून निवृत्त होण्याची भाषा करत तेव्हा ते त्यांना म्हणत, 'मी शंभर वर्षे जगलो, पण निवृत्त होण्याचा माझ्या मनात कधी विचार आला नाही. माणसाने अखेरपर्यंत कार्यरत असावे.'

आज महिला शिक्षण घेऊन आपल्या पायावर उभ्या आहेत. पण अण्णासाहेब व आनंदीबाई यांच्या कार्याचा सर्वांनी योग्य तो बोध घेऊन ढासळणारी कुटुंब व्यवस्था सांभाळली पाहिजे. आज अण्णासाहेबांना जाऊन ५२ वर्षे झाली, पण पुरोगामी महाराष्ट्राला त्यांच्या कार्याचा विसर पडला आहे असे वाटते. कधी त्यांची जयंती - पुण्यतिथी कोणीही साजरी करू नये हे दुर्दैव म्हणावे लागेल.

महर्षी कर्वेसारख्या स्त्री शिक्षणाच्या पुरस्कर्त्यांना त्यांच्या ५२ व्या पुण्यतिथीनिमित्त वंदन !

- अमेय गुप्ते

वरील लेखांमधून वसुधा कामत, अंजली कुलकर्णी, अरूण देशपांडे, डॉ. कुलकर्णी, अमेय गुप्ते यांनी महर्षी कर्वे व त्यांचे स्त्री शिक्षणविषयक कार्य याविषयी आपली मते मांडली आहेत. त्यात एसएनडीटी हे महिला सक्षमतेचं विद्यापीठ आहे, कर्वे हे शिक्षणतज्ञ व स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते होते, कर्वे यांनी महिलांच्या शिक्षणासाठी संस्था उभारली, भारतरत्न कर्वे यांनी शिक्षण व समाज यामध्ये समन्वय घडवला असे सांगितले आहे.

तसेच बातम्यांमधून असे लक्षात येते की प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या मुक्ता मनोहर यांना असे वाटते की, समाजात वंशवाद, विषमता अजुनही आहे. स्त्रीला आजही दुय्यम समजले जाते, भेदभाव केला जातो. तर मराठी विकास संस्थेचे संचालक आनंद काटीकर सांगतात की शिक्षणासाठी मातृभाषाच सोपी; जे कर्वे यांनी १०० वर्षापूर्वीच केले. महर्षी कर्वे यांनी स्थापन केलेल्या एसएनडीटी विद्यापीठाच्या शतकपूर्ती सोहळ्यात बोलताना पोलीस आयुक्त रश्मी शुक्ला म्हणतात; **मुलींचे सबलीकरण झाल्यास समाजाचा योग्य दिशेने विकास होईल.** स्त्री शिक्षणाचे कार्य करताना हेच ध्येय डोळ्यासमोर ठेवून महर्षी कर्वे यांनी भारतातील हे महिलांचे पहिले विद्यापीठ स्थापन केले होते.

- **ऐतिहासिक पद्धती अंतर्गत प्राथमिक व दुय्यम स्त्रोतातून मिळालेल्या माहितीची चर्चा**

या विषयाच्या अभ्यासासाठी प्राथमिक स्त्रोतांचा अभ्यास करताना महर्षी कर्वे यांच्या आत्मवृत्ताच्या अभ्यासातून व त्यांच्या विषयी इतरांनी लिहिलेल्या साहित्याच्या वाचनातून असे दिसून आले की स्त्री शिक्षणाबाबत अतिशय प्रतिकूल परिस्थितीत महर्षी कर्वे यांनी आपले कार्य सुरु केले. शिक्षणाचा अधिकार केवळ पुरुषानांच, स्त्रियांनी शिक्षण घेऊच नये अशी त्यावेळी समाजाची मानसिकता होती. याविषयी 'स्त्री–पुरुष तुलना' या ताराबाई शिंदे यांनी लिहिलेल्या निबंधात अतिशय परखड मते मांडलेली आहेत. तत्कालीन समाजात स्त्रियांना सर्वत्र दुय्यम दर्जाची वागणूक दिली जात असे. स्त्रीने शिकावे हा विचारही समाजास त्यावेळी मान्य नव्हता. त्यामुळे स्त्रियांसाठी शाळा आणि शैक्षणिक सुविधा यांचा प्रश्नच नव्हता. अनेक समाजसुधारकांनी यासाठी प्रयत्न केले. त्यापैकी स्त्रीशिक्षणाचे कार्य तडीस नेण्यासाठी आयुष्याची १०५ वर्षे अविरत झटणारे सुधारक होते, भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे. कर्मठ व सनातनी समाजाचा विरोध पत्करून त्यांनी स्त्रीशिक्षणाचे कार्य इ. सन १८९६ साली सुरु केले. त्यासाठी अनेक समाजसुधारकांनी त्यांना पाठिंबा दिला. तर काहींनी विरोधही केला. महर्षी कर्वे यांचे जीवन व त्यांनी केलेल्या कार्याचे वर्णन करताना मालतीताई देशपांडे, न. म. जोशी, विलास खोले, मंगला आठलेकर, सुलभा तेरणीकर, सरोजीनी बाबर इत्यादी साहित्यिकांनी लिहिलेल्या पुस्तकांमधून तत्कालीन सामाजिक स्थितीचे व महर्षी कर्वे यांचे विचार व कार्य याबाबत सविस्तर माहिती मिळते.

महर्षी कर्वे यांचे कार्य केवळ स्त्रीशिक्षणापुरते मर्यादित नव्हते. तर ते समाजाभिमुख होते कारण स्त्रियांना शिक्षण देण्यास तयार नसणाऱ्या समाजाच्या सनातन विचारांमध्ये आमुलाग्र बदल घडवून आणला. समाजाची गरज व समाजाच्या स्त्रीकडून असणाऱ्या अपेक्षांचा विचार करूनच महर्षी कर्वे यांनी वेगळा शैक्षणिक आराखडा तयार केला. स्त्री म्हणजे उत्तम गृहिणी व आदर्श माता अशी अपेक्षा असणाऱ्या समाजासाठी त्यांनी आपल्या अभ्यासक्रमात प्रपंचशास्त्र, बालमानसशास्त्र, आरोग्यशास्त्र, गृहशास्त्र, पाकशास्त्र अशा संसारोपयोगी विषयांचा समावेश केला. ज्याचा पुढे समाजाला, कुटुंबाला निश्चितच उपयोग होईल. तसेच शालेय शिक्षणाबरोबरच उत्तम संस्कार होतील असे उपक्रम राबवले त्यातून स्वालंबन, बचत, काटकसर, स्वच्छता हे गुण विद्यार्थिनींच्या अंगी बाणले गेले. याशिवाय पाणी भरणे, भाजी चिरणे अशी घरगुती अनेक कामेही वसतिगृहात मुलींना करावी लागत. ज्याचा परिणाम स्त्रियांच्या प्रत्यक्ष आयुष्यात झाला. व त्याचा उपयोग संपूर्ण कुटुंबाला झाला. मुली शिकल्या व स्वावलंबी, आत्मविश्वासू, सक्षम बनण्यासही त्यांची मदत झाली.

याचबरोबर मुलींना गायन, वादन, भरतकाम, विणकाम असे कलाशिक्षण दिले गेले. क्रिडाशिक्षणासाठीही प्रोत्साहन दिले. त्यामुळे मुलींचा सर्वांगीण विकास झाला. आपल्या लिखित मनोगतात सौ. मालतीताई जोशी ही विद्यार्थिनी लिहिते की, ''मी हिंगण्यास राहिल्यामुळेच मला सर्वांगीण शिक्षण मिळाले.'' तर सौ. सुमती गोरे म्हणतात, ''मी हिंगण्यास खूप गोष्टी शिकले त्यातील पहिली गोष्ट म्हणजे **स्वालंबन आणि दुसरी म्हणजे उत्तम संस्कार.''**

महर्षी कर्वे यांनी विधवा शिक्षणापासून आपल्या कार्याला सुरुवात केली. त्यामुळे विधवांच्या आयुष्याचे कल्याण झाले त्याबाबत द्वारकाबाई देशमुख सांगतात, ''अण्णांनी (महर्षी कर्वे) माझ्यासारख्या लक्षावधींच्या दुर्देवाच्या विषारी अन्नाचे अमृत बनवले.'' या प्रतिक्रियाच महर्षी कर्वे यांच्या कार्याचे यश नोंदवतात. अनेक विद्यार्थिनी शिक्षण पूर्ण करून उच्च शिक्षण घेवून समाजात उच्च पदांवर पोहचल्या. म्हणजेच महर्षी कर्वे यांच्या स्त्रीशिक्षणाच्या कार्यामुळे स्त्रियांना स्वतःला, त्यांच्या कुटुंबाला व आपोआपच समाजाला फायदा झाला. अशा समाजाभिमुख कार्यामुळे समाजाचा स्त्रीशिक्षणाचा विरोध मावळला आणि त्यांच्या कार्याला समाजातील अनेक दाते, देणगीदार यांचे आर्थिक सहाय्यही मिळाले. त्यामुळे महर्षी कर्वे यांच्या कार्याचा आलेख उंचावत गेला. आणि

प्राथमिक शिक्षणापासून सुरु केलेले कार्य उच्चशिक्षणापर्यंत पोहचले. त्यासाठी महर्षी कर्वे यांनी भारतातील नव्हे तर देश–विदेशामधील स्त्रियांच्या शिक्षणाचा अभ्यास केला. जपान व जर्मनीमधील विद्यापीठांची माहिती मिळवून त्याप्रमाणे त्यांनी भारतातही शैक्षणिक सुविधा निर्माण केल्या. त्यामुळे त्यांचे कार्य संपूर्ण भारत देशात व परदेशातही प्रसारित झाले. महर्षी कर्वे यांच्या कार्याने प्रोत्साहित होऊन त्यांच्या अनेक सहकाऱ्यांनी, विद्यार्थिनींनी शिक्षण क्षेत्रात भरीव काम केले. त्यांनी स्थापन केलेल्या निष्काम कर्म मठाच्या माध्यमातून अनेक माजी विद्यार्थिनी सेविका म्हणून काम करू लागल्या. **स्त्रियांच्या जीवनात झालेला हा दृश्य परिणाम सर्वांसाठीच उपयोगी ठरला.** अध्यापिका विद्यालयातून अनेक शिक्षिका तयार झाल्या. त्यांच्यामध्ये स्वतःबद्दल विश्वास निर्माण झाला. कलाशिक्षणाचा कुटुंबासाठी उपयोग झाला. उत्तम संस्कारामुळे कुटुंब सुसंस्कारित होण्यास मदत झाली असे लक्षात आले.

४.५ माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

- **भाग ब – गुणात्मक व संख्यात्मक विश्लेषण**

दुय्यम स्त्रोतातील माहिती संकलनाच्या मुलाखती व प्रश्नावली यांच्या माध्यमातून जी माहिती प्राप्त झाली आहे. त्याचे विश्लेषण केले असून कोष्टकीकरण करण्यात आले आहे. प्रत्येक कोष्टकातील संख्यात्मक माहितीचे विश्लेषण नोंदवले असून त्यानुसार अर्थनिर्वचन केले आहे. तसेच आलेखही काढले आहेत. निवडलेल्या नमुन्याद्वारे उपलब्ध झालेली माहिती ही प्रतिसादकांकडून मिळाली आहे. मुलाखती व प्रश्नावलीतील प्रश्नांना मिळालेल्या उत्तरांचा त्यासाठी उपयोग केला आहे. संशोधनाच्या माहितीचे संकलन करण्यासाठी प्रश्नावली हे साधन वापरले आहे. ही प्रश्नावली महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था व एस.एन.डी.टी. महिला विद्यालयातील माजी विद्यार्थिनींकडून भरुन घेतली असून साधारपणे सन १९७९ ते २०१५ या शैक्षणिक कालावधीतील विद्यार्थिनींचा यामध्ये समावेश आहे. तसेच १९१६ ते १९५७ या शैक्षणिक कालावधीतील विद्यार्थिनींची मुलाखत घेतली आहे. माहितीचे संकलन व विवेचन करताना प्रश्नावली व मुलाखत यामधून मिळालेल्या माहितीचा उपयोग केला आहे. संशोधन उद्दिष्टांनुसार संबंधित प्रश्नांच्या आधारे कोष्टके व आलेख वापरून माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले आहे. शैक्षणिक सालाप्रमाणे विद्यार्थिनींचे १ ते ५

गटात विभाजन केलेले आहे. अर्थनिर्वचन करताना मुलाखत व प्रश्नावलीतील उत्तरांमधून उपलब्ध झालेल्या माहितीचा आधार घेतलेला आहे.

- **संख्याशास्त्रीय तंत्रे**

प्रस्तुत संशोधनातील माहिती संकलनाच्या विश्लेषणासाठी गुणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे व संख्यात्मक माहितीचे विश्लेषण करण्यासाठी शेकडेवारी या संख्याशास्त्रीय तंत्राचा वापर केला आहे. तसेच आलेखांचाही उपयोग विश्लेषण करण्यासाठी केला आहे.

- **उद्दिष्ट क्र. १ : महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेल्या शैक्षणिक कार्याचा तत्कालीन सामाजिक संदर्भासह अभ्यास करणे.**


प्रश्न ब ३ : महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या कार्याचे मूल्यमापन कसे कराल?

प्रश्न क४ : महर्षी कर्वे यांच्या स्त्रीविषयक शैक्षणिक कार्याचे मूल्यमापन कसे कराल?

कोष्टक क्र. ४.४ महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या कार्याचे मूल्यमापन

संस्थेच्या कार्याचे मूल्यमापन	गट१	गट २	गट ३	गट ४	गट ५	एकूण	शेकडा
	०१	१०	५०	७०	८०		
१) आदर्श/अजोड/अलौकिक कार्य	–	०८	०६	१९	१६	४९	२३
२) प्रोत्साहनपर	–	०२	०४	–	०३	०९	०४
३) प्रगतीशील	–	–	२३	१८	१५	५६	२७
४) गोर–गरीब /गरजू	–	–	०१	०१	०७	०९	०४
५) उत्तम/चांगले	–	–	–	१३	२८	४१	१९
६) करु शकत नाही	०१	–	११	११	०५	२८	१३
७) सांगता येत नाही	–	–	०५	०२	०६	१३	०६
८) इतर	–	–	–	०६	–	०६	०३

आलेख क्र. ४.६ महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे मूल्यमापन



विश्लेषण –

वरील कोष्टकातील सांख्यिकीय माहितीतून असे दिसून येते की, म. कर्वे स्त्री शिक्षण संस्थेतून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थिनींनी संस्थेबद्दलची मते विविध प्रकारे नोंदवली आहे. गट क्र. १ मधील विद्यार्थिनीला वाटते की संस्था कार्याने इतकी मोठी आहे की त्याचे मूल्यमापन करूच शकत नाही. गट क्र. २ मध्ये महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था एक आदर्श, अजोड, अलौकिक कार्य करणारी संस्था असून तिचे कार्य इतरांना प्रोत्साहनपर आहे, तर गट क्र. ३ मध्ये संस्था प्रगतीशील कार्य करत आहे असे मत जास्त विद्यार्थिनींनी व्यक्त केले असून ही संस्था गोरगरीब व गरजूंसाठीही काम करते आहे. काही विद्यार्थिनींनी संस्थेच्या कार्याचे मोजमाप करुच शकत नाही असे म्हटले आहे. गट क्र. ४ मध्ये ही संस्था एक आदर्श संस्था आहे याकडे जास्त कल दिसून येतो आहे. त्याचबरोबर उत्तम कार्य करणारी ही संस्था आहे अशी मते जास्त आहेत. इथेही आम्ही संस्थेचे मूल्यमापन करण्यास अगदी छोट्या आहोत असे काहींना वाटते. गट क्र. ५ मध्ये संस्था प्रगतिपथावर आहे अशी मते जास्त आहेत. संस्थेच्या उत्तम कामावरही जास्त लक्ष वेधले आहे.

अर्थनिर्वचन –

यातून असे निदर्शनास आले की प्रत्येक गटाची मते, विचार व संस्थेबद्दलच्या भावना वेगळ्या आहेत. परंतु एकंदरीत महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था ही देशातील एक प्रगतीशील शैक्षणिक संस्था


असून **स्त्रियांच्या शिक्षणातील विकासात संस्थेचा मोठा वाटा आहे असे लक्षात येते**. तसेच गट क्र. २ व्यतिरिक्त सर्व गटातील काही विद्यार्थिनींना असे वाटते की संस्था व तिचे कार्य इतके मोठे आहे की आपण त्याचे मूल्यमापन करुच शकत नाही. संस्थेचे कार्य हे आदर्श तर आहेच, परंतु उत्तम काम करताना समाजातील गरीब–गरजूंचाही विचार केला गेला. इतरांना प्रोत्साहन मिळेल असे संस्थेचे कार्य आहे. १२५ वर्षाच्या काळात संस्थेचे कार्य हे प्रगतिपथावर आहे असे लक्षात येते. कारण केवळ ४ विधवा विद्यार्थिनींना घेवून सुरु केलेले कार्य आज २५००० विद्यार्थिनींसाठी शिक्षणांच्या सर्व शाखांसह अविरत चालू आहे.

कोष्टक क्र. ४.५ महर्षी कर्वे यांच्या कार्याचे महत्त्व

प्रश्न क – ३ – महर्षी कर्वे यांचे कार्य कोणत्या दृष्टीने महत्त्वाचे वाटते?

पर्याय	गट १	गट २	गट ३	गट ४	गट ५	एकूण	शेकडा
अ) सामाजिक	–	०९	३५	५१	५२	१४७	७०
ब) शैक्षणिक	०१	१०	३९	६६	७२	१८८	८९
क) कौटुंबिक	–	०७	३२	२३	२८	९०	४३
ड) आर्थिक	–	०२	३२	२२	२४	८०	३८

आलेख ४.७ महर्षी कर्वे यांच्या कार्याचे महत्त्व



- निळा – शैक्षणिक कार्य
- पिवळा – सामाजिक कार्य
- हिरवा – कौटुंबिक कार्य
- लाल – आर्थिक कार्य

विश्लेषण –

महर्षी कर्वे यांचे कार्य सर्वच दृष्टीने महत्त्वाचे आहे. परंतु वरील संख्यात्मक आकडेवारीनुसार सांगायचे झाल्यास अनुक्रमे शैक्षणिक, सामाजिक, कौटुंबिक व आर्थिकदृष्ट्या त्यांचे कार्य महत्त्वपूर्ण दिसून येते. गट क्र. १ मधील विद्यार्थिनी शैक्षणिक बाबीस महत्त्वपूर्ण मानते. इथे सामाजिक, कौटुंबिक, आर्थिकदृष्ट्या आपले मत व्यक्त केलेले नाही. ही विद्यार्थिनी १९३१ साली संस्थेत शिकत होती. त्यावेळची स्त्री शिक्षणाची परिस्थिती अत्यंत बिकट होती. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकारच नव्हता. त्यामुळे तिला महर्षी कर्वे यांचे कार्य शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वाचे वाटत असावे.

गट क्र. २ मध्ये १० विद्यार्थिनी आहेत. त्या सर्वांनाच शैक्षणिक कार्य महत्त्वाचे वाटते आहेच. परंतु ९ विद्यार्थिनींना सामाजिक कार्यही महत्त्वाचे वाटते. म्हणजे महर्षी कर्वे यांचे कार्य शैक्षणिक व सामाजिक बाबतीत जवळजवळ सारख्याच प्रमाणात महत्त्वपूर्ण ठरते आहे. खर तर महर्षी कर्वे यांनी स्त्री शिक्षणाचे कार्य विधवा पुर्नविवाह व विधवांचे शिक्षण यापासून सुरु केले होते. समाजव्यवस्थेत स्त्रियांची/विधवांची वाईट स्थिती होती. समाजसुधारक म्हणूनही महर्षी कर्वे हे प्रसिद्ध आहेत. शिक्षणाच्या कार्याबरोबरच त्यांनी समाजसुधारणेचेही कार्य हाती घेतले होते. त्यामुळे शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या गट क्र. २, ३, ४ व ५ मध्ये शैक्षणिक व सामाजिक पर्यायांना पसंती दिली आहे. या सर्व गटांमध्ये अनुक्रमे शैक्षणिक, सामाजिक, कौटुंबिक व शेवटी आर्थिक पर्याय निवडला गेलेला दिसून येत आहे.

सन १९३७ ते २०१५ पर्यंत काळ बदलत गेलेला आहे. परंतु विद्यार्थिनींची मते मात्र तीच राहिलेली दिसतात. स्त्रीला शिक्षण महत्त्वाचे वाटते आहे. महर्षी कर्वे यांचे स्त्रीशिक्षणाचे कार्य स्त्रियांना सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक बाबीपेक्षा गरजेचे वाटले. कौटुंबिकदृष्ट्या पर्यायास तिसरी पसंती आहे. तर आर्थिक पर्यायास सर्वात कमी पसंती दिसते. कारण त्या परिस्थितीत व आजही स्त्रियांनी पैसा कमावण्यासाठी शिक्षण घ्यावं हे समाजास रुचत नाही. पुरुषप्रधान संस्कृतीत पुरुष कुटुंबप्रमुख आहे. म्हणून पुरुष हाच आर्थिकदृष्टीने सक्षम असावा हीच समाजाची मानसिकता दिसून येते.

अर्थनिर्वचन –


एकूण ८९% स्त्रियांना महर्षी कर्वे यांचे शैक्षणिक कार्य इतर कार्यापेक्षा महत्त्वाचे वाटते आहे.

कोष्टक क्र. ४.६ महर्षी कर्वे यांच्या शैक्षणिक कार्याचे मूल्यमापन

प्रश्न क – ४) महर्षी कर्वे यांच्या शैक्षणिक कार्याचे मूल्यमापन कसे कराल?

कार्य	गट १	गट २	गट ३	गट ४	गट ५	एकूण	शेकडा
१) अतुलनीय	–	०३	०३	०३	०८	१४	०७
२) स्त्री शिक्षण	–	०२	१५	३८	२६	७६	३६
३) विधवा शिक्षण	–	०२	०१	०४	०३	०९	०४
४) अनाथ / गरीब	–	–	०२	०६	०१	०९	०४
५) स्त्री स्थान	–	–	०४	०३	०८	१४	०७
६) उत्तम	०१	–	०४	–	०७	११	०५
७) करु शकत नाही	–	–	–	०४	१०	१४	०७
८) सांगता येत नाही	–	–	०६	१२	१७	३५	१७
९) इतर	–	०३	१५	–	–	१८	०९

आलेख क्र. ४.८ महर्षी कर्वे यांच्या शैक्षणिक कार्याचे मूल्यमापन



विश्लेषण –

महर्षी कर्वे यांच्या शैक्षणिक कार्याचे मूल्यमापन करताना विद्यार्थिनींनी आपल्या अनुभवानुरूप वेगवेगळी मते मांडली आहेत. गट क्र. १ मधील विद्यार्थिनीने त्याचे शिक्षण क्षेत्रातील कार्य उत्तम म्हटले आहे. गट क्र. २ मध्ये अतुलनीय असे नोंदवले आहे. गट क्र. ३, ४, ५ मध्ये मात्र सर्वाधिक मते स्त्री शिक्षणाच्या कार्य संदर्भातील काम हे जास्त महत्त्वाचे आहे असे दिसून येते. याशिवाय विधवा शिक्षण, अनाथ गोर गरिबांसाठी शिक्षणाची सोय व त्यांच्या कार्यामुळे स्त्रीला समाजात काही प्रमाणात का होईना स्थान मिळू लागले असे ७% स्त्रियांना वाटते. अनेक विद्यार्थिनीनी याचे मूल्यमापन करू शकत नाही असे म्हणतात किंवा सांगू शकत नाही असे मत नोंदवतात.

अर्थनिर्वचन –

एकंदरीत सर्व गटांचा विचार केल्यास महर्षी कर्वे यांचे कार्य सर्वाधिक स्त्रीशिक्षणाच्या दृष्टीने मूल्यवान वाटते आहे. त्यासाठी ३६% स्त्रिया आपले मत नोंदवताना दिसून येते. त्यावेळच्या


समाजस्थितीत स्त्रियांना शिकायला मिळणे हीच एक मूलभूत समस्या होती. महर्षी कर्वे यांच्यामुळेच आम्ही मुली/स्त्रिया शिकू शकलो असे जास्त विद्यार्थिनींना वाटते. मुलाखतीतही अनेक विद्यार्थिनीनी सांगतात की, आज आम्ही समाजात जे काही स्थान मिळवले आहे ते केवळ महर्षी कर्वे यांच्या शैक्षणिक कार्यामुळेच आपल्या प्रगतीचे सर्व श्रेय त्या महर्षी कर्वे यांना देतात.

कोष्टक क्र. ४.७ समाजाचा स्त्रीशिक्षणाविषयी दृष्टीकोन

प्र. ड – १) १८ व्या शतकात समाजाचा स्त्रीशिक्षणाबाबतचा दृष्टीकोन कसा होता?

	गट १	गट २	गट ३	गट ४	गट ५	एकूण	शेकडा
१) संकुचित	०१	०५	२१	२०	१८	६६	३१
२) नकारात्मक	–	–	०६	१८	२१	४२	२०
३) मागासलेला	–	–	०९	१८	२४	५१	२४
४) उदासीन	–	०५	–	०५	०७	१७	०८
५) नोंद नाही	–	–	०७	०९	१०	२६	१२
६) इतर	–	०७	–	–	–	०७	०३

आलेख क्र. ४.९ समाजाचा स्त्रीशिक्षणाविषयी दृष्टीकोन



विश्लेषण –

अठराव्या शतकात समाजाचा स्त्रीशिक्षणाबाबतचा दृष्टिकोन अतिशय संकुचित होता. हेच वरील कोष्टकातील सांख्यकीय विश्लेषणातून दिसून येते. त्याकाळी समाजात स्त्रीला दुय्यम दर्जाची वागणूक मिळत असे. त्यामुळे स्त्रीला शिक्षण मिळावे असा विशाल दृष्टीकोन समाजात नव्हता. गट क्र. १ ते ५ मधील २०% विद्यार्थिनींनी समाजात स्त्री शिक्षणाबाबत नकारात्मक विचार होते असे नोंदवले आहे. तर ८% स्त्रिया समाज स्त्रीशिक्षणाबाबत उदासीन होता असे म्हणतात. अनेक विद्यार्थिनींनी समाजाच्या दृष्टीकोनाचे वर्णन 'चूल व मूल', 'रांधा वाढा उष्टी काढा' अशा शब्दातही नोंदवले आहे.

याशिवाय स्त्रियांनी शिकून काय करायच? स्त्री शिकली तर ती लवकर विधवा होते. स्त्री साक्षर झाल्यास धर्म बुडेल. कुटुंबाचा ऱ्हास होईल अशा अनेक अंधश्रद्धा तत्कालीन समाजामध्ये होत्या (आठवले १९९७).

अर्थनिर्वचन –


एकंदरीत गट क्र. १ ते ५ यामध्ये सर्वांनीच **स्त्रीशिक्षणाबाबत तत्कालीन समाजाचा दृष्टिकोन** अत्यंत **संकुचित** होता असे म्हटले आहे. आणि २४% स्त्रियांनी स्त्रीशिक्षणाबाबत समाज उदासीन होता असे सांगितले आहे.

कोष्टक क्र. ४.८ स्त्री शिक्षणाच्या सुविधा

प्रश्न ड – २) तत्कालीन परिस्थितीत स्त्री शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध होत्या / नव्हत्या ?

	गट १	गट २	गट ३	गट ४	गट ५	एकूण	शेकडा
१) नव्हत्या	–	०४	१७	३५	३२	८८	४२
२)काही प्रमाणात होत्या	–	०६	१६	१५	२२	२९	३०
३) होत्या	०१	–	०६	०५	१५	२७	१३
४) नोंद नाही	–	–	११	१५	११	३७	१८

आलेख क्र. ४.१० १८ व्या शतकात स्त्री शिक्षणाच्या सुविधांची उपलब्धता



विश्लेषण –

तत्कालीन परिस्थितीत स्त्री शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध होत्या की नव्हत्या याबाबत संमिश्र प्रतिक्रिया दिसून आल्या आहेत. केवळ १३% स्त्रियांना वाटते की अशा सुविधा उपलब्ध होत्या. १८% स्त्रियांनी तर आपले याबाबतचे मत नोंदवलेले नाही. ३०% विद्यार्थिनी म्हणतात की काही प्रमाणात सुविधा उपलब्ध नव्हत्या. गट क्र. १ मधील विद्यार्थिनी ही १९३१ साली महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेत शिकत होती. तरीही त्याकाळी स्त्रियांच्या शिक्षणाच्या सोयी निर्माण करुन दिल्या होत्या असे मत नोंदवले आहे. महर्षी कर्वे यांच्या आत्मवृत्तातही याची माहिती मिळते की, महर्षी कर्वे यांनी मुलींसाठी स्वतंत्र शाळा, स्वतंत्र वसतिगृह काढले, खेळासाठी प्रशस्त मैदान होते, पोहण्यासाठी तलाव होता व शाळेत शिकवण्यासाठी उत्तम अध्यापक वर्गही होता. असे त्यांच्या आत्मवृत्तात नमूद केले आहे.

परंतु समाजात इतरत्र मात्र अशा सुविधा नव्हत्याच असे ४२% मुली सांगतात. गट क्र. २ ते ४ मध्ये सर्वाधिक प्रतिक्रियांमध्ये सुविधा उपलब्ध नव्हत्या अशीच माहिती मिळते. कारण स्त्री शिक्षणाबाबत समाजाचा अत्यंत संकुचित व मागासलेला दृष्टीकोन होता हे मागील प्रश्नाच्या उत्तरामध्ये आलेच असल्याने शैक्षणिक सोयी उपलब्ध होणे शक्यच नव्हते.

अर्थनिर्वचन –

एकंदरीत तत्कालीन सामाजिक संदर्भातून असे जाणवते की स्त्रियांनी शिक्षण घेणे ही गोष्ट्च लोकांना पटत नव्हती. त्यामुळे त्यांच्यासाठी कोणत्याही शैक्षणिक सुविधा असणं अवघडच होते.

- **उद्दिष्ट क्रमांक २ – महर्षी कर्वे यांनी निर्माण केलेल्या समाजाभिमुख शिक्षणाचा आढावा घेणे**

वरील उद्दिष्टपूर्तीसाठी संशोधकाने संबंधित संदर्भ साहित्याचा अभ्यास करताना असे दिसून आले की, महर्षी कर्वे यांनी स्त्री शिक्षणाचे कार्य हाती घेताना काही विशिष्ट हेतू नजरेसमोर ठेवले होते. त्यांच्या आत्मचरित्रात त्यांचा उल्लेख आहेच. प्रकरण दोनमध्येही संशोधकाने त्यांचा समावेश केलेला आहे. त्यावरुन असे ध्यानात आले की, स्त्री केवळ शिकली म्हणजे कार्य संपले नव्हे तर ती सक्षम, सबला, स्वावलंबी झाली पाहिजे असे महर्षी कर्वे यांचे विचार होते.


परंतु समाजाचा यास प्रचंड विरोध होता. नवाकाळ, इंदूप्रकाश, दर्पण अशा वृत्तपत्रातून त्यांच्यावर टिकाही झाली. महर्षी कर्वे यांनी अत्यंत संयमाने, शांतपणे आपले कार्य चालू ठेवले. समाजाची मानसिकता व स्त्री शिक्षणास होणारा विरोध या संदर्भात विचार करून त्यांनी स्त्रीशिक्षणाचा अभ्यासक्रम ठरविला. समाजाची, कुटुंबाची स्त्रीकडून असणारी अपेक्षा जाणली ती उत्तम गृहिणी, उत्तम पत्नी, उत्तम माता असावी हीच समाजाची अपेक्षा होती. महर्षी कर्वे यांनी त्याच्याशी संबंधित असा अभ्यासक्रम निर्माण केला त्यात आरोग्यशास्त्र, प्रपंचशास्त्र, बालसंगोपनशास्त्र, गृहशास्त्र अशा विषयाचा समावेश केला आणि शिक्षण पूर्ण झालेल्या स्त्रियांना बी.ए. ही पदवी न देता 'गृहीतागमा' ही पदवी दिली. अभ्यासक्रमातच तिला कुटुंबाचे आरोग्य, गृहपयोगी कामे, संसारास उपयुक्त अशा अनेक गोष्टी शिकवल्या जाऊ लागल्या. त्यामुळे समाजाचा, कुटुंबाचा त्यांना होणारा विरोध मावळला.

कोष्टक क्र. ४.९ महर्षी कर्वे यांच्या कार्याची उपयुक्तता

प्रश्न क – ६ सद्यस्थितीत (मुलाखत घेताना) महर्षी कर्वे यांच्या कार्याची उपयुक्तता वाटते का?

	गट १	गट २	गट ३	गट ४	गट ५	एकूण	शेकडा
१) होय	०१	१०	४८	६७	७१	१९७	९३
२) नाही	–	–	–	–	०२	०२	००
३) नोंद नाही	–	–	०२	०३	०७	१२	०.७

आलेख क्र. ४.११ महर्षी कर्वे यांच्या कार्याची उपयुक्तता



विश्लेषण –

प्रत्यक्ष मुलाखत घेताना, प्रश्नावली भरुन घेतानाच्या काळात महर्षी कर्वे यांच्या कार्याची उपयुक्तता अतिशय स्पष्टपणे विद्यार्थिनींनी नोदवली आहे. ९३% विद्यार्थिनींना महर्षी कर्वे यांचे स्त्री शिक्षणविषयक कार्य आजही उपयुक्त वाटते आहे. ७% विद्यार्थिनींनी याबाबत आपले विचार व्यक्त केले नाहीत.

अर्थनिर्वचन –


महर्षी कर्वे यांचे स्त्री शिक्षणविषयक कार्य **आजही उपयुक्त** वाटते आहे. सन १८९६ साली स्थापन केलेली महर्षी कर्वे यांची संस्था ही आज १२५ वर्षानंतरही स्त्रीशिक्षणाचे कार्य अविरत करीत आहे. कालानुरुप अनेक बदलही घडवून आणले आहे. समाजात स्त्रियांना गरज असलेल्या आधुनिक युगातील सर्व शाखांमधील शिक्षणाच्या संधी संस्थेत उपलब्ध आहेत. संस्थेच्या एकूण ६७ शाखांमधून स्त्रीशिक्षणाचे कार्य चालले आहे. त्यासाठी आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध असल्याने त्यांचे हे कार्य सद्यस्थितीतही उपयोगी ठरत आहे.

कोष्टक क्र. ४.१० शिक्षणाचा फायदा

प्रश्न क्र ड – ३ : तुमच्या कौटुंबिक जीवनाला शिक्षणाचा कोणता फायदा झाला ?

	गट १	गट २	गट ३	गट ४	गट ५	एकूण	शेकडा
अ) अर्थाजन करता आले	–	०५	३९	५९	४७	१५०	७१
ब) मुलांवर संस्कार करता आले	०१	०९	४३	५४	४१	१४८	७०
क) कौटुंबिक जबाबदारी पार पाडता आली	०१	०९	४५	६४	४५	१६४	७८
ड) बचत, स. सेवा इ. सवयी लागल्या	०१	०७	४४	६०	६३	१७५	८३

आलेख क्र. ४.१२ शिक्षणामुळे स्त्रियांना झालेले फायदे



विश्लेषण –

गट क्र. १ मधील विद्यार्थिनींने शिक्षणाचा फायदा झाला हे सांगताना अनेक बाबी नोंदवल्या आहेत आहेत जसे की, मुलांवर संस्कार करता आले, कौटुंबिक जबाबदारी पार पाडता आली आणि बचत, काटकसर, समाजसेवा अशा चांगल्या सवयी लागल्या असे म्हटले आहे. १९३१ साली शिक्षण घेतलेल्या आजी मुलाखतीत सांगतात की मी संस्थेत शिवणकाम शिकले व त्यामुळे नंतर माझ्या लहान मुलांचे कपडे मी स्वतः शिवले, अर्थार्जन करता आले नाही तरी कुटुंबास फायदा झाला, मुलाखती दरम्यान काही स्त्रियांनी सांगितले की, मी शिकून नोकरी केली नाही परंतु माझ्या मुलांचा अभ्यास मी घेवू शकले. मला शिक्षणाचा हा फार मोठा उपयोग झाला.

गट क्र. २ मधील स्त्रिया संस्कार व कौटुंबिक जबाबदारी यास समान मत देतात. गट क्र. ३, ४ व ५ मध्येही याच पर्यायांस सहमती दर्शवली आहे, तरीही एकंदरीत विचार केल्यास संस्थेतील शिक्षणामुळे बचत, काटकसर, समाजसेवा अशा सवयी लागल्या असे ८३% स्त्रियांना वाटते.

गट १ ते ५ मध्ये सर्वात कमी पसंती अर्थाजनास दिसते कारण स्त्रियांच्या शिक्षणाचा उपयोग पैसे कमावण्यासाठी व्हावा असा विचार समाजात त्यावेळी रुजलेला नव्हता. त्यामुळे पूर्वी स्त्रिया शिकल्या तरीही नोकरी करण्यासाठी फारश्या बाहेर पडत नव्हत्या असे सांख्यिकिय माहितीवरुन लक्षात येते.

अर्थनिर्वचन –

चांगल्या सवयीबरोबरच कौटुंबिक जबाबदारी व **संस्कारक्षमता** हे गुण प्राप्त झाले असे लक्षात येते. असे अनेक फायदे झाल्यामुळे महर्षी कर्वे यांच्या कार्याचा प्रसार झाला व दिवसेंदिवस संस्थेतील विद्यार्थिनींची संख्या वाढतच गेली अशी माहिती महर्षी कर्वे यांच्या आत्मचरित्रातून मिळते. त्यामुळे स्त्री शिक्षणास होणारा विरोधही हळूहळू कमी झाला. त्यांचे कार्य समाजाभिमुख बनले.

कोष्टक क्र. ४.११ संस्थेचा उपयुक्त अभ्यासक्रम

प्रश्न ड – ४ : संस्थेत कोणता उपयुंक्त अभ्यासक्रम शिकवला जात होता ? त्याचा प्रत्यक्षात कसा उपयोग झाला?

	गट १	गट २	गट ३	गट ४	गट ५	एकूण	शेकडा
१) गृहिणी म्हणून गृहशास्त्राचा उपयोग	०१	०८	३९	४१	३२	१२१	५७
२)दैनंदिन व्यवहाराज्ञान मिळाले	०१	०८	४५	६२	४९	१६५	७८
३)कला शिक्षणाचा उपयोग	०१	०९	३१	४९	४६	१३६	६४
४) आत्मविश्वास मिळाला	०१	१०	४६	६३	६८	१८८	८९

विश्लेषण –

गट क्र. १ ते ५ मधील सर्वच स्त्रियांनी सर्व पर्यायांना पसंती दिली आहे. महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेत शिक्षण घेताना जो अभ्यासक्रम घेतला जात होता तो सर्व दृष्टीने उपयुक्त होता असे वाटते. सर्वात जास्त ८९% स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला असे दिसून येते. त्याखालोखाल दैनंदिन व्यवहारज्ञान शिक्षणातून मिळाले असे ७८% स्त्रिया म्हणतात; आणि कला शिक्षणाचा उपयोग ६४% स्त्रियांना आपल्या जीवनात झाला अशी माहिती मिळते. महत्त्वाचे म्हणजे शिक्षणामुळे स्त्रियांमध्ये **आत्मविश्वास निर्माण झाला**.

वरील तक्त्यातील नोंदीचे निरीक्षण केल्यास असे लक्षात येते की शिक्षणामुळे स्त्रियांमध्ये आत्मविश्वास आला आणि प्रत्यक्ष जीवन जगताना त्याचा उपयोग झाला. याशिवाय केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे तर दैनंदिन व्यवहारज्ञान मिळाले. पूर्वी शिवणकाम, भरतकाम इ. कलाविषयाचे शिक्षण दिले जाई ज्याचा कुटुंबासाठी फायदा झाला आणि गृहिणी म्हणूनही गृहशास्त्र विषय उपयोगी ठरला.

अर्थनिर्वचन –

सर्वात जास्त ८९% स्त्रियांमध्ये **आत्मविश्वास** निर्माण झाला असे दिसून येते. खरंतर वरील सर्वच बाबी स्त्रियांसाठी उपयुक्त ठरलेल्या आहेत.

- **उद्दिष्ट क्र. ३ : महर्षी कर्वे यांच्या स्वतंत्र शिक्षण पद्धतीचा स्त्री जीवनावर झालेले दृष्य परिणाम जाणून घेणे.**


कोष्टक क्र. ४.१२ महर्षी कर्वे यांच्या विचारांचा विद्यार्थिनींवरील प्रभाव

प्रश्न क – ५ : महर्षी कर्वे यांच्या विचारांचा तुमच्यावर कोणता प्रभाव पडला?

	गट १	गट २	गट ३	गट ४	गट ५	एकूण	शेकडा
१) स्वावलंबन	०१	०१	११	०४	१३	३०	१४
२) स. सेवा	०१	०४	१५	१४	१०	४४	२१
३) आत्मविश्वास	०१	–	०४	०५	०३	१३	०६
४) संस्कार	०१	–	११	०२	१४	२८	१३
५) शैक्षणिक कार्य	०१	–	०५	११	१२	२९	१४
६)सहकार्य भावना	०१	०१	०३	०७	०७	१९	०९
७) कष्ट/जिद्द/चिकाटी	०१	०१	०१	१०	–	१३	०६
८) व्यवहारज्ञान	०१	०३	–	०५	१२	२१	१०
९) नोंद नाही	–	–	–	१०	१५	२५	१२

गट क्र. १ मधील सर्व पर्याय योग्य धरले आहेत.

आलेख ४.१३ महर्षी कर्वे यांच्या विचारांचा विद्यार्थिनींवर पडलेला प्रभाव



विश्लेषण –

गट क्र. १ मध्ये एकाच विद्यार्थिनीचा सहभाग असून सर्व पर्यायांना तिने पसंती दर्शवली आहे. महर्षी कर्वे यांच्या विचारांचा परिणाम **स्वावलंबन, समाजसेवा, आत्मविश्वास, संस्कार, शैक्षणिक कार्य करण्याची आवड, सहकार्य, भावना, कष्ट–चिकाटी –जिद्द व व्यवहारज्ञान** अशा सर्व बाबतीत झालेला दिसून येतो. गट क्र. २ मध्ये समाजसेवावृत्ती निर्माण झाली असे लक्षात येते. तर गट क्र. ३, ४, ५ मध्ये सर्व पर्यायांना पसंती दिलेली दिसत आहे.

अर्थनिर्वचन –

एकंदरीत वरील सर्व गुणांचा मुलींवर इष्ट परिणाम झाला असून सर्वात जास्त २१% स्त्रियांमध्ये आपणही समाजसेवा करावी ही वृत्ती वाढीस लागल्याचे दिसून येते. मुलाखतीमधूनही स्त्रिया सांगतात की, आपल्याला जेवढी शक्य आहे तेवढी मदत समाजास करण्याची सवय लागली. विशेषतः ज्या शिक्षिका म्हणून काम करत आहेत त्या गरीब, गरजू विद्यार्थिनींना शिकवतात. शैक्षणिक मदत करतात. त्यांचे पालकत्व स्विकारतात असे लक्षात आले. महर्षी कर्वे यांनी स्त्रियांना केवळ शिकवले नाही तर सक्षमही केले.

महर्षी कर्वे यांच्या अंगी असणाऱ्या स्वावलंबन, समाजसेवा, आत्मविश्वास, शिक्षणाबद्दल ओढ, सहकार्याची भावना, कष्ट व जिद्द, अशा सर्व गुणांचे संक्रमण पुढील पिढीच्या दैनंदिन जीवनात झाल्याचे दिसून येते. अगदी मोजक्याच विद्यार्थिनींनी महर्षी कर्वे यांना प्रत्यक्ष पाहिले आहे. परंतु अनेक जणींनी त्यांच्याबद्दलच्या लेखनातून त्याच्याविषयी माहिती मिळविण्याचे सांगितले आहे. ज्या व्यक्तींच्या कार्यामुळे, कष्टामुळे आपण यशस्वी झालो. त्यांच्यातील एकतरी गुण प्रत्येकीमध्ये दिसून येतो आहे.

विशेषतः समाजसेवा करणे या बद्दलची मते सर्वात जास्त दिसतात. म्हणजे स्वतःचे कुटुंब, संसार, नोकरी सांभाळून आपल्याला जे–जे शक्य आहे ती सेवा विद्यार्थिनी करत आहेत. शिक्षिका आपल्या ज्ञानदानाच्या माध्यमातून गरजूपर्यंत पोहचत आहेत. व इतरही अनेक मुली यथाशक्ती महर्षी कर्वे यांचे कार्य पुढे नेत आहेत.

महर्षी कर्वे यांनी 'निष्काम कर्म मठाची' स्थापना याच हेतूने केली होती. जेणेकरून ज्या स्त्रिया शिकल्या त्यांनी या मठाच्या माध्यमातून इतर स्त्रियांना साक्षर करण्याचे काम निःस्वार्थपणे करावे. केवळ स्वतः शिकून थांबायचे नाही तर इतरांनाही त्यासाठी मदत करावी हा हेतू महर्षी कर्वे यांचा होता. तो साध्य झाल्याचे प्रत्यक्षात पाहावयास मिळते आहे.

जे–जे चांगले दुसऱ्याला देण्यासारखे आहे ते द्यावे. हा संस्कार मुलींमध्ये रुजला. आत्मविश्वासाने वावरत, इतरांना सहकार्य करत स्वावलंबी जीवन जगत महर्षी कर्वे यांचे स्वप्न विद्यार्थिनींनी साकार करीत आहेत असे वाटते. महर्षी कर्वे स्वतःचे काम स्वतःच करत आणि ते उदाहरणामधून दाखवून देत असत.

अनेक विद्यार्थिनींनी संस्थेला आजही देणगी स्वरुपात मदत करत आहेत. अशी माहिती मुलाखतीद्वारे मिळाली आहे. कारण संस्था खूप विस्तारली आहे. विकसित झाली आहे. अजूनही काही प्रमाणात अनाथ, गरीब, गरजू मुलींचे शिक्षण संस्थेत चालू आहे. त्याला हातभार लावण्याचे काम विद्यार्थिनी करत आहेत ही अत्यंत उल्लेखनीय बाब आहे.

प्रश्न क – ७ : महर्षी कर्वे यांचा तुमच्या जीवनावर कोणता परिणाम झाला?

विश्लेषण –

या प्रश्नाच्या उत्तरामध्ये खूप विविधता आढळून आली. समाजसेवेची आवड निर्माण झाली. सहकार्यवृत्ती वाढीस लागली, स्वावलंबन, आत्मविश्वास, धाडस, समानता इत्यादी मुल्यांची जोपासना झाली व नकळत सुसंस्कार घडत गेले. महर्षी कर्वे यांच्यामुळे आपण शिकू शकलो.

अर्थनिर्वचन –

स्वावलंबी व सक्षम झालो याची जाणीव स्त्रियांमध्ये दिसून आली. महर्षी कर्वे यांच्या कार्यामुळेच आम्ही आमची प्रगती करू शकलो. अशाही भावना व्यक्त केल्या गेल्या. संस्थेकडून 'भाऊबीज निधी' हा उपक्रम दरवर्षी राबविला जातो. त्यामध्ये प्रत्यक्ष सहभागी होऊन समाजातील दानशूर व्यक्तींकडून संस्थेला निधी मिळवून दिला जातो. या उपक्रमात इथे शिक्षण घेतलेल्या मुलींचा सक्रिय सहभाग आहे.

कोष्टक क्र. ४.१३ शिक्षणामुळे जीवनात झालेले बदल


प्रश्न ड – ५ : शिक्षणामुळे सामाजिक जीवनात स्त्री म्हणून कोणते बदल जाणवले?

	गट १	गट २	गट ३	गट ४	गट ५	एकूण	शेकडा
१) आत्मविश्वास निर्माण झाला	०१	१०	४८	६८	६७	१९४	९२
२) स्वावलंबी जीवन/वैयक्तिक स्वातंत्र्य मिळाले	०१	०९	३६	५९	६५	१७०	८१
३) कुटुंबात स्त्री असूनही अधिकार मिळाले	–	१०	२९	४९	४८	१३६	६४
४) स्त्री पुरुष समानता जाणवली	–	०५	२७	४१	४५	११८	५६

शिक्षणामुळे स्त्रियांच्या सामाजिक जीवनात झालेला बदल

अ	आत्मविश्वास
ब	स्वावलंबन
क	अधिकार
ड	समानता

आलेख क्र. ४.१४ शिक्षणामुळे झालेला बदल



विश्लेषण –

गट क्र. १ मध्ये आत्मविश्वास व स्वावलंबनाच्या दृष्टीने बदल जाणवले. गट २ मध्ये स्वावलंबी व स्वतंत्र जीवन अनुभवता आले असे दिसते. गट क्र. ३, ४ व ५ मध्येही सर्वच पर्यायांना पसंती दिली आहे. परंतु सर्वात जास्त ९२% स्त्रियांमध्ये **आत्मविश्वास** निर्माण झाला आहे. ८१% स्त्रिया शिक्षणामुळे **स्वावलंबी** झाल्या तर ६४% स्त्रियांना शिक्षणामुळे कुटुंबात अधिकार मिळाले. सर्वात कमी ५६% स्त्रियांना शिक्षणामुळे समानता निर्माण झाली असे वाटते.

अर्थनिर्वचन –


स्त्रियांना शिक्षण मिळाल्यामुळे सामाजिक जीवनात महत्त्वपूर्ण बदल जाणवले हाच त्यांच्या जीवनावर शिक्षणाचा झालेला दृष्य परिणाम म्हणता येईल. प्रश्नावलीतून मिळालेल्या उत्तरांच्या आधारे असे सांगता येईल की, महत्त्वाची गोष्ट म्हणजे शिक्षणामुळे स्त्रियांमध्ये मोठ्या प्रमाणावर आत्मविश्वास निर्माण झाला आहे. आत्मविश्वास असेल तर कोणत्याही प्रसंगाला सामोरे जाता येते. संकटावर मात करता येते. अडचणीमधून मार्ग काढून जीवन यशस्वी करता येते. त्यामुळे आत्मविश्वास मिळाला हा अत्यंत महत्त्वाचा दृष्य परिणाम स्त्रियांच्या जीवनावर झालेला दिसतो. याशिवाय स्वतःच्या पायावर उभं राहणं, स्वावलंबी जीवन जगण्याचे आत्मिक समाधानही मिळाले. ज्या स्त्रीला सर्वत्र दुय्यम स्थान होते. त्या स्त्रिला शिक्षणामुळे कुटुंबात थोडे अधिकारही मिळाले. ती काही निर्णय घेवू शकली. स्त्री पुरुष समानता मात्र काही प्रमाणात जाणवते. म्हणजे स्त्री शिकली, **स्वतंत्र, सबला झाली, अर्थार्जन करु लागली**. पुरुषांच्या बरोबरीने सर्व कार्यक्षेत्रात काम करीत आहे. परंतु समानता मात्र अजूनही पूर्णपणे झालेली दिसत नाही ही खरी शोकांतिका आहे. ताराबाई शिंदे, सावित्रीबाई फु ले, पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे अशा अनेक स्त्रियांची उदाहरणे देता येतील की ज्यांनी स्त्री पुरुषांमध्ये समानता निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. काही प्रमाणात यश आले, नाही असे नाही परंतु खऱ्या अर्थाने सद्यस्थितीतही स्त्रियांना समान हक्कासाठी लढे द्यावे लागतात. ही सत्य परिस्थिती आहे.

कोष्टक क्र. ४.१४ शिक्षणाचे फायदे / महत्त्व

प्रश्न ड – ६) शिक्षणामुळे झालेल्या फायद्यासाठी कोणत्या गोष्टीस जास्त महत्त्व द्याल?

	गट १	गट २	गट ३	गट ४	गट ५	एकूण	शेकडा
अ) आत्मविश्वास	०१	१०	४९	६४	६०	१८४	८७
ब)सामाजिक प्रतिष्ठा	–	०९	३१	४१	४१	१२२	५८
क) साक्षरता	०१	०७	५९	५९	५६	१६५	७८
ड)समाजसेवेचे व्रत	०१	०७	२७	२७	३३	१०२	४८

आलेख क्र. ४.१५ शिक्षणामुळे स्त्री जीवनावर झालेला दृष्य परिणाम



विश्लेषण –

शिक्षणामुळे गट क्र. १ मधील विद्यार्थिनीला आत्मविश्वास मिळाला. साक्षरता आली व समाजसेवेची आवड लागली. गट क्र. २ मध्ये सर्वांना आत्मविश्वास मिळाला व सामाजिक प्रतिष्ठाही मिळाली. गट क्र. ३ ते ५ मध्ये सामाजिक प्रतिष्ठा, साक्षरता व समाजसेवा या बाबतीत जवळपास समान मतं आहेत. परंतु गट क्र. १ ते ५ मध्ये सर्वात जास्त आत्मविश्वास मिळाला असे ८७% स्त्रियांना

वाटते. त्यमानाने शिक्षणामुळे समाजिक प्रतिष्ठा मात्र ५८% स्त्रियांना मिळाली असे वाटते. शिक्षण घेऊनही स्त्रियांची सामाजिक प्रतिष्ठा, समाजातील स्थान फारसे बदललेले दिसत नाही.

अर्थनिर्वचन –

शिक्षणामुळे अनेक गोष्टी आत्मसात होतात. परंतु केवळ बौद्धिक ज्ञान म्हणजे शिक्षण नव्हे. त्याबरोबर नैतिक मूल्यांचे संवर्धन व संक्रमण व्हावे हा ही शिक्षणाचा एक महत्त्वपूर्ण हेतू आहे. महर्षी कर्वे यांच्या शैक्षणिक कार्यामुळे स्त्रिया साक्षर तर झाल्याच परंतु त्यांच्यात आत्मविश्वास आला. स्वतःमध्ये निर्माण झालेल्या विश्वासामुळे माणसात प्रचंड शक्ती निर्माण होते. कोणतेही कठीण कामही सोपे होते. असा महत्त्वपूर्ण **आत्मविश्वास स्त्रियांमध्ये निर्माण झाला. सर्वात जास्त या पर्यायास पसंती मिळाली आहे.** त्यानंतर साक्षरता महत्त्वाची वाटते आणि आत्मविश्वास व साक्षरतेमुळेच कदाचित स्त्रियांना समाजात प्रतिष्ठा मिळू लागली असे वाटते.

'महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था' ही एक सामाजिक संस्था आहे. महर्षी कर्वे यांनी शैक्षणिक कार्याबरोबरच समाजिक कार्यही केले. त्यामुळे इथे शिक्षण घेतलेल्या मुलींवर इष्ट परिणाम झालेला दिसून येतो. कारण समाजसेवेचे व्रत याही पर्यायास मते दिली आहेत. आपल्या परीने प्रत्येकजण समाजाचे उपकार फेडण्याचा प्रयत्न करीत आहे.

मुलाखती व प्रश्नावलीतील सविस्तर उत्तरांमध्ये अनेक विद्यार्थिनींनी अशा प्रकारची मते मांडली आहेत. ज्या ठिकाणी, ज्या क्षेत्रात सध्या मुली आहेत त्या–त्या ठिकाणी जमेल तशी समाजसेवा विद्यार्थिनी करीत आहेत.

उदा. महिलाश्रम हायस्कूलच्या माजी विद्यार्थिनी संघाची अध्यक्ष म्हणून काम पाहणारी माजी विद्यार्थिनी सौ. दिप्ती देशपांडे ह्या निवृत्त शिक्षिका असून प्रशालेच्या शिष्यवृत्ती वर्गाचे अध्यापन त्या विनामोबदला व स्वेच्छेने करतात.

कुसुमताई शेंडे नावाच्या वयोवृद्ध विद्यार्थिनी दरवर्षी भरपूर देणगी गोळा करतात. गरीब–गरजू मुलींना हरप्रकारे मदत करतात. त्यांनी लिहिलेल्या 'उतराई' या पुस्तकात त्या सांगतात की 'मी महर्षी कर्वे यांचा समाजसेवेचा वसा पुढे चालवत आहे.'

महर्षी कर्वे यांच्या कार्याचा असा कृतियुक्त प्रभाव संस्थेत शिकलेल्या मुलींवर पडलेला दिसून येतो. गरीब–गरजू म्हणून शिकून गेलेल्या व सध्या चांगल्या पदावर नोकरी करणाऱ्या मुलीही याच भावनेने काम करून महर्षी कर्वे व संस्था यांच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी धडपड करताना दिसत आहेत.

- **सर्वेक्षणातून मिळालेल्या माहितीचा सारांश : (प्रश्नावली आणि मुलाखत)**

  स्त्रियांच्या आयुष्यावर शिक्षणाचा दृश्य परिणाम कसा झाला ?

यासाठी प्रश्नावली व मुलाखत या साधनाद्वारे माहिती घेतल्यानंतर विद्यार्थिनींकडून महर्षी कर्वे यांच्या शैक्षणिक कार्याबद्दल अंत्यत उपयुक्त अशी माहिती मिळाली. शैक्षणिक सालानुसार (१९१६ ते २०१५) केलेल्या पाच गटांतून शिक्षणामुळे ९९% विद्यार्थिनींनी स्वतःला आत्मविश्वास मिळाला असे नमूद केले. याशिवाय वसतिगृहातील रोजच्या दैनंदिन कामामुळे स्वालंबन, सहकार्य, बचत, जिद्द, काटकसर असे गुण अंगी बाणले गेले. ज्याचा उपयोग संसारासाठी झाला हे सांगितले आहे. संस्थेत शिक्षणासाठी उत्तम सुविधा उपलब्ध असल्याने ८९% स्त्रिया महर्षी कर्वे यांचे शैक्षणिक कार्य महत्त्वाचे मानतात. महर्षी कर्वे हे स्वतःच स्वावलंबी होते. त्यांच्या या गुणांचा परिणाम मुलींवर झाला. समाजाभिमुख अभ्यासक्रमामुळे संसारास हातभार लावता आला. दैनंदिन व्यवहारज्ञान मिळाले असेही ७८% स्त्रिया म्हणतात.

मुलाखतीद्वारे मिळालेल्या माहितीत काही विद्यार्थिनी सांगतात की, शिक्षण घेऊन नोकरी जरी केली नाही तरी कुटुंबाच्या उपयोगी अशी कामे करता आली. मुलांचा अभ्यास घेता आला. शिवणकाम करून चार पैसे मिळवता आले. खंबीरपणे जगता आले. हा शिक्षणाचा दृश्य परिणाम जाणवला. सहकार्यवृत्ती निर्माण झाली. गरजूंना मदत करण्याची सवय लागली. अनेक विद्यार्थिनी यथाशक्ती समाजसेवाही करत आहेत असे समजले.

मुलाखती व प्रश्नावलीतील प्रश्नांच्या उत्तरामधून जास्तीत जास्त स्त्रिया असे मत व्यक्त करताना दिसतात की महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध केल्यामुळेच आम्ही शिकू शकलो, त्यांच्या कार्यामुळे स्त्रीचे समाजातील स्थान उंचावले, समाजाची स्त्रियांकडे बघण्याची

दृष्टी बदलली. त्यांच्या कार्यामुळे जीवनपयोगी संस्कार मिळाले म्हणून महर्षी कर्वे यांचे स्त्री शिक्षणाचे कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. पूर्वीप्रमाणे त्यांचे हे कार्य सद्य स्थितीतही उपयोगी ठरते.

स्त्रियांमध्ये सदगुण अंगी बाणल्यामुळे ते पुढच्या पिढीत संक्रमीत झाले. कुटुंब व समाजास स्त्री शिक्षणाचा फ ायदा झाला. त्यामुळे स्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढत गेले. स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन त्या स्वावलंबी व सक्षम बनल्या. एकविसाव्या शतकात सर्वच क्षेत्रात स्त्रिया आघाडीवर आहेत हा महर्षी कर्वे यांच्या स्त्री शिक्षणाच्या कार्याचा दृश्य परिणाम आहे असे म्हणता येईल.

४.६ संशोधकाचे मत

अभ्यास पूर्ण केल्यानंतर महर्षी कर्वे यांच्या कार्याबद्दल असे सांगता येईल की १२५ वर्षापूर्वी महर्षी कर्वे यांनी राबविलेल्या समाजाभिमुख शिक्षणपद्धतीमुळे व संस्कारक्षम उपक्रमामुळे स्त्रियांचे आयुष्य अंर्तबाह्य बदलून गेले. सध्याच्या शिक्षणपद्धतीत अंर्तभूत असलेले मूल्यशिक्षण, व्यक्तिमत्वविकास, व्यवसाय शिक्षण, कला रसास्वाद, कौशल्यविकास अशा ऐच्छिक विषयांचा समावेश केलेला दिसतो आहे. परंतु महर्षी कर्वे यांनी हे काम विविध उपक्रमाद्वारे घडवून आणले. यातून महर्षी कर्वे यांची दूरदृष्टी दिसून येते. त्यांचे कार्य हे विसाव्या शतकातही उपयुक्त ठरते.

आधुनिक युगातील शिक्षणतज्ञ, शास्त्रज्ञ, विचारवंत असे मत मांडतात की, मातृभाषेतूनच उत्तम शिक्षण होते. महर्षी कर्वे यांनीही सन १९१७ साली मुलींसाठी उच्च शिक्षणाची सोय केली. आणि ते सर्व शिक्षण त्यांनी मातृभाषेतूनच उपलब्ध करून दिले. मातृभाषेतून शिक्षणाला त्यांनी प्राधान्य दिले. पण इंग्रजी भाषेला कमी लेखले नाही. ज्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण घ्यायचे आहे त्यांनी इंग्रजीही शिकावे असे ते म्हणत. पार्वतीबाई आठवले या आपल्या मेहुणीला त्यांनी वयाच्या ४१ व्या वर्षी इंग्रजी शिकवले व अमेरिकेत पाठवले. यातूनच त्यांचे उच्च विचार ध्यानात येतात.

आपल्या सध्याच्या शिक्षण पद्धतीत बदल व्हायला हवा असे अनेकदा आपण ऐकतो. याचा अर्थ समाजाच्या गरजा ओळखून शिक्षणपद्धती, अभ्यासक्रम बदलला पाहिजे. हेच महर्षी कर्वे यांनी ऐकोणिसाव्या शतकात केले. त्यांचा हा विचार एकविसाव्या शतकातही उपयुक्त ठरतो असे वाटते. देशात बेरोजगार वाढताना दिसतो आहे. अशावेळी महर्षी कर्वे यांच्या सारख्या तज्ञांचे विचार उपयुक्त

ठरतात. एसएनडीटी या महर्षी कर्वे यांनीच स्थापन केलेल्या विद्यापीठाच्या होम सायन्स महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी समारंभात भाषण करताना विद्यापीठाच्या कुलगुरू शशिकला वंजारी म्हणतात, **''आज व्यवहारिक शिक्षणाची समाजाला गरज आहे.''** (महाराष्ट्र टाईम्स जून २०००) तर पुण्याच्या पोलीस आयुक्त रश्मी शुक्ला आपल्या भाषणात म्हणतात, ''मुलींच्या संगोपनात भेद नको'' याचा अर्थ आजही स्त्री–पुरुष भेद दिसून येतो. तो कमी करण्याचा प्रयत्न प्रथम महर्षी कर्वे यांनी आपल्या कार्यातून केला.

एकंदरीत स्त्री–पुरुष समानता, व्यवहारिक शिक्षण, समाजाभिमुख अभ्यासक्रम, मूल्यशिक्षण, मातृभाषेचे महत्त्व, अशा सर्वच बाबतीत महर्षी कर्वे यांचे विचार आजच्या परिस्थितीत उपयुक्त ठरतात असे म्हणता येईल. आजकाल पदवी म्हणजे शिक्षण अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. परंतु जीवनास उपयुक्त/कृतियुक्त शिक्षणाचाही विचार होणे आवश्यक वाटते. आणि यासाठी महर्षी कर्वे यांचे विचार व कार्य निश्चितच दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरतात.

४.७ समारोप

प्रकरण चारमधे संशोधनातून उपलब्ध झालेल्या माहितीचे आलेखाच्या माध्यमातून स्पष्टीकरण केले असून त्यामधून मिळालेल्या माहितीच्या आधारे विश्लेषण व अर्थनिर्वचन केले आहे.

प्रस्तुत प्रकरणातील अ भागात प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांद्वारे महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेल्या शैक्षणिक कार्याची जी माहिती संकलित झाली त्या संकलित माहितीची संशोधनाचा विषय व संशोधनाची उद्दिष्टे यानुसार मांडणी करुन विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले आहे. व ब भागात प्रश्नावली व मुलाखत या दुय्यम स्त्रोतांद्वारे महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेल्या शैक्षणिक कार्यामुळे स्त्रियांच्या जीवनावर कोणते दृष्य परिणाम झाले आहेत याचे त्यातील उत्तरांच्या आधारे कोष्टकीकरण करुन आलेखासह विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले आहे. प्रकरण पाचमधे प्रस्तुत संशोधनाचा सारांश, निष्कर्ष, शिफारशी व पुढील संशोधनासाठी विषय दिले आहेत.

प्रकरण पाचवे

सारांश, निष्कर्ष व शिफारशी

अ. क्र.	शीर्षक	पान क्र.
५.१	प्रस्तावना	१७५
५.२	शीर्षक	१७५
५.३	संशोधनाची गरज	१७६
५.४	संशोधनाचे महत्त्व	१७६
५.५	समस्या विधान	१७७
५.६	संकल्पनात्मक व्याख्या	१७७
५.७	कार्यात्मक व्याख्या	१७७
५.८	उद्दिष्ट्ये	१७८
५.९	संशोधन प्रश्न	१७८
५.१०	गृहीतके	१७९
५.११	संशोधनाची व्याप्ती,मर्यादा,परिमर्यादा	१७९
५.१२	संबंधित साहित्याचा आणि संशोधनाचा आढावा	१८०
५.१३	संशोधन पद्धती	१८२
५.१४	नमुना निवडीच्या पद्धती	१८२
५.१५	नमुना	१८२
५.१६	माहिती संकलनाची साधने	१८३

५.१७	महर्षी कर्वे यांचे स्त्री शिक्षणविषयक कार्य व परिणाम	१८४
५.१८	निष्कर्ष	१८५
५.१९	संशोधनाचे योगदान	१८७
५.२०	संशोधनाचे शैक्षणिक उपयोजन	१८८
५.२१	शिफारशी	१८८
५.२२	पुढील संशोधनासाठी विषय	१९०
५.२३	संशोधकाचा अभिप्राय	१९०
५.२४	समारोप	१९१

प्रकरण पाचवे

सारांश, निष्कर्ष व शिफारशी

५.१ प्रस्तावना

संशोधन कार्यातील महत्त्वाचा समजला जाणारा भाग म्हणजे संशोधनाचे निष्कर्ष होय. प्रस्तुत प्रकरणात संशोधकाने संशोधनाचा सारांश, संशोधनातील निष्कर्ष आणि काही शिफारशी नोंदविल्या आहेत.

भारतीय शिक्षण व्यवस्थेतील स्त्री शिक्षण विषयक दृष्टीकोन पाहिल्यास असे लक्षात येते की, वैदिक काळात स्त्री शिक्षणाची स्थिती उत्तम होती. या संदर्भात मैत्रीयी, गार्गी अशा स्त्रियांची नावे आपणास माहिती आहेत, परंतु त्यानंतर स्मृती कालखंडापासून स्त्री शिक्षणाची स्थिती अत्यंत बिकट होत गेली. १८ व्या शतकात तर स्त्रियांनी शिक्षण घेऊच नये अशी स्थिती निर्माण झाली. पितृसत्ताक पद्धतीमुळे कुंटुंब व समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान दिले गेले. त्यानंतर स्त्री शिक्षण मागे पडले. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात सन १८४८ साली महात्मा फुले यांनी स्त्रियांसाठी पहिली शाळा काढली व स्त्री शिक्षणाचा पाया घातला. त्यानंतर अनेक महापुरुषांनी स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली. विशेषतः महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी या क्षेत्रात अत्यंत भरीव कार्य केले. त्यामुळे स्त्री शिक्षणाची प्रगती झाली व स्त्री जीवनावर त्याचा इष्ट परिणाम झाला. प्रस्तुत संशोधनात यासंबंधी अभ्यास करण्यात आला आहे.

५.२ शीर्षक

'महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेल्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास व त्याचा स्त्री जीवनावरील दृश्य परिणाम'

५.३ संशोधनाची गरज

स्त्री शिक्षणाची त्यावेळची समाजातील स्थिती अत्यंत बिकट होती. तत्कालीन स्त्री जीवनाचे वर्णन ''रांधा वाढा आणि उष्टी काढा'' अशा शब्दात केले जाते. केवळ संसार, मुलबाळ, घरकाम हेच त्यांचे जगणे होते. स्त्रियांना कुटुंबात व समाजात कोणतेही हक्क, अधिकार, निर्णय स्वातंत्र्य नव्हते. समाजाच्या अनेकविध रुढी परंपरेत स्त्री जीवन अडकून पडले होते. त्यामुळे स्त्रीचे जगणे कठीण झाले. मग शिक्षण तर दूरच राहीले. अशा स्त्रियांना सुशिक्षित, कार्यक्षम व स्वावलंबी बनवण्याचे काम महर्षी कर्वे यांनी केले. आणि त्याचा इष्ट परिणाम स्त्री जीवनावर कसा झाला हे जाणून घेणे आवश्यक वाटले.

५.४ प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व

काळ हा गतिशील आहे. कालानुरुप परिस्थिती बदलते. त्याचा परिणाम आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रात दिसून येतो. शिक्षण ही देखील गतिशील प्रक्रिया असून ती अखंड चालत रहाते. म्हणून जसजशी परिस्थिती, काळ बदलेल तसा शिक्षणातही बदल घडून यायला हवा.

१२० वर्षापूर्वी महर्षी कर्वे यांनी शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य केले. स्त्रियांसाठी शाळा, वसतिगृह, महाविद्यालय, विद्यापीठ उभारले. स्त्रियांची परिस्थिती, त्यांची गरज व काळानुरुप आवश्यक ते शिक्षण स्त्रियांना मिळावे असा दूरदृष्टी विचार महर्षी कर्वे यांनी केला. तत्कालीन सामाजिक परिस्थिती ध्यानात घेऊन समाजाभिमुख असा अभ्यासक्रम त्यांनी तयार केला. त्यामुळे त्यांचे कार्य प्रगतीशील राहिले (बेदरकर – २००७, स्मरणिका).

महर्षी कर्वे यांनी केलेले कार्य हे सद्य परिस्थितीतही उपयुक्त ठरते. म्हणून त्यांच्या कार्याची माहिती घेणे गरजेचे वाटते. सामाजिकतेचे भान ठेऊन शिक्षण क्षेत्रात कसे काम करावे ? हे महर्षी कर्वे यांच्या कार्यातून समजेल. शिक्षणाचा मनुष्यजीवनावर परिणाम होतो. तो परिणाम बहुतांशी सकारात्मक ठरतो. महर्षी कर्वे यांनी केलेल्या स्त्री शिक्षणाच्या कार्यामुळे स्त्रियांच्या जीवनावर निश्चितच परिणाम झालेला दिसून येतो. त्याचा शोध घेतला आहे.

संशोधनाचे महत्त्व पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेल्या शैक्षणिक कार्याची माहिती मिळेल.

२) महर्षी कर्वे यांनी अनुसरलेल्या / अंगीकारलेल्या कालसापेक्ष समाजाभिमुख शिक्षणाची माहिती होईल.

३) १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात शिक्षणामुळे स्त्री जीवनावर कोणते दृश्य परिणाम झाले हे समजेल.

४) महर्षी कर्वे यांच्या कार्याची उपयुक्तता समजेल.

५) सामाजिक परिस्थितीत होणाऱ्या बदलानुसार सद्यपरिस्थितीत शैक्षणिक पद्धती व अभ्यासक्रमात बदल होणे आवश्यक वाटते. म्हणूनही हा अभ्यास महत्त्वपूर्ण ठरेल.

५.५ समस्या विधान

महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेले शैक्षणिक कार्य आणि त्याचा स्त्रीजीवनावर झालेल्या दृश्य परिणामांचा अभ्यास करणे.

५.६ संकल्पनात्मक व्याख्या

१) शैक्षणिक कार्य – शिक्षणाचा प्रसार, प्रचार वाढीच्या कामी सक्रिय होऊन शिक्षणाच्या कामातील योगदान म्हणजे शैक्षणिक कार्य – (चंदन पवार, २०१०)

२) स्त्री शिक्षण – स्त्रीला साक्षर करणे. (गंगणे, २०१५)

३) दृश्य परिणाम – कोणत्याही गोष्टीचा प्रत्यक्षात दिसणारा बदल.

५.७ कार्यात्मक व्याख्या

१) शैक्षणिक कार्य– महर्षी कर्वे यांनी विधवा, कुमारिकांच्या शिक्षणासाठी केलेले प्रयत्न, स्त्रियांसाठी प्राथमिक शिक्षणापासून उच्चशिक्षणापर्यंत उपलब्ध करुन दिलेल्या सुविधा आणि

शालेय शिक्षणाबरोबरच समाजशिक्षणासाठी दैनंदिन जीवनाशी निगडीत शिक्षणासाठी केलेले कार्य.

२) स्त्री शिक्षण – स्त्रियांना लिहिता वाचता येण्याबरोबरच शिक्षणामुळे त्यांच्यामध्ये होणारा इष्ट बदल, शालेय शिक्षण, संसारोपयोगी शिक्षण, दैनंदिन व्यवहार ज्ञान व स्त्रियांचा सर्वांगीण विकास.

३) दृश्य परिणाम –शिक्षणामुळे साक्षरतेसह स्वावलंबी होणे, आत्मविश्वास येणे, संस्कारक्षम गृहिणी होणे, अर्थार्जन करणे, कौटुंबिक जबाबदारी पार पाडणे अशा पद्धतीने शिक्षणामुळे प्रत्यक्ष जीवनात झालेला बदल.

५.८ संशोधनाची उद्दिष्टे

संशोधनातून खालील उद्दिष्टे साध्य करण्यात आली.

१) महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेल्या शैक्षणिक कार्याचा तत्कालीन सामाजिक संदर्भासह अभ्यास करणे.
२) महर्षी कर्वे यांनी निर्माण केलेल्या समाजाभिमुख शिक्षणाचा आढावा घेणे.
३) महर्षी कर्वे यांच्या शैक्षणिक कार्याचा स्त्री जीवनावर झालेले दृष्य परिणाम जाणून घेणे.

५.९ संशोधन प्रश्न

१) महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी तत्कालीन सामाजिक परिस्थितीत अनुकूल असे कोणते शैक्षणिक कार्य केले?

२) महर्षी कर्वे यांनी स्त्रिशिक्षणासाठी कोणता अभ्यासक्रम राबवला?

३) महर्षी कर्वे यांनी केलेल्या कार्याचा स्त्रीजीवनावर कोणता दृश्य परिणाम झाला?

५.१० गृहीतके

गुड अँड हॅट यांच्या मते ''गृहितकृत्य ही अशी मान्यता आहे की, जी सत्य सिद्ध करण्यासाठी तिचे प्रयोगात्मक परिक्षण केले जाऊ शकते. आणि पुढील संशोधनासाठी ते उपयुक्त असते.'' (कृतिसंशोधन हस्त पुस्तिका, २००५)

- **प्रस्तुत संशोधनातील गृहीतके**

१) शिक्षण तज्ञांच्या शैक्षणिक कार्यामुळे व्यक्ति व समाजात इष्ट परिवर्तन होते. (चंदन पवार २०११)

२) महर्षी कर्वे हे स्त्री शिक्षणाचे प्रणेते होते. (देशपांडे मालती, १९९७)

३) शिक्षणामुळे व्यक्तिच्या व्यक्तिमत्वात सकारात्मक बदल घडून येतात व त्यामुळे इतरांसाठी प्रेरणा मिळते. (कांबळे गीता, २०११)

४) शिक्षणामुळे स्त्रीच्या अंगी व्यवहारकुशलता, जीवनकौशल्ये निर्माण होतात. (महाराष्ट्र राज्य शालेय शिक्षण विभाग – हस्तपुस्तिका, २००५)

५.११ संशोधनाची व्याप्ती

संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतामधून उपलब्ध झालेले महर्षी कर्वे यांचे स्त्री शिक्षणाचे कार्य.

- **संशोधनाच्या मर्यादा**

१) उपरोक्त संशोधन हे उपलब्ध माहिती संकलनाच्या साधनांमधून मिळालेल्या माहितीवर आधारीत आहे.

२) (प्रतिसादकाच्या) मुलाखतदात्यांच्या भावना व मनःस्थिती यावर संशोधकाचे नियंत्रण नाही.

- **संशोधनाच्या परिमर्यादा**

१) प्रस्तुत संशोधन महर्षी कर्वे यांनी केलेल्या स्त्री शिक्षणाच्या कार्यापुरते मर्यादित आहे.

२) प्रस्तुत संशोधन हे प्रतिसादकाने दिलेल्या प्रतिसादापुरते मर्यादित आहे.

५.१२ संबंधित साहित्याचा आणि संशोधनाचा आढावा

- **संदर्भ साहित्य**

शासकिय प्रकाशन– पुस्तके

- जोशी न. म., महाराष्ट्राचे शिल्पकार–महर्षी धोंडो केशव कर्वे, सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, दादर, मुंबई
- बाबर सरोजिनी, स्त्रीशिक्षणाची वाटचाल, महाराष्ट्र शासन शिक्षण संचनालय, मुंबई १९६८,बाबर सरोजिनी – भारतीय स्त्री
- हाटे चंद्रकला, स्वातंत्र्योत्तर भारतीय स्त्री, सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, सचिवालय, मुंबई, प्रथमावृत्ती एप्रिल १९७३,

महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था प्रकाशन– पुस्तके

- कर्वे धोंडो केशव, पटवर्धन नारायण महादेव, धोंडो केशव कर्वे आत्मवृत्त व चरित्र– भास्कर धोंडो कर्वे, चिटणीस हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, पुणे प्रथमावृत्ती १९५८
- कर्वे आनंदीबाई, माझे पुराण, केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, मुंबई १९९८
- कर्वे कावेरी, हिंगण्याच्या माळावर, हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, पुणे २
- आठवले पार्वतीबाई, माझी कहाणी, अनाथ बालिका श्रमाची मंडळी, पुणे, १९३६
- देशपांडे मालती – स्त्री शिक्षणाचे प्रणेते महर्षी कर्वे, म. कर्वे स्त्री शिक्षण संस्था कर्वेनगर, पुणे ५२
- कर्नाटकी चंद्राताई, भारतीय स्त्री शिक्षणात स्त्रीचे स्थान, के. रा. पालकर, चिटणीस, हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, कर्वेनगर, पुणे, प्रथमावृत्ती डिसेंबर १९६७
- पटवर्धन गंगूबाई, भारतीय स्त्री, 'गेल्या दीडशे वर्षातील स्त्रीशिक्षणाचे प्रयोग', के. रा. पालकर, चिटणीस हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, कर्वेनगर, पुणे, डिसेंबर १९६७

- शेंडे कुसुमताई, उतराई, श्री. अ. ल. शेंडे, राजहंस रत्नप्रभा प्रकाशन, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, पुणे २००९
- तेरणीकर सुलभा, गाथा शतकाची, सचिव महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, कर्वेनगर, पुणे ५२, २००७

इतर प्रकाशने पुस्तके

- आठलेकर मंगला, महर्षी ते गौरी (स्त्री स्वातंत्र्याची वाटचाल), राजहंस प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे पहिली आवृत्ती १९९९
- भगत रा. तु. शिक्षणातील थोर विचारवंत, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, सप्टेंबर २००१
- भागवत कमल, स्त्री चळवळीची वाटचाल, प्रागतिक पुस्तक प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८५
- भागवत विद्युत, स्त्री प्रश्नांची वाटचाल : परिवर्तनाच्या दिशेने प्रतिमा प्रकाशन, पुणे २००९
- खोले विलास, महर्षी धोंडो केशव कर्वे, मॅजेस्टिक पब्लिसिंग हाऊस ठाणे, द्वितीयावृत्ती ऑक्टो.
  - मासिके
  - नियतकालिक
  - हस्तपुस्तिका
  - अहवाल
  - वृत्तपत्र (सकाळ, महाराष्ट्र टाइम्स, लोकमत)
  - कात्रणे
  - वेबसाईट

५.१३ संशोधन पद्धती

- ऐतिहासिक
- सर्वेक्षण पद्धती

५.१४ नमुना निवडीच्या पद्धती

प्रस्तुत संशोधनाकरिता 'स्नो बॉल सॅम्पलिंग' व यादृच्छिक लॉटरी पद्धतीचा उपयोग केला आहे.

- स्नो बॉल सॅम्पलिंग
- लॉटरी पद्धत

५.१५ नमुना

१) महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेतील माजी विद्यार्थिनी.

२) एस.एन.डी.टी. महाविद्यालयातील माजी विद्यार्थिनी.

सन १९१६ च्या आधीच्या विद्यार्थिनी सद्य परिस्थितीत भेटणे व त्यांची मुलाखत घेणे अशक्य असल्याने सन १९१६ पासून पुढील २० वर्षाच्या अंतराने सालाप्रमाणे ५ गट केले आहेत. माजी विद्यार्थिनींचे शैक्षणिक कालावधीनुसार पाच गट–

कोष्टक क्र. ५.१ नमुना निवड गट

गट क्र.	शैक्षणिक कालावधी
१.	सन १९१६ ते ३६
२.	सन १९३७ ते ५७
३.	सन १९५८ ते ७८
४.	सन १९७९ ते ९९
५.	सन २००० ते २०१५

५.१६ माहिती संकलनाची साधने

कोष्ठक क्र. ५.२ माहिती संकलनाची साधने

उद्दिष्ट क्र	संशोधन पद्धती	प्राथमिक स्त्रोत	दुय्यम स्त्रोत
१ २	ऐतिहासिक	महर्षी कर्वे यांचे आत्मवृत्त व चरित्र वृत्तपत्रे छायाचित्रे पत्रे (गुणात्मक विश्लेषण)	चरित्र,संदर्भ पुस्तके,मासिके,नियतकालिक हस्तपुस्तिका,अहवाल वृत्तपत्र (सकाळ, म.ट ा.) वेबसाईट संशोधने
३	सर्वेक्षण पद्धती	(संख्यात्मक विश्लेषण)	मुलाखत, प्रश्नावली

अभ्यास विषयास अनुसरुन ऐतिहासिक पद्धतीने (प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोत) माहितीचे विश्लेषण हे गुणात्मक पद्धतीने केलेले आहे. सर्वेक्षण पद्धतीने व (दुय्यम स्त्रोत) संख्यात्मक पद्धतीने केलेले आहे.

- **संख्यात्मक साधने**

शेकडेवारी

माजी विद्यार्थिनींकडून मुलाखती व प्रश्नावलीद्वारे मिळालेल्या माहितीचे संख्यात्मक विश्लेषण शेकडेवारी काढून आलेखाद्वारे स्पष्ट केले आहे.

५.१७ महर्षी कर्वे यांचे स्त्रीशिक्षणविषयक कार्य व परिणाम

स्त्रीशिक्षणाच्या क्षेत्रात अनेक महापुरुषांनी आपले योगदान दिले आहे. त्यापैकी एक महर्षी धोंडो केशव कर्वे होय. एक दृष्टे शिक्षणतज्ज्ञ असा त्यांचा उल्लेख केला आहे. आपल्या १०५ वर्षाच्या दिर्घायुष्य त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी, उन्नतीसाठी खर्ची घातले. त्यासाठी अथक परिश्रम घेतले. अनेक अडचणींवर मात केली. समाजाचा विरोध पत्करून आपले कार्य तडीस नेले. केवळ साक्षरतेचा विचार न करता स्त्रियांच्या अडचणी, गरजा यांचा सर्वांगीण विचार करुन त्यासाठी जे–जे काम करावे लागले ते ते केले. गरज ही शोधाची जननी आहे असे म्हणतात. त्यासाठी नवनवीन मार्ग चाणाक्षपणे शोधून त्यानुसार जशा अडचणी त्यावर तसा उपाय असे काम ते करत गेले. त्यामुळे त्यांच्या कार्याची व्याप्ती दिवसेंदिवस वाढतच गेली.

स्त्रीशिक्षणाच्या कार्याची सुरुवात करताना त्या कार्याची ठळक उद्दिष्टे त्यांच्या समोर होतीच. परंतु तत्कालीन समाजाकडून मिळणारा पाठिंबा आणि होणारा विरोध अशा परस्पर विरोधी प्रसंगाना महर्षी कर्वे यांना सामोरे जावे लागले. त्यांचे स्त्री शिक्षणाचे कार्य मूळात समाजकार्यातून सुरु झाले. त्यांनी विधवा पुर्नविवाहाचा धाडसी निर्णय घेऊन तो प्रत्यक्षात आणला. आणि विधवांच्या शिक्षणाचे कार्य सुरु केले. त्यामागे त्यांचा स्वभाव, बालवयापासून घेतलेले अनुभव, स्त्रियांबद्दल असणारी तळमळ या गोष्टी कारणीभूत होत्या. त्यांच्या कार्याचे वर्णन –

''महात्म्याने रचिला पाया । महर्षी झालासे कळस ।।''

असे केल्यास ते अतिशोयोक्ती वाटणार नाही. महात्मा फुले यांनी सन १८४८ मध्ये स्त्रियांसाठी पहिली शाळा काढली आणि स्त्री शिक्षणाचा पाया घातला. त्यांनी स्त्रियांना प्राथमिक शिक्षण दिले. स्वतःच्या पत्नीला साक्षर केले. तर महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी प्राथमिक शिक्षणाने सुरुवात केली आणि त्यांना उच्च शिक्षण देण्यासाठी भारतातील पहिले विद्यापीठही स्थापन केले. या अर्थाने स्त्री शिक्षणाच्या कार्यावर त्यांनी कळस चढविला असे म्हणता येईल.

असे अतुलनीय कार्य करणाऱ्या महर्षी कर्वे यांनी केलेल्या स्त्रियांच्या शैक्षिणिक कार्याचा अभ्यास करताना संशोधकास महर्षी कर्वे व त्यांचे कार्य याविषयी सखोल माहिती मिळाली. त्यांचे

आत्मचरित्र वाचताना एक स्त्री म्हणून त्यांच्याबद्दलचा आदर अधिकच वाढला. प्रत्येक स्त्रीच्या उन्नतीचे श्रेय महर्षी कर्वे यांच्यासारख्या अलौकिक कार्य करणाऱ्या महात्म्यास जाते.

महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंतच्या सोयी उपलब्ध केल्या. त्यांना शालेय शिक्षणाबरोबरच संसारोपयोगी व समाजाभिमुख शिक्षण दिले. त्यामुळे स्त्रिया साक्षर तर झाल्याच परंतु त्या स्वावलंबी, सक्षम, सबला झाल्या व स्वतःची प्रगती करू शकल्या. ज्यामुळे समाजहित व देशहितही साधले गेले.

५.१८ निष्कर्ष

संशोधन अभ्यासाच्या संदर्भसाहित्यातून मिळालेली माहिती व महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेतील माजी विद्यार्थिनीकडून घेतलेल्या मुलाखती व प्रश्नावलींच्या माध्यमातून आलेली उत्तरे प्रकरण ४ वर आधारित संशोधकाने पुढील निष्कर्ष नोंदवले आहेत. यातील काही महत्त्वाच्या बाबी

क्र.	तपशील	शेकडा
१	महर्षी कर्वे यांचे स्त्रीशिक्षणाचे कार्य महत्त्वाचे वाटते	८९%
२	सद्यस्थितीत महर्षी कर्वे यांच्या कार्याची उपयुक्तता वाटते	९३%
३	स्त्री शिक्षणाचा जीवनाला फायदा झाला	८३%
४	शिक्षणामुळे स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला	८९%

उद्दिष्टनुसार निष्कर्ष

- उद्दिष्ट क्र.१

महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेल्या शैक्षणिक कार्याचा तत्कालीन सामाजिक संदर्भासह अभ्यास करणे.

१) अठराव्या शतकात स्त्रीशिक्षणाबाबत समाजाचा दृष्टिकोन संकुचित होता.

२) अठराव्या शतकात स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता.

३) तत्कालीन समाजास स्त्रियांनी शिक्षण घेणे हे समाजास मान्य नव्हते.

४) अठराव्या शतकात स्त्रियांना कुटुंबात व समाजात दुय्यम स्थान होते.

५) अठराव्या शतकात स्त्री शिक्षणासाठी सामाजिक स्थिती अनुकूल नव्हती.

६) स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रात महर्षी कर्वे यांनी महत्वपूर्ण कार्य केले.

७) महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी संसारोपयोगी विषयांचा अभ्यासक्रमात अंतर्भाव केला. स्त्रीशिक्षणासाठी मातृभाषेला महत्त्व दिले.

८) महर्षी कर्वे यांनी शालेय शिक्षणाबरोबरच स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्कारक्षम उपक्रम राबवले.

९) महर्षी कर्वे यांनी स्त्रियांच्या उच्च शिक्षणासाठी स्वतंत्र महिला विद्यापीठाची स्थापना केली.

१०) महर्षी कर्वे यांनी स्त्रीशिक्षणाचा प्रसार केला.

११) महर्षी कर्वे यांनी स्त्री शिक्षणाच्या कार्यासाठी संस्था उभारली.

- उद्दिष्ट क्र. २

  महर्षी कर्वे यांनी निर्माण केलेल्या समाजाभिमुख शिक्षणाचा आढावा घेणे.

१) महर्षी कर्वे यांनी समाजास उपयुक्त अशा विषयांचा अभ्यासक्रमात समावेश केला.

२) महर्षी कर्वे यांनी स्त्रीला शिक्षणाचा कुटुंबाला, समाजाला उपयोग होईल असे शिक्षण दिले.

- उद्दिष्ट क्र. ३

  महर्षी कर्वे यांच्या शैक्षणिक कार्याचा स्त्री जीवनावर झालेले दृष्य परिणाम जाणून घेणे.

१) शिक्षणामुळे स्त्री स्वावलंबी झाली.

२) सुशिक्षित स्त्रियांनी इतर स्त्रियांना शिक्षण देण्याचे व्रत अंगिकारले.

३) शिक्षणामुळे स्त्रियांच्या व्यक्तिमत्वात इष्ट बदल घडून आले.

४) स्त्रियांच्या शिक्षणाचा उपयोग कुटुंबासाठी झाला.

५) शिक्षणामुळे स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला.

६) शिक्षणामुळे स्त्री सक्षम झाली.

५.१९ संशोधनाचे योगदान

या अभ्यासामधून महर्षी कर्वे यांनी समाजाचा प्रचंड विरोध सहन करुन आपले कार्य कसे तडीस नेले, हे समजले. त्यांची स्त्रीशिक्षणाबद्दलची तळमळ लक्षात आली. केवळ पुस्तिकी ज्ञान म्हणजे शिक्षण नव्हे तर व्यवहारज्ञान, मूल्यसंस्कारही जीवनात यशस्वी होण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरतात याचा अनुभव मिळाला. स्त्रियांच्या गृहिणी म्हणून जबाबदाऱ्या पार पाडताना स्त्रियांनी घेतलेल्या शिक्षणाचा मुलांसाठी, कुटुंबासाठी व समाजासाठी किती फायदा झाला हे समजले. महर्षी कर्वे यांनी केवळ शैक्षणिक कार्य केले नाही तर त्याला समाजकार्याची जोड दिली. त्यामुळे १२५ वर्षानंतरही त्याचे कार्य उपयुक्त ठरते. कालसापेक्ष व परिस्थितीनुरुप समाजाची मानसिकता लक्षात घेऊन दिलेले शिक्षण, विचारपूर्वक तयार केलेला अभ्यासक्रम याबद्दल माहिती मिळते.

एक स्त्री म्हणून या अभ्यासादरम्यान आलेल्या अनुभवातून नवीन शिकता येईल. स्त्रियांचा स्वतःच्या जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन समजला. शिक्षणामुळे स्त्री अंर्तबाह्य बदलून गेली आहे. प्रेम, माया, ममता, सहनशीलता या गुणांबरोबर ती कणखर, धाडसी, आत्मविश्वासू, स्वावलंबी व सक्षम कशी बनू शकते याचा प्रत्यय येतो. कर्वे यांच्याबद्दल आदर आहेच तो अधिक वाढला. प्रतिकूल परिस्थिती अवघड कार्य त्यांनी केले. आत्ताची परिस्थिती तर स्त्री शिक्षणास अनुकूल आहे. स्त्रियांची एकंदरीत स्थिती सुधारावी यासाठी कार्य करण्याची उमेद मिळाली. स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रात अनेक गोष्टी करण्यासारख्या आहेत त्या सर्वांनी मिळून करायला हव्यात. स्त्रीचे कुटुंब व समाजातील स्थान उंचावण्याची गरज आहे. सामाजिक संस्था, समाजसुधारक व स्त्रियांविषयी तळमळ असणाऱ्या सर्वांनी एकत्र आल्यास ते करता येईल अशी आशा निर्माण होते.

'' जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगा उद्धारी

'' मुलगी शिकली प्रगती झाली. ''

स्त्री शिक्षणाबाबत वरील उद्‌गार काढले जातात. ते सार्थ ठरताना दिसत आहेत. शिक्षणामुळे स्त्री जीवनावर झालेला सर्वात महत्त्वपूर्ण दृष्य परिणाम जाणवला, तो म्हणजे स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आहे. आत्मविश्वास निर्माण झाल्यामुळे स्त्रियांना जीवनातील संकटावर मात करता येते. अशक्य ते शक्य करता येते. जीवन आनंदाने जगता येते. समाजात व कुटुंबात स्वतःचे स्थान निर्माण होते. हे महर्षी कर्वे यांनी महिलांसाठी केलेल्या कामातून स्पष्ट होते.

५.२० संशोधनाचे शैक्षणिक उपयोजन

प्रस्तुत संशोधनामुळे शिक्षणक्षेत्रास उपयुक्त अशा काही गोष्टी मिळाल्या.

- स्त्री शिक्षणामुळे स्त्रियांची उन्नती होईल.
- समाजाभिमुख अभ्यासामुळे शिक्षणाचा समाजहितासाठी उपयोग होईल.
- महर्षी कर्वे यांच्या स्त्री शिक्षणाच्या अभ्यासामुळे शिक्षणाची ध्येय व शैक्षणिक आराखडा तयार करण्यास मदत मिळेल.
- पुस्तकी शिक्षणाबरोबरच जीवनोपयोगी शिक्षण मिळाल्यास स्त्री जीवन समृद्ध होईल.
- स्त्री शिक्षणामुळे स्त्रिया स्वावलंबी, आत्मविश्वासू व सक्षम बनतील.
- स्त्री शिक्षणामुळे देशातील स्त्रियांचा साक्षरता दर वाढेल, व त्याचा कुटुंब व समाजास उपयोग होईल.

५.२१ शिफारशी

संशोधन प्रक्रियेतून जे निष्कर्ष निघालेले आहेत त्यावर आधारित तात्विकपद्धती न वापरता व्यवहार्य अशा ज्या सूचना आणि सुधारणांचे मार्ग सुचवलेले असतात त्यांना **शिफारशी** म्हणतात. संशोधन पूर्ण झाल्यानंतर संशोधकास पुढील सूचना करावश्या वाटतात.

- स्त्रियांना कुटुंबात व समाजात समान दर्जा प्राप्त व्हायला हवा कारण अजूनही स्त्री–पुरूषसमानता दिसून येत नाही.

- स्त्री शिक्षणाविषयीचा दृष्टिकोन बदलणे आवश्यक वाटते.ग्रामीण भागात सद्यस्थितीतही स्त्री शिक्षणाकडे तितक्या गांभीर्याने पाहिले जात नाही याविचारात बदल घडून यावा.
- ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणासाठी जाणीवपुर्वक प्रयत्न करणे गरजेचे वाटते कारण आजही ग्रामीण भागात शाळा लांब असल्याने शिक्षणात अडचणी येतात.
- मुलींसाठी वसतीगृहाच्या सोयी उपलब्ध झाल्यास सुरक्षितता निर्माण होईल.
- शिक्षणातून मूल्यसंस्कार (उदा– स्वावलंबन, सहकार्यभावना, श्रमप्रतिष्ठा,सक्षमता) निर्माण होतील यासाठी प्रयत्न व्हावेत.
- शिक्षणामुळे जीवनात इष्ट बदल घडविण्यासाठी आत्मविश्वास निर्माण व्हायला हवा तरच स्त्री जीवन सुखी व आनंदी होवू शकेल.
- आधुनिक काळात काही बाबतीत स्त्री शिक्षणाबाबत उदात्त दृष्टिकोन दिसून येतो परंतु १००% स्त्री साक्षरता निर्माण होण्यासाठी स्त्री वर्ग, पालक वर्ग व समाजाने सक्रीय प्रयत्न आवश्यक वाटते.
- समाजातील बदलत्या परिस्थितीनुरुप अनुकूल असे बदल शासनाने अभ्यासक्रमात करायला हवेत. सध्याचे शिक्षण हे दैनंदिन जीवनास उपयुक्त ठरत नाही; अशी चर्चा अनेकदा ऐकायला मिळते. शिक्षणपद्धतीत आमुलाग्र बदल घडायला हवेत असे विचार अनेक शिक्षणतज्ज्ञांनी व्यक्त करीत आहेत. (उदा. रमेश पानसे, हेरंब कुलकर्णी) स्त्रियांचे सामाजिक स्थान उंचावण्याकरिता स्त्री संघटनांनी सक्रिय व्हायला हवे. महर्षी कर्वे यांनी स्त्रियांना शिक्षणाची सोय करून दिली. त्यामुळे स्त्रियांचा आत्मविश्वास वाढला. परंतु समाजात सामाजिक प्रतिष्ठा, स्त्री–पुरुष समानता दिसून येत नाही. याकरता शिक्षणाशिवाय काही प्रयत्न होणे गरजेचे वाटते. त्यासाठी स्त्रियांनीच पुढे यायला हवे. उदा. स्त्रियांची मानसिकता बदलणे.

५.२२ पुढील संशोधनासाठी विषय

महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेल्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेताना महर्षी कर्वे यांच्याविषयी अनेक नवीन पैलूंची माहिती मिळाली. त्या विषयात संशोधन कार्य व्हायला हवे असे संशोधकास वाटते. त्यासाठी सुचवलेले काही विषय –

१) महर्षी कर्वे यांचे सामाजिक कार्य – एक अभ्यास

२) महर्षी कर्वे यांचे शिक्षणविषयक विचार व त्यांचे शैक्षणिक कार्य

३) महर्षी कर्वे : एक शिक्षणतज्ज्ञ

४) महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या कार्याचा अभ्यास व त्याची उपयुक्तता

५.२३ संशोधकाचा अभिप्राय

उद्दिष्ट क्र.१ : महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेल्या शैक्षणिक कार्याचा तत्कालीन सामाजिक संदर्भासह अभ्यास करणे .

उद्दिष्ट क्र. २ : महर्षी कर्वे यांनी निर्माण केलेल्या समाजाभिमुख शिक्षणाचा आढावा घेणे.

उद्दिष्ट क्र. ३ : महर्षी कर्वे यांच्या शैक्षणिक कार्यामुळे स्त्री जीवनावर झालेले दृश्य परिणाम जाणून घेणे.

संशोधनाची वरील उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेऊन प्रस्तुत संशोधन हे पुढील दोन भागात केलेले आहे. पहिल्या भागात ऐतिहासिक संशोधन पद्धतीनुसार महर्षी कर्वे यांनी केलेल्या स्त्रीशिक्षणाच्या कार्याचा मागोवा घेताना; संबंधित संदर्भसाहित्य व महर्षी कर्वे यांच्या आत्मचरित्राचा अभ्यास करून, त्यांनी तत्कालीन सामाजिक परिस्थितीस अनुरुप असे जे समाजाभिमुख शिक्षण सुरु केले त्याचा शोध घेतला आहे. तर संशोधनाच्या दुसऱ्या भागात महर्षी कर्वे यांनी केलेल्या कार्यामुळे स्त्रियांच्या दैनंदिन जीवनात कोणते दृश्य स्वरुपाचे बदल झाले, हे पाहण्यासाठी प्रश्नावली, मुलाखत या माहिती संकलन साधनांचा वापर करून महर्षी कर्वे यांच्या कार्याची उपयुक्तता तपासण्याचा अभ्यास


केला आहे. एकंदरीत त्यामधून असे निदर्शनास आले की, स्त्रिया साक्षर तर झाल्याच त्याचबरोबर त्या सक्षम, स्वावलंबी व आत्मविश्वासू बनल्या. त्यासंदर्भातली अधिक माहिती निष्कर्षात नोंदविली आहे.

परंतु याचबरोबर महर्षी कर्वे यांचे सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील कार्याचा विविध अंगांनी अभ्यास होणे शक्य आहे असे वाटते. उदा. महर्षी कर्वे यांचे सामाजिक कार्य, महर्षी कर्वे यांचे स्त्रीशिक्षणविषयक विचार व योगदान इ. विषयावर अभ्यास होणे आवश्यक वाटते.

५.२४ समारोप

अशा प्रकारे संशोधनाचा सारांश या प्रस्तुत प्रकरणात संशोधकाने संशोधनाचे योगदान, संशोधनातील निष्कर्ष, शिफारशी नोंदविल्या आहेत. व संशोधनाचे शैक्षणिक उपयोजन आणि पुढील संशोधनासाठी विषयही दिले आहेत.

फोटो क्र. २१ पदवी प्रमाणपत्र (गृहितागमा)



Shreemati Nathibai Damodher Thackersey
Indian Women's University

We, the Chancellor, Vice-chancellor and Fellows of the Shreemati Nathibai Damodher Thackersey Indian Women's University

Certify that Sathe Yesoo V.

of Bombay having been

examined for the Degree of Graduate in Arts

and placed in the second Class, the Degree of

Graduate in Arts

गृहीतागमा

has been conferred on her at Bombay on

the twenty-eighth day of the month of

July in the year one thousand nine

hundred and forty-five

In Testimony whereof is set the Signature of the said Chancellor.


श्री. नाथीबाई दामोदर ठाकरसी

सर्वदा संस्कृता स्त्री परा शक्ति

Chancellor

(महर्षी कर्वे संग्रहालय, कर्वेनगर, पुणे)

फोटो क्र. २२/२३




(गाथा शतकाची, तेरणीकर, २००७)

फोटो क्र. २४



(गाथा शतकाची, तेरणीकर, २००७)

फोटो क्र. २५ महिलांसाठी उच्च शिक्षणाच्या सुविधा



(गाथा शतकाची, तेरणीकर, २००७)



(गाथा शतकाची, तेरणीकर, २००७)



महिलाश्रम
वसतिगृह
''चितळे बंधू
मिठाईवाले''
इमारत




बाया कर्वे
वसतिगृह संकूल



श्रीसिद्धिविनायक
कला-वाणिज्य
महिला
महाविद्यालय

(गाथा शतकाची, तेरणीकर, २००७)

फोटो क्र. २६ वृद्धाश्रम



(गाथा शतकाची, तेरणीकर, २००७)

फोटो क्र. २७

थोरांच्या भेटी



पंतप्रधान **पंडित जवाहरलाल नेहरू** यांची
हिंगणें स्त्री - शिक्षण संस्थेस भेट
(१ ऑगस्ट १९५६)



राज्यपाल श्री. **श्री प्रकाश व** डॉ. **कर्वे**
(८ जुलै १९५७)


(आत्मवृत्त व चरित्र सन १९५८)

फोटो क्र. २८ संस्थेचे प्रधानकार्यालय



(गाथा शतकाची, तेरणीकर, २००७)

फोटो क्र. २९ महर्षी कर्वे व आनंदीबाई कर्वे



(कार्यालय – महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था)

अनुक्रमणिका

संदर्भसूची

अ. क्र.	शीर्षक	पान क्र.
१	पुस्तके	२०४
२	मासिके	२०७
३	नियतकालिक	२०८
४	हस्तपुस्तिका	२०८
५	स्मरणिका	२०८
६	अहवाल	२०८
७	वृत्तपत्र	२०८
८	वेबसाईट	२०९
९	संशोधने	२०९

संदर्भसूची

पुस्तके

* अकोलकर ग. वि., शैक्षणिक तत्त्वज्ञानाची रुपरेषा, श्री. विद्या प्रकाशन, पुणे, जानेवारी १९७३, पृष्ठ क्र. १
* आठलेकर मंगला, महर्षी ते गौरी (स्त्री स्वातंत्र्याची वाटचाल), राजहंस प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे पहिली आवृत्ती १९९९, पृष्ठ क्र. २, ७, ११, ३३, ३७
* आठवले पार्वतीबाई, माझी कहाणी, अनाथ बालिका श्रमाची मंडळी, पुणे, १९३६
* बाबर सरोजिनी, स्त्रीशिक्षणाची वाटचाल, महाराष्ट्र शासन शिक्षण संचनालय, मुंबई १९६८,पृष्ठ क्र. ९, २०, १०३ बाबर सरोजिनी – भारतीय स्त्री
* बापट दिवाकर, महर्षी अण्णासाहेब कर्वे, लोकवाङ्मय गृहप्रकाशन
* बेदरकर कुसुम, शताब्दी स्मरणिका २००७, महिलाश्रम हायस्कूल, अण्णांचे मनोगत
* बन्सी बिहारी पंडित, डॉ. सरोजिनी महाले गुणात्मक आणि मिश्र पद्धती, युनिक पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती सप्टेंबर २०१५
* भगत रा. तु. शिक्षणातील थोर विचारवंत, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, सप्टेंबर २००१
* भागवत कमल, स्त्री चळवळीची वाटचाल, प्रागतिक पुस्तक प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८५, पृष्ठ क्र. ८, ९, १०, ३७, ८२
* भागवत विद्युत, स्त्री प्रश्नांची वाटचाल : परिवर्तनाच्या दिशेने प्रतिमा प्रकाशन,पुणे,२००९
* भांडारकर के. मो. सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र, नित्य नुतन प्रकाशन, पुणे जाने. २०१०
* भिंताडे वि. रा. शैक्षणिक संशोधन पद्धती, नित्य नूतन प्रकाशन, सप्टेंबर २०११
* चाफेकर सुधा, मराठी कन्यांचा कल्पवृक्ष–धोंडो केशव कर्वे, चंद्रकला प्रकाशन, पुणे १९९९
* डॉ. देशमुख शारदा, शिवकालीन व पेशवाईतील स्त्री जीवन, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ प्रकाशन १९७५

* देशपांडे मालती – स्त्री शिक्षणाचे प्रणेते महर्षी कर्वे, म. कर्वे स्त्री शिक्षण संस्था कर्वेनगर, पुणे ५२, मुखपृष्ठ व पृष्ठ क्र. १६, ३८
* ढेरे रा.चिं, लज्जागौरी, श्रीविद्या प्रकाशन, पुणे – ३० प्रथमावृत्ती १९७८
* डॉ. गंगणे वर्षा, स्त्री सक्षमीकरणाची वाटचाल आणि वास्तव, ऋचा प्रकाशन, नागपूर, जुलै २०१५
* घुगले पद्मा, महिलाश्रम हायस्कूल माजी विद्यार्थिनी व शिक्षक संघ, असा आमचा जीवनप्रवाह,पृथ्वीराज प्रकाशन, कोथरुड, पुणे – ऑक्टोबर २००७
* घुगले पद्मा, स्मृतिगंधाली, महिलाश्रम हायस्कूल, माजी विद्यार्थी व शिक्षक संघ असा आमचा जीवनप्रवाह, पृथ्वीराज प्रकाशन, कोथरुड, पुणे – ऑक्टोबर २००७
* गोऱ्हे नीलम, महिलांसंबधी धोरण, स्वयंसिद्धतेकडे वाटचाल, महाराष्ट्र महिला व्यासपीठ, मुंबई ऑक्टोबर १९९४
* जोशी न. म., महाराष्ट्राचे शिल्पकार–महर्षी धोंडो केशव कर्वे, सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, दादर, मुंबई
* हाटे चंद्रकला, स्वातंत्र्योत्तर भारतीय स्त्री, सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, सचिवालय, मुंबई, प्रथमावृत्ती एप्रिल १९७३, पृष्ठ क्र. १२६
* डॉ. कदम चा प. शैक्षणिक संख्याशास्त्र, नित्य नूतन प्रकाशन, पुणे एप्रिल २०१०
* काळे भाग्यश्री, भारतरत्न महर्षी कर्वे, ज्ञानेश प्रकाशन
* कर्वे आनंदीबाई, माझे पुराण, केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, मुंबई १९९८, पृष्ठ क्र. ११५ ते १२३
* कर्वे धोंडो केशव, पटवर्धन नारायण महादेव, धोंडो केशव कर्वे आत्मवृत्त व चरित्र– भास्कर धोंडो कर्वे, चिटणीस हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, पुणे प्रथमावृत्ती १९५८, पृष्ठ क्र. २६, १६५ ते १७२, २५९ ते २६३, ३४२, ३६१, ३५९, ४२५, ४३२
* कर्वे कावेरी, हिंगण्याच्या माळावर, हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, पुणे २००८

* खोले विलास, महर्षी धोंडो केशव कर्वे, मॅजेस्टिक पब्लिसिंग हाऊस ठाणे, द्वितीयावृत्ती ऑक्टो. २०१५. पृष्ठ क्र. २५३
* कोकणे खंडू, बहुजनांचे शिक्षण : वास्तव आणि अपेक्षा, अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभा, पुणे पष्ठ क्र. ३३
* कर्नाटकी चंद्राताई, भारतीय स्त्री शिक्षणात स्त्रीचे स्थान, के. रा. पालकर, चिटणीस, हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, कर्वेनगर, पुणे, प्रथमावृत्ती डिसेंबर १९६७
* कुलकर्णी अंजली, विस्मृतीचित्रे, ग्रंथ अरुणा ढेरे, 'शिक्षणाच्या चळवळीतील स्त्रिया' डिसेंबर २०१६ पृष्ठ क्र. ३२
* काझी झेड. आर, शालेय शिक्षण पुर्नरचना, अनिस प्रकाशन, औरंगाबाद
* लिमये अनसूया, स्त्रीचे समाजातील स्थान आणि भूमिका, चिटणीस समाजवादी महिला सभा, शनिवार पेठ पुणे १९७७, पृष्ठ क्र. ६, ७, १०, २१
* मोडक वि. आ., हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेची ६० वर्षे, भास्कर धोंडो कर्वे, चिटणीस, हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, पुणे १९५६
* महाजनी वि. श्री. व गोगटे श्री. ब., शैक्षणिक समाजशास्त्र, व्हीनस प्रकाशन पुणे, जुलै १९७२
* मुळे रा. शं. उमाठे वि. तु. शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर १९७७
* परांजपे शांताबाई, माझी पायपीठ, सचिव, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, पुणे २०१८
* पारसनीस न. रा. शिक्षणाची तात्विक व समाजशास्त्री भूमिका, नूतन प्रकाशन, पुणे १९९७
* पाटील लीला, स्त्री जीवनाचे चित्तवेध, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, ऑक्टो. २००२, पृष्ठ क्र. ४०
* पटवर्धन गंगूबाई, भारतीय स्त्री, 'गेल्या दीडशे वर्षातील स्त्रीशिक्षणाचे प्रयोग', के. रा. पालकर, चिटणीस हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, कर्वेनगर, पुणे, डिसेंबर १९६७, पृष्ठ क्र. २०९

* परुळेकर आशा, चौकटीबाहेरच्या स्त्रिया, गोकुळ मासिक प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे मार्च १९९४, पृष्ठ क्र. १५
* सांगोलकर, शिक्षण प्रक्रिया व समाज, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे २००६
* साने गीता, भारतीय स्त्रीजीवन, मौज प्रकाशन मुंबई, ऑगस्ट १९८६, पृष्ठ क्र. २
* शेंडे कुसुमताई, उतराई, श्री. अ. ल. शेंडे, राजहंस रत्नप्रभा प्रकाशन, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, पुणे २००९, पृष्ठ क्र. ४२, ४३
* शिंदे ताराबाई, स्त्री–पुरुष तुलना, रघुवंशी प्रकाशन, शुक्रवार पेठ, पुणे – २ (म. फुले यांच्या १०० व्या पुण्यतिथी निमित्त प्रकाशन) पृष्ठ क्र. २३
* शर्मा विजेंदर, Women Education Changing Scenario, लक्ष पब्लिकेशन, पुणे
* तेरणीकर सुलभा, गाथा शतकाची, सचिव महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, कर्वेनगर, पुणे – ५२, २००७, पृष्ठ क्र. ४८
* त्रिभुवन शैलेश, डॉ. धोंडो केशव कर्वे, शब्दाली प्रकाशन, पुणे २००७
* झोडगे फुलवंताबाई, पहिली भारतीय शिक्षिका सावित्रीबाई फुले, कालिदास दत्तात्रेय झोडगे, बिबवेवाडी, पुणे

मासिके

* कांबळे सर्जेराव, ''स्त्रीवाद : संकल्पना व स्वरुप'', सक्षम समीक्षा, एप्रिल–मे–जून–२०१३, पृष्ठ क्र. ४०.
* महाजन अतुल, ''स्त्री – पुरुष समानता'', श्रेष्ठता आणि परस्परपूरकता, परामर्श, एप्रिल २०१७, पृष्ठ क्र.११, २९
* पंडित इंदिराबाई 'स्त्रियांना उच्चप्रतीच्या शिक्षणाची जरुरी आहे का?' स्त्री विकासाच्या पाऊलखुणा, संपादक स्वाती कर्वे, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००३, पृष्ठ क्र. १२५
* प्रभूदेसाई आनंदीबाई, 'स्त्रियास उत्तम शिक्षणक्रम कोणता?' स्त्री विकासाच्या पाऊलखुणा, प्रथमावृत्ती २००३, पृष्ठ क्र. ११७

* टेंकाळे सुवर्णा, 'स्त्रीमुक्ती म्हणजे काय?' परामर्श, मे २०१२ ते एप्रिल २०१३, डॉ. सदानंद मोरे, तत्वज्ञान विभाग, पुणे विद्यापीठ, पृष्ठ क्र. ८७

नियतकालिक

* मगदूम वृषाली 'एका शिक्षणाच्या अभावापायी', प्रेरक ललकारी, जानेवारी २०१७, पृष्ठ क्र. ४

हस्तपुस्तिका

* होईन मी स्वयंसिद्धा, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे मार्च २००५,पृष्ठ क्र . १०

स्मरणिका

* स्मरणिका महिलाश्रम हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, कर्वेनगर, पुणे २००७ शताब्दी महोत्सव
* भाऊबीजनिधी नवती महोत्सव २००९
* स्मृतिगंध, महिलाश्रम हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय रौप्य महोत्सवी वर्ष २०१०
* पालवी, श्री सिद्धीविनायक महिला महाविद्यालय कर्वेनगर, पुणे, अंतरंग उमलत्या मनाचा, कन्याशाळा, सातारा
* सेवा, महोत्सव विशेषांक ९ नोव्हेंबर १९६७

अहवाल

* म. कर्वे स्त्री शिक्षण संस्था, कर्वेनगर, पुणे–५२, १२१ वा वार्षिक अहवाल २०१६–२०१७
* १०५ वर्षांचे जीवनदर्शन, हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, पुणे

वृत्तपत्र

* साबणे अरुणा, 'बायकोनेच नवऱ्याला झोडपले तर चालेल.....?' महाराष्ट्र टाईम्स २३ जुलै २०१६
* शुक्ला रश्मी, 'मुलीच्या संगोपनात भेद नको', महाराष्ट्र टाईम्स २३ जुलै २०१६

वेबसाईट

* शोधगंगा
* शोधगंगोत्री
* www.t.m.v.com
* www.census.co.in

संशोधने

* बागले बा. म. (२००६) प्रवरानगर परिसरातील पद्मश्री डॉ. विखे पाटील यांचे शैक्षणिक कार्य व त्याची परिणामकारकता यांचा अभ्यास.
* चौधरी श्रावण (१९८८) लोकमान्य टिळक यांचे शैक्षणिक कार्य.
* गागरे शं. बा. (२०००) पांडुरंग शास्त्री आठवले यांच्या शैक्षणिक विचारांचा समाजावर झालेल्या प्रभावाचा अभ्यास.
* Gupta R. P. (1985) A Study of educational thoughts of Swami Vivekand
* जाधव दिलीप (२०११) म. फुले व म. कर्वे यांचे स्त्रीसुधारणाविषयक योगदान (सन १८४८ ते १९४८)
* कदम गोविंद (२०१०), एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील समाजसुधारकांचे शैक्षणिक विचार : एक चिकित्सक अभ्यास.
* कांबळे गीता (२०११) शांताबाई दाणी यांच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास.
* मांडगे सुदाम (२०११) रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील.

  यांच्या पत्रांमधून व्यक्त होणाऱ्या शैक्षणिक प्रेरणा व त्यांचा शैक्षणिक कार्यावरील प्रभावांचा अभ्यास.
* Nair V. S. (1980) Educational ideas of Swami Vivekand
* पारघे शर्मिला, (२००७) मा. अण्णा हजारे यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा राळेगण

सिद्धीच्या संदर्भात समाजावर पडलेल्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास.

* पवार चंदन (२०१०) म. फुले व सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक विचार व योगदान आणि आजच्या शिक्षणासाठी त्याची उपयुक्तता यांचा अभ्यास.

* Puthiyath J. D. (1978) Educational Philosophy of Swami Vivekand

अनुक्रमणिका

परिशिष्ट

अ. क्र.	शीर्षक	पान क्र.
अ	प्रश्नावली	२१३
ब	महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था शाखा विस्तार	२१८
क	महर्षी कर्वे यांचे विचार धन	२२१
ड	वर्तमानपत्रातील कात्रणे	२२३

अ – प्रश्नावली

टिळक महाराष्ट्र विद्यापीठात पीएच.डी. या पदवीसाठी

'महर्षी कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेल्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास व त्याचा स्त्री जीवनावरील दृश्य परिणाम'

या विषयाकरिता मुलाखतीसाठी प्रश्नावली

(म. कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या विद्यार्थिनींसाठी)

सदर माहितीचा उपयोग केवळ संशोधनासाठी केला जाईल.

प्रश्नावली क्रमांक : – ☐☐☐

दिनांक : – ☐☐☐

विभाग अ – मुलाखतदात्याची माहिती

अ १. – संपूर्ण नाव –

अ २ – संपूर्ण पत्ता –

अ ३ – फोन नं. –

अ ४ – व्यवसाय / नोकरी –

अ ५ – संस्थेतील शिक्षणाचा कालावधी –

विभाग ब – संस्थेबद्दल माहिती व अभिप्राय

ब १. संस्थेविषयी कोणती माहिती द्याल?

.....

.....

ब २ . संस्थेबद्दल तुम्हाला काय वाटते ?

.....

.....

ब३. संस्थेच्या कार्याचे मूल्यमापन कसे कराल?

.....

.....

विभाग क – म. कर्वे व्यक्ती व कार्याबद्दल माहिती व अभिप्राय

क १. म. कर्वे यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क आला होता क? असल्यास कोणत्याप्रकारे ?

.....

.....

क २. म. कर्वे यांच्या स्वभावाचे कोणते गुण / पैलू दिसून आले?

.....

.....

क ३. म. कर्वे यांचे स्त्री शिक्षण विषयक कार्य खालीलपैकी कोणत्या दृष्टीने महत्त्वाचे वाटते?

पैकी प्रत्येकी किती गुण द्याल?

अ) सामाजिक ☐ ब) शैक्षणिक ☐

क) कौटुंबिक ☐ ड) आर्थिक ☐

इ) यापेक्षा वेगळे उत्तर व स्पष्टीकरण

.....

क ४. म. कर्वे यांच्या स्त्रीविषयक शैक्षणिक कार्याचे मूल्यमापन कसे कराल?

.....

.....

क ५. म. कर्वे यांच्या कार्याचा, विचारांचा तुमच्यावर कोणता प्रभाव पडला? का ?

.....

.....

क. ६. सद्यस्थितीत म. कर्वे यांच्या कार्याची उपयुक्तता वाटते का?

.....

.....

क ७. म. कर्वे यांचा तुमच्या जीवनावर कोणता परिणाम झाला ?

.....

.....

विभाग ड – संस्थेतील शिक्षणाचा दृश्य परिणाम

ड १. स्त्री शिक्षणाबद्दल तत्कालीन (१८ वे शतक) समाजाचा / कुटुंबाचा दृष्टीकोन कसा होता?

.....

.....

ड २ . सद्यस्थितीच्या तुलनेत शिक्षणाच्या कोणत्या सुविधा उपलब्ध होत्या/नव्हत्या?

.....

.....

ड ३. तुमच्या कौटुंबिक जीवनाला शिक्षणामुळे कोणता फायदा / उपयोग झाला?

अ) अर्थाजन करता आले. ☐

ब) मुलांवर संस्कार करता आले. ☐

क) कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे सांभाळता आली. ☐

ड) काही विशिष्ट सवयी लागल्या उदा. काटकसर, बचत, समाजसेवा ☐

इ) यापेक्षा वेगळे उत्तर व स्पष्टीकरण

.....

ड ४. त्यावेळी कोणता उपयुक्त अभ्यासक्रम शिकविला जात होता? त्याचा प्रत्यक्षात कसा उपयोग झाला?

अ) गृहशास्त्राचा उपयोग गृहिणी म्हणून झाला. ☐

ब) दैनंदिन व्यवहारज्ञान मिळाले. ☐

क) कला – शिक्षणाचा उपयोग झाला. ☐

ड) आत्मविश्वास मिळाला. ☐

इ) यापेक्षा वेगळे उत्तर व स्पष्टीकरण

.....

ड ५. शिक्षणामुळे सामाजिक जीवनात स्त्री म्हणून कोणते बदल जाणवले?

अ) आत्मविश्वास निर्माण झाला. ☐

ब) स्वावलंबी जीवन / वैयक्तिक स्वातंत्र्य मिळाले. ☐

क) कुटुंबात स्त्रीला अधिकार व निर्णयस्वातंत्र्य मिळाले. ☐

ड) स्त्री – पुरुष समानता जाणवली. ☐

इ) यापेक्षा वेगळे उत्तर व स्पष्टीकरण

.....

.....

ड ६. शिक्षणामुळे झालेल्या फायद्यांसाठी खालीलपैकी कोणत्या गोष्टीस जास्त महत्त्व द्याल?

प्रत्येकी १० पैकी किती गुण द्याल?

अ) आत्मविश्वास ☐

ब) सामाजिक प्रतिष्ठा ☐

क) साक्षरता ☐

ड) समाजसेवेचे व्रत ☐

इ) यापेक्षा वेगळे उत्तर व स्पष्टीकरण

.....

.....

ब) महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था

शाखा विस्तार

* शैक्षणिक शाखांचे नाव व विद्यार्थी संख्या *

क्र	शाखेचे नाव	विद्यार्थी संख्या
१	श्री सिद्धीविनायक महिला महाविद्यालय	२७६५
२	कमिन्स अभियांत्रिकी महिला महाविद्यालय	२६०३
३	डॉ. भानुबेन नाणावटी वास्तुशास्त्र महिला महाविद्यालय	११४७
४	हिराबेन नाणावटी व्यवस्थापनशास्त्र महिला महाविद्यालय संशोधन संस्था	२५६
५	श्री मणिलाल नाणावटी व्होकेशनल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट	८५०
६	के.बी.जोशी आय.टी. इन्स्टिट्यूट व संगणक पदवी महाविद्यालय	२१२
७	स्कूल ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी	६७२
८	श्रीमती बकुळ तांबट इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन	४२०
९	स्कूल ऑफ मिडिया ॲक्टिव्हिटी रिसर्च ॲन्ड टेक्नॉलॉजी	३०
१०	महिलाश्रम हायस्कूल, कर्वेनगर (माध्यमिक, उच्च माध्यमिक व व्यवसाय शिक्षण)	४३३२
११	कन्याशाळा, सातारा (माध्यमिक, उच्च माध्यमिक व व्यवसाय शिक्षण)	३०१२
१२	कन्याशाळा, वाई (माध्यमिक, उच्च माध्यमिक व व्यवसाय शिक्षण)	१६२६
१३	विद्यापीठ हायस्कूल, पुणे	६०२
१४	एरंडवणे माध्यमिक विद्यालय, पुणे	४२३

१५	पार्वतीबाई अध्यापिका विद्यालय, कर्वेनगर, पुणे	५३
१६	भास्कररराव कर्वे अध्यापक विद्यालय, एरंडवणे, पुणे	४८
१७	आनंदीबाई कर्वे प्रा. शाळा, कर्वेनगर, पुणे	४२१
१८	शिशुविहार प्राथमिक विभाग, कर्वेनगर, पुणे	८८५
१९	शिशुविहार, प्राथमिक विभाग, विद्यापीठ, पुणे	२८९
२०	शिशुविहार पाथमिक विभाग, एरंडवणे, पुणे	४२७
२१	जानकीबाई प्रेमसुख झंवर मराठी शाळा, सातारा	४२६
२२	नवीन मराठी शाळा, वाई	४१९
२३	शिशुविहार पूर्व प्राथमिक, विद्यापीठ	३३
२४	शिशुविहार पूर्व प्राथमिक, एरंडवणे	४५
२५	शिशुविहार पूर्व प्राथमिक, कर्वेनगर	३९९
२६	बाल मनोहर मंदिर, सातारा	२२०
२७	बालक मंदिर, वाई	२६२
२८	महिलासदन शिवणवर्ग सातारा	३५
२९	टाईपरायटींग इन्स्टिट्यूट, सातारा	२००
३०	बालवाडी/अंगणवाडी प्रशिक्षण केंद्र, सातारा	५०
३१	कला तंत्रनिकेतन, वाई	१४१
३२	मुक्तांगण टाईपरायटींग इन्स्टिट्यूट, कर्वेनगर, पुणे	६००
३३	व्हिजन इंग्लिश मिडियम स्कूल, पुणे	१२२५
३४	व्हिजन इंग्लिश मिडियम स्कूल, वाई	५५१
३५	व्हिजन इंग्लिश मिडियम स्कूल, सातारा	६०
३६	प्रा. म. ना. अदवंत प्राथमिक विद्यामंदिर, कर्वेनगर, पुणे	६०२
३७	रत्नागिरी प्रकल्प संगणक पदवी महाविद्यालय व इतर शाखा	३९३
३८	संगणक पदवी महाविद्यालय व आर्टस्–कॉमर्स, सातारा	८५१

३९	शिक्षणशास्त्र महिला महाविद्यालय, रत्नागिरी	१९
४०	नागपूर, प्रकल्प, नागपूर	
	(बालवाडी–पाळणाघर प्रशिक्षण व इतर)	२२
४१	श्रीमती शकुंतला नरगुंदकर शिक्षाशास्त्री (बी.एड.)	
	महाविद्यालय, नागपूर	२२७
४२	श्रीमती सीताबाई नरगुंदकर नर्सिंग महाविद्यालय, नागपूर	२२
४३	कमिन्स अभियांत्रिकी महिला महाविद्यालय, नागपूर	३२६
४४	श्रीमती शकुंतला नरगुंदकर अध्यापक विद्यालय, नागपूर	९७
४५	कॉम्प्युटर ॲकॅडमी, सातारा	१६८९
४६	प्राथमिक/माध्यमिक आश्रमशाळा, कामशेत	
	ता. मावळ, जि. पुणे ४२३	
४७	संगणक पदवी महाविद्यालय, वाई	८१
४८	व्यवसाय शिक्षण केंद्र, वसई	२०

क) महर्षी कर्वे यांचे विचार धन (मालती देशपांडे)

* सार्वजनिक उद्योग हाती घेणाऱ्या मनुष्याचे मन थोर असले पाहिजे. स्वतःच्या संस्थेवर विशेष प्रेम असणे, तिच्यासाठी रात्रंदिवस घडपडणे जरूर आहे, हे खरे आहे तथापि अशा मनुष्यांच्या मनात मनुष्यजातीच्या व समाजाच्या प्रगतीसाठी जी माणसे, ज्या संस्था झटत आहेत त्यांच्याबद्दल प्रेमभाव व सहानुभूती असणे अत्यंत आवश्यक आहे.

* मतभेद हे सर्वत्र असावयाचेच. पण त्याच्या मुळाशी व्यक्तिविषयक भावना नसून राष्ट्रीय भावना असली पाहिजे म्हणजे ते सद्‌बुद्धीने चाललेल्या कार्याच्या आड येत नाहीत.

* जसजसे मनुष्य आत्मपरीक्षण, आत्मसंशोधन करू लागेल तसतसा त्याचा आत्मोन्नतीचा मार्ग अधिकाधिक सुलभ होत जाईल.

* मनुष्य अस्तिक असो नास्तिक असो. त्याचे या जगातील जीवित एक अलौकिक चीज आहे. तिचा उपयोग फार दूरदर्शीपणाने, शहाणपणाने केला पाहिजे.

* आत्मोन्नतीसाठी तळमळ उत्पन्न होणे हे मनुष्यपणाचे पहिले चिन्ह होय. पदोन्नतीच्या द्वारे आत्मोन्नती साधण्यासाठी धडपडणे ही त्यावरची पायरी होय.

* कोणत्याही कार्यावर निस्सिम प्रेम जडल्यावाचून मनुष्याच्या हातून समाधानकारक काम होत नाही.

* स्त्री शिक्षणाच्या कार्याची लांबी, रुंदी, खोली वाढविण्याच्या महत्कार्यासाठी मी आपले जीवित अर्पण करीन अशी मनाची तयारी असली पाहिजे.

* आपण दीर्घायुषी होण्याचा जसा प्रयत्न करीत असतो तसा आपल्या संस्था दीर्घायुषी करण्याचा प्रयत्न आपण करावा.

* संस्था अल्पायुषी होण्याची जी कारणे आहेत त्यापैकी जमाखर्चाची अव्यवस्था व पैशाची अफरातफर हे आहे.

* अडचणीचे प्रसंग हे मनुष्याचे खरे शिक्षक होत.

* मनुष्याची किंमत त्याच्या मतावर नाही तर त्याच्या आचरणावर आहे.

* ऐहिक, पारलौकिक स्वार्थापलिकडे काहीही नाही, असे विचार मनुष्य फार काळ करीत राहिला तर त्याच्या मनाला समाधान मिळणार नाही. मी काय केले असता माझ्या जन्माचे सार्थक होईल हा विचार मनुष्याच्या श्रेष्ठ मनोवृत्तीचा दर्शक आहे.

* आपणाला कोणी शत्रू उत्पन्न होऊ द्यायचा नाही हे करणे जसे अशक्य कोटीतले आहे तसेच आपण कोणाचे शत्रुत्व करायचे नाही हे करणे नाही. अर्थात तुलनेच्या दृष्टीने दुसरे पहिल्यापेक्षा सोपे इतकेच.

* जुने जसेच्या तसे सांभाळून ठेवण्यात अर्थ नाही, शहाणपणा नाही. जुन्या-नव्यांचा एकजीव होऊन जुन्यातून नवे उक्रांत होणे हीच जुन्याची खरी वाढ होय.

* राष्ट्रीय ग्रंथ, राष्ट्रीय पुरुष, राष्ट्रीय परंपरा ही सर्व राष्ट्रीय जीवन होत.

* चांगले विचार फार काळ टिकत नाहीत. ते तीव्र असतानाच मनुष्याने चांगले कार्य उरकून घ्यावे.

●●●

ड) वर्तमानपत्रातील कात्रणे



महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी महिलांसाठी उच्च शिक्षणाची दारे खुली केली. त्याला ९९ वर्ष पूर्ण होऊन आज ही शैक्षणिक चकचक शतकमहोत्सवी वर्षात पदार्पण करत आहे. त्यानिमित्ताने सांगितलेली विद्यापीठाची यशोगाथा...

» वसुधा कामत

एसएनडीटी
महिलासक्षमतेचं
विद्यापीठ

महर्षी कर्वे यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी

कर्वे संस्थेच्या वर्धापन दिनात सहस्रबुद्धे यांचे मत



समाजाच्या सहकार्यातूनच थांबतील स्त्रीभ्रूण हत्या

यशोशिखर गाठण्यासाठी स्वातंत्र्य द्या

तिहेरी तलाकविरोधी विधेयकाद्वारे मुस्लिम स्त्रियांना दिलासा मिळवून देण्याची सुरू असलेली घाई आणि दुसऱ्या बाजूला मंदिर प्रवेशासाठी स्त्रियांकडे दयावे दाखले मागणे, फेंगशुईबाल बुरखी ताशरण्यावर बंदी घालण्यासारख्या घटना घडत आहेत. एकाच देशात स्त्रियांसंदर्भात सुरू असलेल्या या विरोधाभास दर्शवणाऱ्या घडामोडी परिस्थितीचा गांभीर्याने विचार करायला लावणाऱ्या आहेत.



मुलीच्या संगोपनात भेद नको

भेदभावाला महिलाही जबाबदार असल्याचे पोलिस आयुक्तांचे मत

महिलांना 'माणूस' म्हणून किंमत द्या

पुरुषसत्ताक व्यवस्थेने स्त्रीला दुय्यम लेखले



'... अन् स्त्री शक्तीचा सन्मान राखला जाईल'

स्त्री-पुरुष असमानतेची दरी दूर करण्याचा निर्धा



गुरुकुलातले दिवस

आत्मविश्वास, निर्भयपणा, सचोटी हे गुण 'हिंगणे स्त्री-शिक्षण संस्थे'ने आमच्या अंगी अगदीसहजपणे बहाल केले आणि त्याचा मैत्रिणी याच वास्तूमुळे आम्हाला लाभल्या!




मुक्तपीठ

मैत्रीची पाऊणशे वर्षे



व्यावहारिक शिक्षणाची समाजाला गरज

'एसएनडीटी'च्या कुलगुरू शशिकला वंजारी यांचे मत



'एसएनडीटी'च्या होम सायन्स महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या समता समारंभप्रसंगी उपस्थित मान्यवर.

रंगला माजी विद्यार्थिनींचा मेळा